म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय ......आरोग्य......
दा.क्र. १४१५६

IRBK-0114156

# मनोगत

हा कथा-संग्रह प्रकाशित करण्यासाठीं प्रोत्साहन गुरुवर्य प्रा. माधव मनोहर यांचं. कथांचे पहिले टीकाकारही तेच म्हणून तरी तो प्रकाशित करण्याचा धीर केला.

सौ शिरीष पै, सौ. विजया राजाध्यक्ष व शां. शं. रेगे यांनीही या कथा निरलसपणे वाचल्या इतकंच नव्हे, तर त्यात मौलिक सूचनाही केल्या कांही पहिल्या वहिल्या कथा ठोमऱ्यानी वीणासारख्या दर्जेदार मासिकात प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

कथेच्या प्रांतात पहिलं पाऊल टाकलं, तेव्हां न कुरकुरता, कंटाळता कथा वाचल्या प्रा. वि. ह. कुलकर्णी यांनी.

या सर्व प्रथितयश साहित्यिकांच्या सहाय्यावाचून माझ्या साहित्याचं पान पुढं हलणं शक्य नाही, याची मला पूर्ण जाणीव आहे. त्यांच्या आभाराचं न फिटणारं ऋण शब्दांकित करणं वेडेपणाचं. तसंच न करणंही कृतघ्नपणाचं. म्हणूनच केवळ हा अट्टाहास.

श्री. मोहन वाघ यानी नेमक्या नि मोजक्या वेळात मुखपृष्ठ मोठ्या कल्पकतेनं व कलात्मक रीतीनं तयार करून दिलं. तेव्हां त्याचेही आभार. जाता जाता ज्या लहान थोर साहित्यिकांनी व हितचिंतकांनी मला सहाय्य केलं, त्यांचे आभार मी मानले नाहीत; तर ते कृतघ्नपणाचं ठरेल.

शेवटी या सर्वांच्या सदिच्छा माझ्या उभ्या आयुष्यात माझ्या पाठीशी रहाव्यात, हीच इच्छा व आशा.

—लेखिका

तीं. कै. दादा नि आओ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ६३७६६ दि ...कथा...
क्रमांक ...२१२५ नोंद दि ३।३।६७

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. १०९५६ नों. दि .............
...कथा...... क्र. ..................

■ १ ■

# 'ग म भ न'

IRBK-0114156

शैलेशच्या दप्तरांतून पाटीपेन्सिल काढून मी शैलेशला हाक मारते.

" शैलेश, घरांत ये बघू आतां. अजून खेळ संपला नाही तुझा ? "

तो आपल्याच खेळांत गुंग.

बाहेर अंधारून आलंय. आधींच संध्याकाळची काळोखी. तिला पावसाच्या काळोखानं घातलेली गच्च मिठी. खरं म्हणजे आता नीटसं दिसत नाहीं. पण सोसायटींतलीं दोन तीन मुलं नि शैलेश यांचा खेळ अजूनहि चालूच.

' शैलेश, '...माझी पुन्हा मोठ्यानं हाक.

पण शैलेशच्या तें गांवींहि नाहीं. तो आपल्याच तंद्रींत.

काय करावं बाई या पोराला ! केव्हांची हाक मारतेय पण ऐकूं जाईल तर शपथ ! शाळेंतून घरीं आला. रेनकोट काढून खुर्चीवर भिरकावला. दप्तर दारांतच फेकलं. माथींच मारलं म्हणून कपभर दूध ढसाढसा ढोसलं. दोन तीन बिस्किटं चड्डीच्या खिशांत कोंबलीं. एक दोन तोंडांत. ती धड खायलासुद्धां उसंत नाहीं. अन् खेळायला पळाला. गेले आठ पंधरा दिवस हे अस्सं चाललंय, शाळा सुरू झाली तरी. ह्याचं सगळं लक्ष सदा खेळांत.

नुकतंच शाळेंत नांव घातलंय यंदा. मग सुरुवाती सुरुवातीपासून थोडा तरी रेग्युलर अभ्यास नको करायला ? शाळेत एकेका वर्गात छप्पन्न छप्पन्न मुलं.

प्रत्येकाकडे लक्ष पुरवायला बाईंना कुठला वेळ ? घरीं अभ्यास करून घ्यायलाच हवा अर्धा तास...पंधरा मिनिटं तरी.

नुसत्या हाकांनीं शैलेश वर येण्याचं चिन्ह दिसत नाहीं.

मी तरातरा खालीं जाऊन शैलेशला जवळ जवळ उचलूनच घरांत घेऊन येते.

" शैलेश, मुकाट्यानं आतां अभ्यासाला बस आधीं. "

मी जबरदस्तीनं त्याला हाताला धरून खालीं बसवते. त्याच्या हातात पाटी-पेन्सिल देते.

" हं सांग बघू , आज काय शिकवलं शाळेंत ? "

" पण आई, मला आधीं खायला..." त्याचा थोडा केविलवाणा, थोडा रडवेला स्वर.

" अरे, पण मघाशीं शाळेंतून आल्यावर तर तुला खायला दिलं नि तू खालीं खेळायला गेलास. आतां पुन्हा कसलं खायला दे ? "

' पण भूक लागलीय मला. '

' एवढ्यांतच कशी भूक लागली ? '

" पण लागली त्याला काय करूं ? आणि कित्ती वेळ खेळलो नाहीं का खालीं ?"

" पण आतां आधीं अभ्यास, मग खाणं..."

" अग पण अभ्यास कसा सुचणार भूक लागली असतांना ? "

" मग खायला बरं सुचतं अभ्यास राहिला असतांना ? "

हल्लीं या पोरांना बोलायलाहि बरं सुचतं. म्हणे अभ्यास कसा सुचणार भूक लागली असली तर ? मोठ्या माणसांनीं वापरलेले शब्द ऐकून ठेवतात नि नेमके कसे अचूक वापरतात.

" हं. सांग बघू काय अभ्यास झाला शाळेंत. "

" आई...शी..."

" काय बाबा आला ? " माझा त्रासिक स्वर. याची कटकट कधी संपायची नाही असा अर्थ ध्वनित करणारा.

' शी ' लागली असल्याचं तो बोटानं दाखवतो. अन् चड्डी काढायला सुरुवात करतो.

मला वाटलंच तें. या पोरांच्या मनांत नसली एकादी गोष्ट करायचं कीं यांना नेमकी 'शी' लागते, पोटांत दुखायला लागतं.

"खोटं. तुला अभ्यास करायचा नाही म्हणून सांगतोस सबब."

"अग नाहीं, आई. खरंच घाईची लागली." तो संडासाकडे धावतोही बोलतां बोलतां.

मी मुकाट्यानं त्याची चड्डी काढायला सुरुवात करते.

"मी काढतों. थांब ना. तुला नाहीं यायची लौकर काढतां."

"ठीक आहे, बाबा तू काढ." मी मुकाट रहाते.

'पाद पण नांद' हा हेतू मनात.

तो संडासांत जाऊन बसतो. मी तिथेंच उभी राहून बेसिन धुवूं लागते.

तो संडासात बसून शाळेत शिकवलेली कविता म्हणतो. मधेच तो एकदम उठून उभा रहातो डोक्यावर हात घेऊन.

"काय रे, झालं का?"

तो तसाच कविता म्हणत उभा रहातो. जणूं मी त्याला कांहीं विचारलंच नाहीं.

"अरे, गात काय बसलाहेत संडासांत? झालं का तुझं?"

"नाहीं."

"मग उभा कशाला राहिलास डोक्यावर हात घेऊन? शर्ट वर घे बघू. खराब होईल नं सगळा."

"थांब ग जरा..." शैलेशचा जरा त्रासिक स्वर. कपाळावर आठ्यांचं जाळं.

"अरे थांब काय! व्हायचं असेल, तर नीट बस बघू."

"अग पण कविता पाठ करतोय."

"संडासात? अन् मग उभा कशाला राहिलास मधेच?"

"कांहीं कळत नाहीं आई तुला. अग बाईनीं हे डोक्यावर हात घेऊन उभं राहून म्हणायला सांगितलंय."

मी गप्प. काय बोलणार यावर?

त्याचा कार्यक्रम झाल्यावर ओलं अंग टॉवेलानं कोरडं करीत तो बाहेर येतो.

"हं चल. आतां तरी बस अभ्यासाला."

शैलेशला माझ्याकडून कांहीं शिकायचं नाहींयाय. पण त्याला शिकवण्याची 'माझीहि जिद्द दांडगीच.

" चल लौकर. पाटी पेन्सिल घे. तासन तास अंग कोरडं करीत बसलाय. विनाकारण चेंगटपणा. हं आटप. मी गमभन शिकवते तुला. "

पाटीवर मी ग म भ न ही अक्षरं काढते. पण शैलेशला त्याचं ढिम्म नाहीं. तो आतां सायकलवर स्वार झालाय. अन् खोलींतल्या खोलींत सायकल फिरवतोय.

" कम्माल आहे बाई या पोराची ! कसा करून घ्यायचा याच्याकडून अभ्यास ? किती टाळंटाळ तरी करायची ! "

मला त्याचा भारी राग येतो. एवढंसुद्धां ऐकत नाहीं म्हणजे काय ? मी त्याला सायकलवरून उतरवून बखोट्याला धरून आणून माझ्याजवळ बसवते. उद्यां हा दगड निघाला, म्हणजे लोक दूषण देतील मला. घरांत आई एवढी शिकलेली पण लक्ष कुठें आहे मुलाकडे ? आपण नाहीं लोकांना नांवें ठेवीत ? ते कांहीं नाहीं. याच्याकडून अभ्यास करून घ्यायचाच.

" हं, हें गमभन गिरव बघू. ग ग गणपतीचा; म म मक्यातला; भ भ भटजींतला; न न नळांतला. म्हण एकीकडे तोंडानं म्हण अन् गिरव हं राजा. "

शैलेश मख्खच.

" अरे गिरव न. "

तरीही शैलेश तसाच बसलेला.

" शैलेश..." माझा आवाज चढतो. डोळे वटारले जातात. " गिरव लौकर."

" अं हं. "

" हें पहा आतां ऐकलं नाहींस, तर मार खाशील चांगला..." माझा तसाच चढा सूर अजूनहि. डोळे वटारलेले. मोठे.

" पण मला नाहीं गिरवतां येत..." त्याचा थंड सूर.

" न यायला काय झालं ? उगीच सोंगढोंग करू नको. रात्रीं जेवायला नाहीं मिळणार, दूधसुद्धां नाहीं. उपाशी पोटीं झोपावं लागेल गिरवलं नाहींस तर. "

शिक्षेचा कडकपणा त्याच्या डोक्यांत भरावा म्हणून मी मुद्दाम यादी वाचते. शैलेशनं अभ्यास करण्यासाठीं उपास हा जालीम उपाय आहे, कारण रात्रीं कांहीं खाल्लं नाहीं, तर झोपच येत नाहीं त्याला.

" अगं पण बाईंनीं असं नाहीं सांगितलं आम्हाला..." कसं समजावून सांगायचं या आईला, असा अर्थ त्याच्या शब्दांत अभिप्रेत.

मी मनांतल्या मनांत चरफडते. "जिथे तिथें बाईंनीं नाहीं असं सांगितलं. चुलींत गेल्या तुझ्या त्या बाई..." अर्थात हेंहि मनांतल्या मनांतच.

शैलेश पुन्हा सायकलवर स्वार होतो.

"मग कसं सांगितलंय तुझ्या बाईंनीं? ऐकूं दे तरी मला एकदां."

मला त्याचा मनस्वी राग येतो. वाटतं, एक ठेवून द्यावी चांगली. मी हात उगारतेहि. तो माझ्याकडे पाहून हसतो मिस्किलपणें. नेहमींसारखंच. अन् पटकन पळत पळत येऊन माझ्या गालाचा पापा घेतो. मी पण त्याचा पापा घ्यावा म्हणून ओठांचा चंबू करून माझ्यापुढें उभा रहातो.

या वेळीं हा मोह टाळलाच पाहिजे.

मी पापा घेत नाहींसं पाहून माझ्या ओठांवर आपले ओठ टेकवतो. पुन्हा पळत जाऊन सायकलवर स्वार होतो.

लबाडाला ही हसण्याची कला छान साधलीय कशी अगदीं. माझा राग चालवण्याची.

माझा उगारलेला हात आपोआप खालीं येतो. स्वर मवाळ होतो.

"शैलेश, अरे का बाबा तुझा असा अट्टाहास माझ्याकडनं न शिकण्याचा? हात टेकले खरोखर तुझ्यापुढें."

तरीही शैलेशचं माझ्याकडे दुर्लक्षच.

माझ्याकडनं शिकण्यासारखं कांहींच नाहीं. शिकायचं सर्व कांहीं बाईंच्या-कडून, अशी त्याची ठाम समजूत.

"चल न शैलेश."

"काय ग उगीच भुणभुण आई?"

"अरे भुणभुण कसली? तुझ्या शाळेंतल्या बाईंना कांहीं कळतं का तुला शिकवायला? मग मला नको तुला शिकवायला?"

तो माझ्याकडे थोड्या आश्चर्यानं पहातो.

"न कळायला काय झालं? उलट खूप कळतं आमच्या बाईंना. तुझ्यापेक्षां सुद्धां खूप..." तो नाक उडवून म्हणतो.

माझा अहंकार त्याच्या या आघातानं चांगलाच दुखावतो. (डिवचला जातो.) मी त्याच्यावर मनस्वी चिडते. ओठांवर शब्द येतात, "माझ्या शतांश तरी

अक्कल आहे का तुझ्या बाईंना...” पण ते शब्द मी मागे परतवते. त्याच्यादेखत असे शब्द वापरणं...

‘ हुं ! ’ माझा थोडा तिरस्कार भरला हुंकार. काय हाका मारलं समजतं तुझ्या बाईंना, ठाऊक आहे मला. तुला माझ्याकडंच शिकलं पाहिजे. चल पाहू बिनबोभाट.

तो तरीहि मुकाटच.

“ शैलेश, यायचंय का नाहीं तुला हीं अक्षरं काढायला ? ”

मनात येतं, काय एवढा माझा तरी अट्टाहास त्याला शिकवण्याचा ! पण तरीहि माझा हेका सोडायला मी तयार होत नाहीं.

“ शैलेश, कसं रे समजत नाहीं तुला ? तुला शिकायचंय, खूप खूप मोठ्ठा व्हायचंय, होय न ? मग अभ्यास केल्याशिवाय कसं बरं होईल ? मग येणार कीं नाहीं ? ”

सायकलला पॅडल मारतां मारतां तो वळून माझ्याकडे पहातो. थोडं हसतो. गालांतल्या गालांत. पुन्हा जोरांत पॅडल मारतो.

“ शैलेश, अरे कधीं समजणार तुला ? मला उद्योग नाहीं, म्हणून इथें तिष्ठत बसलें तुझ्यासाठी ? रिकामटेकडी इथें बसायला मला वेळ नाहीं. समजलास ? ”

सायकल वळवून तो ती थांबवतो, माझ्याकडे पहातो. तिथें तसाच बसून. अभ्यास करण्यासाठीं त्याला कॅडबरीचं आमिष नक्कीच पुरेसं आहे.

“ शैलेश, छान अभ्यास केलास नं, तर एक मोठं चॉकलेट घेऊन देईन तुला. मग येतोस न ?...” मी निर्वाणीचं विचारतें.

मनांत म्हणते, रागावून झालं. बाबा पुता करूनही झालं. आतां या उप्पर नाहीं ऐकलंस, तर तू नि तुझं नशीब. मी तरी काय करणार ?

शैलेश सायकलवरनं खालीं उतरतो. माझ्या हातांतली पाटी-पेन्सिल घेतो. पण मला कांहीं समजत नाही, हा भाव अजूनहि त्याच्या चेहऱ्यावर.

माझ्या मनाचा मनस्वी गोंधळ उडतो. खरंच का मला कांहीं समजत नाहीं ?

उघड्या दरवाज्यांतून वाऱ्याची झुळुक येते. तिच्याबरोबर तरंगत, तरंगत हेलकावत आलेले विचार पुटपुटु माझ्या डोक्यांत शिरतात. खरंच का मला कांहीं समजत नाहीं, शैलेशची कल्पना आहे तसं ? माझ्या मनाचा मनस्वी गोंधळ उडतो. मी तंद्रींत शिरते. विचारांच्या.

"हें बघ मी काढलं. कळलं का, आई, तुला हें कसं काढायचं ? घे पाटी-पेन्सिल. काढ बघूं आता."

शैलेश मला गदागदा हलवून म्हणतो.

मी तंद्रींतून बाहेर येते. माझी तंद्री विस्कटते.

"काय काढूं ? काय कळलं का म्हणालास ?"

"गमभन काढायचं गं ?..." माझ्या हनुवटीला धरून माझं तोंड तो त्याच्या हातांतल्या पाटीवरच्या अक्षराकडे फिरवतो.

का कोण जाणे, मी नकारार्थी मान डोलावतें.

"मग काढ. मी सांगतों..." तो माझ्या हातांत पाटी पेन्सिल देतो.

"प्रथम एक आडवी रेघ काढ. त्याला एक उभी रेघ काढ. या उभ्या रेघेपासून थोड्या अंतरावर दुसरी एक उभी रेघ काढ. पहिल्यापेक्षां थोडी मोठी हं. आता पहिल्या उभ्या रेघेला बाहेरून गोल काढ. हा झाला ग ऽ ऽ ऽ..."

माझ्या हातांतली पाटी कोरी. माझा चेहराहि कोराच !

तो माझ्या हातांतल्या पाटीकडे पहातो. मग निरखून माझ्या चेहऱ्यावरचे भावहि.

"कां ऽ हीं समजलं नाहीं ? थांब हं. मी सांगतों पुन्हा समजावून."

अगदीं बाईंच्या तोंडचेच शब्द. जणूं टेपरेकॉर्ड केलेले.

मी खालीं ठेवलेली पाटी पेन्सिल पुन्हा माझ्या हातांत देत तो म्हणतो... "हं काढ. मी दाखवतों तुला इथें काढून."

ग काढण्याची सगळी कृति तो जरशीच्या तरशी सांगतो. पाकशास्त्रांतल्या कृतीसारखी.

खडूनं तो लादीवर ग काढून दाखवतो.

मी मुकाट्यानं पाटी-पेन्सिल हातांत घेते.

गमभन शिकण्यासाठीं. माझ्याच मुलाकडून.

■ ■

■ २ ■

# मृत्युगोल

दादर स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यानं ती तरातरा चाललीय. मधेंच ती आपल्या मनगटी घड्याळाकडे पहाते आणि पावलं आणखीच जलद् उचलायला सुरुवात करते. नऊ सत्तावीसची लोकल गांठायलाच हवी. आधींच तीन लेट झालेत. आज लेट झाला, तर एक कॅज्युअल कापली जाईल. तिचीं पावलं आणखीनच जलद् पडूं लागतात. ती आतां चालत नाहींच. धांवतेयच जशी. कशीबशी ती लोकल गांठते. आणि गाडींतल्या गर्दींत मिसळते; धक्केबुक्के खात; कुठें हेतुपूर्व तर कुठें निर्हेतुक दिलेले. तिला वाटतं, या गर्दींत आपण विरघळून जाऊं एखाद्या दिवशीं, पाण्यांत साखरेचा किंवा मिठाचा खडा विरघळावा तशा. क्रूसाला लटकावल्यासारखीं माणसं गाडींतल्या हॅंगरांना लटकलेलीं आहेत. तिलाहि रोज असंच उभं रहावं लागतं. कारण गाडी कर्जत, कल्याण-पासूनच जंवळ जवळ सगळी भरून येते. अंगाला अंग घासताहेत. श्वासांत श्वास मिसळून जाताहेत. परळला गाडी थांबते. कांहीं लोकं तरी इथें उतरावींत. गर्दी कमी व्हावी. पण तसं होत नाहीं. दोन तीन उतरतात. दहाबारा चढतात. संख्या जास्तच वाढते. वाढत्या गर्दीबरोबर ती आणखीच आंत रेटली जाते. दोन बाकांच्यामधें ढकलली जाते. कुणाच्या तरी अंगावर जाऊन आदळते. बाकावर जांभया देत बसलेला भय्या म्हणतो,

"बाई, बायकांच्या डब्यांत जायचंत तुम्ही."

तिला वाटतं, हा डबा परवडला. बायकांचा डबा आणखीच वाईट. नेहमीं ती बायकांच्या डब्यांतच चढे. तिथें गर्दी तर तशीच. त्यांत शिवाय आणखी भांडाभांडीं, कचकच, कोलाहल, मुलांच्या मुताचे ओघळ, मासळीचा कुबट वास, आंधळ्या, महारोगी भिक्षेकरणींचा सुळसुळाट. त्यापेक्षां हा डबा बरा. निदान मुताची घाण नाहीं. मासळीचा कुबट वास नाहीं. भिक्षेकऱ्यांना आंत शिरायला जागा नाहीं. पण तिचे हे विचार मनांतल्या मनांतच रहातात. भय्याशीं ती कांहींच बोलत नाहीं.

' छे, छे, छे, छे ! कमाल आहे तुमची ! एवढे काऊन्टस तुमच्याकडे अन् तुम्ही एक हाट देऊन गप्प बसतां ? '...तिच्या कानावर गाडीच्या आवाजांत मिसळलेले ते शब्द पडतात.

कर्जत, कल्याणपासून ऑफिसला जाणाऱ्या लोकांचे ठरलेले कंपू आहेत. गाड्या तिथूनच सुटत असल्यामुळें त्यांना बसायला चांगली जागा मिळते. त्यांचा ब्रिजचा किंवा रमीचा डाव चांगलाच रंगतो. ब्रिजचा डाव संपल्यावर नेहमीं लोकांची आपांपसांत चर्चा, वादावादी चालते.

गाडींतल्या बऱ्याच लोकांचं लक्ष आपोआपच ब्रिजवाल्यांच्याकडे वळतं. त्याबरोबर तिचंहि. एका कोपऱ्यांत प्रचलित राजकारणावर कडाक्याचा वांझोटा वाद चालू असतो. कांहीं पेपर वाचण्यांत, तर कांहीं रहस्यकथा किंवा पॉकेट बुक्ससारखीं पुस्तकं, मर्डर स्टोरीज वाचण्यांत गुंग असतात. सगळं रोजचंच ठरलेलं. जणूं कुणीतरी आंखून दिलेलं.

बोरीबंदरच्या फलाटावर गाडी थांबते न थांबते, तोंच गाडींतली गर्दी फलाटावर कोसळते नि ऑफिसकडे धांवत सुटते. तीहि त्यांतच असते. मोटारींची, बसेसची रीघ लागलेली असते. वाहनांच्या ट्रॅफिकसाठीं माणसांचा ट्रॅफिक अडवला जातो. ती थोडी अस्वस्थ होते. नेहमीं हें असंच होतं. बसच्या क्यूंत उभं रहावं, तर हवी ती बस लौकर कधींच मिळत नाहीं. दुसऱ्या रूटच्या अनेक बसेस जातांना दिसतात. पण त्या रूटसाठी उभं रहावं, तर तीच तऱ्हा. तिला भारी राग येतो बसचा. गाडींतून यावं तर नेहमीं लाल दिवा विकट हास्य करीत पुढें उभा. तिला तो लाल दिवा मुळींच आवडत नाहीं. रोज रोज अस्सा मेला वाटेंत आडवा येतो नि छळतो. काळ्या मांजरासारखा. वेळेवर मस्टरवर सही होणार कीं नाहीं ?

सिग्नल मिळतो. हिरवा उजेड डोळ्यांत भरतो. माणसांचा मोठा तांडाच्या तांडा ऑफिसच्या दिशेनं धांवत सुटतो. उंच टाचांच्या चप्पलांचे नि बुटांचे आवाज जिन्याच्या हृदयाची धडधड वाढवतात. मस्टरसाठीं घोळका जमतो. तीहि त्यांतच उभी. सही करून ती आपल्या टेबलावर येऊन बसते. टेबलावर कागदांची रास आहे. आज हे सर्व कागद काढलेच पाहिजेत. तिची नजर त्यांत बुडून जाते. इतरांच्याहि. सर्वांच्या माना एकदम खालीं जातात. पेनं कुरकुरूं लागतात. कागद बाजूला जाऊन पडतात.

"जाधवबाई, तो रिपोर्ट तयार तयार झाला का ?"...

तिच्या शेजारच्या मुलीला हेडक्लार्क विचारीत असतो.

"नाहीं शेट."

गुप्ते हेडक्लार्कला इथें सगळी गुप्तेशेटच म्हणतात.

"अजून तयार नाहीं ? कमाल आहे तुमच्यापुढें ! किती ढिलाई करतां कामांत ? आज एम्. सी. कडे सहीला जायला पाहिजेत ते कागद"...हेडक्लार्क गुप्त्यांचा थोडा करडा आवाज.

"तोच तर म्हणून तयार करतेय शेट."

"बरं, बरं ! आटपा आतां लौकर"...

गुप्तेशेट नाकांत तपकीर कोंबून आऽऽऽक्ष करतात.

"अहो प्रधानबाई, तें स्टेटमेंट तेवढं टाइप करून द्या बरं पटकन्. अन् आतां हात जरा जलद चालूं द्यात. भरपूर रजा झाली आहे. आतां पदर बांधून कामाला लागा दुप्पट जोरानं."

"पण शेट हा ड्राफ्ट आधीं तयार करूं दे न मला."

खरं म्हणजे प्रधानबाईचं लक्ष टाइपरायटरकडे नसून जाधवाबाईच्या नवीन साडीकडे वेधलं गेलंय.

"अहो पण हें अर्जंट आहे जास्त. जास्त अर्जंट काय, हें सुद्धा कळत नाहीं न तुम्हाला ?"...

गुप्तेशेट थोडे कातावलेत.

टाइपरायटरची गति वाढते. सांधा बदलला जातो. कट् कट् कट् कट् आवाज येतो.

"काय गाडगीळ, चहा घेणार का ? फार तल्लफ आलीय बुवा. फिफ्टी फिफ्टी घेऊं. काय ?"

राखे ऑफिसमध्यें आला न आला कीं, रोज अस्सा चहा ढोसतो. घरीं चांगला जेवणावर हात मारून येतो. तरी इथें आल्याबरोबर चहाची कशी तल्लफ येते कोण जाणे !

गाडगीळला तो रोजच चहा विचारतो. ती फार मनांत भरलीय त्याच्या. तिनं सिगरेट ओढली तरीसुद्धां त्यांत त्याला कांहीं आक्षेपार्ह वाटणार नाहीं. ( आतां ती ओढत नाहीं, ही गोष्ट वेगळी. ) ओढली असती तिनं, तर ती सुद्धां ऑफर केली असती त्यानं तिला. ( ऑफिसमधल्या लोकाचंच भाष्य आहे असं. ) पण गाडगीळला मुळींच आवडत नाहीं तो. लोचट मेला ! उगीच गोंड घोंळवतो. सदा मेल्याच्या तोंडांत पान. त्याचे किडके रंगलेले लाल दांत, ओठ; पानतंबाखूच्या तोबऱ्यामुळें चमत्कारिक वाटणारी, थोडं बोबडं बोलण्याची पद्धत. काळा कुळकुळीत रंग, गाडगीळला रिपल्सिव्ह वाटतात या सगळ्या गोष्टी.

रोज त्यानं चहा विचारल्यावर ती त्याला ‘ नो थँक्स ’ म्हणते. केवळ एटिकेटस् पाळायच्या म्हणून. इतक्यांदा नको सांगितलं तरी रोज रोज कशाला विचारतो कळत नाहीं. आज तिला त्याच्याशीं कांहीं बोलावंसंच वाटत नाहीं. अगदीं रीत म्हणून सुद्धां. तो पुन्हां विचारतो तरीहि ती कांहींच बोलत नाहीं. इतकंच नव्हे, कामांतून मान वर करून नुसतं पहातसुद्धां नाहीं.

“ गाडगीळ, मणेरीकर का नाही आली आज ? ”...

गुप्तेशेट नाकावरून खालीं ओघळलेला चष्मा हातांत काढून घेऊन तिच्याकडे पहातात.

तिचं प्रथम लक्षच नसतं त्यांच्या प्रश्नाकडे. पण ते पुन्हां तोच प्रश्न विचारतात.

“ मला काय ठाऊक शेट. ”...

तिचा आवाज थोडा चिडका येतो. उगीचच. तिच्या नकळत.

“ त्या रहाळकरबरोबर भटकत असेल कुठेंतरी इथें दांडी मारून. ”

“ आजकाल मोठं कठीण झालंय या पोरींना जपणं. मोठा सोशल प्रॉब्लेम होऊन बसलाय हा. नको त्या वयांत नको ते धंदे करतात या पोरी ”...कुलकर्णी क्लार्कचा पोक्त विचार.

“ हल्या त्या वयांत हवंसं वाटतं तें करतां येत नाहीं, मिळत नाहीं म्हणून. ” गाडगीळला वाटतं सांगावं त्यांना असं, पण ती आज गप्पच रहाते. दांत काढतांना इन्जेक्शन दिल्यासारखी तोंड आवळून.

" गाडगीळ, तिचं काम तिला करूं दे. तुम्ही का लेट बसून काढतां तिचे कागद? अन् हें पहा, ते कालचे कागद तयार असले, तर आणून द्या इकडे सहीला. "

गाडगीळ मुकाट्यानं उठून कागद नेऊन देते.

" काय लक्षांत आलं न मगेरीकरचं? "...गुप्तेशेट पुन्हां विचारतात.

" एक केस ' पुट अप ' करतां येत नाहीं तिला धड. कसं तरी उडवते हल्लीं काम. ज्या दिवशींचे त्या दिवशीं नकोत कागद काढायला? पण सिनेमे नि नाटकं पहात हिंडते दांड्या मारून. कशीं कामं होणार यांचीं वेळेवर? "

गाडगीळला वाटतं, गुप्तेशेटच्या का डोळ्यांत येते तिची चैन! विचारी करीतच होती इतके दिवस मान मोडून काम. किती उशीरा ठरलंय तिचं लग्न. हरखून गेलीय त्या आनंदानं. करूं दे कीं बिचारीला चार दिवस मजा.

" पण काय हो गाडगीळ, तुम्ही का बसतां त्यांच्यासाठीं लेट? "

जांभेकर चुटक्या वाजवीत जांभई देत विचारतात.

" मला वाटतं, हौसच आहे गाडगीळांना लेट बसण्याची. कुणा न कुणासाठीं लेट बसतातच त्या हल्लीं. "...आजगांवकरचं भाष्य.

काय सांगायचं यांना लेट का बसते तें. जन्मभर गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या करीत बसण्याची हौस का आहे इथं कुणाला? पण घरीं जाऊन तरी करायचं काय? कुणासाठीं जायचं? कशासाठीं जायचं? इथें कागदांच्या ढिगाखालीं दडपलेल्या मनांत विचारांना शिरायला वाव तरी मिळत नाहीं. म्हणूनच ठीक आहे. नाहीं तर वेड लागायची पाळी यायची एकाद्या दिवशीं...

गाडगीळचे विचार मनांतल्या मनांतच राहतात.

मिस् कर्णिक गुप्तेशेटच्या टेबलाशीं जाते. ' गुप्तेशेट, या कम्प्लेंटला उत्तर कसं द्यायचं तें सांगा न बरं जरा, ' असं म्हणत म्हणत गुप्तेशेटना जवळ जवळ खेटून उभी रहाते. हलक्या आवाजांत नि लाडिक स्वरांत त्यांच्याशीं जरा वेळ बोलते. तिचा पदर खांद्यावरून बराच घरंगळलेला असतो नि तिचा स्लीव्हलेस पोलक्यांतून डोकवणारा किरकोळ काळा हात कसातरीच वाटतो. तरी पण माना वेळावून लाडिक लाडिक बोलण्यानं गुप्तेशेट नेहमींच विरघळतात. खालच्या मानांना हें सर्व सहज दिसतं, डोळ्यांच्या कोपऱ्यांतून. चार दोन नजरांची पटकन दृष्टभेट होते. त्यांच्या डोळ्यांत थोडं मिस्किल, थोडं खवचट हास्य. फक्त

त्यांचं त्यांनाच जाणवेल, दिसेलसं. मिस् कर्णिकला हें कळतं कीं नाहीं कोण जाणे! कदाचित् कळलं असेल. कदाचित् नसेलहि. तिच्या वागण्यांत त्यामुळें कांहींच फरक मात्र पडत नाहीं.

मिस् जाधव नि मिसेस प्रधान कामांतून उठून पन्नास वेळां बाथरूममध्यें जातात. बाथरूमचं नुसतं नांव, दुसरं काय! आतांहि त्या तशाच जातात. गुप्तेशेट चांगलेच गरम होतात.

"खरोखर या बाया हाताखालीं नकोत म्हणून सांगितलं पाहिजे मला आमच्या साहेबांना. कशीं यांच्याकडून कामं करून घ्यायचीं कळत नाहीं?"...

गुप्तेशेटचा आवाज थोडा चढलाय. पण मिस् तारकुंडेंचं तिकडे लक्षहि नाहीं. ती गुप्तेशेटना विचारते,...'शेट, आज हाफ डे द्याल मला?"

"कशाला? एवढीं कामं तुंबलींत नि हाफ डे कसला मागतां?"

"अं.....शेट आज डोहाळेजेवण आहे माझ्या एका मैत्रिणीचं"...ती लाजत लाजत, अडखळत सांगते.

"छान! आज काय कुणाचं डोहाळेजेवण, उद्यां बारसं, परवां बारावं"...

"चचचच! असं हो काय बोलतां शेट? बारावं काय हो म्हणतां उगीच?"

"मग काय तर!"...गुप्तेशेट अजून त्याच रागाच्या तारेंत आहेत. 'सदा हाफ डे, कॅज्युअल चालूंच. एक कांहीं कॅज्युअल शिल्लक रहात नाहीं तुम्हा बायकांची वर्षाकाठीं. त्या प्रधानबाईची आठ महिने रजा झाली. प्रथम मॅटर्निटी, मग प्रिव्हिलीज, मग मेडिकल, नंतर हाफ पे, विदाऊट पे, सगळे प्रकार झाले रजेचे. तरी पुन्हां कामावर आल्यावर आहेच चुकारपणा. त्या जाधव नि प्रधान-बाईना पन्नास वेळां मेकअपसाठीं बाथरूम गांठावी लागते. नेहमीं साड्या, ब्लाऊझ, बांगड्या, आणि कुणा कुणाच्या काय काय फॅशनस इकडेच यांचं लक्ष. कशाला नोकऱ्या करतात कोण जाणे!"

"क्वाइट करेक्ट ऽऽऽ!"...अय्यर गुप्तेशेटच्या म्हणण्याला पुष्टि देतो. त्याच्या काळ्या कुळकुळीत चेहऱ्यावर हरीनं पांढरे खडू उभे केल्याप्रमाणें वाटणाऱ्या दातांतून चमत्कारिक हंसू फुटतं. त्या हंसण्याला लाचारीचा वास असतो. पुढची पोस्ट मिळवण्याच्या खटपटीसाठीं त्याला हें करणं प्राप्तच असतं.

अय्यरकडे पाहून गुप्तेशेट मोठ्यानं हंसतात. इतक्यांत मिस् जाधव, मिसेस

प्रधान टेबलाशीं येऊन बसतात. गुप्तेशेट त्यांना दमांत घेतात. त्यांच्या नजरा कागदांत खुपसल्या जातात.

वास्तविक गुप्तेशेट तसा वाईट नाहीं. जाधव नि प्रधान कामचुकार नंबर एकच्या. मग तो तरी काय करणार ? गाडगीळला तो कधींच बोलत नाहीं. उलट तिच्या सिन्सेरिटीबद्दल तिची तारीफच करतो. पण का कोण जाणे, हल्लीं तिला गुप्तेशेट भारी कडक वाटतो. खालच्या मानेनें ती काम करीत असते. पण तिच्या कानावर आजूबाजूचे संवाद पडतातच. तिला वाटतं, गुप्तेशेट हा जेलर आहे. हे सगळे क्लार्क कैदी आहेत. गुप्तेशेट या सगळयांनां फटकारे मारून ( शब्दांचे का होईना ) कामं करवून घेतो. या जेलमधून कधींच कुणाची सुटका नाहीं. वयाच्या जवळ जवळ पंचावन्न वर्षांपर्यंत. अंहं. अठ्ठावन्न वर्षांपर्यंत. तीन वर्षांची मुदत वाढलीय. कुलकर्णी क्लार्कना किती आनंद झालाय त्यामुळें. त्यांच्या एका मुलीच्या लग्नाची जबाबदारी आहे अजून त्यांच्यावर. तीन वर्षांच्या पगारांत हुंडा सहज बसेल. नाहींतर पंचाईतच होती. या तुरुंगांत डांबून घेण्यांत त्यांना आनंद वाटतोय. पण गाडगीळ ? तिला या कशाचंच सुख नाहीं. फारसं दुःखहि नाहीं. तिच्या मनावर त्याची प्रतिक्रिया होण्यासारखं आहेच काय तिच्या आयुष्यांत ?

गुप्तशेट चीफक्लार्कशी कांहीं काम निघाल्यामुळें पलीकडच्या रूममध्यें जातो. खालच्या नजरा या संधीचीच वाट पहात असतात. गुप्तेशेटचं बहिर्गमन अचूक ताडतात. एकदम वर होतात.

लेखण्या थंडावून पुतळ्यासारख्या स्वस्थ बाजूला जाऊन बसतात.

वासवानीनं कराचीहून पांच सात साड्या मागवल्या आहेत आपल्या मिसेससाठीं. त्या तो हळूंच बाहेर काढतो.

" वासवानी, कसलं पॅकिंग तें एवढं मोठं ? "...

एका कारकुनीणीची उत्सुकता, उतावळेपणा दाबून राहू शकत नाहीं.

वासवानी मुद्दामच कांहीं न बोलतां पॅकिंग अगदीं थोडंसंच उघडतो. सगळ्यांची उत्सुकता साहजिकच वाढते.

" अय्या ! साड्या ऽऽऽ ? "...एकजण त्यांत हळूंच डोकावून म्हणते.

" अगबाई ! हो ऽऽऽ ? खरंच ? बघूं तरी "... दुसरी.

वासवानीच्या भोंवतीं पोरीसोरींचं टोळकं जमतं. रंगाची, कॉम्बिनेशनची चिकित्सा होते. दोघी तिघी तर तीन चार नग आमच्यासाठीं अस्सेच मागवा

म्हणून ऑर्डरहि देतात. वासवानी मोठ्या उदार मनानं तेंच नग बहाल करतो. म्हणतो,–" मिसेससाठीं आणल्या होत्या मुद्दाम. पण माझं काय, मागवीन पुन्हां. तुम्हाला आवडल्या आहेत इतक्या, तर घ्या ह्याच. असलंच कॉम्बिनेशन पुन्हां मिळेल असं थोडंच आहे.'

त्या वासवानीवर एकदम खुष होतात. किंमत देऊनहि त्याचा उदारपणा त्यांच्या डोळ्यांत भरतो. वासवानीहि मनोमन खुष होतो. फुकटचं क्रेडिट! बरं झालं खपल्या. त्याच्या वाइफला त्या साड्या मुळीं पसंतच पडलेल्या नसतात.

हैदराबादहून टायपिस्ट प्रधानांनींहि अशाच बांगड्या आणलेल्या असतात. त्यांचंहि तिथें प्रदर्शन होतं. पुन्हां एकवार तीच, तशीच चर्चा होते. ऱ्याच ऑर्डरी नोंदवल्या जातात.

साइड बिझनेस करायचा म्हटलं, तर ऑफीस ही एक चांगली मोक्याची जागा आहे, असं कुलकर्णी क्लार्कना वाटतं..." पोरींचा ऑफिसांत सुळसुळाट झाल्यापासून हें अस्सं चालतं आजकाल ऑफिसांत. दुकानाचं स्वरूप आलंय ऑफिसला..." ते मनांतल्या मनांत पुटपुटतात.

ती मात्र या कशांतच नसते. जणूं ती या गांवचीच नाहीं. सगळ्यांनाच तें खटकतं. आजकाल ही अशी का वागते? कुणाशीच मोकळेपणानं बोलणं, वागणं नाहीं. कशांतच रस नाहीं. ही अशी वाळक्या पानासारखी शुष्क कां? रसहीन. रंगहीन. तिच्यांत हा असा बदल एकदम कां व्हावा? तिलाहि तें नीटसं कळत नाहीं. पण तसा तो झालाय एवढं मात्र खरं.

मिसेस प्रधान तिच्या अगदीं टेबलाशीं जाते. म्हणते..." गाडगीळ, साड्या पाहा किती सुंदर आहेत."

ती कांहींच बोलत नाहीं. तशीच काम करीत रहाते.

" इश्श! काय त्या कागदांत एवढं डोकं खुपसून बसलाहांत? कम्माल आहे बाई! इतक्या सुंदर साड्या आहेत म्हणते तरी मन जात नाहीं?" "मला कुठें घ्यायच्या आहेत साड्या!"...ती तुटक स्वरांत बोलते. "अहो पण पाहा तर खऱ्या"...मिसेस पळसुले तिच्यापुढें साडी नाचवते. "अय्या ऽऽ! घ्यायच्या नसल्या म्हणून काय झालं! नुसत्या पाहण्यातहि गंमत, सुख आहेच कीं. मुलखा वेगळ्याच बनल्या आहेत गाडगीळ हल्लीं"...जाधव शेरा मारते..." कमाल

आहे बाई तुमच्यापुढें ! ह्या बांगड्या तरी पहा, काय टॉप आहेत "...जाधव एक डझनभर बांगड्या तिच्या पुढ्यांतल्या कागदावरच आणून ठेवते.

ती त्या बांगड्यावरून एकदां ओझरती नजर टाकते. बसनं जातांना रस्त्यावरच्या पाट्यांवरून टाकावी तशी. तिच्या नजरेंत बिलकुल औत्सुक्य नाहीं. निर्विकारपणें ती त्या बांगड्या जाधवच्या हातांत परत देते.

गाडगीळचं हें असं विचित्र, कांहींसं इंडिफरंट वागणं हा आजकाल ऑफीसमधला मोठा चर्चेचा विषय आहे.

" What's the matter with her now a days ?..." एकजण हळूंच दुसऱ्याच्या कानांत कुजबुजतो.

" कुणास ठाऊक बुवा " अशा अर्थी दुसरा हाताची व ओठांची ॲक्शन करतो. मग आपापसांत थोडी नेत्रपल्लवी, थोडं हास्य.

" मला वाटतं, कुठून तरी नकार आला असावा. "

" कुणी गांठला बिठला तर नव्हता ? नाहीं तर त्यानं दिली असेल हुलकावणी. मग पदरीं निराशा. "

हलकेसे दोन सूर. गाडगीळपर्यंत पोंचतील न पोंचतीलसे.

" छे ! ती नाहीं शक्यता या केसमध्यें."

" बाकी आतां केस पिकायला लागले. मग कसलं काय नि कसलं काय ! "

जाधवला तर विलक्षण कोडंच आहे. गाडगीळचं हें असं का वागणं ? हिला कुठल्याहि वस्तूची भुरळ का पडेनाशी झाली ? हिला आजकाल कांहींच हौसेनं घेण्याचा फार काय नुसतं पहाण्याचाहि मोह कां होत नाहीं ? या वयांतच ही अशी कां सगळ्याला विटली ? आंबली ? अकालीं विरक्त, पोक्त बनली ? एकदम फेड-अप झाली ?

'अहो जाधव '...दिघे तंबाखूचा तोबरा भरतां भरतां म्हणतो, किंचित् बोबड्या स्वरांत,...' त्यांना हे मोह टाळायचे आहेत. कारण मोहात् भवति संमोहात्...' दिघे आपल्या अर्धवट संस्कृत ज्ञानाचं नेहमीं असंच प्रदर्शन करून खो खो हंसत सुटतो.

ती त्याच्यावर मुळींच चिडत नाहीं. एरवीं ती त्याच्या असल्या आचरट बोलण्यावर चिडत असे. त्याच्या संस्कृतमधल्या चुका त्याला दाखवून देत असे

पण आज तिचं त्याच्या बोलण्याकडे बारीक लक्षच नाहीं. वाऱ्यावरून उडत आलेले कांहीं तरी शब्द इतकंच जेमतेम त्याला महत्त्व.

सुळे क्लार्कला रोजच्या रोज चाललेल्या या कशांतच इन्टरेस्ट नाहीं. तो पानाचा डबा काढून, हातावर तंबाखू मळून वेळ मिळेल तेव्हां झकपैकीं बार भरतो. जोशी सिगरेट शिलगावतो. जरा आडोशाला जाऊन लज्जतदार झुरके ओढतो, कारण त्याच्या शेजारीं बसणाऱ्या मिस् पानसेला सिगारेटच्या धुराचा वास सहन होत नाहीं म्हणे. मग गप्पांना रंग भरतो. कुणाकुणाच्या काय काय भानगडी, प्रेमप्रकरणं, वशिले, प्रचलित राजकारण यांसारख्या अनंत विषयांना हात घातला जातो. जोशीला रेसमधें, आकड्यामधें फार इंटरेस्ट. शनिवार. रविवार तो यांतच वेळ घालवून मजा करतो. चैन करतो. ऑफिसांतसुद्धां तो नेहमीं घोड्यासंबंधीं नि आकड्यासंबंधींच बोलत रहातो. लोकांना कंटाळा येईपर्यंत. त्याच्या डोळ्यापुढें सतत घोडे नि आकडेच फिरत असतात. मग भटाकडून मागवलेला चहा येतो. तें मचूळ, नदीला पूर आल्यासारखं गढूळ पाणी चवीनं प्यायलं जातं. इतक्यांत गुप्तेशेट आल्याची चाहूल लागते. जोशी अर्धवट ओढलेली सिगरेट पटकन् बुटाच्या टाचेखालीं विझवतो. वासवानीच्या टेबलाभोंवतीं जमलेल्या समस्त साळकाया-माळकाया एकदम आपापल्या खुर्च्या पकडतात, संगीत खुर्चीत धांवत जाऊन खुर्ची पटकवावी तश्शा. गप्पांची गटारगंगा वाहतां वाहतां एकदम आटते. तोंडं थंड होतात. एकाद्या नवोढेप्रमाणें नजरा खालीं होतात. डोळ्याच्या कोपऱ्यांतून मात्र आजूबाजूचं निरीक्षण चालूच रहातं. पुन्हां टाइपरायटरचा आवाज येतो. सांधा बदलला जातो. लेखण्या कुरकुरं लागतात. ड्राफ्ट्स, अर्जंट प्लीज, इन्डोअर, आऊटडोअर "मिस्टर दिघे, ती फाइल सापडली का हो?" "अरे सिताराम, हे एवढे कागद ने साहेबाकडे सहीला." इत्यादि ठराविक शब्द कानावर पडतात. पण बाकी वातावरण कामानं स्तब्ध झालंय. रानडे अन् दिघे फक्त याला अपवाद. ते दोघे मात्र अधूनमधून कुणाकुणाशीं कांहीं बोलतात. हवेंत हास्य उधळतात. गुप्तेशेटची त्यांच्यावर मर्जी आहे. त्यामुळें त्यांना हें खास कन्सेशन आहे. गाडगीळ मात्र इकडे तशी कामांत चूर, निर्विकार, उदासीन. हळूं हळूं टिफिन टाईम येते. सगळे कागद एकदम दूर होतात. कॅंटीनमधें मला मोठा घोळकाच्या घोळका जमतो गोड जिन्नसां-

वर बसण्यासाठीं माशा टपून रहाव्या तसे बटाटेवडे वगैरे सारख्या पदार्थांवर ताव मारण्यासाठीं उतावीळ झालेले जीव आंत भाऊ गर्दी करतात. एकच गदारोळ माजतो. कँटीनमधें डबेवाल्यांनीं आणून ठेवलेल्या डब्यांची लाईन लागते. बटाटे वडे, भजी यांचा दर्प नाकांत शिरतो. गाडगीळ येतांना पोळीभाजी बरोबर घेऊन येते; ती इथें बसून कशीबशी खाते. हॉटेलमधल्या जिन्नसांच्या त्याच त्या चमत्कारिक, नकोशा वाटणाऱ्या वासामुळें तिचा जीव गुदमरून जातो. ती पुन्हां आपल्या टेबलाशीं येऊन बसते. सगळं वातावरण तेंच असतं. गप्पा, चर्चा, बाष्कळ विनोद, त्यानंतरचं खी खी करून हंसणं, तंबाखूचे बार, सिगरेटी, साड्या, त्याला मॅचिंग ब्लाऊझ, बांगड्या, पर्सेस, इन्क्रिमेंट, प्रमोशन, ग्रॅज्युइटी, पेन्शन, प्रॉव्हिडंट फंड...

ती मात्र या साऱ्यांपासून अलिप्त आहे. तिच्या या अलिप्ततेबद्दल साऱ्यांनाच प्रथम विलक्षण कुतुहल वाटलं. पण आतां हळू हळू तें साऱ्यांच्याच परिचयाचं झालंय. ती या ऑफिसमध्यें लागल्यापासून सिन्सियरली काम करायची पण तेव्हां ती अशी अलिप्त नव्हती. हसरी, बोलघेवडी म्हणून सगळ्या स्टाफमध्यें प्रिय होती. त्या वेळीं तिला हौस होती, उमेद होती. आपलं काम चोख करूनहि ती बडबडाची, हसायची, खिदळायची, मजा करायची. कितीजणांच्या मिसचिफ्स काढायची. ऑफिसच्या सगळ्या ॲक्टिव्हिटीजमध्यें भाग घ्यायची. गॅदरिंगच्या नाटकांतून तर तिनं प्रत्येक वेळी निरनिराळीं कामं केलीं. व्यवस्थापिका म्हणून, प्रॉम्प्टर म्हणून, नटी म्हणून. मोठ्या कुशलतेनं आणि पुन्हा सहकाऱ्यांशीं योग्य तें अंतर राखून, संयमानं वागून. तिच्या मिसचिव्हस स्वभावामुळें ऑफिसमध्यें ती एक दिवस जरी आली नाहीं तरी सगळ्यांना सुनंसुनं, ओकओक वाटे. गेलीं बारा वर्षं तिनं ऑफिसमध्यें निरनिराळ्या तऱ्हेनं आपले गुण, आपली कला प्रगट केली होती. पण आता तिचं मन या कशांतच रमत नाहीं. ती काम करतेय नि करीत नाहींहि. तिचं शरीर त्यांत अडकलंय. पण मन मात्र कुठं तरी भरकटतंय. ती आजकाल एक यंत्र बनलीय. किल्ली दिल्यावर तें चालू होतं. त्यात जिवंतपणा कसा तो नाहींच. तिला वाटतं, हें यंत्र केव्हां दगा तर देणार नाहीं ? ह्या यंत्रांत केव्हां तरी बिघाड होऊन तें चुका तर करणार नाहीं ? पण ती तशीच काम करीत राहते.

हळू हळू रेंगाळत रेंगाळत संध्याकाळ खालीं उतरते.

पाच वाजल्यापासून खालच्या नजरा मधून मधून हळूच वर डोकावून पहात असतात. त्यांचं मन आतां कामात नाहीं. लक्ष लागलंय घड्याळातल्या साडेपांच-च्या काट्याकडे. साडेपांचवर काटा सरकतो न सरकतो तोंच फायली बांधल्या जाऊ लागतात. " काय दिघे येणार का ? का काढायचेत कागद अजून ? " अशा तऱ्हेचीं काहीं वाक्यं कानावर पडतात. मिस जाधव, मिसेस प्रधान पुन्हां बाथरूममध्यें जाऊन तोंडावर पावडरचा हळूवार हात फिरवतात. रिफ्रेश होऊन येतात. स्टाफचा घोळकाच्या घोळका ऑफिसच्या आवारांतून सटकतो. हंसत, खिदळत स्टेशनच्या दिशेनं धांवत सुटतो. घराच्या विलक्षण ओढीनं. तिच्या शेजारच्याच टेबलावर बसणारी देशपांडे तर साडेपांच केव्हां वाजतात, याचीच वाट पहात असते. अन् साडेपांचचा ठोका पडण्यापूर्वींच फायली बांधून तयार राहते. ठोक्याबरोबर घरीं पळते. नवऱ्याच्या, मुलांच्या, घराच्या ओढीनं. पण गाडगीळनं लवकर घरीं कां पळावं ? ती खेचून नेणारी ओढच नाहीं, तर पळायचं तरी कसं ? कुणासाठीं ? कशासाठीं ? तिची तीव्र इच्छा आहे. तिच्याहि आयुष्यांत असा एखादा दिवस यावा. तिनं त्या ठोक्याला घरीं पळावं. कुणाच्या तरी विलक्षण, तीव्र ओढीनं. कुणाच्या तरी जबरदस्त आकर्षणाचं सुदर्शनचक्र तिच्या सारखं मागं मागं फिरावं. गाडगीळ वाट पहाते. वाट पहातच राहते. त्या ओढीची, त्या आकर्षणाची, प्रेमाची. पण असा दिवस तिच्या आयुष्यांत कधीं उगवतच नाहीं.

उन्मळून पडल्यासारखी गाडगीळ तिथं तशीच बसून राहते. पुढचीं सगळीं रिकामीं टेबलं भकासपणें पहात, सुन्नशी. घरीं जाण्यांत तरी काय स्वारस्य आहे ? तिथेंहि पुन्हां सगळं तेंच. आपला आपणच चहा करून प्यायचा, एकटंच शून्य दृष्टीनं कुठं तरी पहात बसायचं. ठराविक ठशाचीं बोलणीं ऐकायचीं. डोळे पेंगुळले कीं झोपायचं.

घरीं जाईपर्यंत जवळ जवळ दिवेलागणीची वेळ होते. आई कुठल्या तरी देवळात गेलेली असते. वयपरत्वें ती आतां अध्यात्माकडे वळलीय. सबंध दिवस देव देव करीत रहाते. कथा, कीर्तन, प्रवचनांत गुंग असते. बाबा कुठल्या तरी पेन्शनरांच्या कंपूत ब्रिजच्या डावांत रमतात. भाऊ आणि वहिनी आपल्या मुलांच्यांत रमलेलीं असतात. आपल्या छोट्याला चिऊकाऊ दाखवून भात भरवण्यांत, त्याची तैनात संभाळण्यांत रमलेली असतात. तें पाहून ती आणखीच

अस्वस्थ होते. या सुखाची तिनं आशा करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. धाकट्या भावाचं नुकतंच लग्न झालंय तें जोडपं आपल्यांतच मशगूल आहे. वैवाहिक जीवनांतल्या नाविन्याची चव चाखण्यांत सगळ्या बाह्य जगाला विसरून गेलंय. दोन बहिणी लग्न होऊन सासरीं मजेंत आहेत. सगळीं आपापल्यापरी सुखांत आहेत. आपापल्या संसारांत गुरफटलेलीं आहेत. तीच फक्त यांतून खडा वेंचून काढावा तशी निराळी आहे. घरांत कुणालाच तिच्यांत फारसं इन्टरेस्ट नाहीं. जणुं ती या घरांत नाहींच. तिच्याशीं जिवाभावाच्या चार गोष्टी बोलायची, तिचं सुखदुःख जाणून घेण्याची कुणालाच आवश्यकता वाटत नाहीं. तिला कांहीं दुःख असेल ही जाणीवहि कुणाला नाहीं. घरांत तिच्याशीं बोलायला कुणालाच उसंत नाहीं. जो तो आपल्यांतच गुरफटलेला. ती मात्र एकटीच आहे. तरीसुद्धां घरीं येणं प्राप्तच आहे, म्हणून ती येते. आयता चहा मिळण्याचीहि आशा नसते. ती आपला चहा करून पिते. मरगळलेल्या मनांत उत्साह भरण्याचा एक प्रयत्न दुसरं काय ! पण उत्साह भरतच नाहीं. ती कॉटवर स्वस्थ पडून रहाते पांच दहा मिनिटं डोळे मिटून पण तो एकलेपणा मिटल्या डोळ्यांनाहि भेडसावतोच. तिला वाटतं, तो आपल्याला गिळून टाकील. ती फार भिते. पडून पडूनसुद्धां तिला उगीचच थकल्यागत वाटतं. ती मग अस्वस्थ होते. कांहींशी चिडते स्वतःवर, इतरांच्याहिवर. उठते, कोपऱ्यांतली सतार काढते. तिला तीव्र इच्छा होते. त्यांतून मंजूळ स्वर काढावे. दिड दा, दिड दा दाडा दाडा. हृदयांतली पोकळी स्वरांनी भरून काढावी. सारं वातावरण भारून टाकावं. नादब्रह्मांत तल्लीन व्हावं. स्वतःला हरवून जावं. पण जिवाचा आटापिटा करूनहि सूर सांपडतच नाहींत. हातांतून निटसटूनच जातात, पहातां पहातां, धरतां धरतां. पळपुटे चोर कुठले ! लुच्चे मेले. पण असं का व्हावं ? तिला मनस्वी चीड येते त्या स्वरांचीहि. रागानं ती सतार बाजूला करते. हृदयांतलं रितेपण कायमच रहातं. आजकाल हें असंच होतं. असं का होतं ? तिला कळतच नाहीं. काय करावं, तिला उमगत नाहीं.

मग फसकन रात्र येते. बाहेर गेलेली मंडळी घरीं परत येतात. जेवणाची वेळ झालेलीच असते. जेवतांना मोठा भाऊ कांहीं ठिकाण तिच्यासाठीं हेरल्याचं सांगतो. त्यावर नुसतीच चर्चा होते. वांझोटी. तसं म्हटलं तर तिच्या लग्नाबद्दल आतां सगळी उदासीन आहेत. आईवडिलांनासुद्धां त्याबद्दल आस्था नाहीं. प्रथम शिक्षण पूर्ण होऊं दे, मग बघूं, शिक्षणांत; त्यामुळें उगीच व्यत्यय नको, म्हणून

तिच्या लग्नाचं लांबणीवर पडलं. मग चार सहा ठिकाण पाहिलीं पण कांहीं कारणानें फिसकटलं. कुठं यांच्याकडून तर कुठें त्यांच्याकडून. प्रथम तिच्या व तिच्या घरच्याहि अपेक्षा फार म्हणून मनपसंत ठिकाण मिळेना. लग्न जमेपर्यंत घरीं बसण्यापेक्षां नोकरी तरी करावी या उद्देशानं ती नोकरीला लागली. ' आहे आतां तिची ती मिळवती, जमलं, सावकाश तरी हरकत नाहीं ' असं घरांत आईवडीलच बोलूं लागले. वय वाढत चाललं, चेहरा निबर दिसूं लागला. मग अपेक्षां कमी झाल्या पण फार उशिरानं. सौंदर्य ओसरू लागल्यावर त्यामुळें कमी अपेक्षा धरूनहि धड कुठं जमेना. इळूंहळूं सगळी कंटाळली, स्थळं पहाणं रोडावलं, थंडावलं नि बंदच झालं. तिचं वय आपलं वाढतंच आहे नि कुणालाच तिचं लग्न होऊन जावं, अशी घाई नाहीं. आवजया म्हणतात, " त्यांचं त्यांनी ठरवावं. गांठावा कुणीतरी ऑफिसांतलाच. "...तिला वाटतं, त्यांना काय होतंय असं म्हणायला. गांठावा म्हणून का गांठतां येतो ? योग्यसा मनुष्य तर हवा न ? का आपला पुरुष आहे नुसता, म्हणून त्याला घालायची माळ ? मधं दिघे नि देशपांडे लागले होते लघळपणा करायला. पहात होते खडे टाकून पण तिला नाहीं आवडत असला लघळपणा. तिनं असं कांहीं जामलंय त्यांना आडून. आतां कुणी वाटेला जात नाहीं तिच्या. जाधवनं जमवलंय हल्लीं त्या देशपांडेशीं सूत. ती म्हणाली एकदा गाडगीळला...' गाडगीळ, किती दिवस थांबणार अशा वाट पहात घरच्यांनीं ठरवावं म्हणून ? जमवून टाका कुणाशीतरी मेतकूट. '

पण तिचा स्वभावच नाहीं तो. शीः ! जाधव ओंग्हर आहे अगदीं. तिला नाहीं आवडत जाधवाचं ओंग्हर वागणं. मग तिला हवंय तरी काय ?

तिला काय हवंय, हें नक्की तिचं तिलाहि कळत नाहीं. पण तिला आतां या सर्वांचा उबग आलाय एवढं मात्र खरं. सगळं निर्जीव. कशांतच कांहीं चैतन्य नाहीं. आला दिवस ती कसा बसा ढकलीत नेते. बंद पडलेली मोटार मागून रेटा लावून ढकलतच न्यावी तसा तिचं आयुष्य एका साच्यांत गच्च बसून गेलंय. एका ठराविक वर्तुळांत ती फिरतेय. अष्टौप्रहार तोच, तसाच प्रवास. तसंच एका परिघांत फिरणं. घरच्या नि ऑफिसच्या सगळ्या त्याच त्या वातावरणाची तिला किळस येते. उबग येतो. प्रमोशन, इंक्रिमेंट, प्रॉव्हिडंट फंड, पेन्शन, ग्रॅच्युइटी, फाइल्स, एम्. सी. हे शब्द आतांही वाऱ्याच्या झोतासारखे तिच्या कानावर आदळतात. त्याच चर्चा, तेच बाष्कळ विनोद, त्यानंतरचं हंसणंही तसंच

ठराविक खी खी करून. तंबाखूचे बार, सिगारेटी, साड्या, त्याला मॅचिंग बांगड्या, पर्सेस, ब्लाऊझेस, एंजिनसारखं रोज धपापत ऑफिसला जाणं येणं...

सगळं ठराविक, साचेबंद, आंखीव. तोच ठेका, तीच लय, तेंच ( रड )... गाणं. रात्रीं झोंपेच्या गुंगींत ती हें सारं विसरण्याची आशा करते. पण तसं होत नाहीं. झोंप कशी ती येतच नाहीं. अन् जरा डुलकी लागली तरी तींच स्वप्नं पिच्छा पुरवतात. सबंध रात्र ती या कुशीवरून त्या कुशीला होत राहते. तिला तीव्र इच्छा होते. आपण या सगळ्यापासून पळावं. खूप खूप दूर. पण तिला पळतां येतच नाहीं. ती तशीच नुसतीच फरफटत चालली आहे. ढगांसारखी अधांतरीच लोंबकळत फिरते आहे. नुसतीच तगमगते आहे, रात्र न् रात्र.

मग पुन्हां सकाळ येते. धाडकन तिच्यापुढें येऊन उभी राहते. बागुलबुवा-सारखी तिला भेडसावते. ती मनस्वी दचकते केवढ्यांदातरी. मग उठून नित्याचे कार्यक्रम आटोपते. तशीच धपापत गाडी गांठते. बोरीबंदरच्या फलाटावर तिला मुद्दाम उतरावं लागतच नाहीं. गर्दीबरोबर ती सहज बाहेर फेकली जाते. आपण गर्दीबरोबर ढकलत बाहेर आलोय, इकडे आज तिचं लक्षच नाहीं. ती आपल्याच विचारांत गुरफटलीय. त्यांतच गरगर गरगर, गोल गोल, गोल गोल फिरतेय. तिला आज का कोण जाणे, सारखी मागं पाहिलेल्या सर्कशींतल्या त्या मृत्यु-गोलाचीच आठवण येते आहे. त्यांत चकरा मारणारा तो माणूस ! तो अपघात ! मघापासून तोच तिच्या डोळ्यापुढें सारखा फिरतोय. तिला वाटतं, आपणहि आतां अशाच घर नि ऑफिसच्या या मृत्युगोलांत फिरत रहाणार जन्मभर. शरीर नि मन भेलकांडत असलं तरीहि.

विचारांच्या एका निराळ्याच तंद्रींत असतांना ती गर्दीबरोबर स्टेशनच्या बाहेर रेटली जाते. ऑफिसच्या दिशेनं सहजच चालू लागते. मोटारींची, बसेसची रीघ लागलेली असते. वाहनांच्या ट्रॅफिकसाठीं माणसांचा ट्रॅफिक अडवला जातो. लाल दिवा नेहमींप्रमाणेंच तिच्याकडे पाहून विकट हास्य करीत तिची वाट अडवून उभा असतो. पण आज तो तिला काळ्या मांजरासारखा मुळींच वाटत नाहीं. ती त्याच्यावर मुळींच चिडत नाहीं. उलट त्याच्याकडे पाहून ती हंसते. अन् रस्ता ओलांडण्यासाठीं तशीच धांवते. धांवतच सुटते, सुसाट.

■ ■

■ ३ ■

# पळवाट

“ काय निघायचं का ? ” तात्या हलक्या आवाजांत आबांना म्हणाले.

“ हो. आतां आणखी थांबण्यात अर्थ नाहीं. मंडळी बाहेर केव्हांची तिष्ठत बसली आहेत. ”

आबांनी दीर्घ श्वास सोडला. ईश्वरी इच्छेपुढें इलाज नाहीं अशा अर्थी हाताचे पंजे हवेत उडवले.

काकूंनी, लालाच्या आईनें त्यांना पुढें होतांना पाहिलं. त्या काय तें उमगल्या. लालाला आतां ते नेणार. कायमचं. त्यांनीं त्याच्या छातीवर मस्तक टेकलें. त्यांना हुंदका अनावर झाला. काकूंचा शोक हृदय फाडीत होता.

जमलेल्या लोकांना काय करावें सुचेना.

मंडळी जागच्या जागीं तटस्थ राहिली.

लाला गेल्याची तार काल गुहागरला आमच्या शेजारच्या डॉक्टरांच्याकडे केली होती. काकूंना शॉक न बसेल अशा बेतानें सांगून त्यांना तुमच्या गाडींतून पाठवा, म्हणून त्यांत कळवलें होतें. आमच्या तारेप्रमाणें डॉक्टरांनीं काकूंना इकडे पाठवून दिलें होतें. पण तरीही तें ऐकून, पाहून काकूंना शॉक बसणार, हें नक्कीच होतें. कारण लाला अचानक गेला होता. ताप नाहीं. जाळ नाहीं जेमतेम आठ दिवसांचें मामुली दुखणें तें काय नि लाला जातो काय !

सगळेंच अघटित !

काकूंना कळवायला अवसरही मिळाला नाहीं. पण त्याला कुणाचाच इलाज नव्हता. काकू येईपर्यंत लालाला न्यायचें नाहीं, एवढेंच करणें आमच्या हातांत होतें अन त्याप्रमाणें लालाचें मृत शरीर कॉटखालीं बर्फाच्या लाद्या ठेवून कॉटवर ठेवून दिलें होतें.

काकू आल्या. लालाला तशा अवस्थेंत पाहून त्या उन्मळून पडल्या. एकच आकांत झाला.

लाला काकूंचा एकुलता एक मुलगा. वडिलांच्यामागें मोठ्या कष्टानें वाढवलेला, प्रकृतीनें नाजूक म्हणून तळहाताच्या फोडाप्रमाणें जपलेला. मग काकूंना हें दुःख अनावर होणें साहजिकच होतें. हातातोंडाशीं आलेला मुलगा बघतां बघतां गेला होता.

" लाला, तूं मला एकटीलाच इथें टाकून निघून गेलास. तूं मला फसवलंस; लाल, आतां मी कुणासाठीं जगू? मला इथें आहे तरी कोण? लाल, सांग, बोल. शेवटचा एक शब्द तरी माझ्याशीं बोल. देवा का घेऊन गेलास माझ्या लालाला? आधीं मला का नेलं नाहींस?"——

काकू ढसाढसा रडत होत्या. त्यांचा आक्रोश मला ऐकवत नव्हता. त्यांचें सांत्वन कसें करावें कळत नव्हतें. शब्द सुचत नव्हते. तरीहि मी काकूंची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होतो.

" काकू, तुम्ही एकट्या आहात असं का समजतां? मी तुमचाच मुलगा आहे असं समजा. लालाच्या ठिकाणीं मी आहे. मी तुम्हांला कांहीं कमी पडूं देणार नाही."

काकूंनीं एक दीर्घ श्वास सोडला. महत्प्रयासाने कसेबसे अश्रू आवरले. थिजलेल्या डोळ्यांनीं त्या लालाकडे पाहत राहिल्या.

इतक्यांत...

मंडळींनी लालाला उचललें.

माझें अवसान एकदम ओसरलें. इतका वेळ आवरलेले मन फुटलें. आवेगानें हुंदका बाहेर पडला.

काकूंचें तर सारें शरीर पुन्हा गदगदलें. लहान पोरागत त्यांनीं गळा काढला.

पण हा आक्रोश ऐकायला लाला तिथें होताच कुठें? आतां आहे तें त्याचें चेतनाहीन शरीर — फक्त शरीर — आणि तेंहि आतां तिथून उचललंय. कांहीं

अनु. क्र. ८३७६८ दि. ८-५ ... नोंद दि. ३/३/५२



[illegible]मागे राहणार आहे ती चिमुटभर राख. काळाच्या ओघांत वाऱ्याबरोबर तीहि उडून जाईल. आणि मग लालाचें अस्तित्वच पुसलें जाईल. पाटीवर आपण एखादें चित्र काढावें आणि कुणाच्याहि तें दृष्टीस पडल्याशिवाय पुसलें जावें तसें.......

पण यांत माझा तर कांहीं दोष नाहीं ना? मला सारखी रुखरुख लागून राहिलीय. जिवाची उलघाल होतेय. पण लाला असा अचानक जाईल, ही मला तरी कुठें कल्पना होती?

तशी लालाची प्रकृती जात्याच नाजूक. पण त्याला दुखणं असं कांहींच नव्हतं. निजून तर तो मुळींच नव्हता. चांगला खात होता, पीत होता. अभ्यास करीत होता. फक्त गेले आठ दिवस तो नुसतं डोकं फार दुखतंय म्हणत होता. मला कल्पनाहि नव्हती कीं, त्याच्या डोकं–दुखीच्या मागें असें कांहीं विलक्षण दुखणें दडून बसलेंय अन् संधि सापडताच तें अचानक त्याच्यावर कोसळणार आहे.

त्यानें डोकेदुखीची तक्रार केली तेव्हां मी उलट त्याची चेष्टाच केली. म्हटलं, "लाल्या, लेका तुझी तब्येत ही अशी तोळामासा अन् तुझा अभ्यासाचा झक्कूताड्या रात्रंदिवस संपतच नाहीं. पाहावं तेव्हां तुझं लक्ष गुरफटलेलं अभ्यासांत, डोकं खुपसलेलं पुस्तकांत. तुझं लग्न त्या पुस्तकाशींच लागलंय्."

"अरे क्लास जाईल ना माझा नुसत्या उनाडक्या करीत बसलों तर."

"क्लास गेला उडत! आधीं तब्येत. मग अभ्यास. अरे, एवढा कॉलेजमधें येतोस, तर कॉलेज-लाइफ कांहीं एन्जॉय करशील कीं नाहीं? तुझी नजर सदा मार्कांवर, क्लासवर. शरीर झालंय सुक्या बोंबलासारखं. रांडेच्या! चांगलं खा, पी; मजा कर. कधीं खेळशील, मजा करशील, नांव नको. अभ्यासांतच मरणार, रांडेच्या, तूं."

"अरे, पण..."

"अरे पण नाय नि काय नाय—" मी लालाचें वाक्य मधेंच तोडलें. त्याला पुढें बोलूंच दिलें नाहीं.—"तूं इतका हुशार, डोकेबाज तुला हवाच कशाला एवढा अभ्यास करायला? आयुष्यांतला सगळा आनंद, मजा हरवून बसलास तूं अभ्यासापायीं."

लालानें चष्म्यांतून आपल्या मिचमिच्या डोळ्यांनी एकवार माझ्याकडे पाहिलें. तो क्षीण हसला. म्हणाला, " मध्या, क्लास नाहीं मिळाला, तर स्कॉलरशिप जाईल, मग शिक्षण बंद. तुझी गोष्ट निराळी. सुदैवानें कॉलेज लाइफ एन्जॉय् करायला संपूर्ण मोकळा आहेस तूं. "

लालानें डोकें हातानें दाबून धरलें. दृष्टी पुन्हा पुस्तकांत स्थिर केली. लालाचें बोलणें खरें होतें. त्याची मी उगीच चेष्टा केली. माझें मन मला आतां खाऊं लागलंय.

त्याच रात्रीं लाल्याला एकाएकीं विलक्षण भडभडून उलट्या होऊं लागल्या. सगळी खोली नुसती भरून गेली वांत्यांनीं. लाल्याची ती अवस्था पाहून मी मनस्वी घाबरून गेलों.

सगळेंच भयानक !

मध्यरात्रीं मी डॉक्टरांच्याकडे धावलों. डॉक्टरांना घेऊन येतो तो लाल्या रक्ताची उलटी होऊन बेशुद्ध पडलेला.

डॉक्टर लाल्याला तपासत होते. मी डॉक्टरांचा चेहरा तपासत होतो. डॉक्टरांचा चेहरा गंभीर गंभीरच होत होता. तो चेहरा पाहून मी पार हादरलों. अंगातलें उरलें सुरलें त्राणसुद्धा नाहींसें झालें. जेततेम सतरा-अठरा वर्षांचीं पोरें आम्ही. मरण म्हणजे काय, दुखणें म्हणजे काय, रक्ताची उलटी केव्हां होते, सगळंच अज्ञान ! मी भीत भीत डॉक्टरांना विचारलें, " डॉक्टर, हा बरा होईल न आतां लवकर ? "

" इटस टू लेट नाऊ. " स्टेथास्कोप बाजूला करीत डॉक्टर म्हणाले, " ह्यापूर्वींच मेडिकल एड घ्यायला हवी होती तुम्ही. "

" पण तसं त्याला कांहींच होत नव्हतं... "

मला वाटलं, डॉक्टरांना सांगावं असं. पण शब्द तोंडांतल्या तोंडांतच घुटमळले. मनाला न कळत रुखरुख मात्र चावत राहिली. मुंगीसारखी. लाल्याच्या बाबतींत माझें कांहीं चुकलें तर नाहीं ना ?

कारण लाल्याची जबाबदारी काकूंनीं सर्वस्वीं माझ्यावर सोपविली होती. गुहागरहून मुंबईला शिक्षणाकरिता येऊन आम्ही एक खोली घेऊन राहिलो तेव्हां काकू म्हणाल्या होत्या, " मध्या तूं आहेस लाल्याकडे लक्ष पुरवायला, म्हणून अगदी निश्चित मनानं ठेवतेय मी त्याला मुंबईला. "

त्यांनी माझ्यावर विसंबून लाल्याला ठेवला आणि अचानक हें असें विचित्र घडलें.

माझ्या खांद्याला धरून मला हलकेच कुणी तरी बाहेर आणलें. लाल्याला आंघोळ घालून तात्यांनीं नि आबांनीं त्याला तिरडीवर ठेवलें, अंगावर सफेद कापड घातलें. तोंडांत तुळशीपत्र ठेवलें, आणि तिरडी बांधली.

मी तें सारें पाहत होतों. अगदीं सताड, उघड्या डोळ्यांनी पाहत होतों. मला सगळें दिसत होतें; जाणवत मात्र नव्हतें. कुणीतरी पुढें होऊन माझ्या कानांत सांगितलें "–मडकें तुम्ही धरा."

हातात धोंडा बांधल्यासारखे हात जड झाले होते. पण कांहीं झालें तरी आज या घटकेला मला तें करणें प्राप्तच होतें. मी कसेंबसें मडकें उचललें. यांत्रिकपणें नि पुढें झालो. मी काय करतोय ? माझं मलाहि पुरेसं उमगत नव्हतं.

तसे पाहिलें तर मडकें धरण्याचें काम माझ्याकडे यावें असें लाल्याचे नि माझें काही जवळचें नातें नव्हतें. पण लाल्याची आई नि माझी आई एकाच गांवच्या सासुरवाशिणी. गुहागरच्या. वयाच्या बाराव्या वर्षापासूनच्या मैत्रिणी. लालाचे वडील नि माझे वडील अगदीं जानी दोस्त म्हणून लाल्याच्या आईला मी काकू म्हणत असें. लाल्याचे घर खालापाटास होतें. आमचें वरलापाटास. शाळेपासूनचे आम्ही लंगोटीयार दोस्त आणि आता मुंबईला तर गेलीं दोन वर्षं आम्ही एकाच खोलीत राहत होतों. त्यामुळें लालाला इथें जवळचें असें माझ्या-खेरीज कुणीच नव्हतं.

"हं व्हा पुढं. वळून पाहायचं नाहीं बरं का." एक वृद्ध गृहस्थ माझ्या कानांत कुजबुजले.

मी मडकें धरून पुढें झालों. लाल्याला खांदा देऊन बाकीची मंडळी मागून येत होती; मला वळून पाहायचें नव्हतें. पण मन मात्र पुन्हा पुन्हा वळून पाहत होते, लहानपणच्या आठवणींत घुटमळत होतें, भूत काळांत घुसत होतें.

एक तेव्हांची आठवण थोडी अंधुकशी, तुटक, पण या प्रसंगानें त्याचें महत्त्व जाणवणारी, मनाची अस्वस्थता वाढवणारी.

आमच्या वरलापाटची आम्ही पाच–सहा पोरें उनाड म्हणून तेव्हां चांगलीच प्रसिद्ध सुटीत आम्हाला उंडारायला रान मोकळें व्हायचें. बाबा म्हणायचे "पोळ सुटल्येत रांडेच्ये ! किती बोला, किती मारा, पुन्हा बे–एके–बेचा पाढा आहेच

सुरू. इतरा तसा धुमाकूळ घालतात. पण एखाद्या दिवशीं जिवावर बेतायचें त्यांच्या नि आमच्याहि."

आमच्या मानानं लाल्या फारच गरीब, नम्र, सालस; बिचारा या सदरांत गणाना होणारा, कदाचित तशा त्या शरीरामुळेंही असेल. आमच्या धांगडधिंग्यात तो असायचा पण लांबून. खरे म्होरके आम्हीच पांच-सहा जण बन्या, मन्या, नान्या, मी वगैरे—

शाळांना मे महिन्याची सुटी पडली होती; अन् आम्हाला चांगले दोन महिने उंडारायला रान मोकळें झालें. मी लाल्याकडे चार-सहा दिवस राहून येतांना लाल्याला आमच्याकडे सात आठ दिवस राहायला घेऊन आलों.

वास्तविक या दिवसांत आमचें गांव माणसांनीं चांगलेंच मोहरून निघतें. माहीतल्या आंब्यासारखें पण या वर्षी बरीच माणसें मुंबईला एका लग्नासाठीं गेल्यामुळें गांव जरा ओकाबोका वाटत होता. माझी बहीण बाळंतपणाकरतां आमच्याकडे आली होती, म्हणून माझी आई, आमचे काका व मी लग्नाला गेलों नव्हतों. बन्या मन्याहि गेले नव्हते. शिवाय रानवी व पालशेतहून गुहागरला शिकायला येऊन राहिलेले दोन मित्र आम्हाला नवीन मिळाले होते. रानवीचा सोन्या भलताच कल्पक. त्याचें डोकें भलतीकडेच चालत असे. वरलापाटकर त्याला उरफाट्या डोक्याचा म्हणत.

सुटीच्या पहिल्या पंधरवड्यांत आट्यापाट्या, हुतुतू, खो खो, गोट्या, भोवरे सगळे खेळ खेळून आम्ही कंटाळलो होतों आम्हाला आतां कांहींतरी नवा खेळ हवा होता.

सोन्याच्या डोक्यांतून एक विलक्षण शक्कल निघाली तो म्हणाला "आज आपण मरणाचा खेळ खेळूं."

आमच्या सर्वांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह उमटलें.

हा खेळ आम्हाला अगदीं नवीन होता. मरण म्हणजे नक्की काय...आम्हाला पूर्ण कल्पनाहि नव्हती. तशी ती आज तरी कुठें आहे म्हणा! पण त्या वेळीं तर आम्ही अगदींच अजाण होतों. शिवाय आम्हांला साधारण समजूं लागल्यापासून मेलेलं मनुष्यहि आम्ही कुणी पाहिलें नव्हतें. बन्याचे काका वारले, तेव्हां आम्हा पोरांना तिकडे कुणी फिरकूंनहि दिलें नव्हतें. अगदीं बन्यालासुद्धां काकाचे जास्त झालें तेव्हां आमची रवानगी खालपाटास झाली होती नि त्यांना नेल्या-

नंतर आम्हांला घरी आणलें होतें. नाहीं म्हणायला आमच्या शेजारच्या आजी गेल्या तेव्हां बन्यानें नि सोन्यानें तें सारें कुतूहलानें लक्षपूर्वक पाहिले होतें अन् आम्हा दोघाचौघांना त्याचें रसभरित वर्णन ऐकवलें होतें. पण तरीसुद्धां मरणाची तशी अजूनहि आम्हांला कल्पना नव्हती. त्यामुळें मरण म्हणजे देवाघरीं जाणे, ही एकच आईनें दिलेली मरणाची अंधुकशी कल्पना मला होती. म्हणून मी सोन्याला विचारलें, " मरणाचा खेळ म्हणजे कसला खेळ रे ? "

सोन्यानें आम्हाला थोडक्यांत खेळाची कल्पना दिली, आमचें त्याच्यावर बराच वेळ चर्वितचर्वण झालें. पण नक्की कांहीं ठरेना. रात्री झोपताना मी आईला मरणाविषयीं प्रश्नावर प्रश्न विचारले पण आई जाम सांगेना. शेवटीं दोन धपाटे पाठींत घालून ती म्हणाली " रांडेच्या ! उगीच का भंडावतोस मला ? झोप बघू मुकाट्यानं. रात्री भीति वाटेल नाहीतर झोपेंत. "

आईच्या शब्दामुळें माझ्या मनांत बागबूग होत होतें तरी शेवटीं तो खेळ खेळायचें ठरलें.

पण मरायचें कुणी ? मोठाच प्रश्न.

मी म्हटले, " मी आहें तयार मरायला. पण मरायचें म्हणजे नक्की काय करायचं सांगा. "

" अरे, तुला कांहींच काम नाहीं. तूं फक्त स्वस्थ पडून रहायचं. कसली हालचाल नाहीं. आम्ही तुला तिरडीवर बांधू नि स्मशानांत पोचवूं. "

" मग तिथें नेल्यावर काय करायचं ? "

" खरंच, मग काय करायचं रे, सोन्या ? " आतां नक्की आठवत नाहीं; पण कुणीतरी सोन्याला विचारलें.

" आणि मग तिथें नेल्यावर..." सोन्यानें थोडा वेळ विचार केला मग तो एकदम म्हणाला, " आणि मग कांहीं नाहीं. "

" पण त्या आजी गेल्या न, त्यांना कांहीं कुणी परत आणलें नाहीं म्हणे. "

मी मरणार या नुसत्या कल्पनेनेसुद्धां लाल्याची विलक्षण घाबरगुंडी उडाली होती.

" हा रांडेच्या ! येडचाप कुठला ! मेल्यावर त्या परत कशा येणार ? त्या गेल्या देवाकडे. "

" पण देवाकडे जायचं कसं रे ? " माझी शंका.

" तूं तरी लाल्यासारखाच साळढाळ लेका ! " सोन्या म्हणाला.

" अरे देव नेतो आपल्याकडे माणसाला. आपल्याला नाहीं कांहीं करावं लागत. "

" मस्त ! मस्त मजा आहे तर मरणांत ! मी आहें मरायला तयार. "

मी आनंदानें टाळी वाजवली.

माझ्या डोळ्यांपुढे छानसें चित्र उभें राहिलें. आपण मेलोय्. देवानें स्वर्गापासून खालपर्यंत एक भली मोठी लांबलचक शिडी लावली आहे. आपला हात धरून तो आपल्याला हळुहळू वर नेतो आहे. देव विमानहि पाठवील कदाचित्. तुकाराम वैकुंठाला म्हणे विमानांत बसून गेले. बाईनीं शाळेत सांगितली होती ती गोष्ट. देवानं मला विमानातून नेलं, तर खूपच मज्जा मी जातां-जातां खालीं पाहीन. पृथ्वीवरची सगळीं माणसं, नद्या, डोंगर सगळं कसं छोटं-छोटं, लुटुपटीच्या खेळांतल्यासारखं दिसेल. जेमतेम अंगठ्याएवढीं माणसं. लिलिपुटच्या माणसांसारखी. मी त्यांना ' टाटा ' करून दिमाखानं देवाकडे जाईन.

" काय रे, नक्की मरणार न तूं ? " मला वाटतं, बन्यानं विचारलं.

" हो नक्की. "

माझ्या होकारावर सगळी तयारीला लागली. माझी गंमत होती. मी मेलेला... मला कांहींच काम नव्हतं. सोन्या, बन्या, विन्या म्होरके होते. मन्या, लाल्या त्यांना मदत करीत होते.

वेळ दुपारची. आंबरसपुरीचें जेवण झालेलें. माणसें चांगलीच आहीरलीं होतीं. आमचे काका तर चांगलेच घोरत पडले होते. ते अंथरुणावर पडले न पडले कीं झालीच त्यांची घोरण्याला सुरुवात. पण त्यांची झोप तशीच सावधहि. जरा कुठें कांहीं खुट्ट वाजायचा अवकाश कीं, उठलेच ते ! ते केव्हां जागे होतील याचा नियम नव्हता, म्हणून मी पहारा करीत होतो.

सोन्यानें, बन्यानें सगळी तयारी केली. धुणी वाळत घालण्याची एक काठी अन् वेचड्यात पडलेला एक बांबू घेऊन त्यांना त्यांनीं झाप बांधून तिरडी तयार केली. वेंहेड्यातच एक मडकें पडलेलें होतें [ कदाचित् आईचें संक्रांतीच्या वाणाचें मुगडहि असेल ] त्यांत चुलींतला उरलासुरला निखारा घातला. एक शेणकुटहि. एका दोऱ्यांत दारची चार फुलें ओवून हार तयार केला. सकाळीं पेटवलेल्या थाळीवरच्या तपेल्यांत अजून दोन तांब्ये गरम पाणी होतें, तेहि मला

आंघोळ घालण्यासाठं आणलें. सगळी तयारी झाल्यावर सोन्या म्हणाला, " मध्या, चल मर आता लवकर. "

तिरडीवर मी निपचीत उताणा पडलों. मला तिरडीवर बांधण्यापूर्वी वजनाचा अंदाज घेण्यासाठीं त्यांनीं माझ्यासकट तिरडी उचलून पाहिली.

" छे ! हा भारी पडेल आपल्याला उचलायला. खूप लांब जायचंच पुळणीच्या वाटेनं " सोन्या म्हणाला.

" मध्या, रांडेच्या ! भारी लोध्या तूं ! काय रे हें तुझं शरीर ! "

" मग तू तरी कमी जाड्या आहेस का, रांडेच्या ! " मी तिरडीवर उठून चसत म्हटलें.

" चल उतर तू खालीं. " सोन्याने मला तिरडीवरून बाजूला ढकललें.

आता मरण नाहीं म्हणजे देवाकडे जाणंहि नाहीं नि मजाहि नाही. माझा थोडा विरसच झाला.

" मग आता काय नि कसं करायचं ? मरायला दुसरं कोण तयार आहे ? " सोन्या म्हणाला.

कुणीतरी माझ्या खांद्यावर मागून येऊन एकदम हात ठेवला. " फार भराभरा चालताय तुम्ही. मंडळी मागं पडली आहेत. नानांचा खांदा आधींच अधू. दुखायला लागला, म्हणून जरा खांदेपालट करावा लागला. "

मी किंचित् थबकलों. नि पुन्हा मंद्गतीनं पुढें चालायला लागलो. मन मात्र थबकायला तयार नव्हतें. तें तसेंच वेगानें मागे धावत होतें.

त्या दिवशीं कुणी मरायचं हा प्रश्नच बन्यानें सोडवला.

" लाल्या बरा पडेल आपल्याला उचलायला " बन्या म्हणाला, " लाल्या, चल. मर तूं लवकर. "

लाल्या मेला, तर शाळेंत आपला पहिला नंबर येईल अशी कदाचित बन्याची समजूत असेल. कारण नाहींतरी लाल्यामुळें दर वेळी त्याचा पहिला नंबर हुकत होता.

" हो, हो. तोच बरा आहे. लाल्या काय लेचाडा नुसता. सहज उचलतां येईल आपल्याला त्याला "...

सोन्यानें बन्याच्या बोलण्याला पुष्टी दिली.

" मी...मी मरायचं ? मी प्रेत व्हायचं ? "

नुसत्या कल्पनेनेंहि लाल्या मनस्वीं घाबरला.

" हत् रांडेच्या ! घाबरतोस काय मरायला ? मध्या बघ. किती धीट ! आपणहून तयार झाला मरायला. "

" तर काय ! तूं लेका अगदींच बायल्या ! "

" पण मी मेलों. तर आईला फार वाईट वाटेल रे. "

" छ्या ! भित्री भागूबाई नुसती ! बांगड्या भर आतां. म्हणे आईला फार वाईट वाटेल. मध्या मेला, तर त्याच्या आईला नाहीं वाईट वाटणार ? "

बन्यानें मला वाटतें, लाल्याला मुद्दामच खिजवलें.

" मी मध्यालासुद्धां नकोच म्हणत होतो मरायला. हा खेळ नकोच आपण खेळायला. "

लाल्या रडकुंडीला येऊन म्हणाला.

" मोठा शहाणाच कीं नाहीं ! एवढी तयारी केली ती फुकट ? "

" ते कांहीं नाहीं. तुला मेलंच पाहिजे. "

सोन्यानें अन् बन्यानें लाल्याला दमच भरला.

" पण मी मेलों तर माझ्या आईला दुसरं कुणीच नाहीं रे. "

" मग कुणी नसलं म्हणून काय झालं ? " सोन्यानें दरडावलें.

" पण——पण मी नाहीं इतक्या लवकर मरणार. मला अजून जगायचंय्— खूप-खूप शिकायचंय. मला नाहीं मरायचं. मला खूप शिकायचंय; खूप खूप मोठा व्हायचंय. "

जगण्याची, शिकून मोठा होण्याची अशी मनस्वी इच्छा असतांना लाला आज अचानक गेलाय अन मरणाबद्दल फारशी खंत न बाळगणारा, कांहींसा बेफिकीर असणारा मी, त्याच्यापुढे मडकें धरून चाललोय्. काय विचित्र योगायोग !

डोळे पुन्हा घळघळा वाहायला लागलेत. समोरचं सगळंच भोरकट दिसत; पुढे पाऊल टाकणें अशक्य झालंय.

" मग तूं रांडेच्या, शिकणार, मोठा होणार नि आम्ही काय इथं भाकऱ्या भाजणार आहोत ? का शेणी थापणार आहोंत ? "

बन्यानें खवचटपणें हसून त्या दिवशीच्या लाल्याच्या शब्दांची टरच उडवली.

" बरं मग तू शीक नि मोठा हो. आमच्यांत नको आता खेळायला येऊस. आमच्यात खेळायचं असेल तर तुला मरायला हवं आता. " सोन्यानें लाल्याला शेवटचें सांगून टाकलें.

" हो. तुला मरायला हवं. "...

बन्यानें त्याची री ओढरी.

लाल्यानें दीनवाणेपणानें माझ्याकडे पाहिले कसाईखान्याकडे जाणाऱ्या बकऱ्याप्रमाणें. मी त्या प्रसंगातून त्याची सुटका करावी या आशेनें.

पण मरणांत मला कांहींच वाईट वाटत नव्हतं. उलट मौजच वाटत होती. मी म्हटले, " मर न लाल्या. अरे खूप मजा असते मरणांत. "

" पण खरं सांग, मधू. मरायचं म्हणजे माडावर चढण्याइतकं कठीण आहे का रे? नाहींतर मागच्या सारखा थोडंसं जातो न जातो तो धपकन् खालीं पडेन. नि हातपाय मोडला तर आणखी आईच्या हातचा मार खावा लागेल. "

" अरे, पण मेल्यावर तूं पुन्हां इथे येणारच कसा आईच्या हातचा मार खायला? तूं जाऊन बसणार एकदम देवाच्या घरीं. मग आजी देवादिकांच्या गोष्टी सांगते न, त्या सगळ्या प्रत्यक्ष पाहायला मिळतील तिथें तुला. अमृत प्यायला मिळेल. शहाळ्याच्या पाण्यापेक्षां गोडगोडसं. तिथें खूप अमृत असतं म्हणे. "

मी माझ्या डोक्यांतल्या सगळ्या कल्पना लाल्याला सांगितल्या. त्यालाहि त्यांत मग गंमत वाटली. तरी मनाच्या एका कोपऱ्यात भीति होतीच. पण शेवटीं तो मरायला तयार झाला.

पुन्हा कुणीतरी मागून येऊन मला हलकेंच डिचवलें.

" सर्वांच्या बरोबरीनें चालायला हवं तुम्हाला. इतके सावकाश नका चालू. वर उन्ह तापलंय. पाऊल जरा उचलायला हवं. "

विचाराच्या तंद्रींत माझें माझ्या चालीकडे लक्षच नव्हतें. अधूनमधून भरून येणाऱ्या डोळ्यांना रस्ता धूसर दिसत होता. मी कधी भराभर तर कधीं मला वाटतें, सावकाश चालत असावा.

त्यांच्या सांगण्यामुळें माझीं पावलं पुन्हा जलद गतीनें पुढें पडायला लागलीं. मन मात्र पुढें जायला राजी नव्हतं. ते मागेंच वळलं.

सोन्यानें नि बन्यानें लाल्यावर जबरदस्ती केल्यामुळें लाल्यानें शेवटीं मरायला रुकार दिला.

मग त्या दोघांनीं त्याला आंघोळ घालून तिरडीवर ठेवलें. कुंकू, गुलाल, लावला. वर सफेद कपडा घातला. लाल्या हात पाय झाडून ' नको नको ' म्हणत असताहि तिरडी बांधली.

मडकें धरण्याचें काम ओघानेंच माझ्याकडे आलें. सोन्या, बन्या, मन्या, वगैरेंनी त्याला खांदा दिला. आणि लाल्याची प्रेतयात्रा निघाली.

वाडीच्या अगदीं मागच्या बाजूला, पुळणीजवळ आमचे हे उद्योग चालले होते. शिवाय आमची वाडी खूप लांब रुंद, अवाढव्य आहे; त्यामुळें घरात कुणालाच कशाचा पत्ता नव्हता. वाडींतल्या माडापोफळीच्या गर्दीमुळें घरांतल्या लोकांना इतक्या लांबचं दिसणं शक्यही नव्हतं. त्यातून त्या वेळीं सगळी ढाराढूर घोरत पडलेली.

पुळणीवाटे आम्ही बिनधोक बाहेर पडलो. सहीसलामत बाहेर पडलो खरे, पण जेमतेम दहा वीस पावलं चाललो न चाललो तोच थबकलो. पायांत कुणाच्याच कांहीं नव्हते. वाळू चांगलीच तापली होती. पायाला चटके बसत होते. खांदा देणाऱ्यात मन्या थोडा नाजूक नि मिजाशी होता. तो म्हणाला, " अशा तापलेल्या पुळणींतून आपण नाहीं बुवा यायला तयार. पायाला फोड येतील उद्यां. "

मन्यानं हातपाय गाळले. मग तिरडी कशी नेणार ?

" हे पाहा, माडांच्या सावल्या पुळणीवर आल्यायत. तिथें सावलींत थांबूं जरा. अन् मग काढूं डोक्यांतून शक्कल. " सोन्या म्हणाला.

तेवढ्यात...

" रांडेच्यांनो, काय करताहात रे तिकडे ? " काकांचा दणदणीत आवाज कानावर आला.

सगळ्यांचे डोळे आवाजाच्या दिशेला वळले नि आम्ही चांगलेच भेदरलो.

" बापरे ! आता भरली आपली पुरी शंभर वर्षे. "

मी विलक्षण घाबरलों. काका हातांतला तांब्या तसाच धरून आमच्याकडे धावतच येत होते. त्यांनीं सर्व पाहिलेलें होतें नक्कीच.

" सोन्या, रांडेच्या ! चड्डया पिवळ्या व्हायचीं वेळ आली आतां. "

"छ्या! सगळंच ऑफस झालं! तुझे काका आतांच कुठें आले इकडे मरायला?"

"अरे, ते शौचाला निघालेत पुळणीवर. आमचा संडास पडलाय् न. पण आतां रे?"

"आतां करायचा शिमगा."

असे म्हणून काका जवळ आलेले पाहताच सगळें ढुंगणाला पाय लावून पळाले. वाट सापडेल त्या वाडींत शिरले. राहिलों मी तिथे एकटाच, काकांच्या तावडींत. लाल्याला तिथें तसा एकटाच टाकून मला जाववेना.

"रांडेच्यांनो, हे कसले तुमचे खेळ मरणाचे!"

असे म्हणून काकांनीं प्रथम फाडकन माझ्या एक मुस्काटांत भडकावली. तरीहि मी लाल्यासाठीं तिथे तसाच गाल चोळीत चोळीत उभा राहिलो. मला कांहींच सुचेना. मनाला कसेंतरीच वाटूं लागलें.

काकांनी लाल्याला मोकळें केलें. लाल्या तिरडीवरून उठला नि मला 'पळ लवकर' म्हणून खुणावून धूम घराकडे पळाला. मी त्याच्यामागोमाग धावणार, तेवढ्यात...काकांनीं माझा शर्ट पकडला. आणि बखोट्याला धरून मारीत-मारीत घराकडे आणले. प्रत्येक फटक्यागणिक ते मला दरडावून विचारीत होते.

मला कांहींच सांगता आलें नाही. मनाला नाहीं म्हटले तरी चुटपूट लागून राहिली. आपलें कांहीं चुकलें तर नाहीं ना?

वास्तविक मूळ कल्पना सोन्याची. त्यानें नि बन्यानें लाल्याला भरीला घातलें. पण मी त्या खेळांत सामील झालो. लाल्याला 'मर' म्हटलें हें चुकलें खरेंच.

मनात असे विचार येत होते. मी काकांच्याबरोबर फरफटत घराकडे चाललो होतो. मार खात खात.

आज तो मरेमरेस्तो खाल्लेला मार आठवतोय; तें सारेंच आठवतेंय. जसें घडलें तसें. मला त्या दिवशीं दुःख झालें, पण तें माझ्या माराचें. अंग गळवासारखें ठणकत होतें त्याचें. लाल्याच्या मरणाचें मला कांहींच दुःख नव्हतें.

पण...पण आज वाटतं,

त्या दिवशीं आम्ही तो खेळ खेळलो नसतों तर?

तो भयंकर खेळ ! लाल्याच्या प्रत्यक्ष जिवाशीं खेळलेला. जिवंतपणी काढलेली त्याची प्रेतयात्रा !

नेणून का होईना, तेव्हां केलेल्या त्या भयंकर अपराधाचं प्रायश्चित्त म्हणून तर हें संकट आज आमच्या कोसळलं नसेल ना ? लाल्याला तिरडीवर घातला तेव्हां पाल तर चुकचुली नाहीं ना, सत्य, सत्य म्हणून ? भवितव्यत बोलून चुकली कीं काय ? वातावरणात जीं भुतं वावरत असतात त्यांनीं तो खेळ पाहिला तर नाहीं ? तेव्हांचं आमचं बोलणं ऐकून वास्तुदेवतेनं 'तथास्तु' म्हटलं कीं काय ? म्हणूनच त्या वेळी माझ्याकडे आलेलं मडकं धरण्याचं काम आज मला पुन्हा करावं लागतंय.

आठवणीसरशी अंग नुसतं थरारून येतंय्.

पण माझं चुकलं असं तरी मी कसं म्हणू ! मरण म्हणजे काय हें तेव्हां कळत नव्हतं, म्हणून तर आम्ही तो जीवघेणी खेळ खेळलो.

मी माझ्या मनाची समजूत घालण्याचा प्रयत्न करतोय पण मनाला लागलेली चुटपुट नाहींशी होत नाही. मनाला शंका सारखी बोचत राहिलीय्. मी चुकलोय्, चुकलोय् ! नि त्या चुकींतून ही पळवाट शोधून काढतोय्.

आम्ही पुळणीजवळ येऊन पोहलो. वरून उन्हाचे चटके बसत होते. खालीं तापलेल्या वाळूचे. क्षणभर मन भिरभिरले......

तीच, तशीच वेळ. मागें आम्ही खेळ खेळलो अगदी तश्शी, तीच. वाटतंय, लाल्या मेलाच नाहीं. तो खेळात मेलाय्. अन् त्या दिवशी काकांनीं अचानक येऊन आमचा खेळ जसा उडवून लावला तसाच हा खेळहि उडवला जाईल. एखाद्या अज्ञात शक्तीनें. काकांच्या रूपानें. आणि लाल्या तिरडीवरून उठून मागच्यासारखाच घराकडे धावत सुटेल. पण आज आता काकांच्या हातच्या माराची भीति मला बिलकुल वाटत नाहीं. मी लाल्या उठण्याच्या आशेनें वाट पाहातोय्. वरून अंगाला उन्हाचे चटके बसताहेत तरी. हातांतल्या मडक्यांतल्या विस्तवाची धग जाणवतेय् तरीहि.

■ ■

■ ४ ■

# जिज्ञासा

जानकीच्या लेकाचें लग्न झालें. थाटामाटानें, उत्साहानें, पहिलावहिला मुलगा म्हणून मोठ्या कौतुकानें लग्नाचें सूप पाखडलें गेलें. आल्या गेल्या, वऱ्हाडी मंडळींचीं देणीं घेणीं, मानपान उरकले. नव्या जोडप्याकडून सत्यनारायणाची पूजा झाली, आणि जानकीचा मुलगा नि सून हनिमूनला, काश्मीरला गेलीं.

लग्नाचें वऱ्हाडहि हळूं हळूं पांगलें. लग्नाच्या पूर्वतयारींत आईला मदत करण्यासाठीं तिची लेक आठ दहा दिवस आधीं येऊन राहिली होती, तिलाहि आतां जास्त दिवस राहाणें शक्य नव्हतें. म्हणून तिनेंहि आपल्या मुक्कामाला कूच केलें. तिच्या पाठोपाठ जानकीच्या धाकट्या लेकानेंहि आपला होल्डॉल आवरला. त्याला कामावर हजर राहायलाच हवें होतें.

त्यामुळें घरांत आतां जानकी नि तिचे यजमान बाबुराव अशीं इन मीन दोनच डोकीं वावरतांना दिसत होतीं. गेलें कांहीं दिवस घरांत चाललेली धामधूम, गोंधळ, आरडाओरड, गजबजाट, मुलांचीं रडणीं-ओरडणीं, रुसणीं-फुगणीं, हट्ट, मोठ्या माणसांचा मुलांना धाक दाखवण्यासाठीं रागावण्याचा, ओरडण्याचा आवाज, मधूनच मुलांच्या पाठींत बसलेल्या धपाट्यांचा धपाधप आवाज, आणि त्यानंतर मुलांच्या गळ्यांतून निघालेले बेंडबाजाचे सूर, मुलांची आपापसांत चाललेली मारामारी, भांडणं अन् त्यावरून मोठ्या माणसांत होणारी अस्पष्टशी

धुसफुस, कामाची धांदल, धांवाधांव—सगळें सगळें संपलें नि सारं कसें एकदम शांत शांत झालें.

एरवीं जानकीच्या घरांतलें वातावरण कसें शांत शांत. थंड, थंडच असे. घरांत सारी सडी, इन मीन तीन माणसें. ना लहान मूल ना बाळ, कीं येणा-जाणारांची, पै पाहुण्यांची वर्दळ. मग गडबड, गोंधळ असणार तरी कसला नि कुणाचा ! सगळा संसार चालला होता तो बेताबातानें, काटकसरीनें, व्यवस्थित-पणानें, टापटिपीनें. पण लग्न जवळ आलें नि जानकीच्या घरानें लग्नघराचें स्वरूप धारण केलें.

या लग्नाच्या या साऱ्या कोलाहलात जानकीचें डोकें कधीं कधीं उबून जात होतें. आढींत घातलेल्या आंब्याप्रमाणें. पण तरीहि तिला तें सारें हवें हवेंसें वाटत होतें. त्यांत एक प्रकारची गंमत वाटत होती. पण तें सारें संपलें नि जानकीला सगळें घर ओकेंबोकें वाटायला लागलें, एकदम कसें खायला उठलें.

घरांत कामाचा पसारा 'मी' म्हणून पडला होता. लग्नाच्या त्या घाईगर्दीत कुणीहि लागतील त्या वस्तु वाटेल तेंव्हां काढून घेऊन कुठेंहि, कशाहि ठेवून दिलेल्या होत्या. अव्यवस्थित नि अस्ताव्यस्त. लग्नाकरतां जादा आणलेले डाळ, तांदूळ इत्यादि सामान, उसकटलेल्या वस्तु, सामानानें घर नुसतें ओतूं चाललें होतें. घरांत कुठें निवांतपणें बसायलाच काय पण पाऊल ठेवायलासुद्धां जागा नव्हती. त्यांत आणि प्रेझेंट आलेल्या वस्तु, लग्नाप्रीत्यर्थ हौसेनें, कौतुकानें केलेल्या कलाकुसरीच्या गोष्टी—यांची योग्य रीतीनें विल्हेवाट लावणें, कामाचा हा सारा पसारा आवरणें, म्हणजे मोठें दिव्य होतें.

त्यांतून गेल्या पंधरवड्यांत जानकीला निवांतपणीं दोन घटका झोंपायलाहि मिळालें नव्हतें. गांवभर बोलावण्यांना हिंडता हिंडतां शरीर अगदीं थकून गेलें होतें. चेहरा ओढल्यासारखा झाला होता. डोळ्यांवर झोंप होती. पण जानकीला कांहींच सुचत नव्हतें. कामाचा पसारा 'आ' वासून पुढें पडलेला असूनहि त्यांतलें कुठलें, कसें, कधीं आवरायचें याचा उलगडा होत नव्हता. डोळ्यावर झोप असूनहि झोंपावेंसें वाटत नव्हतें. झोंप येणेंहि शक्य नव्हतें. एक दोन दिवस असेच गोंधळांत गेले नि मग हळूं हळूं ती आपल्या नित्याच्या उद्योगाला लागली. चार सहा दिवसांत तिनें सारा पसारा आवरला नि घर पुन्हां पहिल्या-सारखें व्यवस्थित लावून टाकलें.

लग्नाच्या आधींची गडबड, लग्नांतली धामधूम आणि नंतरचा पसारा यानें जानकीचें शरीर चांगलेंच आंबलें होतें, शिणलें होतें. थाटमाट हौसमौज सगळें कौतुकाचें खरें, पण म्हणून शीण आल्यावांचून थोडाच राहाणाराय! फक्त त्या धामधुमींत, उमेदींत तितकासा भागवटा जाणवला नाहीं इतकेंच. पण आतां मात्र जानकीचें शरीर पेंगुळल्यासारखें झालें. लग्नाची जबाबदारी संपली होती. सारें कसें सुरळीत पार पडलें होतें. मनावरचें एक मोटें दडपण कमी झालें होतें. पण त्यामुळेंच तें आतां मोकळें मोकळें झालें होतें. आणि मग मनाच्या पोकळींत निरनिराळे विचार अलगद डोकावूं लागले. विचारांच्या मऊ मऊ दुलईंत जानकीचें मन हळूंच शिरलें नि दुलई लपेटून निवान्त विसावा घेऊं लागलें......

अकरावें वर्ष संपून बारावें वर्ष लागतें न लागतें तोंच जानकीच्या गोऱ्या गोऱ्यापान, गुबगुबीत, कोंवळ्या कोंवळ्या हातावर हिरवा चुडा चढला. तिच्या नितळ, तजेलदार कांतीमुळें हिरव्या साडीचोळीला केवढी शोभा आली होती! सोन्यामोत्याच्या दागिन्यांनीं शरीर नखशिखांत मढून निघालें होतें. लग्न म्हणजे काय ही जानकीला त्या कोंवळ्या वयांत कल्पना तरी काय नि कशी असणार? भातुकली खेळण्याचें, हक्कानें, आईवडिलांवर रुसण्याफुगण्याचें, भावंडांच्याशीं भांडण्या तंटण्याचे, गाभुळलेल्या चिंचा-कैऱ्या आईवडिलांच्या नकळत चोरून खाऊन खोकला झाल्यावर पाठींत धपाटे खाण्याचें, अल्लडपणानें अवखळपणानें खेळण्याबागडण्याचें तें वय! त्या वयांत जानकी उंबरठ्यावरचें भरलें माप उलथून सासरच्या आपल्या हक्काच्या घरीं आली. भातुकलींतला लुटुपुटीचा संसार खेळण्याच्या वयांत जानकीच्या खरोखरीच्या संसाराला सुरुवात झाली.

लग्न ठरल्यामुळें जानकीला आनंद झाला होता, नाहीं असें नाहीं. पण तो आनंद इतर स्त्रियांना लग्न ठरल्यावर होतो, त्यापेक्षां अगदीं निराळाच होता. लग्नांत नवीन दागदागिने, कपडे, सुंदरशा सोन्याच्या बांगड्या, सारें तऱ्हतऱ्हेचें हौसेनें घालासंवरायला मिळेल म्हणून ती मनोमन आनंदली होती. पण प्रत्यक्ष लग्नाच्या वेळीं मात्र जानकीचा जीव अगदीं जेरीस आला. कारण जानकीचें लग्न झालें तें अगदीं जुन्या पद्धतीनें. चांगलें तीन चार दिवस गाजावाजानें. छोटीशी, देखणी सून जानकीच्या सासूबाईंनीं घरांत आणली ती केवळ आपल्या हौसेसाठीं अगदीं कौतुकानें. मग लग्नाचा थाट काय विचारतां! जेवणाच्या पंगती, देणी-

वेणीं, मानपान, विहिणीचें, जांवयाचें रुसणं फुगणें–यांची दोन तीन दिवस नुसती धमाल चालली होती.

मोठीं माणसें इकडून तिकडे मिरवीत होतीं. नटत मुरडत होती, खात पीत होतीं. त्यांची चंगळ चालली होती, मजा चालली होती. पण जानकीचा इवलासा कोंवळा जीव मात्र या गोंधळांत, लग्नाच्या साऱ्या सोहळ्यांत थकून शिणून गेला होता. होमाच्या धुरानें डोळे चुरचुरत होते. त्यांत सारखें सारखें येणारें पाणी टिपतां टिपतां जानकीचे नाजुक हात थकत होते. नाकाचा शेंडा लाललाल झाला होता. दागिने नि कोऱ्या साड्या तिला आतां नकोशा वाटूं लागल्या.

आतांपर्यंत जानकीला साडी नेसण्याची तरी कुठें संवय होती ! ती परकर-पोलकेंच घालीत होती. परवंड्यानें ती कधीं हौसेनें एकदोन वेळां जेमतेम साडी नेसली असेल काय ती ! पण आतां तिचें लग्न होतें नि लग्नांत साड्या नेसणें प्राप्तच होतें. एवढ्या मोठ्या नऊ वारी साडींत ती सर्वच्या सबंधच्या सबंध नुसती बुडून जाई. सकाळपासून साडी नेसल्यावर संध्याकाळीं तिचा जीव नुसता उबून जाई. पण आतां रात्रीपर्यंत तिला ती साडी सोडण्याची बात बोलतां येत नसे. म्हणून रात्र केव्हां होते नि परकर पोलकें घालायला केव्हां मिळतें याची ती वाट पहात राही.

लग्नाच्या या सोहळ्यांनीं जानकीचा नवराहि वैतागून गेला होता. तोहि बिचारा जेमतेम सतरा अठरा वर्षांचाच होता. त्यामुळें तीं दोघेहि या सोहळ्यां-तून आपण केव्हां एकदां सुटूं म्हणून वाट पहात होतीं.

लग्नाची धामधूम संपते न संपते तोंच जानकीच्या सासूबाईनीं तिला गृह-शिक्षणाचे धडे द्यायला सुरुवात केली. जानकी एकुलती एक कौतुकाची सून, म्हणून त्या तिला लगेच स्वयंपाकाच्या गाड्याला जुंपणार नव्हत्या, पण तरी तिला स्वयंपाक करतां येणें आवश्यकच होतें. कारण जानकी आतां सासुरवाशीण होती. गृहिणी होती. मग तिला गृहकृत्यें करायला यायला नकोत ! कुंवारपणांतल्यासारखें आतां नुसतें हुंदाडून कसें चालेल ? पिठलं–भाताचा पहिला पाठ जानकीला चार दिवसांत चांगला पाठ करावा लागला. अगदीं घोकंपट्टी करून. मग नवी सून म्हणून जानकी सासूबाईच्या बरोबर रोज दुपारीं कुणा ना कुणाकडे बसायला जाऊं लागली.

मामंजीनीं तिला कांहींतरी प्रश्न विचारला तो प्रश्न काय होता हे आज जानकीला नक्की आठवत नव्हतें. पण त्यांनी कांहींतरी विचारलें एवढें खरें. नवऱ्यानेंहि कशी कोण जाणे मान वर करून जानकीकडे उत्तराच्या अपेक्षेनें पाहिलें नि जानकी जी लाजली लाजली नि गोंधळली ती कांहीं विचारायची सोय नाहीं. मामंजींच्या प्रश्नाचें उत्तरहि न देतां ती तिथून सुसाट आंतच पळाली. त्या पळापळींत तिचें डोकें कपाटाला आपटलें नि त्याला थोडेंसे टेंगुळहि आलें.

आज त्या प्रसंगाची आठवण झाल्यावर जानकीला मोठें हंसू आलें, छे! आपण अगदींच लाजाळू? आपल्यावेळची पद्धतहि मोठी विचित्रच. लग्न म्हणजे काय हें समजण्यापूर्वींच आपलें लग्न झालें. आपल्याला फक्त एकच गोष्ट ठाऊक होती, कळत होती. ती म्हणजे नवऱ्याला पाहिल्यानंतर लाजणं! लग्न होऊन पुरें वर्ष होऊन गेलें तरी जानकी आपल्या नवऱ्याशीं चार दोन शब्द तरी बोलली होती कीं नाहीं कोण जाणे! नवऱ्याशीं तिची ओळख झाली ती लग्नानंतर दोन अडीच वर्षांनीं. तिला एकदम आपल्या नवीन लग्न झालेल्या मुलाची आठवण झाली. लग्न ठरल्याबरोबर तिचा मुलगा नि भावी सून एकमेकांशीं किती मोकळेपणानें बोलायला लागलीं! जणुं दोघांची कित्ती दिवसांची जुनी ओळख होती! दोघे बरोबर फिरायला जायला लागलीं. एकमेकांच्या पसंतीनें त्यांनीं लग्नाचे कपडे घेतले. सुनेचे दागिनेसुद्धां त्या दोघांच्या पसंतीनेंच झाले. कुणी जरा थट्टा केली कीं दोघेहि लाजेनें चूर होत. ती तसली थट्टा त्यांना हवी-हवीशी वाटे. कारण त्या थट्टेचा अर्थ त्यांना कळत होता.

आपली कुणी त्यावेळीं थट्टा केली तरी आपल्याला त्याचा कांहींच अर्थ कळत नव्हता. कळत होतें तें फक्त लाजणें. केवळ लाजणेंच. दुसरें कांहीं सुद्धां नाहीं.

नवऱ्याला पाहून आपल्याला एवढी लाज का वाटते, याची जानकीला कांहींच कल्पना नव्हती. पण तरीहि तिला लाज वाटत होती खरी. अन् आतां जानकीचा मुलगा लग्नाच्या अक्षता पडण्यापूर्वींच आपल्या भावि वधूच्या मागें मागे करत होता. तिला जपत होता. तिच्या तंत्रातंत्रानें, कलाकलानें वागत, चालत होता. अन् परवां तर जानकीनें एक मोठी गंमत पाहिली...

जानकी सहज म्हणून बाहेर पडली. कां कोण जाणे, तिचे पाय समुद्राकडे वळले. मग ती एकटीच जाऊन समुद्रावर बसली. वाळूंत कांहीं चाळा करीत.

अन् तेवढ्यांत तिचा मुलगा नि सून तिला नेमकी दिसली. हातांत हात घालून, हंसत खिदळत, गप्पाष्टकें करत ती वाळूंत फिरत होतीं. तो कांहीं तरी बोलल्यावर तिनें मानेला नाजुकसा हिसडा दिला, ती लाजली, हंसली. अगदी किंचितशी, ओठातल्या ओठांत. तिचा तो लाडिक हावभाव, जानकीला फारच विलोभनीय वाटला. लग्नापूर्वी तीं एवढ्या गप्पा तरी काय नि कसल्या मारतात! इतके विषय तरी कसे नि कुठले मिळतात त्यांना बोलायला! जानकीचें कुतुहल हळूच डोकें वर काढून पाहूं लागलें. नवीनच जन्मलेल्या मांजरीच्या पिलानें प्रथमच डोळे उघडल्यावर आजूबाजूला कुतुहलानें पहावें तसें.

त्यांचें बोलणें सहजगत्या कानावर पडलें तर बरें, असें वाटून अभावितपणें तिचे अधीरे कान टवकारले गेले. पण जानकी त्यांच्यापासून बऱ्याच अंतरावर होती. आजूबाजूला असलेल्या जाडजूड सिंधी बायकांच्यामागें ती लपली गेल्या-मुळें त्यांना दिसूं शकली नाहीं. ती दोघेजण तशीच पुढें निघून गेलीं. जानकीची जिज्ञासा तशीच जिरली.

आपल्या वेळच्या मानानें जग आतां खूप बदललंय, हें ती ऐकत होती. मुंबईसारख्या मोठ्या शहरांत राहून प्रत्यहीं पहातहि होती. पण तें सारें प्रत्यक्ष आपल्या घरांत घडलेलें ती आतांच पहात होती. तिला तें सारें नवीन नवीन वाटत होतें. आतांपर्यंत रस्त्यांत नवराबायको हंसत खिदळत गप्पाष्टकें करीत हातांत हात घालून चाललेली पाहिली, तर तिला तें जरा चमत्कारिक वाटत होतें. त्यांत नवल वाटत होतें. ह्यांना काय घरेंदारें नाहींत प्रेमाचे असले चाळे चव्हाट्यावर करायला, असाहि एक अंधुक विचार तिच्या मनांत येत असे. पण आतां हे प्रेमाचे चाळे, प्रीतीचे खेळ स्वतःच्या घरांत चाललेले ती पहात होती. अगदीं सताड डोळे उघडे ठेवून. पण आतां तें पहातांना तिला एकप्रकारची गंमत वाटत होती, अन् आज तर तिच्या मनांत एक चोरटा विचार हळूच शिरला होता......

खरेंच. असें एकमेकाशीं प्रेमानें वागायला आपल्याला कधीं संधीच मिळाली नाहीं. आपण एकमेकांवर प्रेम केलें तें अगदीं दुरून. शब्दरहित, अबोल, केवळ डोळ्यानें. आपल्या आजवरच्या आयुष्यांत कांहीतरी अपुरें, कांहींतरी न्यून राहिलें. कांहीं कांहीं हव्या हव्याशा वाटणाऱ्या अनुभूतींना आपण पारख्याच राहिलों. सुखाचा कांहीं भाग लंगडा, थोटकाच राहिला. तें हातांत हात घालून

हिंडणेंफिरणें, सुखदशा जाणिवेनें लाजणें मुरकणें, एकमेकांच्या जास्तींत जास्त सहवासांत राहाणें, त्या सहवासासाठीं मन आसावणें, आसुसणें. आतुरता, औत्सुक्य, उत्कंठा. अन् या साऱ्याचा अनुभवानंद—हा मनसोक्त. मनमुराद लुटायला मिळावा, नव्याची नवलाई आकंठ अनुभवावी, सुखोपभोगानें बेहोष व्हावें—म्हणून हीं निघालेली हनिमूनची कल्पना !

हनिमूनच्या ह्या कल्पनेचा विचार जानकीच्या मनाला किंचितसा, चुटपटता स्पर्श करून गेला न गेला तोंच जानकीचा जीव एकदम चांगलाच चुटपुटला. मनाच्या एका कोपऱ्यांत अस्वस्थता दाटली. आयुष्यांतल्या एका फार मोठ्या आनंदाला मुकल्याबद्दल जीव हळहळला. तिला वाटलें—आपण संसार थाटला, चांगला रौप्यमहोत्सवाइतकीं वर्षं तो टापटिपीनें केलाहि, मुलेंबाळें झालीं, आतां सूनसुद्धां आली, पण असली गंमत आपल्या आयुष्यांत कधीं घडलीच नाहीं. आपल्यावेळीं अशी हनिमूनची कल्पना असती तर !

आपल्या लग्नानंतरच्या आठवणींत गुरफटलेलें तिचें मन एकदम तें आठवणींचें पांघरूण दूर सारून मुलाच्या हनिमूनच्या विचारांत, कल्पनेनें शिरलें. खरेंच, आतां ती दोघें काय बरें करत असतील ! रोजचा त्यांचा काय कार्यक्रम असेल ! ती खूप खूप मजा मजा करत असतील. हातांत हात घालून हिंडत फिरत असतील. हंसत खिदळत गप्पा मारीत मारीत हॉटेलांतल्या जिनसांवर ताव मारीत असतील. आणखी, आणखी काय बरें करत असतील ? कल्पनेनें काढलेल्या त्या चित्रावर जानकीला सराईत चित्रकाराप्रमाणें रंगाचा कुंचला फिरवितां येईना. चित्राच्या रेखाहि अजून अपुऱ्याच राहिल्या होत्या. खरेंच, आतां तीं दोघं काय बरें करत असतील' जानकी पुन्हां पेन्सिलीनें त्या कल्पनाचित्राच्या रेखा काढूं लागली.

इश्श ! ती स्वतःशींच किंचित् ओशाळें हंसून पुटपुटली. काय करत असतील म्हणजे काय ? काय बाई वेडा विचार आपल्या मनांत आला ! आतां संध्याकाळीं दुसरें काय करणार ? कुठल्यातरी बागेंतबिगेंत दोघं फिरायला गेलीं असतील कदाचित् ती एखाद्या झाडाआड लपली असेल, तो तिला शोधत असेल. तो जवळ आलेला पहातांच ती हळूच दुसरीकडे लपेल किंवा पुढें धावेल. तिला पकडण्यासाठीं तोहि तिच्या मागें धावत जाईल. ती त्याच्या हातांत सांपडते न सांपडते तोंच पुन्हां निसटून जाईल. आणखी मग ह्या लपंडावाला खूप मज्जा

येईल. झाडाच्या एकाद्या पारंबीला, फांदीला लोंबून ती झोका घेईल. तोहि तिला मोठा झोका देईल. प्रेमी युगुलाची, नायक नायिकेची सिनेमांत जशी पळापळी, गंमतजंमत चालते तश्शी.

नुकत्याच पाहिलेल्या एका सिनेमांत जानकीनें नायक-नायिकेची अशी शिवाशिवी, असला पाठशिवणीचा खेळ पाहिला होता अन् तिला तो मोठा गंमतीदार वाटला होता. तें दृश्य तिला मोठें लोभस; सुखद वाटतें होतें. पण त्यावेळींहि तिच्या मनांत कुठेंतरी थोडीशी अस्वस्थता निर्माण झाली होती. आपल्यावेळीं असला पाठशिवणीचा खेळ खेळण्याची पद्धत नव्हती ह्याचा तिला कांहींसा विषाद वाटला होता. जानकीच्या डोळ्यापुढें, कां कोण जाणे आपला मुलगा नि सून तोच खेळ खेळत असल्याचें चित्र उभें राहिलें अन् तिला मोठी गंमत वाटली. तिच्या ओठांतून कौतुकाचें हंसू फुटलें नि ती स्वतः-शींच खुसूखुसू हंसली. दोन तीन दिवस जानकीच्या मनांत सारखे तेच विचार घोळत होते.

जानकीला आतां घरांत करमेना. तिला वाटलें, पाल्ट म्हणून, वेळ जरा मजेंत घालवण्यासाठीं म्हणून आपण कुठेंतरी जाऊन यावें. मनाला थोडा हुरूप तरी येईल. एकलकोंडेपणा जाईल. नेहमींच्या त्याच त्या जीवनांत, साऱ्या वातावरणांत जरा बदल होईल. आपल्याला आता थोडी फुरसदहि आहे. नाहींतरी मुलगा नि सूनबाई एवढ्यांत परत येणार नाहींत. त्यांना परत यायला अजून चांगला सात आठ दिवस अवकाश आहे. 'ह्यां'ना पण अजून रजा आहे. इथें आतां घर अगदीं खायला उठलंय.

मग त्या रात्रीं तिनें नवऱ्याजवळ हळूच आपल्या मनची गोष्ट काढली. 'मी म्हणते–आपण दोघे चार आठ दिवस कुठंतरी बाहेरगांवीं जाऊन यायचं का? इथें घर कसं अगदीं खायला उठलंय बाई मला. हवापालट झाला, जागाबदल झाला, तर तेवढंच बरं वाटेल थोडं."

वास्तविक जानकी अगदीं नवऱ्याच्या मनांतलेंच बोलली होती. त्यालाहि आतां घरांत बिलकुल करमत नव्हतें. सगळें सुनेंसुनें, ओकेंबोकें वाटत होतें. कुठें-तरी जावें, हवापालट करावा अशी तीव्र इच्छा झाली होती. तोहि जानकीला हाच प्रश्न विचारण्याच्या विचारांत होता, पण जानकीची थोडी गंमत करण्यासाठीं म्हणून तो म्हणाला, 'अग, घरांत काय थोडे का उद्योग आहेत तुला? बरं,

इथले उद्योग सोडून दुसरीकडे जाऊन तरी करमेल का तुला ? नाहींतर पैशापरी पैसा खर्च होईल नि शेवटीं पदरांत कांहींच पडणार नाहीं. ”

जानकी थोडीशी हिरमुसली. मनांतल्या मनांत म्हणाली. ‘ ह्यां ’ ना कसली हौसच नाहीं मुळीं. नवऱ्यानें तिच्या मनांतले विचार बरोबर ओळखले. तो म्हणाला, ‘ अहा ग वेडाबाई ! हिरमुसलीस वाटतं ? एकंदरीत माझं नाटक बरोबर वठलं तर !” नंतर हलकेच तिचा हात हातांत घेऊन तो म्हणाला, “ खरं सांगू तुला, मलासुद्धां परवांपासून सारखं वाटतंय, आपण दोघांनीं कुठेंतरी जाऊन यावं चार दिवस. बघ कुठें जायचं, माथेरान, खंडाळा, महाबळेश्वर ? ”

“ महाबळेश्वरला जाण्याची फार दिवसांची इच्छा आहे माझी. सासूबाईंच्या बरोबर खंडाळा, माथेरानला जाणं झालंय मागें एकदां. पण खरंच आतां आपल्याला जागा कशी नि कुठें मिळणार ? अन् बरं का...” जानकी अगदीं लाडिक स्वरांत म्हणाली, “ ह्यावेळीं आपण कुणाच्या घरीं असं जायला नको बाई. सरळ हॉटलांत उतरू या एकाद्या. आजकाल कुणाकडे उतरायचं म्हणजे त्यांना जड नि आपल्यालाहि संकोच. ”

“ हो, अन् तुलाहि विश्रांति मिळेल चार दिवस. कुणाकडे असं गेलं कीं तुला मग विश्रांति अशी मिळतच नाहीं. ”

‘ लगेच उद्यांच्या उद्यां सकळींच महाबळेश्वरला तार नाहींतर ट्रंककॉल करून विचारतो जागेचं. ’

सुदैवानें एका हॉटेलमध्यें त्यांना हवी तशी खोली लगेच मिळालीहि. जानकीचें ग्रहमान यावेळीं जोरावर होतें, यांत शंका नाहीं.

प्रवासाची तयारी समानाची बांधाबांध, जानकीची धामधूम सुरू झाली. जानकीचें लग्न झाल्यापासून आज पहिल्यांदाच तीं दोघेंच अशीं बरोबर बाहेर-गांवीं जाणार होतीं. आठ दिवस हॉटेलमध्यें राहणार होतीं. मजामजा करणार होतीं. आतांपर्यंत जानकी पुष्कळ ठिकाणी हिंडली फिरली होती. तिनें खूपशी गांवेंहि पाहिलीं होतीं. पण तीं सारीं सासूसासरे बरोबर असतांना. त्यामुळें तिला हवा तसा मोकळेपणा कधींच मिळाला नव्हता. मोठ्या माणसांचा योग्य तो आदर राखून, ज्यांच्याकडे जायचें त्यांची तैनात संभाळून राहतांना तिला संकोचल्या-सारखं वाटत असे पण आतां तिला संपूर्ण मोकळीक मिळणार होती. कामधाम-

नव्हतें. कसलेंहि बंधन नव्हतें. संकोच बाळगण्याचें कारण नव्हतें. जानकी मनोमन आनंदली होती. आनंदाची धुंदी तिच्या नसानसांत नुसती भरभरून नाचत राहिली होती. त्या तालावर जानकीचीं पावलें लयबद्ध, झपाझप पडत होतीं.

शेजारणीनें हें पाहिलें तेव्हां तिला मोठी गंमत वाटली. ती मिस्किलपणें हंसत हंसत म्हणाली, 'काय ग तेव्हां चान्स नाहीं मिळाला म्हणून आतां चाललीस वाटतं हनिमूनला ? लेक नि सून गेलेत काश्मीरला हनिमूनकरतां; आतां तुझा हनिमून होऊ दे महाबळेश्वरला.'

'इश्श !.तुझं आपलं कांहींतरीच.' जानकी मस्त लाजली. गोड हंसली.

'बाकी ह्या वयांत हनिमून साजरा करण्याची तुमची कल्पना मोठी छान आहे हं.' शेजारणीनें जानकीच्या पाठीवर थाप मारली.

"चल ग ! म्हणे हनिमून. चावट कुठली ! सहज आपलं शीण घालवण्यासाठीं बदल म्हणून जातोंय झालं."

वरवर जानकी असें म्हणाली खरी पण मनांतून मात्र हनिमूनच्या कल्पनेनें ती चांगलीच मोहरली होती. मनांत म्हणत होती–जीवनांतल्या एका अविस्मरणीय आनंदाला आपण मुकलों होतों पण तो फार उशीरा का होईना आतां अनुभवायला मिळणार. एका मजेशीर गोष्टीची अवीट गोडी, अनंत काळापर्यंत स्मृतींत राहणारी. लज्जत चाखायला मिळणार. अपुरं राहिलेलं स्वप्न साकार होणार.

जानकीच्या डोळ्यापुढें केवळ एक दोनदा भूगोलांत पाहिलेलें महाबळेश्वर साकार झालें. दोनचार दिवसाच्या रुखरुखीनें मिटलेलें मन अभावितपणें उमललें जानकी एकदम कांहींशी अल्लड नवोढा तरुणी बनली. तिच्या हालचालींत किंचित् अवखळपणा आला. ती उगीचच स्वतःशीच हंसत होती मध्येंच अकारण लाजत होती. तिथें गेल्यावर काय काय करायचें याचा विचार करत होती. मनाशी कांहीं आराखडा तयार करत होती.

अन् महाबळेश्वरला आल्यावर तर जानकी नि तिचा नवरा अगदीं विलक्षण सुखावली. अगदीं खरोखरच नवपरिणीत जोडप्याप्रमाणें तीं दोघें सकाळ संध्याकाळ खूप भटकलीं मनसोक्त हंसलीं, खिदळलीं. एकमेकाशीं हितगुज करण्यांत मनस्वी रंगून गेलीं. संध्याकाळीं बाहेर पडल्यावर रस्त्यांत समोरून एक रिक्षावाला येत होता तेव्हां जानकीच्या नवऱ्यानें पटकन् तिच्या दंडाला धरून तिला बाजूला केलें. एका [illegible] पश्च [illegible]ननुभूत आनंदानें सुखसंवेदनेनें जानकीचें शरीर एकदम शहारलें.

तीं दोघे आर्थरसीटच्या पॉईंटवर एकमेकांना अगदीं खेटून बसलीं. बोलतां बोलतां सहज जानकीच्या नवऱ्यानें तिच्या गालावर हलकेच चापट मारली तेव्हां ती काय सुरेख लाजली, मुरकली. तिचे गाल आधींच गोरे गोरे, लाल लाल होते ते गुलाबाच्या फुलासारखें आणखीनच लाल झाले. 'इश्श ! हें काय ! आपण घरीं नाहीं म्हटलं ! इथें पॉईंटवर बसलेलीं आहोंत.' मानेला एक नाजुकसा हिसडा देत जानकी म्हणाली. मानेच्या नाजूक हिसड्याची ही अॅक्शन एका सिनेमात तिनें नुकतीच पाहिली होती.

'मग त्यांत काय झालं ? माझ्याच बायकोच्या गालावर चापट मारली, परक्या बाईच्या गालावर तर नाहीं ना ?' असें म्हणून जानकीचा नवरा मोठ्यानें हंसला.

वास्तविक त्याचें तें पोरकट वागणें जानकीला खूपच आवडलें होतें. इतकेंच नव्हे तर त्यानें असें कांहींतरी पोरकट रोमँटिक वागावें, असेंच तिला मनापासून वाटत होतें. अशीच तिची अपेक्षाही होती. पण वरकरणीं ती त्याला विरोध करत होती. विरोधांतून संमति दर्शविण्याचा तो प्रकारहि अल्लड, नवखेपणां-तल्यासारखाच होता.

दुसरा दिवसहि त्यांनीं दोघांनीं खूप मजेंत घालवला. हॉटेलच्या जेवणाखाणा-वर ताव मारला. बायकांना आयतें जेवायला मिळालें तर खूप आनंद होतो, रोज स्वतः करून करून कंटाळाहि येतो नि त्यामुळें अपूर्वाईनें मिळालेलें आयतें अन्न गोडहि लागतें. जानकी जेवणावरहि खूप होती. गप्पाटप्पा, हंसणें, खिदळणें सगळें अनिर्बंध चाललें होतें. त्यादिवशीं संध्याकाळीं पावसाची थोडी झिमझिम सुरू झाली, ती दोन तास टिकली तेव्हां त्याचाहि शिडकावा त्यांनीं अंगावर करून घेतला.

नवविवाहित जोडप्याप्रमाणें दोन्ही रात्रीं त्यांनीं दोन दोन, तीन तीन, वाजे-पर्यंत जागून हितगुजें केलीं. नर्तकीच्या पावलासारखीं झपाझप पावलें टाकीत दोन्ही रात्री द्रुतगतीनें दोघांनाहि चकवून पळून गेल्या. गप्पांच्या नादांत दोघांनाहि त्याचें भान राहिलें नाहीं. आजपर्यंत हृदयांत सांठलेलें ओंठावर येत होतें अन् तें टिपण्यांत दोघांत जणुं स्पर्धा चालली होती. त्यांत त्यांना एकप्रकारचा अनि-र्वचनीय असा आनंद होत होता. आनंदाला, उत्साहाला उधाण आलें होतें.

तिसऱ्या दिवशीं हें उधाण किंचित्सें ओसरलें. आदल्या दिवशीं लहान पोरागत ती पावसात भिजलीं होतीं. अगदीं मुद्दामच. पण त्यामुळें आज त्यांना

सर्दीचा एकदम चांगलाच त्रास होऊं लागला. जानकीच्या नवऱ्याला दम्याचा आधींच त्रास होता. त्याला तर ती थंडी मुळींच सहन झाली नाहीं. त्या रात्रीं त्याला दम्याची चांगलीच धाप लागली. घशांत तार वाजायला लागली. पहिल्या दोन दिवसांत नि रात्रींहि खूप रोमँटिक गप्पा झाल्या होत्या. आज तोहि पूर ओसरला. अन् साध्या व्यावहारिक, सांसारिक, आजारपणाच्या, मुलाबाळांसंबंधीं नि इतर सटरफटर, अवांतर गप्पांना सुरुवात झाली.

तब्वेतीच्या तक्रारीमुळें दोघांनाहि बाहेर पडतां येईना. सगळा दिवस दोघेजण खोलींत नुसतीं बसून होतीं. मग दिवसभर करायचें तरी काय, हा त्यांना प्रश्नच पडला. गप्पा मारून मारून मारणार तरी किती ? दिवसभर घरांत दोनच्या दोन माणसें. दोघेजण सारा वेळ बोलणार तरी काय ? वाचनाचा जानकीच्या नवऱ्याला फारसा नाद नव्हता. पण तरीहि त्यांनीं बरोबर आणलेलीं एक दोन पुस्तकें चाळण्यांत वेळ घालवला. पण इथें ना काम, ना धाम, ना धंदा. वेळ घालवायचा तरी कसा ! आजूबाजूला ओळखीपाळखीचेंहि कुणीं नाहीं. पावसाला थोडी थोडी सुरुवात झाल्यामुळें हॉटेलांतल्या बऱ्याचशा खोल्याहि हळूं हळूं खालीं होत होत्या.

डाव्या बाजूच्या खोल्यांतून दोन नि उजवीकडे एक अशी तीन बिऱ्हाडें शिल्लक होतीं. पण त्यांपैकीं कुणाच्या खोलींत जाऊन त्यांची ओळख करून घ्यावी म्हटलें, तर तें शक्यच नव्हतें. कारण त्या तीन बिऱ्हाडांपैकीं एक अँग्लोइंडियन, एक ख्रिश्चन आणि एक कुठल्या जातीचें होतें, त्याचा त्यांच्या राहाणीवरून, बोलण्याचालण्यावरून कांहींच बोध होत नव्हता. जानकीला त्यांपैकीं एकाचीहि भाषा अवगत नव्हती. मग बोलणार तरी काय नि कसं ? तरीहि तिनें थोडें मोडकेंतोडकें बोलून, मध्येंच नुसतें त्यांच्याकडे पाहून हंसून तो प्रयत्न केला, पण तिला तें जमेना. मोडक्या तोडक्या बोलण्यानें, क्वचित् त्यांच्याकडे बघून हंसण्यानें करमणूक कशी होणार ?

शेवटीं पांच सहा दिवसांतच दोघेहिजण तिथें राहायला कंटाळलीं. त्यांना वाटलें— मुलें बरोबर असतीं तर पत्ते वगैरे खेळण्यांत थोडा वेळ मजेंत गेला असता. गप्पांना निराळे विषय मिळाले असते. आतां इथें खेळण्याची, वाचनाची सोय नाहीं. गप्पांना नवीन विषय, नवीन माणसें नाहींत. मग करायचें तरी काय

इथें राहून? हॉटेलचा रोजचा एवढा चार्ज फुकटच्या फाकट भरायचाच कशाला?

जानकीला एकदम आपलें घर डोळ्यापुढें दिसूं लागलें. त्या घराची, तिथल्या वातावरणाची तिच्या मनाला ओढ वाटूं लागली. तिला आपल्या मुलाची व सुनेची आठवण झाली. खरेंच, तीं दोघेसुद्धां काश्मीरला अगदीं कंटाळून गेलीं असतील. तीं सुद्धां तिथें दोघेंच्या दोघे! रोज रोज करणार काय, बोलणार काय, खेळणार काय, राहणार कसें! दोघांत कुणीतरी तिसरें हवें, चौथें हवें—त्याशिवाय मजा नाहीं. दोघें बिचारीं अगदीं कंटाळून गेलीं असतील, जानकीला त्यांची अती दया, कणव आली. ती मग नवऱ्याला म्हणाली, "मला वाटतं पुरं आतां इथें राहाणं. आपल्या तब्बेतीहि ठीक नाहींत. दोघेंच्या दोघे इथें राहून करणार तरी काय? मला वाटतं, आपण आतां घरीं परतावं. तिकडे सुनबाई नि मधुसुद्धां दोघेंच्या दोघें राहून कंटाळून गेलीं असतील, बिचारीं! दोन डोकीं सारा वेळ करणार तरी काय? कसली नि कशी करमणूक करून घेणार? आपण इथून जाण्यापूर्वी कंटाळून परत सुद्धां आलीं असतील एखादवेळ."

जानकीच्या नवऱ्याला तिचें म्हणणें तंतोतंत पटलें. त्याच्याहि मनांत राहून तेंच येत होतें. आपल्या मनची गोष्टच जानकी बोलल्यामुळें त्यानें तिच्या बेताला ताबडतोब संमति दिली.

जानकी नि तिचा नवरा घरीं परतलीं. पण त्यांचा मुलगा मात्र अजून परतला नव्हता. जानकीचा अंदाज साफ चुकला. मधू बरोबर पंधरा दिवस काश्मीरला राहून परत आला. जानकीला वाटलें होतें—तो तिथें खूप कंटाळून आला असेल. आल्याबरोबर म्हणेल—"आई, खूप कंटाळा आला बघ दोघांना तिथें राहून. तुमची सारखी सारखी आठवण येत होती. तुम्हांला इथें उचकी लागली होती ना आठवण काढल्यामुळें? अगदीं दोघेच्या दोघे बघ. ना कुठें ओळख ना पाळख. ना कुणी तिसरें खेळायला कीं गप्पा मारायला. सारा वेळ दोघेंच बोलणार तरी काय नि किती? अन् करणार तरी काय?"

पण जीं वाक्यें त्याच्या तोंडून बाहेर पडण्याची जानकी वाट पहात होती तीं चार दिवस झाले तरी पडलींच नाहींत. उलट तिकडून आल्यापासून तीं दोघे चांगलीच खुषीत होतीं. तिथें जें सुख त्यांनीं उपभोगलें होते त्याची धुंदी अजूनहि

त्यांच्या चेहऱ्यावरून, शरीरावरून. नसानसांतून नुसता ओसंडत होती. एका विलक्षण बेहोषींतच तीं असूनहि घरांत वावरत होतीं. जानकीला तें पाहून मोठें आश्चर्य वाटत होतें. शेवटीं तिनें न राहवून मुलाला विचारलें, " काय रे, कशी काय झाली तुमची ट्रिप ? "

" अगदीं टॉप ! मस्त मजा आली बघ. खरं म्हणशील तर, दिवस अपुरेच वाटले शेवटीं. आणखी थोडे दिवस मिळते तर और भी मजा असती. हिची फार फार इच्छा होती आणखी राहण्याची. नाहीं का ग ? " शेवटचें वाक्य त्यानें आपल्या बायकोकडे पहात खुषीनें हंसत म्हटलें.

" इश्य ! कांहींतरीच काय हो तुमचं आपलं ! " बायकोनें मानेला एक नाजुकसा हिसका दिला. ती लाजली. गोडशी हंसली. तिच्या त्या एका ' इश्श ' शब्दांत अनेक अर्थ अभिप्रेत होते.

जानकी आपल्या मुलाकडे नि सुनेकडे नुसतीच ' आ ' वासून पहात राहिली. वेड्यागत. गोंधळलेल्या, बावरलेल्या नजरेनें.

■ ■

... शाखा.
अनुक्रमांक ०३६४५० ... दि. ...
क्रमांक ... नोंद दि. ...

■ ५ ■

# मुखवटा

खोलींतल्या खोलींत काकासाहेब येरझारा घालीत होते. खोलीच्या या टोंकापासून त्या टोकापर्यंत, विलक्षण वेगानें, व्यथित, अस्वस्थ अंतःकरणानें. त्यांच्या काळजाला कुठें तरी खोल खोल जखम झाली होती. त्यांतून भळभळा रक्त वाहत होतें. वेदना असह्य झाली होती. सारीं गात्रें विकल झाल्यागत मध्येंच ते हताशपणें आपल्या पलंगावर टेकत पण ते एकदा सेकंदभरच. पुन्हां उठून ते येरझारांना सुरुवात करीत. त्यांच्या मनांत चाललेली उलवाल, घालमेल त्यांच्या प्रत्येक पावलांत प्रतीत होत होती. त्यांचे हात म्हणत होते कीं या हातांनीं काय करूं नि काय नको ! आणि त्या प्रत्येक ऊर्मी-सरशीं त्यांचीं बोटें पंज्यावर घासलीं जाऊन त्यांच्या मुठी वळत होत्या. त्वेषानें ते वेडे व्हायची पाळी आली होती.

काकासाहेब एक प्रख्यात वकील होते. आतांपर्यंतच्या आपल्या आयुष्यांत घरांतले नि व्यवसायांतलेहि अनेक अनुभव त्यांनीं मोठ्या कौशल्यानें टिपले होते. काकासाहेबांच्या दृष्टीच्या कावळ्यानें अनेक गोष्टी कशा अगदीं नेमक्या हेरल्या होत्या पण ही एकच गोष्ट त्यांच्या काकदृष्टींतून कशी चुकली होती, कोण जाणे ! पण सुदैवानें म्हणा कीं दुर्दैवानें म्हणा, ती आज अगदीं योगायोगानेंच त्यांना कळून चुकली होती. आजपर्यंत त्यांनीं आपल्या यादींत घातलेले अनेक भलेबुरे अनुभव आजच्या अनुभवापुढें एकदम फिक्के होते. आज त्यांनीं

जें पाहिलें तें फार भयंकर होतें. किळसवाणें होतें. लाजिरवाणें होतें. त्यानें काकासाहेबांच्या अब्रूच्या चिंधड्या उडाल्या होत्या. रस्त्यावर भीक मागणाऱ्या भिकाऱ्याच्या वस्त्रासारखी अब्रूचीं लोंबणारीं लक्तरें अंगावर घालून शरमेनें खालीं मान करून काकासाहेबांना जगात वावरावें लागणार होतें. लोक त्यांच्याकडे बोटें दाखवून आपापसांत कांहीं कुजबुजणार होते. पण काकासाहेबांना नेहमींप्रमाणें आपल्या वकिली बोलण्यानें त्यांना चीत करतां येणार नव्हतें. तर उलट त्यांच्या बोलण्याकडे काणाडोळा करून त्यांना पाहिलें न पाहिलेंसें करून पुढें जाणें प्राप्त होतें.

जी गोष्ट काकासाहेबांना आज कळली ती अशी किती वर्षे चालली होती कोण जाणें ! आतांपर्यंत ती त्यांना अज्ञात होती, एवढें खरें. आतांपर्यंत हें सारें आपल्याला कसें कळलें नाहीं याचें त्यांना आश्चर्यच वाटलें. प्रथम तर त्यांच्या डोळ्यावर विश्वासच बसेना. आपण भ्रमांत तर नाहीं ना ! स्वप्नाच्या अस्पष्ट नेणिवेच्या, अस्पष्ट जाणिवेच्या जगांत तर आपण नाहीं ना ! त्यांच्या मनाचा गोंधळ उडाला होता पण काकासाहेब चांगले जागे होते. नेणिवेच्या जगांतून जाणिवेच्या जगात आले होते. डोळ्यापुढें सत्य पहात होते. उघडें वाघडें सत्यच. मग जी गोष्ट चक्षुर्वैसत्यं पाहिली, कान सताड असून ऐकली ती खोटी तरी का नि कशी मानायची ? धडधडीत पुरावा हातीं पडल्यावर सत्य कसें नाकारायचें ? पुरेसा पुरावा नसतांना सुद्धां काकासाहेबांनीं केवळ वकिली डावपेचांनीं आतांपर्यंत अनेक केसेस जिंकल्या होत्या मग आतां प्रत्यक्ष पुरावा मिळून ते ही केस जिंकणार नाहींत, असें होणें शक्यच नव्हतें. पण ही केस जिंकून त्यांच्या पदरांत काय पडणार होतें ? केस जिंकल्याच्या आनंदाचा कैफ त्यांना चढणार नव्हता. यशाची धुंदी त्यांच्या रोमरोमांत तुडुंब भरणार नव्हती. उलट त्यांची सारी शक्ति क्षीण होणार होती. त्यांचें जीवन उद्ध्वस्त होणार होतें.

काय करावें तें काकासाहेबांना सुचत नव्हतें. विचारांचें मोहोळ उठलें होतें, आणि त्यांतून थव्याथव्यांनीं बाहेर पडणाऱ्या मधमाशा मनाला डंख करीत होत्या विलक्षण वेदनांनीं वेडें करीत होत्या. काल कालपर्यंत फार काय पण आज दुपारपर्यंत काकासाहेब किती सुखांत, किती आनंदांत होते ! नेणीव ही कधीं कधीं जाणीवेपेक्षां फार चांगली असते कारण आजपर्यंत काकासाहेब अज्ञानांत होते नि म्हणूनच आनंदांत होते.

परवां नुकतीच त्यांनीं एक महत्त्वाची नि कॉम्प्लिकेटेड केस जिंकली होती.

केसचा निकाल न्यायाधिशांनीं वाचून दाखवला आणि काकासाहेब बाररूममध्यें शिरले तेव्हां सगळ्या वकिलांनीं एकच गदारोळ मांडला. सगळ्यांनीं त्याच्यावर अभिनंदनाचा नि स्तुतीचा नुसता वर्षाव केला. काकासाहेबांनींहि मिस्किलपणें हंसत त्या स्तुतीचा नि अभिनंदनाचा स्वीकार केला.

तसें म्हटलें तर या वकिलांच्या बोलण्यांत थोडीशी अतिशयोक्ति होती आणि काकासाहेबहि तें जाणून होते. पण त्यांत तथ्यांशहि होता, हें नक्कीच. वास्तविक आज आरोपीला सरळ फांशीचीच शिक्षा व्हायची त्यानं गुन्हा केलाय हें उघड उघड दिसत होतें. पण फिर्यादीला काकासाहेबांनीं असे काही विलक्षण डावपेचाचे प्रश्न टाकले कीं शेवटीं तो गांगरला. पारध्यासारखे काकासाहेब त्याला आपल्या जाळ्यांत पकडण्यासाठीं अगदीं टपूनच बसले होते. शेवटी त्यांचा अंदाज बरोबर ठरला. त्यांनीं त्याची पारध केली. तो त्याच्या जाळ्यांत सापडला नेमका. आयत्या वेळीं तो इतका गोंधळला, बावचळला कीं त्याच्या वकिलानें त्याचे पाठ करून घेतलेले प्रश्न फुकट गेले. त्यानें काकासाहेबांच्या प्रश्नांना भलतींच उत्तरें दिलीं अन् आरोपी गुन्हा घडला त्या दिवशीं त्या गांवात नव्हताच हें त्याच्याच तोंडून काकासाहेबांनीं वदवून घेतलें. झालें, सगळींच सूत्रें निराळीं हललीं. फांशीची शिक्षा तर राहिलीच बाजूला पण आरोपी निर्दोषी म्हणून सुटला. काकासाहेबांनीं त्याला जीवदान दिलें. जन्माचें ऋणी करून ठेवलें.

वास्तविक काकासाहेबांचें यश अपूर्व तर खरेंच ! असें यश त्यांना मिळालें म्हणजे ते त्या विजयाच्या धुंदीत किती तरी काळ राहात. त्यांची ती धुंदी, बेहोषी तीन तीन चार चार दिवस उतरत नसे. त्यांत आणखी आजूबाजूच्या वकिलांनीं केलेल्या स्तुतीच्या वर्षावानें त्याच्या विषयावर कळस चढे. अंगावर मूठभर मांस चढल्याचा भास होई तोंडावर कांहीं आगळीच झिलाई चमके. वास्तविक हे सारेजण आपली अशी अफाट स्तुति कां करतात, हें काकासाहेबांना पक्कें ठाऊक होतें. पण तरीहि त्या स्तुतीनें ते सुखावत इतकें मात्र खरें. आजूबाजूच्या विश्वाला ते पूर्णपणें जाणून होते. ते मनांत म्हणत असत. सगळे चोर आहेत लेकाचे ! ह्यांना माझ्यापासून फायदा आहे, माझ्याकडून कांहीं ना कांहीं उपटायचें आहे म्हणून ते माझी वारेमाप स्तुति करताहेत. तोंड फाटेस्तो मला वाखाणताहेत. रोज फुकटच्या उत्तमपैकीं सिगारेटस फुंकायला मिळतात, कांहीं तरी निमित्तानें चहा-खाणें वसूल करायला मिळतंय, म्हणून तोंडदेखल्या हे माझ्याशीं

इतक्या चांगुलपणानें वागताहेत पण तेंच जर ह्यांना माझ्याकडून कांहीं मिळ-ण्याची शक्यता नसती, तर ह्यांनीं निश्चितच मला चांगलें म्हटलें नसतें. नांवा-जायचें तर राहिलेंच बाजूला, पण ह्यांनीं माझी पार हेटाळणी केली असती. आपल्या मागे आपल्याला ते काय म्हणतात, हें काकासाहेब पूर्णपणें जाणून होते. त्यांच्या धूर्त दृष्टींतून लोकांच्या लबाड हालचाली कधीं चुकत नसत. तसाच तो तरुण वकिल. कोर्टांत नवीनच प्रॅक्टिस सुरू केलेला. बाररूममधून बाहेर पडल्या-बरोबर भेटला. मोठ्या अदबीनें त्यानें काकासाहेबांना नमस्कार केला. त्यांच्या प्रतिनमस्काराची वाटहि न पहातां त्यांचा हात हातांत घेऊन म्हटलें, 'काका-साहेब कॉंग्रॅटस. खरंच तुमच्या बुद्धिमत्तेबद्दल विलक्षण आदर वाटतो मला. आजच्या या यशाबद्दल मीच पार्टी देणाराय तुम्हांला.'

फोर्टमधल्या एका मोठ्या आलिशान हॉटेलांत काकासाहेबांना त्यानें पार्टीचें आमंत्रण दिलें काकासाहेबांना त्याच्या स्वरांतील लाचारी स्पष्ट जाणवत होती. तरीहि त्यांनीं त्याच्या पार्टीचें आमंत्रण स्वीकारलें. हा वकील प्रथम कोर्टांत यायला लागला, तेव्हां काकासाहेबांचें मत त्याच्याबद्दल फार चांगलें झालें होते. तो दिसण्यांत रुबादार, चांगला गोरागोमटा होता. त्याच्या वागण्यांत बोलण्या-चालण्यांत अदब होती. त्याच्या पॉलिश्ड मॅनर्सचें काकासाहेबांना फार कौतुक वाटलें होतें. आकर्षणहि वाटलें होतें. पण पुढें परिचयानें त्यांना कळून आलें होतें कीं, हा मनुष्य वाटतो तसा साव नाहीं. तर पक्का बनेल आहे. ह्याच्या पोटांत एक नि ओठांवर दुसरेंच आहे. आपल्याला मुलगा नाहीं, तेव्हां आपल्या पश्चात आपली सगळी प्रॅक्टिस ह्याला बळकावयाची आहे. मधाचें बोट त्यांच्या मनाला लागलंय, म्हणून तो हा मध चाटण्यासाठीं आधाशासारखा आशाळभूत दृष्टीनें आपल्या मागें मागें हिंडतोय, आपली बडदास्त ठेवतोय. हा निव्वळ खुष-मस्क्या आहे. राजे लोकांच्या दरबारीं असतात तसला.

आणखी कोर्टांतला तो चपराशी. तो तर त्यांना आतां येतांना अगदीं लवून सलाम करीत असे. हा सलाम त्याच्या हातावर काकासाहेबांनी ठेवलेल्या दोन रुपयांचा आहे, हें काय काकासाहेबांना कळत नव्हतं ? कोर्टांतून ते घरीं येत तेव्हांहि त्यांना मोठा मजेशीर अनुभव येई. गाडीचा हॉर्न वाजला रे वाजला कीं त्यांचा गडी लगबगीनें पुढें येऊन त्याच्या हातांतली बॅग घेई. त्यांची सावत्र आई देवाच्या वाती भिजवीत किंवा असेंच कांहीं काम करीत असली तरी तें अर्धवट

टाकून त्यांच्या स्वागताला हजर होई. त्यांच्याकडे पाहून स्मितहास्य करी. मोठा आपुलकीचा प्रेमाचा आव आणून त्यांची वास्तपुस्त करी. काकासाहेबहि आपलें वासनांतलें हास्य तोंडावर आणीत. सीतेला फसवून आपल्याबरोबर दूर दूर नेणाऱ्या मायावी मृगासारखी आपली ही आई आपल्या पुढें उभी राहते, अशी एक विलक्षण कल्पना काकासाहेबांच्या मनाला चटकन् स्पर्शून जाई.

येरझारा घालतां घालतां काकासाहेब किंचित् थबकले. त्याचें मन एकदम फार पूर्वीच्या काळांत आपल्या लहानपणींच्या आठवणींत डोकावलें.

ते साधारण सात आठ वर्षांचे असतील तेव्हांची गोष्ट. ह्याच त्यांच्या सावत्र आईनें त्यांच्याविरुद्ध त्यांच्या वडिलांच्याजवळ कागाळी केली होती. तिनें स्वतःच घरांतलें एक चांदीचें भांडें आपल्या माहेरीं दिलें होतें नि काकासाहेबांनींच तें चोरून नेऊन कुठें तरी विकलें असलें पाहिजे,अशी खोटीच तक्रार काकासाहेबांच्या वडिलांच्याजवळ केली होती. त्या दिवशीं वडिलांनीं काकासाहेबांना बेदम मरेमरेतो मार दिला होता. आपण चूक केली नाहीं, म्हणून काकासाहेबांनीं वडिलांना विनवून कळवळून सांगितलें होतें, तरी पण त्यांनीं तिकडे लक्षच दिलें नव्हतें – ' बोल, तूंच चोरलंस ना तें. बोल. चोरी करूनच्या करून वर आणि खोटं बोलतोस ? कसा कबूल करीत नाहींस, ते बघतों, थांब. '–असें म्हणून त्यांनीं त्यांच्याकडून कबूल करून घेण्याचा प्रयत्न केला. अन् ते कबूल करीत नाहींसे पाहून त्यांच्या पायावर, पाठीवर हव्या तशा, हव्या तिथें छड्या ओढल्या होत्या. शेवटीं त्यांचे हात थकल्यावरच त्यांनीं छडी खालीं टाकली होती. आईनें चहाड्या करायच्या नि वडिलांनीं मारायचें, हें पुढें पुढें तर काकासाहेबांच्या अंगवळणीच पडलें होतें. पण त्या दिवशींचा मार मात्र काकासाहेब जन्मांत कधींहि विसरले नव्हते. त्यांना तें विसरणें शक्यच नव्हतें. चोरीचा अकारण आळ नि वर माराच्या यातना ! चार दिवस काकासाहेबांच्या अंगावर वळ होते. अंग ठणकत होतें. पण त्या वळावरून प्रेमानं हात फिरवायला, त्यांचें अश्रु पुसायला मायेचें, प्रेमाचें कोणी नव्हतें. अगदीं कोणी नव्हतें. आईच्या जाचणुकीचीं पूर्वीचीं अशीं अनेक चित्रें कांहीं स्पष्ट तर कांहीं अस्पष्ट, पुसट, काकासाहेबांच्या डोळ्यापुढें अजूनहि उभीं होतीं. त्या दिवशींचा तो मार त्यांना आतांहि आठवला नि त्यांच्या अंगावर शहारेच आले. तोंडाला कडवट चव आल्यागत वाटलें. आपल्याबद्दल मनांत मत्सर, द्वेष असणारी, अहोरात्र आपला रागराग करणारी ही आपली आई

आज आपल्याशीं मोठ्या गोडीनें, प्रेमानें वागतेय, नव्हे, वागल्यासारखें दाखव-तेय. का ? हें सारें ढोंग, सोंग कशासाठीं ? कारण तिचा स्वतःचा सख्खा मुलगा तिला आपल्या दारांत सुद्धां उभी करीत नाहीं, अन् इथें आपल्या पैशावर तिला चैनींत रहायला मिळतंय, उंची उंची लुगडीं नेसायला मिळतात, चांगलें चुंगलें, नाजुक साजुक खायला मिळतंय, देवधर्माला सढळ हातानें पैसा मिळतोय, गाडींतून मारे रुबाबांत दिमाखानें हिंडायला मिळतंय म्हणून ?

ज्या ज्या वेळीं काकासाहेबांना या गोष्टींची आठवण होई, त्या त्या वेळी त्यांचें मन आक्रसून जाई. त्यांना वाटे, हिनें मागें आपल्याला अनेक वेळां छळलंय, आतां आपणहि हिला फाड फाड बोलून घ्यावें, पूर्वीच्या तिच्या दुष्कृत्यांचा पाढा तिच्यापुढें वाचून तिला त्याबद्दल जाब विचारावा आणि आतांचें तिचें हें बनावट ठेवणींतलें हंसूं कशासाठीं आहे, हे तिच्याच तोंडून वदवून घ्यावें. पण हा विचार त्यांच्या मनांत एक क्षणभरच बुडबुड्यासारखा वर येई नि दुसऱ्या क्षणीं विरून जाई. मग काकासाहेब तिला पाहिल्यावर आपलें ठेवणींतलें हंसूं बाहेर फेकीत नि पुढें सटकत.

त्यांच्या भावानें तर मधें त्यांना केवढ्या पेंचांत टाकलें होतें ! हा त्यांचा भाऊ वडिलांशीं भांडून आपला हिस्सा घेऊन केव्हांच घराबाहेर पडला होता. नंतर कितीतरी वर्षांत त्यानें आपल्या आईवडिलांचें, भावंडांचें तोंडहि पाहिलें नव्हतें, कीं त्यांची विचारपूसहि केली नव्हती. पण काकासाहेबांच्या धंद्याचा जम बसल्यावर तो अचानक एक दिवस त्यांच्या घरीं उपटला. चेहरा हीन दीन करून त्यावर शक्य तेवढा लाचारीचा भाव आणून, आपला सगळा पैसा कसा गेला, आपण कसे चुकलों, इत्यादि गोष्टी रंगवून त्यानें काकासाहेबांना ऐकवल्या आणि आतां आपण एका माणसाशीं पार्टनरशिपमध्यें नवीन धंदा सुरू करणार आहोंत, गतायुष्यांतल्या चुकांचें परिमार्जन करणार आहोंत इत्यादि भारूड सांगून त्यांच्याजवळ पैशाची याचना केली. ते पांच हजार रुपये लवकरच फेड-ण्याचें वचन दिलें. आपल्या हातून पूर्वी घडलेल्या आपल्या चुकांचें आपल्याला केवढें दुःख होतंय, हें डोळ्यांत पाणी आणून व्यक्त केलें. काकासाहेबहि त्याच्या अभिनयाला भुलले. कसबी नटाचें कौशल्य काकासाहेबांना फसवण्यासाठीं त्यानें दाखविलें असेल, याची त्यांना पुसटहि कल्पना आली नाहीं. जाऊं दे, कसाहि असला तरी आपला भाऊच आहे. चुकला असेल एकदां. आतां त्या चुकीची तो

दुरुस्ती करणार आहे ना ? त्याला पश्चात्ताप झालाय हें काय थोडें आहे ? मग आतां त्याला मदत करणें, एकवार वर यायला संधि देणें आपलें कर्तव्यच आहे असा विचार करून काकासाहेबांनीं त्याला पैसे दिले. पैसा हातांत पडल्यावर त्यानें तो हवा तसा उडवून टाकला इतकेंच नव्हे, तर काकासाहेबांची खोटी सही करून एका माणसाला फसवून त्याच्याकडून पैसे काढले आणि काकासाहेबांना गोत्यांत आणण्याचा प्रयत्न केला. वास्तविक काकासाहेबांना त्याच्यावर कायदेशीर इलाज करता आला असतां. पण ते गप्प बसले. त्यांत त्याची तर बेअब्रू झालीच असती पण त्यांच्याहि प्रतिष्ठेचा प्रश्न होता. मुकाट्यानें त्यांनीं त्या माणसांचे पैसे देऊन टाकून तें प्रकरण मिटवलें. तिथें जावें तिथें ढोंग, दगलबाजी, लाचारी, दैन्य, लुच्चेपणा ! ठिकठिकाणीं लोक असेच मुखवटे घालून हिंडतात नि आपला स्वार्थ साधून घेतात हें काकासाहेब ओळखून होते. पण या साऱ्या मुखवट्या-कडे ते जाणूनबुजूनच दुर्लक्ष करीत होते. ते मनांत म्हणत होते, 'चालायचंच. जग आहे तिथें अशा गोष्टी व्हायच्याच. जगांतल्या बाकीच्या व्यक्तींशीं आपल्या काय करायचंय त्यांचा नि आपला संबंध तो कितीसा येणार ? त्यांना हव्या तेवढ्या दूर अंतरावर ठेवणें आपल्याला सहज शक्य आहे.'

पण आज काकासाहेबांनीं जें पाहिलें त्याच्याशीं त्यांचा अगदीं निकटचा संबंध होता. आतां त्यांना जाऊं दे, चालायचंच असें म्हणून दूर अंतरावर राहणें शक्य नव्हतें. आज त्यांनीं जें पाहिलें त्यामुळें त्याचें सगळें जीवन भकास, रुक्ष नि उजाड झालें होतें.

नित्याप्रमाणें आज सकाळीं काकासाहेब कोर्टांत गेले. आजची केस ते जिंक-णार याबद्दल त्यांना तिळमात्र शंका नव्हती. त्यांच्यासारख्या ख्यातनाम वकिलाला आजची केस म्हणजे हातचा मळ होता. केस होती पती-पत्नीमधली. सुरूप पत्नी कुरूप नवरा. कुरूप नवऱ्याबद्दल त्या सुंदर स्त्रीला वाटणारी किळस, घृणा, तिरस्कार ! त्यासाठीं तिला हवा असलेला घटस्फोट. काकासाहेब आज त्या देखण्या स्त्रीच्या बाजूनें केस लढवणार होते. त्या स्त्रीला ते घटस्फोट मिळवून देणार होते. त्यासाठीं त्यांनीं भरपूर पुरावा तयार केला होता. खोट्या साक्षी काढल्या होत्या. तो मनुष्य नुसता कुरूपच नाहीं, तर बदफैली आहे, व्यभिचारी आहे, तो जितका बाहेरून कुरूप आहे, त्यापेक्षांहि तो आंतून अधिक कुरूप आहे, त्याच्याच घरांत त्यांची मानलेली बहीण म्हणून राहणाऱ्या, नवऱ्यानें

टाकून दिलेल्या स्त्रीशीं त्याचे अनैतिक संबंध आहेत, असें काकासाहेब आज कोर्टात सिद्ध करणार होते. त्याला वेडेवाकडे, कुत्सित, वकिली डावपेचाचे प्रश्न विचारून भर कोर्टात त्याची अब्रू काढणार होते, असत्य असलेल्या गोष्टीच सत्य असल्याचें शाबीत करणार होते. खऱ्याचें खोटें नि खोट्याचें खरें करून दाखवणार होते. अंतर्बाह्य कुरूप असलेल्या असल्या नवऱ्याबरोबर अंतर्बाह्य सुरूप असलेल्या ह्या स्त्रीनें कां राहावें, कां संसार करावा हा प्रश्न ते आज कोर्टाला विचारणार होते. यश पदरांत पडण्यापूर्वीच यशाची नशा काकासाहेबांना चढत चालली होती. कोर्टाच्या कामकाजाला सुरुवात झाली. काकासाहेब आपल्या टेबलाशीं उभे राहिले. आरोपीचें नांव पुकारलें गेलें. तो पिंजऱ्यात येऊन उभा राहिला. काकासाहेबांनीं एकवार आपली शिकार निरखून पाहिली. पारध आपल्या जाळ्यांत सांपडायला सुकर आहे कीं नाहीं, हे न्याहाळणारा भाव त्यांच्या दृष्टींत होता. त्यांना एकदम वाटलें कीं, तो मनुष्य आपल्याला वाटला होता, तितका राकट किंवा कुरूप नाहीं. तो काळा असला तरी अगदीं डांबरासारखा काळा खास नाहीं. त्याचें नाक नकटें असलें, चेहरा खडबडीत असला, तरी त्याची फिगर पुरुषी आहे. वयाच्या मानानें त्याचे केस दाट, सुंदर, काळेंभोर नि कुरळे आहेत. त्याचे डोळे तेजस्वी अन् तरीहि शांत नि करारी आहेत. कां कोण जाणें पण त्याला पाहिल्याबरोबर काकासाहेबांना आरशांत पाहिलेल्या स्वतःच्या छबीची आठवण झाली. दोन्हींत विलक्षण साम्य असल्याचा त्यांना भास झाला. एकदम ते स्वतःला त्याच्याठिकाणीं पाहूं लागले. ह्या माणसाप्रमाणेंच काकासाहेब दिसण्यांत वेतावेताचेच होते नि त्यांची पत्नी सुंदर होती. चार देखण्या बायकांतसुद्धां अधिक देखणी, उठावदार दिसेल अशी रेखीव, सुरूप होती. काकासाहेबांची हुशारी, त्यांचें कर्तृत्व, पैसा हें सारें पाहून तिच्या वडिलांनीं व्यवहारांचें गणित मांडून तिला या घरांत दिली होती. मनानें दोघांची अशी तुलना केल्यामुळें काकासाहेब कांहीं काळ गोंधळले. आरोपीला वेडेवाकडे वकिली डावपेचाचे प्रश्न विचारणें त्यांना कसेंसेच वाटूं लागलें. एका निरागस, निष्पाप जिवाला बेधडकपणें कलंकी, पापी, व्यभिचारी ठरवायला त्यांचें मन कच खाऊं लागलें. मनाची चलबिचल झाली. मत्रांची वेडर वृत्ति वितळूं लागली. आतापर्यंत जें आपल्या बाबतींत घडलें नव्हतें, तें कां घडतंय याचें त्यांना आश्चर्य वाटूं लागलें. पण आजपर्यंत जें घडलें नव्हतें, तें घडत होतें. जें होऊं नये तें होत

होतें. त्या माणसाच्या ठिकाणीं स्वतःला नि त्याच्या पत्नीच्या ठिकाणीं आपल्य पत्नीला पाहाण्याचा काकासाहेबांच्या मनाचा चाळा चालू होता. कुरूप नवरा, सुरूप पत्नी, घटस्फोट हे शब्द काकासाहेबांच्या मेंदूंत भिनत होते. आपण ही केस हरणार, असें त्यांना वाटूं लागलें. पण लगेच मोठ्या निर्धारानें त्यांनीं स्वतःला सावरलें. आतां आपल्याला तो मनुष्य जसा दिसतोय, जसा वाटतोय, तसाच तो असेल हें कशावरून? उलट तो तसा नसलाच पाहिजे, त्यानें घातलेला तो एक मुखवटाहि असेल. फसवा, ढोंगी मुखवटा. आंत एक नि बाहेर दुसरेंच. ह्या मुखवट्याआड त्याचें खरें स्वरूप दडलंय अन् तें फार फार निराळें आहे. हा वरचा मुखवटा उडवण्याचा अवकाश कीं आंतलें खरें उघडेंनागडें स्वरूप आपल्या दृष्टीस पडेल. वरची झिलई जाऊन पितळ उघडें पडेल. मग या वरच्या आवरणाची कदर करण्याचें काय कारण? काकासाहेबांना एकदम धीर आला. आरोपीकडे प्रश्नावर प्रश्नांचे बाण फेंकून त्यांनीं त्याला घायाळ केलें. कोर्टाची पायरी उभ्या आयुष्यांत कधीं न चढलेला तो मनुष्य गोंधळला. काकासाहेबांनीं मोठ्या कौशल्यानें त्याला कोंडींत पकडलें. वर्षानुवर्षं अब्रूनें जगलेल्य माणसाची बेअब्रू केली. कांचेसारखें जतन केलेलें त्याचें शील, त्याला तडे पाडून त्याचे पार तुकडे तुकडे केले. पण तो मनुष्य जितक्या शांतपणानें येऊन पिंजऱ्यांत उभा राहिला, तितक्याच शांतपणानें पिंजऱ्यांतून बाहेर पडला. त्याच्य डोळ्यांत तोच थंड शांत भाव होता. चेहरा अगदीं प्रथम होता, तसाच आतांहि होता. त्याच्या अंतःकरणांत, भावनांत जरासुद्धां चलबिचल झालेली त्याच्या हालचालीवरून, त्याच्या डोळ्यांतल्या भावांवरून प्रतीत होत नव्हती. जणूं जें घडलें, तें घडलेंच नव्हतें, किंवा जें घडणें होतें अशी घटना घडणार याची त्यानें केव्हांच अटकळ बांधली होती. मग त्याबद्दल विषाद वाटण्याचें कारणच काय होतें? किंवा तशी ती घडली नसती, तरच त्याला नवल वाटलें असतें! काकासाहेबांना वाटलें, हा स्थितप्रज्ञ तर नाहीं ना? त्यांना कळेना, कीं ही मनःशांति त्यानें कसल्या तपश्चर्येनें मिळवली? पण हें याचें खरें स्वरूप कीं मुखवटा?

यश मिळण्यापूर्वीच चढत चाललेली यशाची धुंदी काकासाहेबांच्या चेहऱ्यावरून आतां उतरली. कैफ साफच ओसरला. आज आपल्याला असें आगळेंच्च कांहीं तरी कां वाटतंय, हें त्याचें त्यांनाच कळेना. बाररूममध्यें न शिरतांच ते कांहींसे लवकरच कोर्टांतून बाहेर पडले. घरीं जायला त्यांचें मन तयार नव्हतें.

कुठें तरी जावें, एकटें अगदी एकटें बसावें, आपल्या मनाची ही विलक्षण अवस्था कुणाला न कळेल अशा ठिकाणीं जाऊन बसावें, अशी त्यांना फार इच्छा झाली. सुदैवानें मेट्रोंत अगदीं मागच्या रांगेंत शिल्लक राहिलेलें, अगदीं कडेचें एक तिकीट त्यांना मिळालें. न्यूजरील संपतच आली होती. त्याचें लक्ष सहजच पुढच्या रांगांच्याकडे गेले. तीन चार रांगांच्या पलीकडे एक स्त्री नि एक पुरुष एकमेकांना अगदीं खेटून बसलीं होतीं. त्यांच्या पलीकडे मात्र दोन खुर्च्या रिकाम्या होत्या. किलकिले डोळे करून शोधक नजरेनें काकासाहेब उगीचच इकडे तिकडे पाहण्याचा चाळा करीत होते. तितक्यांत त्या पुढच्या रांगेंतल्य. दोन रिकाम्या खुर्च्या डोअरकीपरनें टॉर्चचा प्रकाश पाडून दोन माणसांना दाखवल्या. प्रकाशाचा कवडसा त्या स्त्रीच्या तोंडावर पडला. तिचा चेहरा उजळला. काकासाहबांना तिचें तोंड स्पष्ट दिसलें, आणि काकासाहे तिथल्या तिथें थिजल्या सारखे झाले. आपल्या अंगातलें सगळें चैतन्य एकाएकीं नष्ट झालंय, असें काकसाहेबांना वाटलें. जें दृश्य त्यांनीं पाहिलें त्यानें ते पार हादरून गेले. आपण स्वप्नांत तर नाहींना, त्यांच्या मनाला एक शंका निसटता स्पर्श करून गेली. पण नाहीं. ते चक्क जागे होते. त्यांचे डोळे सताड उघडे होते. त्यांनीं जें पाहिलें तें स्वप्नांत नव्हे, तर चक्क जागेपणीं पाहिलें होतें. एक भयंकर विदारक सत्य, उघडें वाघडें सत्य त्याच्या अचानक दृष्टीस पडलें होतें. आणि तें पाहिल्यावर काकासाहेबांच्या अंगातली सगळी शक्ति, सगळी चेतना एकदम क्षीण झाली. त्यांचे पाय थरथरल्यासारखे झाले. घशाला कोरड पडली. आपल्याला आतां इथून उठतां तरी येईल कीं नाहीं, अशी त्यांना भीति वाटली. इतकी भयंकर गोष्ट आज आपल्या दृष्टीस पडेल, ही त्यांना कल्पनाच नव्हती. सुंदरसा मुखवटा आणि त्याझबरोबर त्याच्या आड लपलेलें भेसूर काळेंकुट्ट अंतरंग! भयानक सत्य त्यांच्याकडे पाहून विकट हास्य करीत होतें. आतांच्या आतां पुढें व्हावें, त्या मुखवट्याचीं शकलें शकलें उडवावींत, त्याच्या आंतलें ओंगळ स्वरूप उघडें करावें इतकी काकासाहेबांना अगदीं चीड आली पण त्यांनीं संयम राखला. प्रत्यक्ष आपली पत्नी परपुरुषाच्या खांद्यावर मान टाकून रेलून बसलेली पाहूनहि काकासाहेबांनीं मन आवरलें. आतां त्यांना तिथें बसणें शक्य नव्हतं. ते तिथून उठले. दोन पावलें पुढें झाले. बाहेर पडण्यापूर्वी नको म्हटलें तरी त्यांची दृष्टि पुन्हां त्या दोघांच्याकडे वळलीच इतक्यांत त्यांच्या कानावर त्याचे शब्द आले,-

'काल सबंध दिवसभर बाकी जुहूच्या त्या हॉटेलांत मोठी मजा आली नाहीं ?' तिच्या तोंडाशीं तोंड नेऊन कांहींसें तिला आपल्या कवेंत घेतल्यासारखें करीत तो म्हणाला.

'शुत्! इथं का बोलायचं असतं तें!' ती म्हणाली.

त्यांचें तें बोलणें ऐकून काकासाहेबांना एकदम शिसारी आली. किळस आली. त्यांचा संताप अनावर झाला. ते विलक्षण जळफळले, संतापले. पण मनांतल्या मनांत. वरकरणी त्यांना शांतपणा दाखवणें प्राप्तच होतें. खरें म्हणजे त्यांना आतां वाटत होतं, की आतां इथल्या इथेंच हिला चागलें आसुडानें फोडून काढावें नि ती काय लायकीची बाई आहे, हें जगाला पुराव्यानिशीं सिद्ध करून दाखवावें. पण काकासाहेबांना आपल्या भावनांना आवर घालणें प्राप्तच होतें. कांहीं झालें तरी ते एक प्रतिष्ठित गृहस्थ होते. नांवाजलेले वकील होते. तोंड दाबून, डोळे मिटून आंतल्या आंत तें दुःख त्यांनीं गिळलें! पण त्यांच्या डोळ्यासमोरून तें जुहूचें हॉटेल कांहीं केल्या हलेना. तिथल्या एका खोलींत ही उनाड मैना आपल्या राघूबरोबर प्रेमालाप करीत असल्याचें दृश्य त्यांच्या डोळ्यांसमोर उभें राहिलें. फ्लॅश लाईट टाकल्यावर दिसावें, असें स्पष्ट दिसलें. त्यांचें अंग एकदम शहारलें. जुहूच्या त्या हॉटेलानें तर काकासाहेबांना जबरदस्त धक्काच दिला. ह धक्का लहानसान नव्हता. ऑथेल्लोनें तर केवळ संशयावरून डेस्डेमोनाचा खून केला होता. अन् आतां काकासाहेबांना नुसता संशय नव्हता तर पक्का पुरावा त्यांच्या हातात पडला होता. त्यांनीं सारें चक्षुर्वैसत्यं घडलेलें पाहिलें होतें. पण त्यांचा स्वभाव तसा विचारी होता. तिला विचारण्यासाठीं त्यांच्या पोतडींत अनेक प्रश्न होते. विरुद्ध पक्षाच्या साक्षीदाराला असे प्रश्न विचारून त्याला नामोहरम करण्याची त्यांना चांगलीच प्रॅक्टिस होती. पण इथं सिनेमा थिएटरमध्यें तिला असे प्रश्न विचारून थिएटरला कोर्टाचें स्वरूप देणें वेडेपणाचें होतें. तिच्याबरोबर त्यांना आपलीहि बेअब्रू करायची नव्हती. लोकांना फुकट तमाशा दाखवायचा नव्हता. आणि म्हणून त्यांना त्या गोष्टीचा विलक्षण धक्काच बसला, उद्वेगजनक चीड आली, तरी त्यांनी एकदम कोणतीहि ॲक्शन घ्यायचं नाकारलें, सिनेमा सुरू होण्यापूर्वीच ते सिनेमागृहांतून बाहेर पडले.

काकासाहेब सिनेमागृहातून बाहेर पडले खरे, पण कुठं जावें, काय करावें तेंच त्यांना कळेना. घरीं जाण्याची ताकद तर त्यांच्या अंगांत आतां मुळींच

उरली नव्हती. मग जायचें तरी कुठें ? कुणाकडे ? एकाद्या मित्राकडे ? अं हं ! आजची आपली मनोव्यथा कोणाला म्हटल्या कोणालासुद्धां कळतां कामा नये, अगदीं परम प्रिय मित्रालासुद्धां. काकासाहेब तसेच घुटमळत तिथें फूटपाथवर जरा उभे राहिले. पलीकडच्या फूटपाथवरून एक बाई एका पुरुषाबरोबर हंसत खिदळत चालली होती. काकासाहेबांना ती ओळखीचीशी वाटली. त्यांनीं निरखून पाहिलें. कोर्टांत जिला त्यांनीं आज घटस्फोट मिळवून दिला होता, तीच ती बाई. काकासाहेब एकदम दचकले. त्यांचा जीव चुटपुटला. मघाच्या त्या पुरुषाबद्दल त्यांना अतीव करुणा वाटली. ह्या बाईबद्दल चीड, घृणा, तिरस्कार, किळस ! ते मनाशीं म्हणाले,—शीः पक्की निर्लज्ज, बेशरम बायको दिसतेय ही ! अगदीं आपल्या बायकोसारखी ! ती तरी काय बाई आहे !—छे ! अकारण आपण त्या पुरुषाला बदनाम ठरवला. असंख्य मुंग्या आपल्याला डंख मारताहेत असा कांहीं तरी विचित्र भास त्यांना झाला.

मनाची उलघाल आणखीच वाढली.

ते गाडीशी आले. दरवाजा उघडून आंत बसलेहि. पण आतां पुढें काय ? आतां जायचें तरी कुठें, हेंच त्यांना कळेना. विचारांची भुतावळ मनांत नाचत होती. तें तांडवनृत्य काकासाहेबांना असह्य झालें होतें. त्यानें त्यांना भोंवळ आल्यागत झालें. आपली बायको इतकी बनेल केव्हां झाली ? कशी झाली ? वर्षानुवर्षें ती आपल्याशी अशीच मुखवटा घालून वागतेय का ? मग आपल्या हें कधींच कसें लक्षांत आलें नाहीं ? आपल्याशीं ती प्रेमळपणानें वागते, बोलते, तसे भाव तिच्या डोळ्यांत दिसतात, याचा अर्थ तरी काय मग ? कीं तें सारें एक नाटकच ?

आणि खरोखरच काकासाहेबांची बायको वरवर त्यांच्याशीं फार प्रेमळपणानें वागत होती. ते घरीं आले न आले तोंच ती आचाऱ्याला चहाखाणें तयार तयार करायला सांगून त्यांच्याशी बोलायला येई. त्यांच्या गळ्यांत लडिवाळपणें हात टाकून ती त्यांच्याशीं लाडिक लाडिक नि साखरेंत घोळल्यासारखें गोड गोड शब्द बोले. तिच्या वागण्यांत बोलण्या चालण्यांत आकर्षकता होती. काकासाहेबांना घरीं आलेले पाहिल्याबरोबर ती त्यांच्याकडे पाहून प्रसन्नपणें हंसे. त्या तिच्या हास्यांत विलक्षण गोडवा होता. काकासाहेबांना त्यांत कधीं नकलीपणाचा, नाटकाचा भासहि झाला नाहीं. उलट तिच्या वागण्यांतला गोडवा काकासाहेबांचा सबंध

दिवसाचा शीण नाहींसा करीत असे.

आतांपर्यंत काकासाहेबांनीं कितीतरी मुखवटे पाहिले होते. त्यांच्या भावाचा मुखवटा, गड्याचा मुखवटा, कोर्टात वकिलांचे मुखवटे नि इतर व्यवहारांतहि अनेक लोकांनीं वेळोवेळीं घातलेले मुखवटे त्यांना पूर्णपणें ठाऊक होतें. ते स्वतःहि हें सर्व जाणूनच त्यांच्याशीं वागत होते. त्यांच्यापासून चार हात दूर राहून त्यांना त्यांच्याशीं वागणें शक्य होतें. पण पतिपत्नीनीं एकमेकांशीं मुखवटा घालून वागण्याची कल्पना त्यांना सहन होईना. पतिपत्नीचें हें नातें असें आहे कीं ज्यामुळें ती दोघे स्त्री पुरुष एकरूप होतात. त्यांच्यांत अभिन्नत्व उत्पन्न होतें. मग भिन्नत्व नाहीं तर मुखवट्याची गरजच काय? पण काकासाहेबांना आज कळून चुकलें कीं त्यांची कल्पना चूक आहे. जग ही एक रंगभूमि आहे अन् हीं सारीं माणसें त्या रंगभूमीवर नाचणारीं पात्रें आहेत. निव्वळ सोंगें आहेत. त्यांनीं सर्वांनीं मुखवटे घातलेले आहेत हरतऱ्हेचे, नकली, फसवे, वेगडी मुखवटे घालून ही सारीं पात्रें स्टेजवर नाचताहेत. पृथ्वीचें तें नाट्यगृह त्यांच्या डोळ्यासमोरून हलेना. त्यांना वाटलें, आपल्या पत्नीसकट सगळे पक्के चोर आहेत. पण वरवर मात्र साव असल्याचा आव आणताहेत. सगळीं सोंगें! शिमग्यांतलीं! आंत एक नि बाहेर दुसरेंच. जें पोटांत आहे, तें ओंठावर नाहीं. जें मनांत आहे तें जनांत नाहीं. ह्यांचे खायचे दांत वेगळे, दाखवायचे दांत वेगळे. हे सारे लोक निरनिराळे मुखवटे घालून आपल्यापुढें नाचताहेत. वेडे-वांकडे. अस्ताव्यस्त. काकासाहेबांच्या डोळ्यापुढचा तो भेसूर नाच कांहीं केल्या थांबेना. तें दृश्य त्यांच्या डोळ्यापुढून हलेना. उघड्या डोळ्यांपुढेंहि तेंच दृश्य. मिटलेल्या डोळ्यांपुढेंहि तेंच दृश्य. अंतश्चक्षू पुढेंहि तेंच. किलकिल्या डोळ्यां-पुढेंहि तेंच. मुखवटे. मुखवटे. मुखवटे! जगांत सगळे लोक असेच मुखवटे घालून हिंडतात. पण हें असें कां? हे मुखवटे घातले नाहींत तर? मनुष्य आहे, तसा तो वागला, दिसला, आपण खरेखुरे जसे आहोंत, तसेच आपण दिसावें, तसेंच आपण वागावें, असें त्यानें ठरवलें, तर कुठें बिघडलें? पण माणसें तशीं वागत नाहींत, तशीं दिसत नाहींत, स्वतःला तीं तसें दाखवीत नाहींत. जगांत माणसें मुळीं वावरतच नाहींत. वावरतात ते सारे मुखवटे. काकासाहेबांचें मन ह्या साऱ्या मुखवट्यांना आतां विलक्षण विटलें होतें. त्यांना वाटलें, कुठें तरी अशा ठिकाणीं जावें कीं जिथें ढोंग, दगलबाजी, लाचारी,

दैन्य या कश्शा कश्शाचे मुखवटे नाहींत. अशा निरागस, निष्पाप जीवनांत डोकावून पहावें, जिथें सत्य हें केवळ सत्य, उघडें वाघडें सत्यच दिसेल, अन् असत्य तें असत्यच वाटेल, ज्यांत मेळ नाहीं, आभास नाहीं. जिथें वेगडी, मुलामा, झिलई केलेल्या गोष्टींना वाव नाहीं, थारा नाहीं, अशा विश्वांत वावरावें. असें विश्व कुठें दिसेल? अशा विश्वांत शिरायला कसें नि कुठें मिळेल? पण असें विश्वच असेल का अस्तित्वांत? हो. लहान, अगदीं छोट्या छोट्या बालकांच्या सान्निध्यांत या विश्वाचा आपल्याला साक्षात्कार होईल. बालकांच्या त्या विश्वांत मुखवटे आपल्याला मेडसावणार नाहींत. पण छे! केवळ बालांच्या या निष्पाप, निरागस जीवनांत आपल्याला कसें वावरतां येईल? जिथें लहान मुलें आहेत तिथें थोडी कां होईना मोठीं माणसें असणारच. त्यांना टाळणें कसें शक्य आहे? आपली हट्टी दृष्टि अशी अलग राहणें शक्यच नाहीं. ती नको तिथें प्रथम जाते. हें मुखवटे टाळणें आपल्याला अशक्य आहे, आतां आपल्या डोळ्यांना, मनाला कोणाचाहि मुखवटा पाहणें सहन होणार नाहीं. जगांतल्या सगळ्याच मुखवट्यांना काकासाहेबांचें मन आज विटलें होतें. ते वैतागले होते. शेवटीं दादरला चौपाटी-वरच्या स्मशानाजवळ जाऊन ते बसले. स्मशानांत पेटणाऱ्या चितेकडे पाहात कितीतरी वेळ ते तिथें बसले होते. एकटे. अगदीं एकाकी. एकाद्या भुतासारखे. इथेंच फक्त त्यांना कसलाहि मुखवटा दृष्टीस पडणार नव्हता.

काकासाहेब तिथें तसेच किती वेळ बसले होते कोणास कळे! विचार करकरून त्यांना ग्लानि आल्यासारखी झाली. पण कितीहि विचार केला तरी काका-साहेबांना हें समजूच शकलें नाहीं कीं त्यांची पत्नी त्यांच्याशीं अशी कां वागली! तिला इथें कमी तरी काय पडत होतें? काकासाहेबांचें तिच्यावर असीम प्रेम होतें. तीहि त्यांच्या प्रेमाला तसा प्रतिसाद देत होती. नव्हे, तसा दिल्याचें दर्शवीत होती. अमाप पैसा होता. हवें तसें तिला चैनींत रहायला मिळत होतें. काकासाहेबांकडून तिला सगळ्या प्रकारचें सुख मिळत होतें. मग तरीहि तिनें त्यांच्याशीं प्रतारणा कां केली? काकासाहेबांच्याबरोबर सप्तपदीचीं सात पावलें चालून त्यांना सात जन्मांची सोबत करण्याचें वचन तिनें त्यांना देवब्राह्मणांच्या-समोर, त्यांच्याच साक्षीनें दिलें होतें. मग त्या आणा भाका ती एवढ्यांतच विसरली? लग्नाच्या त्या पवित्र बंधनाचें पावित्र्य तिनें असें कां बिटाळलें? तिनें त्यांना इतके दिवस असें कां फसवलें? कां अंधारांत ठेवलें? काकासाहेबांचें प्रेम.

लग्नाचें पवित्र बंधन ह्यांची कशाचीच तिला मातब्बरी वाटली नाहीं ? हें तिला कांहींच नको होतें ? मग तिला काय हवें होतें ? काकासाहेबांचा केवळ पैसाच ? अन् त्या पैशावर करतां येणारी चैन ?

काकासाहेबांच्या मनांतल्या विचारांची गुंतावळ कांहीं केल्या सुटेना, बऱ्याच वेळानें केव्हांतरी ते तिथून उठले. घरीं येण्याची इच्छा नव्हती तरीहि अभावितपणें त्यांची गाडी घराकडे वळली. कदाचित घरीं येणें प्राप्त होतें म्हणूनहि असेल ते घरी आले. विमनस्कपणें आंत शिरले.

ते अवेळीं घरीं आल्यामुळें सुदैवानें आज त्याचें स्वागत करायला कोणी सामोरें आलें नाहीं. कसेबसे कोटांतले कपडे उतरवून त्यांनीं तोंडावर पाण्याचा हबका मारला. मनाची बेचैनी कमी करण्याचा एक निष्फळ प्रयत्न, दुसरें काय ? खोलींत येऊन ते झपाट्यानें येरझारा घालीत राहिले. त्यांच्या पत्नीनें एका खोलींतून त्या खोलींत जातांना त्यांना सहज पाहिलें. त्यांना बघितल्याबरोबर तिच्या चेहऱ्यावर नेहमीचें लाघवी, गोड हास्य चमकलें ' अय्या ! केव्हां आलांत ? मला कळलंसुद्धां नाहीं ' ती लाडिक लाडिक स्वरांत म्हणाली.

कानांना धुंद करणारी आवाजाची गोडी वातावरण भारून गेली. काकासाहेबांची मान त्यांच्या नकळत वर झाली. अभावितपणें त्यांची दृष्टादृष्ट झाली. जें दृष्टीस पडायला नको होतें तेंच नेमकें काकासाहेबांच्या दृष्टीस पडलें. जें दर्शन त्यांना असह्य झालें होतें, तेंच दर्शन घडलें होतें. जें त्यांना पहायची केव्हांहि इच्छा नव्हती, तेंच पहावें लागलें होतें. हा मुखवटा पहावा लागण्यापेक्षां आपले डोळे कां फुटले नाहींत ? अशावेळीं आपण आंधळे असतो, तर फार फार बरें झालें असतें, असा विलक्षण विचार काकासाहेबांच्या मनांत येऊन गेला. ह्या मुखवट्यावर दिसणाऱ्या हास्यानें त्यांचें डोकें एकदम भडकलें. पावडर-रूझनें रंगलेला आपल्या पत्नीचा चेहरा चांगली मुस्कटांत देऊन खरोखरचा रंगवून काढावा, अशी त्यांना तीव्र इच्छा झाली. त्यांचे हात नुसते शिवशिवत होते. त्या मुखवट्यावर फेकण्यासाठी कांहीं अपशब्द त्यांच्या अगदीं ओठावर आले. त्यांना वाटलें, तिला सांगावें, ' तूं कुलटा आहेस, पापी आहेस, व्यभिचारी आहेस. काल तूं आपल्या भावाकडे जाते म्हणून मला खोटेंच सांगून त्या मवाल्याबरोबर सबंध दिवस जुहूच्या हॉटेलांत नाचलीस. आज कुठेंच जाणार नाहीं, घरांतच बसणार

आहे, असें सांगून त्या हलकटाबरोबर मेट्रोंत त्याच्या खांद्यावर मान टाकून सिनेमा पहात होतीस. तूं, तूं एक नंबरची नाचरी मैना आहेस.' पण महत्प्रयासानें आपला मनःक्षोभ आवरून त्यांनीं आपल्या ओठांना मुरड घातली.

त्यांच्या पत्नीनें काकासाहेब वरीं आल्याची वर्दी आंत जाऊन आचाऱ्याला दिली व ती पुन्हां त्यांच्या खोलीकडे वळली. मनांत एकदम कांहीं विचार येऊन खोलीचें दार आंतून बंद करून घेण्यासाठीं काकासाहेब दाराशीं आले, तेवढ्यांत ती आंत शिरली. आंत येऊन तिनें दार कलतें केलें. काकासाहेब चटकन् बाजूला होऊन खिडकीशी पाठमोरे उभे राहिले. ती जवळ येत असल्याची चाहूल त्यांना लागत होती. तिच्या प्रत्येक जवळ पडणाऱ्या पावलागणिक काकासाहेबांचें डोकें जास्त जास्तच भडकत होतें. त्यांची त्रस्त मुद्रा, मनांतला क्षोभ आवरतांना त्यांना होणारा त्रास त्यांच्या पत्नीच्या नजरेंतून मघाशीं सुटला नव्हता. तिनें जवळ येऊन त्यांच्या खांद्यावर हात ठेवला नि स्वरांत शक्य तितका प्रेमळपणा आणीत विचारलें, "बरं नाहीं का वाटत आज?"

तिनें खांद्यावर हात ठेवतांक्षणीं काकासाहेब विलक्षण दचकले, भेदरले. तिच्या व्यभिचारी हाताचा स्पर्श त्यांना विषारी डंखासारखा झोंबला. सगळ्या शरीरांतून विलक्षण वेदना होत असल्याचा भास झाला. ते चटकन् बाजूला झाले. त्या मुखवट्याची त्यांना घृणा आली. त्यावरचा खोटा प्रेमळपणा, लाघवी, गोड हास्याची चमक काकासाहेबांच्या डोळ्यांना सहन होईना. हा मुखवटा आतांच्या आतां उडवून टाकला पाहिजे! काकासाहेबांनीं तिला एकदां आपादमस्तक न्याहाळलें. त्यांच्या वृत्तींत एकदम वकिलाचा बेडरपणा आला. तिचा मुखवटा आतां कसा गळून पडेल हें त्यांना पहायचें होतें.

'घरांतच होतीस ना आज सबंध दिवस? कंटाळा आला नाहीं दिवसभर घरांत बसून?" काकासाहेबांनीं वकिली प्रश्न टाकला.

"अय्या! घरांत नव्हतें बसलें सबंध दिवस. आताच बाहेरून आलें मी. झाला असेल अर्धातास मला वाटतं."

"सकाळी तूं म्हणाली होतीस, आज बाहेर कुठें जाणार नाहीं, म्हणून विचारलं आपलं"...मुद्दाम निर्विकार भाव चेहऱ्यावर आणून काकासाहेब म्हणाले.

"हो म्हटलं होतं. पण...पण अगदीं अचानक ठरलं जायचं."

" अस्सं ! "

" बरं पण तुमचा चेहरा आज असा का ? डोकबिकं दुखतंय ? "... पत्नीच्या स्वरांत खोटं मार्दव होतं. पोकळ आस्था होती.

" छे ! कांहीं होत नाहीं मला. ठीक आहे. तुझा दौरा कुठें होता आज ? "

" किनई माझ्या मैत्रिणीचा फोन आला, दोन तिकिटं रिझर्व्ह केलीं आहेत येतेस का म्हणून. " पत्नीचा लाडिक अविर्भाव.

" अस्सं ! " एक डोळा किंचित् किलकिला करून दुमडून काकासाहेब म्हणाले. ते अजूनहि खिडकींतून बाहेर कुठतरी शून्यात पहात होते. " मग मला का नाहीं कळवलंस ? मीपण आलों असतो तुमच्याबरोबर. "

" खूप वाटलं मला तुम्हांला कळवावंसं पण... "

" बाकी मैत्रीण बरोबर असतांना माझी काय गरज नाहीं का ? तिच्याबरोबर पाहण्यांतच कांहीं और मजा... " काकासाहेबांच्या स्वरांत खोचकपणा होता.

" इश्श ऽऽ ! "...इश्श या शब्दाला हेलकावे देत पत्नी म्हणाली,... " कांहींतरीच तुमचं आपलं. असं नाहीं बरं का. खरं म्हणजे तुमच्याशिवाय पिक्चर बघण्यात गंमत नाहीं बाई वाटत. पण... " तिच्या चेहऱ्यावर मंद मधूर हास्याचा शिडकावा झाला. चेहऱ्यावर मोहक भाव आला.

याच, याच तिच्या मोहक हावभावांना, मंद मधुर हसण्याला काकासाहेब आतापर्यंत भुलत आले होते. तिच्या चेहऱ्यावरचं तें स्मित आपल्या ओठांनी टिपण्यात मनस्वी सुखावले होते, पण आतां त्या बेगडी अभिनयाचाच त्यांना उबग आला होता.

" पण...पण काय ?...त्यांच्या स्वरात थोडा तुसडेपणा होता. पण तिच्या तो लक्षातहि आला नाहीं किंवा येऊनहि तिनं तो लक्षांत न आल्याचं नाटक बरोबर वठवलं.

" पण तिनं अगदीं गळच घातली न मग नाइलाजच झाला माझा. शिवाय मला वाटलं, तुम्ही असणार यावेळीं आपल्या केसमध्यें गुंतलेले मग तुम्हांला कळवून उपयोग काय ! "

" आज फार पटकन् जिंकली मी कोर्टीतली केस. अपेक्षेबाहेर लौकर संपलं काम. "

" अय्या ! हो ऽऽ "

" हो न वाटलं, मेट्रोला जावं पण म्हटलं, तू नाहींस बरोबर मग एकट्यानंच जाण्यांत काय मजा ! "

" च च च च !..." ती हळहळली. " उगीच थोडक्याकरतां चुकलं. पण मला तरी काय कल्पना ! "

" बरं पण कुठल्या मैत्रिणीबरोबर गेली होतीस ? "

" पार्ल्याची..."

" पार्ल्याची ?..."

" हो. पार्ल्याची सुनंदा हो..." तिनं सफाईनं खोटी थाप मारली.

" मला भेटली मघाशीं सुनंदा. "

" अय्या ! होय ? कुठें भेटली ? " काकासाहेबांच्या पत्नीचा चेहरा एकदम फिक्का पडला.

" सुमारे तीन तासापूर्वी. " पुन्हां वकिली डावपेचाचें काकासाहेबांचें बोलणें.

काकासाहेबांची पत्नी त्या बोलण्यानें बावरली. चांगलीच गोंधळली पण तिनें लगेच स्वतःला सावरलें. " कीं नाहीं, तिचं एकाएकीं फार डोकं दुखायला लागलं. सिनेमा पहाणं देखील अशक्य झालं तिला म्हणून मधून उठून गेली ती. "

" आणि मग तिथून उठून डोकेंदुखी कमी होण्यासाठीं दामोदर हॉलमधें नाटकाला जाऊन बसली ? "

पत्नीला कोंडींत पकडण्यासाठीं काकासाहेबांनीं खोटेंच प्रश्न विचारून तिच्या-कडून खरें काढून घेण्याचा प्रयत्न केला.

" इश्श ! कमालच केलीन् तिनं तरी. " पत्नी आंतून चांगलीच अस्वस्थ झाली होती, तरी आपली बाजू सावरुन घेण्याचा निष्फळ प्रयत्न करीत, हंसत हंसत म्हणाली.

"एकुण आज सुनंदानं तुला सिनेमा दाखवला तर ? "

" हो. " पत्नीचा पुन्हां गोड हंसण्याचा प्रयत्न.

मुखवट्याला विटलेल्या काकासाहेबांच्या दृष्टीनें पुन्हां मुखवटाच पाहिला. हा मुखवटा पुन्हां दिसूं नये म्हणून काय करावें ? काकासाहेबांना स्मशानांत पाहिलेल्या प्रेताची एकदम आठवण झाली. प्रेत ! फक्त प्रेताला तेवढा मुखवटा नाहीं. हा मुखवटा पाहणें नको असेल तर त्याचें प्रेत झालें पाहिजे. प्रेत, ! मुखवटा ! मुखवट्याचें प्रेत ! मुखवटा आणि प्रेत. या शब्दांनीं काकासाहेबांच्या

डोक्यांत नुसतें थैमान घातलें. तेच ते शब्द त्यांच्या डोक्यांत घुमूं लागले. डोक्यावर विलक्षण आघात करूं लागले. त्या आवाजांनीं काकासाहेब बेभान झाले. व्यभिचारी पत्नीबद्दल वाटाणारा तिरस्कार अनावर झाला. व्यभिचार करून वर नीतीचा, सौजन्याचा, लाघवीपणाचा मुखवटा घालणाऱ्या पत्नीचें काय करूं नि काय नको असें त्यांना होऊन गेलें. त्यांच्या डोळ्यापुढें पत्नीच्या मुखवट्याचें प्रेत दिसूं लागलें. आयुष्यभर संयमानें वागणाऱ्या काकासाहेबांच्या मनाचा फक्त याच वेळीं तोल सुटला- विचार आणि विवेक यांचा महत्प्रयासानें सावरलेला कडा धाडकन् खालीं कोसळला. वर्षानुवर्षे विचारीपणानें वागणारे काकासाहेब एकदम अविचारी बनले. 'खोटं! खोटं सांगते आहेस तूं.' काकासाहेब एकदम ओरडले. त्यांच्या शब्दाला विलक्षण धार होती. त्यांत तिरस्कार होता, चीड होती. डोळ्यांत कांहीं तरी चमत्कारिक, हिंस्र श्वापदासारखे क्रूर भाव असल्याचें त्यांच्या पत्नीला जाणवलें. तिला हें सारें नवीन होतें. ती भेदरली. तरी सर्व बळ एकवटून चाचरत म्हणाली, खरं—खरं सांगतेय मी."

"बिलकुल नाहीं. साफ खोटं आहे हें. वर्षानुवर्षं तूं हा मुखवटा घालून माझ्यापुढें नाचते आहेस. ढोंग, खोटेपणा, नकली, फसवें प्रेम. मुखवटा पाहाणं मला आतां असह्य झालंय. आज मी त्या मुखवट्याचीं शकलं शकलं उडवणार आहे."

काकासाहेबांचा आजचा नूर पाहून त्यांची पत्नी विलक्षण घाबरली. एकेक पाऊल मागें मागें चालली. पण काकासाहेबांनीं पटकन् पुढें होऊन तिची मानगूट आपल्या दोन्ही हातांत घट्ट पकडून आवळली नि तिला धाडकन् लोटून दिलें. भिंतीला टांगलेल्या भल्या मोठ्या आरशावर ती आदळली. आरशाचा एक मोठा थोरला तुकडा खळकन् फुटून खालीं काकासाहेबांच्या पायाशीं पडला. त्यांत त्यांना नेमकें आपलें प्रतिबिंब दिसलें. ते विलक्षण दचकले. तिथेंहि त्यांना एक मुखवटाच दिसला. त्यांच्या डोक्यांत, छातींत कसेंतरीच झालें. असंख्य मुखवटे व त्यामधें तें प्रेत जत्रेतल्या पाळण्यासारखें विलक्षण गतीनें त्यांच्या डोळ्यापुढें गरगर फिरूं लागलें. काकासाहेबांना भोंवळ आली. आणि ते एकदम खालीं कोसळले.

■ ■

■ ६ ■

# नवस

करकरीत तीनसांज झाली. घराघरांतून रॉकेलचे मिणमिणते दिवे लागले. रस्ते शाळेंतल्या आज्ञाधारक मुलांच्याप्रमाणें हाताची घडी तोंडावर बोट ठेवून चिडीचिप्प बसले. कुठें कुठें पडवींत झोपाळ्यावर बसून हलके हलके झोके घेत, तर कुठें कुठें ओसरीवर फेऱ्या मारीत मुलें 'शुंभ करोति नि रामरक्षा' म्हणूं लागलीं होतीं. शारदेनें हलकेच, मांजराच्या पावलानें घरांत पाऊल टाकलें. देवघरांत सासू धूपदीपाची तयारी करीत होती. ती पाठमोरी आहे असें पाहून दबल्या पावलांनीं शारदा मागील दारीं गेली अन् पाय धुवून देवघरांत आली. सासूच्या मागें उभी राहूनच तिनें देवाला नमस्कार केला नि त्याच पावलीं ती परत निघाली. शारदेला वाटलें, बरं झालं सासूनें आपल्याला पाहिलें नाहीं. पण शारदेकडे पाठ असूनहि तिच्या हालचालीकडे सासूचें पूर्णपणें लक्ष होतें. शारदा परत फिरलेली पाहून वात लावतां लावतां तिनें एकदम मागें तोंड फिरवलें अन् ती म्हणाली, "अग, करकरीत तीनसांजेला राहूं नये हो घराबाहेर असं गरभारशीं बाईनें. बाकी तुम्हां ह्या पिढींतल्या पोरींन पटायचं नाहीं म्हणा आम्हा म्हाताऱ्यांचं बोलणं. पण...पण उगीच कांहीं वेडविद्रं झालं कीं...कीं साहजिकच येतं मनांत, अन् वाटतं सांगून तर पहावं."

शारदा यावर कांहींच बोलली नाहीं. तिनें मुकाट्यानें ओचापदर बांधला नि ती स्वयंपाकघराकडे निघाली.

"कोपऱ्यावरच्या घरांत एक सवाष्ण गेली. तरणीताठी, गरभारशी, फार पूर्वींची गोष्ट आहे म्हणे. दारांतल्या चिंचेवर भूत होऊन बसलीय म्हणतात बाई ती. त्या चिंचेखालून तर कध्धीं जायला धजत नसे कुणी अवसेपौर्णिमेला, रात्रीं अपरात्रीं नि करकरीत तीनसांजेला.' दूधसाखरेचा नैवेद्य देवाला दाखवितांना तिची सासू पुन्हां मागें वळून म्हणाली.

शारदा तरीहि कांहींच बोलली नाहीं. ती उंबऱ्याशींच थबकली. मनांत म्हणाली "नशिबांत असेल तें चुकतंय थोडंच अशानं !

पहिल्या खेपेला दिवस गेल्याचें कळल्यापासून बिचारी एक दिवस सुद्धां कधीं वेळीं अवेळीं घरीं आली नाहीं कीं, बाहेरहि पडली नाहीं. दिवसा कधींमधीं कुठें गेली असेल तेवढीच. पण संध्याकाळीं नि रात्रींहि अगदीं डांबून ठेवल्यागत बसत होती घरांत. पण शेवटीं जें व्हायचें तें झालेच होतें. 'दवात असेल तें चुकतंय थोडंच कुणाला ? कुठं जाशी भोगा तर तुझ्या पाठीशीं उभा. माझे भोग आहेत ते भोगायलाच हवेत मला. मग रात्रीं काय, दिवसा काय नि केव्हांहि घराबाहेर पडलं तरी तीच अवस्था.' शारदा स्वतःशींच पुटपुटली. तिनें एक जड निःश्वास सोडला. त्या निःश्वासांत औदासिन्याची छटा होती. कांहींसा बेफिकीरपणाहि होता. 'हुं ! वर्षांनुवर्षं हींच वाक्यं ऐकतोय आपण सासूबाईंच्या तोंडचीं. उगीचच अनुभवाखेरीज.' ती पुन्हां एकदां स्वतःशींच पुटपुटली.

आधीं किती दिवस शारदेला पोरबाळ होत नव्हतें. साऱ्यांनीं वांझोट्यांतच जमा केली होती तिला. तिच्या जावा तर उघड उघड टोमणे मारीत होत्या. आपल्या हातचें हें नाहीं हें समजूनसुद्धां त्या असें कसें बोलतात, याचें शारदेला राहून राहून मोठें नवल वाटे. पण तिचें दैवच तिच्या उलट होतें. मग मुकाट्यानें तिला तें ऐकून घेणें प्राप्तच होतें. दुसऱ्याच्या वर्मावर नेमकें बोट ठेवून कुचकें बोलणारे लोकच जगांत फार.

तिला ह्या मुलीच्या वेळीं डोहाळे लागले तेव्हांचीच गोष्ट. महिना दीड महिना ती सारखीच ओकत होती. पाणीसुद्धां घड पचत नव्हतें. उलट्या कांहीं थांबेनात. तिच्या सासूला नि नवऱ्याला वाटलें कीं हे नक्की डोहाळेच आहेत. सासूच्या सांगण्यावरून नवऱ्यानें तिला इच्छा झालेली वस्तु मुद्दाम तिला खायला आणून दिली. दोघी जावा खवचटपणें हंसल्या. आपापसांत कुजबुजल्या.

"भाऊजी मारे कौतुक करताहेत डोहाळे समजून, पण शेवटीं सगळं ओफस

होणाराय म्हणावं. मागच्या वेळीं अशाच चार आठ दिवस उलट्या झाल्या नि शेवटीं त्या पित्ताच्याच उलट्या ठरल्या." एक म्हणाली.

"इश्श ! हो ना. नि ह्यापण मारे कौतुक करून घेताहेत. मी म्हणतें वाटत कसं नाहीं कांहीं त्यांना कौतुक करून घ्यायला ? व्हायचं असतं तर इतके दिवस नसतं का झालं ? आतांपर्यंत थोडे का प्रयत्न झाले ? पण बिचाऱ्या भाऊजींच्या नशिबांत कांहीं पोर दिसत नाहीं." दुसरीनें पहिलीची री ओढली. कधीं नव्हे ती ह्याबाबतींत त्या दोघींना आपल्या दिराची कींव येत होती.

पण शेवटीं ते डोहाळेच ठरले आणि लग्नानंतर दहा बारा वर्षांनीं वयाच्या जवळ जवळ तिशीच्या सुमारास कुठें तिला पहिली वहिली मुलगी झाली. मोठ्या नवसायासानें. दिवस गेल्याचें लक्षांत आल्यावर शारदेला कोण आनंद झाला ! पोराच्या आगमनाच्या वाटेकडे ती डोळे लावून बसली होती. मनांतल्या मनांत मोठमोठीं मनोराज्यें रचूं लागली होती. पहिला वहिला मुलगाच व्हावा, असें तिला फार फार वाटत होतें. त्यामुळें मुलगी झाल्याचें कळलें तेव्हां तिचें मन कांहींसें खट्टूहि झालें होतें. पण हरकत नाहीं. मुलगी तर मुलगी, मुलगा होईल पुढच्या खेपेला ? असें म्हणून तिनें मनाचें समाधान केलें होतें. मुलीला पहायला शारदेचें मन किती अधीर झालें होतें ! पण मुलगी पुढ्यांत आली मात्र, तिला प्रेमाचा पान्हा फुटण्याऐवजीं एकदम रडूंच कोसळलें. काळाकुळकुळीत डांबरागत रंग, माकडासारखी चेहऱ्याची ठेवण, अंगावर भरमसाट लव ! कशी दिसणार ही पोर पुढें, शारदेला कळेना. पण कांहीं झालें तरी ती पोर म्हणजे तिच्या काळ-जाचा तुकडा होता. तो तुकडा तीं जिवाभावानें जतन करूं लागली. तिच्या शरीरांत, डोक्यांत कांहीं प्रगति होते का, म्हणून आशेनें रोज वाट पाहूं लागली. पण ती पोर आठ दहा वर्षांची झाली तरी तिला धड बोलतां येईना, कीं कांहीं कळेना. कुरूप नि अर्धवट ! शरिराचा नुसता जड गोळा. खायला काळ नि भुईला भार. शारदेच्या जावा, नणंदा तर त्या पोरीचा तिरस्कारच करीत. तिला दिवसभर साऱ्या हिडीसफिडीस करीत. घरांत तिच्याशीं कुणीच नीट वागत नसे. अगदीं शारदेचा नवरासुद्धां. बाहेरच्या लोकांना त्या पोरीबद्दल कींव वाटे. क्वचित् सहानुभूतिहि. पण तिच्याशीं मायेनें, प्रेमानें वागणारें कुणीच नव्हतें. कुणी कुणी तर तिची आडून नि कधीं कधीं सरळ सरळ सुद्धां कुचेष्टाच करीत. एकटी शारदाच काय ती आपल्या पोटच्या गोळ्याच्या प्रेमानें तिचें सारें कांहीं जातीनें

पाहात, करत होती. पण ती पोर म्हणजे तिच्या जिवाला जन्माचा घोर लागून राहिलेली होती. त्या पोरीच्या पाठीवरचीं तीन्हीं मुलें झाल्याबरोबरच गेलीं. जगली वांचली ती ही वेडीविद्री पोर. नि आतां यापुढचें भवितव्य आहे तरी कसें नि काय, आपलें नि त्या पोरीचेंहि, याची शारदा रोज काळजी करीत बसली होती. आणखी एकादें असेंच पोर तर पुन्हां होणार नाहीं ना, म्हणून धास्तावली होती...

सासूच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून शारदेनें मुलांचीं पानें घ्यायला सुरुवात केली. इतक्यांत तिच्या मुलीनें बाहेरून धांवत धांवत येऊन मिठी मारली. पोरीच्या पायाला अडखळून शारदा पडणारच होती, पण तिनें आपला तोल "अग, अग, हें काय, पडत होतें नं आतां मी. एकदम येऊन काय बिलगलीस अशी ?' शारदेनें मुलीला बाजूला केलें नि हातांतलीं ताटें खालीं ठेवलीं.

"अं...अं.. अं मग ही कमी नि मन्या बघ ना मला चिडवतात उगीच."
पोरगी अडखळत अडखळत बोलली.

"अग पण आपण चिडावंच कशाला ? तूं काय बिब्बा आहेस अशी चिडायला ?"

"पण सारखी सारखी कशाला बोलते ती मला ? कमी म्हणते, 'वेडी आहेस तूं' अन् मन्या मला म्हणतो, 'इंदूबिंदूसारखी काळी कुरूप दिसतेस तूं."

"अग कांहींतरी बडबडतात तीं वेड्यासारखीं."

"तींच दोघे वेडी आहेत, होय ना ?"

"होय."

"आणि कुरूप पण ?"

"हं !"

मुलीच्या प्रश्नाला शारदा उत्तरें देत होती खरी, पण तिचें मन आतां मुळींच ठिकाणावर राहिलें नव्हतें. एक दोन मिनिटें ती तिथें तशीच उभी राहिली, कांहींशी गोंधळल्यागत, कांहींशी सुन्न झाल्यागत. मग एकदम तिचे डोळे पाण्यानें तुडुंब भरले. मान खालीं करून पोलक्याच्या बाहीनें तिनें चटकन् डोळे टिपले.

सुखदुःखाच्या आपल्या भावनांना वाट मोकळी करून देणेंसुद्धां कधीं कधीं मुश्किल होतें. करकरीत तीनसांजेला भरल्या घरांत रडणें घरांतल्या साऱ्यांना अपशकुनाचें लक्षण वाटून त्यावर मोठा गहजब झाला असता, हें शारद

जाणून होती.

डोळे पुसून शारदा यंत्रागत बाहेर आली नि कामाला लागली, इतक्यांत तिच्या मुलीनें पुन्हां तिला हाताला धरून ओढीत म्हटलें, "ए आये, तूं सांग ग त्यांना. पुन्हां पुन्हां चिडवतात."

आतां मात्र शारदा त्या पोरांवर चांगलीच चिडली. असेल तिची मुलगी कुरूप वेडी, पण म्हणून काय साऱ्यांनीं तिच्यामागें लागून तिला सतावून सोडावें? कुणीहि तिच्याबद्दल साधी सहानुभूतिसुद्धां बाळगूं नये? रोज उठून हा काय जिवाला ताप? शारदा मग तिथून ओरडून दटावणीच्या सुरांत म्हणाली, "का रे उगीच मागें लागलाहांत तिच्या? गप्पा बसतां का घालूं दोन रट्टे एकेकाच्या पाठींत? ती एक आहे वेडी पण तुम्ही तर शहाणे आहांत नं? मग तुम्हाला का नाहीं सांगून समजत?" मग मुलीच्या पाठीवर हात फिरवून ती म्हणाली, "थांब हं, आपण त्यांचीं घरं उन्हांत बांधूं हं."

"कोण, ही वेडी आमचं घर उन्हांत बांधणार!" बाहेरच्या खोलींतून आपापसांत बोललेला अस्पष्ट आवाज आला. पाठोपाठ सगळी ही ही ही ही करून मोठ्यानें उपहासात्मक हंसलीं.

"थांबा हो. ऐकत नाहीं काय? आतां रट्टेच हाणले पाहिजेत एकेकाच्या पाठींत." असें म्हणत शारदा तरातरा पडवीत गेली.

"इश्श! एवढं रागावायला काय झालं बाई! वेडी ती वेडी! नि वेडी म्हटलं तर राग कां येतो एवढा, कळत नाहीं. मुलंच तीं. बोलतात कधीं मधीं एक-मेकाला चेष्टेंत पण ह्याच्या आपला नाकाच्या शेंड्यावर राग बसलेला. बरं मुलं काय उगीच का बोलतात त्यांना मारायला? आहेच ती पोर मुळीं तशी वेडी-विद्री." मोठी जाऊ आंतून फणकाऱ्यानें म्हणाली. 'आपली पोर अशी म्हणून दुस्वास वाटतो त्यांना दुसऱ्याच्या चांगल्या हुशार पोरांचा, दुसरं काय!" धाकटी म्हणाली.

दोघीहि शारदेला ऐकूं जाईल एवढ्या मोठ्यानें मुद्दामच बोलल्या कारण त्या पोरीला चिडवण्यांत त्या दोघींच्याहि मुलांचा हात होता.

त्यांची अपेक्षा पूर्ण झाली शारदेच्या तें कानावर पडलें. ज्या आवेशानें ती पडवींत गेली होती मुलांना धाक दाखवायला म्हणून तो तिचा आवेश एकदम ओसरला. ती तशीच निमूटपणें माघारीं फिरली. त्या पोरांना मारण्याचा आपल्याला

काय अधिकार ? ती मग त्या पोरीवर चिडली. स्वतःवरहि चिडली पोरीला फरा-फरा ओढीत नेऊन तिनें तिला एका कोपऱ्यांत बसवली ' आतां जर का मी सांगे-पर्यंत इथून हललीस नि बाहेर खेळायला गेलीस त्यांच्यात तर याद राख. तंगडीच मोडून टाकीन तुझी. " शारदेच्या डोळ्यांतून रागाच्या आगीचे लोळ बाहेर पडत होते.

" खासा न्याय आहे. " मोठी मऊ जाऊ म्हणाली.

" चोराऱ्या उलऱ्या..." धाकटी म्हणाली.

असे प्रसंग घरांत वरचेवर घडत अपमान, उपहास, तिरस्कार ! हें सारें आत तिच्या अंगवळणी पडत चाललें होतें. पाण्याच्या एका घोटाबरोबर कारल्याच्य भाजीचा घांस गिळावा तसा शारदेनें राग गिळला. जावांचें बोलणें आपण ऐकलेंच नाहीं असें दर्शवून ती आपल्या उद्योगाला लागली पण तिचें लक्ष कामांत लागेना. धूपारती करतां करतां सासू तिकडे घंटा वाजवीत होती. त्या घंटेच्या निनादापेक्षां सासूचे मघाचे शब्दच शारदेच्या कानांत घुमू लागले. भूतखेत, तंत्रमंत्र, करणी असल्या गोष्टीवर तिचा आतांपर्यंत कधींच विश्वास बसला नव्हता. तिची श्रद्धा होती ती फक्त देवावर देवांतल्या. त्याच्या अद्‌भुत लीलेवर, अचाट सामर्थ्यावर, अतिमानुष शक्तीवर. पण मन पंगू झालें कीं, तें अंधश्रद्धाळू बनतें. शारदेचें मनहि अलिकडे अलिकडे असेंच पंगू झालें होतें. लागोपाठ बसलेल्या धक्क्यानें त्याचा कणखरपणा पार नाहीसा झाला होता. आतांहि तिचें दुबळें मन म्हणूनच त्या विचित्र विश्वासाच्या आहारीं गेलें तिला वाटलें, खरंच या म्हणतात तसं कांहीं असलं तर ? नि त्यामुळेंच मागें असं कांहीं झालं असेल तर ? अन् या-पुढेंहि पुन्हां झालें तर ? छे ! नकोच ती कल्पना. मनोमन ती घाबरली. देवापुढें जाऊन उभी राहिली. तिनें देवपुढं हात जोडले अभावितपणें नि भक्तिभावानेंहि तिनं त्याला आवाहन केलें. साकडे घातलें. देवाला ती नवस बोलली म्हणाली, ' देवा, चुकले. तीनसांजेला पाऊल टाकलं खरं घरांत पण अगदीं चुकून हं. अजाणता. नेणून घडली ही चूक हातून. पण क्षमा कर. तुझं देवत्व, तुझी शक्ति पणाला लाव. हें भूतखेत सारं दूर दूर हाकलून दे. या खेपेला तरी सारं सुरळीत होऊं दे. एक तरी पोर पदरांत पडूं दे. रूप, गुण बुद्धि सारं सारं नीटनेटकं, धड असूं दे त्याचं. पांच नारळांचं तोरण बांधीन तुझ्या दारांत.' मग खास कुल-स्वामिनीला उद्देशून ती म्हणाली, ' आई जगदंबे, सोळा शुक्रवार करीन मी

माझ्यावर कृपाप्रसाद करशील तर.'

आतांपर्यंत शारदा थोड्या का वेळां देवाला नवस बोलली होती ? पहिलं वहिलं पोर नि तेंच असें विचित्र, वेडंविद्रं झाल्यामुळें ती पहिल्या बाळंतपणा-पासूनच पार हबकून गेली होती. प्रत्येक वेळीं ती देवाला नवस बोलत आली होती आज ना उद्यां देव आपल्या नवसाला नक्की पावेल अशी तिला फार फार आशा होती. खात्रीहि होती. पण एक दोन नव्हे तीनहि वेळां तिची निराशाच झाली होती. देवानें तिचें गाऱ्हाणें ऐकूनहि न ऐकल्यासारखें केलें होतें. कान असूनहि देव कानकोंडा झाला होता. कारण यावेळींहि शारदेचें मूल उपजलें तें मुळीं गेलेलेंच पण तरीहि शारदेनें आशा सोडली नाहीं. तिला वाटे, आज ना उद्यां एकादें गोंडस सुंदरसें पोर आपल्या अंगाखांद्यावर खेळेल. वयाची चाळीशी होईपर्यंत तिची ही आशा तग धरून होती. पण त्या गोड गोष्टीची वाट पाहून पाहून ती थकली हळू हळू तिची आशा रोडावत चालली अन् मग पंचेचाळीशी उलटल्यावर तर ती नष्टच झाली.

आतां शारदा आपल्या त्या एकमेव जड गोळ्याचीच जोपासना करूं लागली. त्यांत कांहीं सुधारणा होईल म्हणून वाट पाहूं लागली. त्याला जिवापलीकडे जपूं लागली. नवस बोलूं लागली. उपासतापास नेमधर्म करूं लागली. पण मुलगी बारा वर्षांची झाली तरी फरक होईना तेंच रूप, तेच गुण, तेंच वेडंविद्रं शरीर, अर्ध-वटागत अडखळत, अडखळत कसेंतरी बोलणें, तें सारें होतें तसें कायम राहिलें. दिवसानुदिवस शारदा काळजीनें काळवंडूं लागली. ह्या जड गोळ्याचें पुढें काय करायचें तरी काय ? त्याचें व्हायचें तरी कसें ? पुढें काय, पुढें काय हा प्रश्न तिला भेडसावूं लागला अगदीं एखाद्या भुतागत अन् पोरगी तेरा चौदा वर्षांची झाली, न्हातीधुती झाली, वयांत आली तेव्हां तर शारदा पारच हबकली. रात्र रात्र तिला झोंप येईना झाली या कुशीवरून त्या कुशीला वळत वळत रात्र कशी सरेल याची ती वाट पाहूं लागली. रात्रीं तास न तास काळोखांतच आढ्याकडे टक लावून पहात राहू लागली. अगदीं एकाद्या वेड्यागत डोळ्यांत तेल घालून पोरी-वर लक्ष ठेवूं लागली कित्ती दिवसांत ती घराबाहेर पडेनाशी झाली न जाणों आपण बाहेर पडलों नि आपल्या अपरोक्ष ही पोरगी चुकून माकून का होईना कुणाच्या पाशांत अडकली तर ? रात्रीं क्वचित् तास दोन तास झोंप कधीं लागली तरी तिला मग विचित्र विचित्र स्वप्नें पडत. ती जागी होई ती दचकूनच. तेवढ्यांत

पोरगी कुठं गेली तर नाहीं ना या भीतीनें ती घाबरीघुबरी होई. शरीर भीतीनें, घामानें थबथबे. तश्शीच उठून ती आजूबाजूला नजर टाकी. मुलीला अंथरुणावर पाहून तिचा जीव भांड्यांत पडे. उशालगतच्या तांब्याभांड्यांतलें घोटभर पाणी पिऊन ती पुन्हां अंथरुणावर पडे. शारदेला ही मुलगी सांभाळतां साभाळतां नाकीं दम येऊं लागला. आपल्या पोटीं ही पोर आलीच कशी ? मागल्या जन्मीं आपण असं कोणतं पाप केलं होतं म्हणून त्या पापाचं हें जिवंत पुरेपूर माप आपल्या पदरांत पडलं ? शारदेला कांहीं कळेना. असली पोर पोटी येण्यापेक्षां ती झालीच नसती तर ? किंवा उपजतच गेली असती तर आपण जन्मभर वांझ राहिलो असतो तरी सुद्धां परवडलं असतं, असेंहि तिला अलिकडे अलिकडे वाटूं लागलें होतें.

शारदा मनाच्या अशा विचित्र, प्रक्षुब्ध अवस्थेंत असतांना तिची मुलगी दिवसानुदिवस वाढत होती. वय वाढत होतें, शरीर वाढत होतें पण अक्कल मात्र वाढत नव्हती. तिचा आहार भरपूर चांगला होता. कधीं साधें पडसें, खोकलासुद्धां तिला ठाऊक नव्हता. इतकी तिची प्रकृति निकोप होती. कसली काळजीकथा नाहीं, लाजलज्जा नाहीं, भीति नाहीं, मग प्रकृतीवर परिणाम तरी कशाचा होणार ? आणि म्हणूनच ती वयानें होती त्यापेक्षां केवढी उफाड्याची दिसूं लागली होती. शरीराबरोबरच निसर्गाच्या नियमानुसार शरीरधर्महि वाढत होता. शारदा हें जाणून होती म्हणून काळजीनें काळवंडून गेली होती. ही मुलगी मोठी होईल तशी शहाणीसुरती होईल, तिचें लग्नकार्य होईल नि आपली एक काळजी दूर होईल ही आशा करणेंहि शारदेला वेडेपणाचें वाटत होतें, पण तरीसुद्धां तिचें वेडें मन कधींकधीं तशी आशा करण्यांत, लेकीच्या संसाराबद्दलची वेडी मनोराज्यें रचण्यांत गुंगून जात असे...

असेंच दिवस चालले होते. एक दिवस शारदेच्या पुतणीला लोक बघायला येणार होते. बघण्याच्या कार्यक्रमांत या वेड्याविद्र्या पोरीचें अमंगल अस्तित्व नको म्हणून तिची व्यवस्था काय करावी या विवंचनेंत सगळीं पडलीं. शेवटीं सकाळींच शारदेनें तिला आपल्या गांवांतल्या बहिणीकडे पाठवून दिली. ठरल्या-प्रमाणें बघण्याचा समारंभ सुरू झाला. मुलगी हातांत चहाचा ट्रे घेऊन बाहेर आली. एवढ्यांत अचानक शारदेची ती वेडी पोर कशी कोण जाणे, आपल्या मावशीला गुंगारा देऊन अचानक तिथें उपटली. तिनें त्या मुलीला मागून येऊन

एकदम धडक मारली. चहाच्या कपबशांनीं भरलेला ट्रे दणकन् खालीं कोसळला. काचांचे तुकडे बैठकीवर इतस्ततः विखुरले. आलेलीं सगळीं माणसें हा काय प्रकार आहे म्हणून पहातच राहिलीं. ‘ अग हें काय ? हळू नाहीं का यायचं ? ’ शारदेचा दीर म्हणाला. वरकरणीं ते शांतपणें बोलले खरे पण आंतून ते चांगलेच भडकले होते. दाखवायला आणलेली मुलगी या आकस्मिक प्रसंगानें घाबरून, गोंधळून गेली. तिला प्रश्नांचीं धड उत्तरेंहि देतां येईनात. पण एवढयावरच भागलें नाहीं. शारदेची ती पोर त्या लोकांच्यापुढें बसून खुळ्यागत मोठ्यानें हंसली नि म्हणाली, ‘ माझंपण लग्न करायचंय, मलापण पहा ना. ’ बघायला आलेल्यापैकीं कुणी कुचेष्टेनें हंसलें. कुणी तिच्याकडे तिरस्कारानें कपाळाला आठ्या घालून पाहिलें. शारदेचा दीर आतां चांगलाच भडकला. ‘ चल जा, नीघ आंत. मूर्ख नाहींतर. तुझ्यासारख्या वेड्या पोरीशीं लग्न करायला वेड नाहीं लागलं अजून लोकांना ’ असें म्हणून त्यानें तिला वखोट्याला धरली. शारदेला आंत या गोष्टीचा पत्ता लागल्याबरोबर ती ताडकन् उठून बाहेर आली. लाजेनें ती अर्धमेली झाली होती. मावशीकडे पाठवलेली ही पोर अचानक इथें आतां कशी टपकली तेंच तिला कळेना. ती पोर त्या खोलींतून हलायला बिलकूल तयार नव्हती. शारदेच्या हाताला तिनें झटकाहि दिला. शेवटीं शारदेनें कशीबशी ओढून तिला घरांत आणली. बघायला आलेले लोक गेल्यावर शारदेच्या दीर जावेनें घरांत एकच गदारोळ मांडला. त्या दोघांनींहि शारदेला हवेंतसें बोलून घेतलें. या स्थळाकडून आतां नक्कीच नकार येणार याबद्दल त्यांना शंका नव्हती. मंगल प्रसंगाच्या वेळीं कुरूप, अमंगल, अशुभ दर्शन घडलें होतें. चांगलें हातचें स्थळ केवळ त्या कुरूप, वेड्या पोरीमुळें गेलें या विचारानें सगळीं चिडलीं होतीं. ‘ एक दिवस कांहीं नीट सांभाळतां येत नाहीं तिला तुम्हांला ? ’ दीर जाऊ म्हणाली. पण बिचारी शारदा काय करणार ? तिनें मुद्दाम थोडीच तिला बाहेर पाठवली होती ? आधींच आपल्या मुलींतल्या व्यंगानें, कमीपणानें शारदा दुःखीकष्टी झाली होती. त्यांत आणि वर हा अपमान. दुःखावर डागण्या, मनांतल्या मनांत ती ओशाळली. स्वतःवर, त्या पोरीवर, आपल्या फुटक्या नशिबावर रागावली, चिडली, संतापली अन् त्या रागाच्या भरांत एका पट्टीनें तिनें आपल्या पोरीला फोडून काढली. ती पोर विव्हळत होती, आरडत ओरडत होती, खोलीभर थयथय नाचत होती. अन् शारदा तिच्या मागून तरशी धांवत

पळत तिला गाठून फटके देत होती. पण कुणालाहि त्या पोरीची दया येत नव्हती. सगळीं आपापल्या उद्योगांत व्यग्र होतीं. निदान तशी मग्न असल्याचा बहाणा तरी करीत होती. शेवटीं शारदा मारून मारून कंटाळली, थकली. पट्टीचे मोडून दोन तुकडे झाले तेव्हां पट्टी दूर फेकून देऊन, फतकल मारून, कपाळाला हात लावून ती बसली. शारदेचा राग मग एकदम थंड झाला. तिला त्या पोरी-बद्दल एकदम कणव वाटूं लागली. माणसासारखी माणूस पण ढोरासारखें निर्दयपणानें बडवलें तिला. बोलून चालून वेडी पोर. तिला काय कळतंय ? अन् तिला कळावें ही अपेक्षा करणेंच वेडेपणाचें नाहीं का ? समंजसपणें वागायला ती शहाणी थोडीच आहे ? छे ! आपण तिला उगीचच मारलें. रात्रीं तिच्या अंगावरचे वळ पाहून शारदेला रडू कोसळलें. तिला पोटाशीं धरून ती ढसढसा रडली. तिनें तिच्या अंगाला हळुवारपणानें तेलाचें बोट लावलें अन् ती तिला हळूहळू हलक्या हातांनीं उगीचच थोपटूं लागली.

कालच्या प्रसंगामुळें घरातलें वातावरण बरेंच तंग झालें होतें. शारदेच्या दीर-जावांची नक्की खात्री होऊन चुकली होती कीं, ह्या पोरीच्या मानगुटीवर एकादें भूत बसलंय अन् तें भूत जर काढलें गेलें नाहीं तर ही पोर भुतासारखी कायमची आपल्याच मानगुटीवर बसणार. आपल्या कार्यांत पुनः पुन्हां विघ्न आणणार. शारदेच्या अपरोक्ष घरांत या गोष्टीवर बराच खल झाला. अन् एका मांत्रिकाकडे तिला न्यायाचें ठरलें. वास्तविक मागें एक दोघा मांत्रिकांना बोलावून अंगारा, मंत्रतंत्र, धागेदोरे, गंडे, अंगावरून भाकरी ओंवाळून टाकणें इत्यादि उपचार केलेच होते. कुणी कांहीं सांगेल त्याप्रमाणें शारदा प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होती. डॉक्टरी उपायहि चालूच होते. पण कशानेंच फरक पडत नव्हता. त्याअर्थी भुतानें तिला पक्कं धरलंय असें सनुमतें ठरलें. दिरानें नवीन मांत्रिक गांठला. भूत काढण्याबद्दल त्याची ख्याति होती. त्यानें पोरीच्या अंगावरचें भूत काढून देण्याची गॅरंटी दिली. पोरीला त्याच्याकडे नेण्यांत आलें. तिच्या वडिलांचीच फक्त संमति घेण्यांत आली. भूत बोलकें करण्यासाठीं मांत्रिकानें पोरीच्या अंगावर मंतरलेलें पाणी शिंपडलें नि प्रश्न विचारायला सुरुवात केली. अमुक दिलें तर जाशील का, तमुक दिलें तर जाशील का अशा अनेक गोष्टी, कोंबडें बकरीसुद्धां देऊन, भुताची तृप्ति होऊन, तें जायला तयार आहे का-त्यानें विचारलें. पण भूत कांहीं बोलतें होईना. ‘खोड पक्कं धरलंय, मार खाल्ल्या-

शिवाय भूत मानगुटीचं हलायला तयार नाहीं दिसत. थांबा, त्याला चांगले फटके मारून घालवतो. हा मांत्रिक कांहीं कच्च्या गुरूचा चेला नाहीं म्हटलं. पहा, कसं त्याला आतां पळवून लावतो तें ' मांत्रिक म्हणाला. त्यानें त्या पोरीला एका खांबाला बांधून घातलें, नि जोरजोरानें फटके मारायला सुरुवात केली. तोंडानें एकीकडे तो म्हणतच होता, ' बोल, आतां तरी जाशील कीं नाहीं ? अमुक देतो चालता हो इथून. ' मांत्रिक फटक्यावर फटके मारीत होता अन् ती पोर कळवळून ओरडत होती, ' मारूं नका, मारूं नका ' म्हणून मोठ्यानें गळा काढून रडत होती. बांधून घातल्यामुळें रडण्या भेकण्याशिवाय विचारी कांहींच प्रतिकार करूं शकत नव्हती. तीनसांजेच्या वेळेला तिचं तें रडणें, ओरडणें मोठें भेसूर वाटत होतें. दगडालासुद्धां पाझर फुटावा असा तो सारा प्रकार होता. पण मांत्रिकाच्या तें सारें परिचयाचेंच होतें बकऱ्याला मारतांना खाटकाला त्याची दया का येणार आहे ? हें मांत्रिक म्हणजे त्या पोरीला यमदूत होता. त्याला तिच्या प्राणाची, वेदनांची काय पर्वा ? उलट तो पोरीच्या काकांना म्हणाला. ' पहा, भुताला चांगला मार बसतोय. पोलीला हा मार लागत नाहीं. तुम्ही त्याची काळजी करूं नका. आतां तें सांगेल बघा—दत्ता जातो रे, दत्ता जातो रे ! मांत्रिक मारीत होता. भूत काढीत होता. पोर ओरडत होती. फटक्यावर फटके, फटक्यावर फटके बसत होते. पण भूत ' दत्ता जातो रे ' कांहीं म्हणेना. मांत्रिक मारून मारून थकला. पोर मार खाऊन खाऊन थकली. बेशुद्ध झाल्यागत तिची मान एका बाजूला कलती पडली. अंगातून रक्त फुटलें. तेव्हां शेवटीं नाइलाजानें मांत्रिक थांबला. भूत काढण्याची त्याची आशा खुंटली.

इकडे शारदा पोरीची काळजी करीत बसली होती, मनांतून चांगलीच धास्तावली होती. पोरीच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती. पोर जिवानिशीं घरीं सुखरूप परत आली म्हणजे मिळवली. मनांतल्या मनांत ती देवाचें नांव घेत होती.

पोर घरीं आली ती विव्हळतच. मारानें तिचें हाडनहाड खिळखिळें झालें होतें. शारदेनें तिला पाहिलें मात्र, तिला एकदम भडभडूनच आलें. मनांतल्या मनांत तिनें त्या मांत्रिकाला, पोरीच्या काकांना हव्या तशा शिव्या दिल्या. तिल. वाटलें. मोठ्यानें ओरडून त्यांना विचारावें, ' काय ही माझ्या पोरीची तुम्ही दशा करून टाकलीत ! वेडं मनुष्य नि भुतानें झपाटलेलं मनुष्य यांतला साधा

फरकसुद्धां तुम्हांला कळत नाहीं का ? तुम्ही सारीं मात्र भुतासारखीं उलट तिच्या मानगुटी बसलाहांत. गुरासारखी पोरीला बडवलंत पण भूत नाहींच तर तें निघणार कुठून ? ढोरासारखं निर्दयपणानं मारणारा हा मांत्रिक होता का खाटीक होता ? का तुमच्या पोरीच्या दाखवण्यात हिनें विघ्न आणलं त्याबद्दल हा सूड तुम्ही तिच्यावर उगवलात ? ' एक चमत्यारिक विचारहि त्या क्षणीं तिच्या मनांत आला तिला वाटलें, ह्या साऱ्यांना वेड लागावें अन् त्यांना असेंच मरेमरेस्तो झोडपून काढावें. पण वाटलें खूप, तरी शारदा कांहींच करू शकत नव्हती. असहाय अगतिक ! शारदा नुसती रडूं शकत होती. तीसुद्धां फक्त रात्रींच्या एकांतांत. तिनें पोरीला एकदम कवटाळलें. मूक आसवांच्या अभिषेकानें चिंब भिजवलें. तिला गरम गरम पाण्यानें आंघोळ घालून तिचें अंग शेकलें अन् हळुवार हातानें अंगावरून तेलाचें बोट फिरविलें.

एवढा फार्स झाला तरी दोन दिवसांनीं त्या पोरीच्या तें गांवींहि नव्हतें. ती आईला विचारीत होती, ' आई माझं लग्न केव्हां करणार ग ? मालीचं तेवढं लग्न करतां मग माझं कां नाहीं करत ? ' नंतर एक कच्चकड्याचें बाळ मांडीवर घेऊन तीं म्हणाली, " माझं लग्न केलंस म्हणजे मलापण असं बाळ होईल. '

तिचें तें बोलणें ऐकून शारदा हतबुद्ध झाली. हतबल झाली. या वेड्या पोरीला एरवीं कांहीं कळत नाहीं मग हें एवढं शहाणपण कुठून आलं ? त्यानंतर त्या पोरीनें शारदेला तोच प्रश्न कितीदां तरी विचारला अन् शारदा मनांत समजून चुकली कीं, या पोरीच्या मनांत आतां लग्नाचं खूळ चांगलंच शिरलंय. पण बिचारी शारदा तरी काय करणार ? या वेड्या पोरीला ती कुठं नवरा शोधायला जाणार ? या वेड्या, कुरूप पोरीला कोण पदरांत घेणार ? जन्मभर सांभाळायची जबाबदारी कोण घेणार हें दिव्य कोण नि कसें करणार ? जाणून बुजून उरावर धोंड कोण पाडून घेणार ? हें वेडं, कुरूप लोढणं कुणाच्या गळ्यांत अडकवणार नि कसें अडकवणार ? शारदेला त्या पोरीचें लग्न होण्याची बिलकुल आशा नव्हती, तरीहि तिला वाटे कुणीतरी तिच्याशीं लग्न करावें, तिच्या जीवनाचें सार्थक व्हावं. शेवटीं तीसुद्धां एक स्त्रीच आहे नं ! मग तिला मन, स्त्रीसुलभ भावना असणारच. बुद्धि वाढली नाहीं तरी शरीर उफाड्यानें वाढलंय. मग शरीरधर्म कसा चुकणार ? त्यामुळें ती वेडी पोर जेव्हां जेव्हां शारदेला विचारी,

‘आई माझंहि लग्न करणार ना ग ?’ तेव्हां तेव्हां शारदेचें मन मायेनें, प्रेमानें, दयेनें तुडुंब भरून येई. डोळे पाण्यानें डबडबून जात. पोरीला पोटाशीं धरून ती तिची समजूत काढण्याचा कसा तसा प्रयत्न करी. म्हणे, ‘करू हं आतां माझ्या सोनीचं लवकर लग्न.”

पण दिवसानुदिवस शारदेला त्या पोरीला संभाळणें कठीण होत चाललें होतें. ही पोर लग्नाशिवाय राहणें शक्य नाहीं हें शारदा पुरेपूर समजून चुकली होती. पण या पोरीचें लग्न कसें नि कुणाशीं करून द्यायचें हें कोडें तिला उलगडत नव्हतें. ती फक्त एवढेंच जाणूं शकत होती कीं, आतां या पोरीला कधींहि, कुठेंहि एकटी दुकटी पाठवतां कामा नये. दिवसरात्र तिच्या मागें मागें आपल्याला राहिलें पाहिजे. तिचें पाऊल वांकडें पडूं नये म्हणून डोळ्यांत तेल घालून जपलें पाहिजे. नाहींतर तिच्यापेक्षांहि आपल्याच अब्रूचे धिंडवडे जास्त निघणार.

दिवसरात्र काळजी, काळजी ! शारदेजी काळजी दिवसानुदिवस भूमितिश्रेणीनें वाढत होती. काळजी करून करून शारदा खंगली होती. वयानें होती त्याच्य दुप्पट म्हातारी दिसूं लागली होती. पण काळजी करूनहि, डोळ्यांत तेल घालून त्या पोरीच्या पाळतीवर राहूनहि कांहीं उपयोग झाला नाहीं. जी गोष्ट होऊं नये म्हणून शारदा जिवाचा एकदा आटापिटा करीत होती तीच गोष्ट नेमकी घडली होती. ती कशी घडली, केव्हां घडली हेंच शारदेला कळेना. खूप विचार करकरूनहि तिला उमगेना कीं, हें कसें झालें ! पण तें झालें होतें एवढें मात्र खरें. त्या पोरीची पाळी चुकली होती. पाळीची वेळ टळली, तेव्हांच शारदेचा जीव चुळबुळ करू लागला. कांहीं भानगड तर नाहीं ना, मनानें आशंका घेतली. छे ! आपलें मनच वेडें नि शंकेखोर. चार दोन दिवस असे व्हायचेच कीं मागेंपुढें कधीं मधीं, त्यांत एवढी काळजी कशाला करायला हवी ! तिनें आपल्या मनाची समजूत घातली. खोटीच समजूत, खोटेंच समाधान. पण जें नेमकें व्हायला नको असतें तेंच होतें. शारदा रोज त्या पोरीच्या पाळीची वाट पहात होती आणि ती होत नव्हती. शारदा वाट पहात होती आणि निराश होत होती. त्या पोरीला मात्र कशाचीच काळजी नव्हती. तिच्या खातीं जणूं कांहींच घडलें नव्हतें. ती चांगली मजेंत होती. तिला जें हवें होतें तें मिळालें होतें. अब्रूची चाड तिला काय वाटणार ? तिच्या कर्माची तिला ना खंत ना काळजीकथा ! तशी करण्याइतपत तिच्याजवळ बुद्धि होतीच कुठें ? काळजी करीत होती एकटी

शारदा. अन् तें खोटं ठरतंय का याची अजूनहि निराशेनेंच कधीं कधीं वाट पहात होती. पण एक दिवस सकाळीं उठून ती बया खरोखरच ओकूं लागली तेव्हां शारदेच्या काळजानें एकदम ठावच सोडला. छातींत धडकी भरली. त्या पोरीऐवजीं शारदेचेंच अंग थरथरल्यागत झालें. डोकें गरगरायला लागलें. आंतडीं पिळवटलीं. आतां घरांत या गोष्टीची बातमी लागायला काय वेळ ? हां हां म्हणतां म्हणतां त्याचा सगळीकडे बभ्रा होणार अन् मग मात्र आपली धडगत नाहीं. खात्री होऊनहि शारदेचें वेडें मन पुन्हां खोटी आशा करू लागलें. पोरीच्या प्रेमाच्यापोटीं, लौकिकाच्या भीतीनें ती देवाला अजूनहि नवस बोलत होती. 'देवा, हें खोटं ठरलं तर सोळा सोमवार करीन.' ती देवाची करुणा भाकत होती. तळमळीनें, मनाच्या शर्थीनें देवाला विनवीत होती, कीं, देवा, हें खोटं ठरव. माझी अब्रू नको आणूं अशी चव्हाट्यावर. सोडव मला या विचित्र संकटांतून.

पण शारदेची अशी सहजासहजी सुटका व्हायची नव्हती. त्या पोरीची म्हणजे पर्यायानें तिचीच अब्रू चव्हाट्यावर यावी असाच योगायोग होता. त्या पोरीला नक्कीच दिवस गेले होते. तिचें पोटहि आतां थोडें मोठे दिसूं लागलें होतें. चेहऱ्यावर एक आगळेंच तेज आलें होतें. शारदेला आतां हें लपवून ठेवणें शक्यच नव्हतें. घरांत तिच्या जावाजावांची नि बाहेर शेजारणींचीहि आपापसांत चांगलीच कुजबुज सुरू झाली होती.

"मागच्या पाळीला खोटंच बसवलं होतं कीं काय बाईनीं त्या वेडीला दूर ?" एकजण म्हणाली.

"इश्श ! कोण जाणे बाई. असेलसुद्धां. पण मी म्हणते, कोंबडं झाकून ठेवलं म्हणून उजाडायचं रहातंय थोडंच ?" दुसरी म्हणाली.

"ह्यांच्यापायीं आपली नाचक्की होणार आतां गांवांत."

"तर काय ! तोंड बाहेर काढायला जागा नाहीं राहिली आतां. जरा कुठं बाहेर पडलं तरी लोक बोटं दाखवतील आपल्याकडे." दुसरीनें पहिलीच्या बोलण्याला दुजोरा दिला.

"बाकी आश्चर्य आहे नाहीं ? वेडीला एवढं मात्र कसं कळतंय ?"

"अहो, असल्या वेड्यांना एवढं ज्ञान चांगलं असतं."

"कुणाच्या पुढ्यांत जाऊन पडली होती कोण जाणे ! पण आयशीचं तरी

एवढं लक्ष नाहीं आपल्या पोरीवर. ती पोर काय, बोलून चालून वेडी. तिला काय आपल्या अब्रूची चाड!"

शारदेला त्यांचें तें कुजकें, घालून पाडून बोलणें, त्या पोरीकडे पाहून आपापसात फिदीफिदी हंसणें, मध्येंच शालजोडीतलें मारणें-सारें अगदीं असह्य होत होतें. तिला वाटत होतें, आपण आंधळ्या झालों असतों तर आजचा हा प्रसंग पाहायला लागला नसता. बहिऱ्या झालों असतों तर हीं कुसकीनासकीं बोलणीं ऐकूंच आलीं नसतीं. पण असें नुसतें म्हणून काय करणार? तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी तिची अवस्था झाली होती. आपलेच्च दांत, आपलेच्च ओठ-बोल तरी कुणाला लावायचा?

शारदेला घरांत रहाणें नकोसें होई पण बाहेर पडलें तरी तीच अवस्था. शेजारणी तिच्याकडे विचित्र नजरेनें पहात, आपापसांत कुजबुजत अन् कधीं कधी तसें कुणी पाहिलें नसलें, त्या सहज आपापसांत कांहीं बोलत असल्या तरी शारदेला वाटे, त्या आपल्याकडे मुद्दामच चमत्कारिक नजरेनें पाहताहेत. आपल्या विषयींच चर्चा करताहेत. मग शारदेला घरींदारीं राहणें, जाणें नकोसें होऊन जाई. तिला उगीचंच अपराध्यागत वाटे. वास्तविक यात तिचा कांहीं अपराध नसला तरी सारी बोलणीं ऐकून घेणें प्राप्तच होतें. कारण शेवटीं अपराध तिच्या पोरीचा म्हणजे पर्यायानें तिचाहि होताच नं? एकटी सासू मात्र शारदेच्या बाजूची होती. पण शारदा सासूची लाडकी आहे असें म्हणून तिच्या जावा तिचा अधिकच हेवादावा नि मत्सर करीत. तिच्याविषयीं वेडेवांकडें बोलण्याची एकहि संधि त्या फुकट दवडीत नसत.

शारदा तें सारें सहन करीत होती. मुकाट्यानें, शांतपणानें. मनांतून ती चिडत होती. रागावत होती. पण वरकरणी शांत रहात होती. आल्या प्रसंगाला तोंड देण्याचं बळ अंगात आणीत होती. कारण प्रसंग तर ठेपला होता. त्यांतून कशी का होईना सुटका करून घेणें प्राप्तच होतें. शेवटीं एक दिवस मनाचा धडा करून तिनं तं आपल्या आपल्या नवऱ्याला सांगितलें. मोठ्या आशेनें त्याच्याकडे पाहिलें की, निदान ह्या वेळीं तरी हा आपल्याला यांतून काहीं मार्ग सुचवील. आपल्या काळजीचा थोडातरी वाटा उचलील. पण शारदेचा नवरा अविचारी, तापट नि हेकट होता. तो आपल्या दुःखांत अशा वेळीं सहभागी होईल ही शारदेची कल्पना अगदीं चुकीची नि वेडेपणाची होती. हें सारें ऐकल्यावर त्यानें

त्या पोरीला चिंचेच्या फोकानें बडव बडव बडवली. तोंडानें एकीकडे तो बडबडतच होता, ' बोल कुठं गेली होतीस झक मारायला ? कुठल्या मवाल्याला गांठलंस ? बोल. ' तो मारीत होता, बडबडत होता. बडबडत होता नि मारीत होता. पोरगी आरडत ओरडत होती. सासू पुराणाला गेली होती. मग मध्यें कोण पडणार ? प्रथम शारदाहि मध्यें पडली नाहीं. ह्यावेळीं तरी निदान तो तापटपणानें वागणार नाहीं हा तिचा अंदाज चुकल्यामुळें ती गोंधळल्यासारखी झाली होती. मुलीवर कांहींशी चिडलेलीहि होती. पण मग नवऱ्याचें तें पोरीला जनावरासारखें झोडपणें तिला पहावेना. पोरीची तिला दया आली. ती वेडी झाली, कशीही झाली तरी तीहि एक मनुष्यच आहे ना ? तिलाहि भवना असणारच. वेडी म्हणून तर त्या भावनांना वासनांना आवर कसा घालवा ते तिला कळलें नाहीं. चांगली शहाणी सुरती माणसेंसुद्धां नाहीं कां चुकत कधीं कधीं ? ही तर बोलून चालून अशी अर्धवट मग नुसतें गुरासारखें असें मारून काय उपयोग ? शेवटीं ती मध्यें पडली ओढून तिनें बाजूला केली.

रात्रीं शारदेनें पोरीला कुशींत घेतलें. तिच्या पाठीवरून ती कितीतरी वेळ प्रेमानें हात फिरवीत होती हळू हळू बोलतां बोलतां तिनें तिच्याकडून सारी हकीकत काढून घेतली हें झालें कसें केव्हां नि कुणामुळें ? तिच्याच गांवातल्या बहिणीच्या मुलाचा प्रताप होता तो. नुकतेंच तारुण्यांत पाऊल टाकलेला, शिकलेला, शहाणासुर्ता, दिसण्यांत चांगला पोरगा अन् त्यानें या कुरूप, वेड्या पोरीशीं आपल्या सख्ख्या मावस बहिणीशीं असें अनीतीचें, वेकायदेशीर वर्तन करावें ! शारदेला आश्चर्याचा मोठा धक्काच बसला ती हतबुद्धच झाली. शेवटीं तिनें त्याची शहानिशा करायचें ठरवलें. या पापाचा धनी तूंच आहेस ना म्हणून तिनें एक दिवस त्याच्या घरीं जाऊन त्याला कठोरपणानें जाब विचारला. तिचा तो त्यावेळचा हावभाव, तिचे हातवारे, भेदक दृष्टि पाहून मनांतून प्रथम तो कांहींसा घाबरलाच पण चटकन् त्यानें आपल्याला सावरलें आपण त्या गांवचेंहि नाहीं असें पटवण्याचा प्रयत्न केला. उगीचच खोटा प्रयत्न. शेवटीं शारदेनें रुद्रावतार धारण केला तेव्हां हो ना करतां करतां त्यानें सारें कबूल केलें ' मग आतां पुढें काय ? ' शारदा बहिणीला म्हणाली.

" करूं दे तिच्याशींच लग्न. एकदां झक मारली मग आतां पाऊल मागें का ? ' बहीण म्हणाली.

पण लग्नाला तो बिलकुल तयार होईना त्याच्या वडिलांना तर तें एकदम नामंजूर होतें. शारदेलाहि त्याच्याबद्दल थोडी सहानुभूति वाटली तरुण कोवळा, अननुभवी पोर चुकला असेल एकाद वेळ. पण म्हणून अर्धवट पोर त्याच्या गळ्यांत बांधून त्याच्या जन्माचें नुकसान का करायचें.

शेवटी शहानिशा करूनहि विचारविनिमय करूनहि शारदेच्या पुढचा प्रश्न सुटलाच नाहीं. अशा परिस्थितींत इतर चार लोकांनीं जो मार्ग पत्करला असता तोच मार्ग तिनेंहि स्वीकारावा नि शहरांत नेऊन त्या दिव्यांतून त्या पोरीला मुक्त करावें व आपणहि सुटावें असें पोक्त नि व्यवहारी सल्ला तिच्या मोठ्या दिरानें दिला पण शारदेला त्याचें तें बोलणें मुळीसुद्धां आवडलें नाहीं, पसंत पडलें नाहीं. ' मग आतां निस्तरा तुम्हीच कसं निस्तरायचं तें ' असें म्हणून तो तिथून चालता झाला.

त्यादिवशीं शारदेच्या डोळ्यातलें पाणी खळेना. तिच्या मनांत राहून राहून सारखें एकच येत होतें, ' छे ! आज हीच आपली पोर चांगली असती तर आपण तिचें थाटामाटांत हौसेनें लग्न करून दिलें असते. पहिल्या वर्षीचे सारे सणवार केले असते. तिचें डोहाळजेवण, बाळंतपणा केवढ्या आनंदांत पार पाडलें असतें. तिच्या पहिल्या पोराचें कोण कौतुक झालें असतें घरांत ! पण आज... "

रात्रीं पोरीला पोटाशीं घेऊन शारदा ढसढसा रडली अगदीं एकाद्या लहान पोरागत अंतःकरणाच्या तळमळीनें ती देवाला विचारीत होती कीं, ' देवा, कशाला तूं या पोरीला माझ्या पोटीं जन्माला घातलीस? तिच्या नि माझ्याहि जन्माचे अब्रूचे असे धिंडवडे निघण्यासाठींच का? त्यापेक्षां ती जन्मालाच आली नसती तर ? किंवा उपजतच मेली असती तर एकवेळ वांझपणाचा डाग मला लागला असता तरी हरकत नव्हती. गेल्या जन्मीं मी असं कोणतं पाप केलं होतं परमेश्वरा कीं, त्याचं प्रायश्चित्त मला या जन्मीं मिळतंय ? काय करूं मी हा वेडाविद्रा गोळा जन्मभर जवळ बाळगून ? माझ्या जिवाचा हा घोर जन्मभर संपणारच नाहीं का ? देवा, नाहीं नाहीं आतां हें सहन होत. सोडव मला आतां या यातनांतून. जसा हा जड जीव माझ्या पदरांत टाकलास तसाच तो घेऊन जा अन् मला या जंजाळांतून कायमची मुक्त कर. देवा, देवा सोडव मला या संकटांतुन एकदांची. उद्यां माझ्या पश्चात त्या पोरीची आणखी परवड होण्यापेक्षां, आणखी विटंबना होण्यापेक्षां माझ्यादेखत तिनें डोळे मिटलेले बरे. माझ्या पाठी

मागें त्या पोरीचे हाल कुत्राहि खाणार नाहीं. त्यापेक्षां तिला आजच मरण आलेलं काय वाईट ? देवा, आतां एवढं तरी गाऱ्हाणं ऐकशील ना ? ऐकशील का देवा ?"

शारदा जिवाच्या आकांतानें देवाला विनवीत होती. त्याच्यापुढं आपलें गाऱ्हाणें मांडीत होती. तो जड गोळा घारीसारखा झडप घालून नेण्यासाठीं देवाला टाहो फोडून सांगत होती. नवस बोलत होता.

अन् शेवटीं एकदाचें शारदेचें गाऱ्हाणें देवानें ऐकलें. तो तिच्या नवसाला पावला. तिच्यावर प्रसन्न झाला. शारदेची ती वेडीविद्री पोर शारदेच्या मागण्या-प्रमाणें तिच्याच बाळंतपणांत त्यानें अलगद उचलून नेली. शारदेच्या मागचा जन्माचा घोर नाहींसा केला. ती पूर्ण मोकळी झाली. तिचें कोंडवाड्यांतलें जीवन संपुष्टांत आलें. ती केव्हांहि कुठेंहि जायला, कांहींहि करायला स्वतंत्र झाली.

बाहेर त्या पोरीच्या अंत्ययात्रेची तयारी चालू होती. तें मृत शरीर उचला-यला चार लोक आंत आले, शारदेनें त्या पोरीला नेण्यासाठीं देवाला टाहो फोडून बोलावलें होतें. नि त्याप्रमाणें देव धावून आला होता पण शारदेला आतां तें दृश्य बघवेना. तिच्या पोटांत एकाएकी पोकळी निर्माण झाली. आपल्या काळजाचा भला मोठा लचका कुणी तोडून नेत असल्याचा तिला भास झाला. पोरीला एकदम मिठा मारून तिनें हंबरडा फोडला. पोरीच्या छातीवर डोकें टेकून ती तिला विचारीत होती, ' शेवटीं तूं माझ्याआधीं गेलीस ? मला एकटीला इथं सोडून निघून गेलीस ? तूं गेलीस आतां मला आई म्हणून कोण हांक मारणार ?" ती तरातरा देवघरांत गेली अन् जिवाच्या आकांतानें देवाला म्हणाली, " देवा, माझी एकुलती एक पोरं, माझ्या हाडामासाचा गोळा तूं उचलून नेलास. एवढा कसा निष्ठूर झालास ? देवा, आतांपर्यंत मी थोडे का नवस केले ? तेव्हां तुझ्या या पाषाणमूर्तीला पाझर फुटला नाहीं ? मग आतांच त्या पाषाणमूर्तीला कसा पाझर फुटला ? का पाझर फुटला ? बोल, देवा, बोल ह्यावेळीं तूं माझ्या नवसाला का पावलास ? सांग देवा, का नि कसा पावलास नेमका ह्याचवेळीं ?"

देवापुढं वाकून तिनें दाणकन् डोकें आपटलें नि ती खालीं कोसळली.

■ ■

■ ७ ■

# तो आणि मी

साहेबानं पाठवलेला माझ्या नवीन अपॉइन्टमेंन्टच्या ऑर्डरचा कागद प्यूननं माझ्या हातांत दिला आणि सांगितलं, "सायबानी तुमास्नी भेटाया बोलीवलं हाय."

कागदावरून मी भिरभिरती नजर फिरवली. मग तो नजरेंत खुपसला. पण डोळ्यांवर विश्वासच बसेना. मी मनस्वीं गोंधळलों. आळीपाळीतं प्यूनकडे नि त्या कागदाकडे पहात राहिलों.

"येताय न्हवं ?" माझ्या त्या विचित्र वागणुकीचं प्यूनच्या डोळ्यांत आश्चर्य दाटलेलं.

त्यानं पुन्हा विचारलेल्या प्रश्नानं मी तंद्रींतून खाडकन् बाहेर आलों.

"हो. आलोंच हं ..." म्हणत मी फायली नीट बांधून ठेवल्या नि निघालों.

रांगणेकराच्या जागीं माझी अपॉइन्टमेन्ट ? हें घडलं तरी कसं ? कां ? केव्हां ? विचारांच्या धांवणाऱ्या मुंग्या एखदम भुरुभुरु भूतकाळांत पळाल्या.

दोन एक महिन्यापूर्वीची गोष्ट. आमच्या ऑफिसांतल्या एका डिपार्टमेंटच्या गॅदरिंगच्या दिवशीं रांगणेकर मला भेटला. भेटला म्हणण्यापेक्षां दिसला. कारण आम्हीं दोघं एकमेकांशीं एकहि शब्द बोललों नाहीं.

मी आणि सुशीला–माझी बायको–थिएटरकडे चाललों होतों. मागनं गाडीच

आवाज आला. मी सहज वळून पाहिलं. रांगणेकर थिएटरशीं गाडी पार्क करीत होता. पुढच्या सीटवरून प्रथम त्याची बायको खालीं उतरली. तिनं आजूबाजूला नजर टाकली. गाडीवाल्यांच्या नेहमींच्या पद्धतीनं, रुबाबानं. मग रांगणेकर खालीं उतरला. गाडीचं दार त्यानं लॉक केलं. आपल्या बायकोप्रमाणेंच चौफेर नजर भिरभिरवून गाडींतून उतरतांना आपल्याकडे कुणाकुणाचं लक्ष आहे, हें अजमावलं. मग किल्ल्या हलवीत हलवीत, हंसत खिदळत तीं दोघं पुढं निघालीं.

सुशीलेच्या सूक्ष्म, तीक्ष्ण दृष्टींतून त्यांची हालचाल निसटली नाहीं. गाडी-वाल्यांच्याकडे पायीं चालणारे ज्या आधाशीपणानें, अस्वस्थपणानें, थोड्या मत्सरानें पहातात, तशी ती रांगणेकरकडे पहातेय · असं मला वाटलं. मग एकदम माझ्याकडे वळून ती म्हणाली, " अय्या ! अहो, रांगणेकर ! पाहिलं नाहीं वाटतं तुम्ही त्यांना ? आतां उतरले गाडीतून न पुढं गेले. "

मी गप्पच. तिचं बोलणं ऐकूनहि न ऐकल्यासारखा. " अहो, अहो ते पाहा, रांगणेकरच चाललेत पुढं. बायकोसुद्धां आहे बरोबर ... "

रांगणेकरच्या अस्तित्वाची मला जाणीव देण्याचा सुशीलेचा प्रयत्न पुन्हा एकदा.

माझा फक्त हुंकार.

" इश्श ! त्यांचंसुद्धां लक्ष नाहीं वाटतं ? त्यांच्या बायकोनं माझ्याकडे पहिल्यासारखें वाटलं, म्हणून मी हसलेंसुद्धां. पण ती कांहीं हसली नाहीं. कमाल आहे बाई ! त्यांनीं गाडी पार्क केली तेव्हा आठ-दहा फूट अंतरावर तर होतों आपण त्यांच्यापुढें. अन एवढं का दिसलं नसेल ? खुश्शाल निघून गेली आपली ओळख नसल्यासारखी. "

" नसतील दिसलों कदाचित्. एवढं मोठं कम्पाऊंड. त्यांत येणाऱ्या जाणाऱ्यांची कोण गर्दी. नाहीं जात एकादे वेळ माणसाचं लक्ष. " तिचं लटकं समाधान करण्याचा माझा प्रयत्न

" पण काय हो, गाडी केव्हां घेतली रांगणेकरांनीं ? "

" झाले असतील पांच सात महिने. आतां साधासुधा हेडक्लार्क नाहीं तो नुसता, आमच्यासारखा. ऑफिसर आहे ऑफिसर. ऑफिसतर्फे फोन, गाडीचा अलाऊन्स, सगळं कांहीं मिळालंय त्याला आणखी कांहीं दिवसांनीं क्वार्टर्सहि मिळणार आहेत म्हणे. "

" तरीच स्वारी तोऱ्यांत आहे एवढी. बायकोच्यासुद्धां राहणींत, बोलण्या-चालण्यांत केवढा फरक पडलाय या एका वर्षांत. बाकी गाडीवाले आहेत म्हणा आतां ते. तेव्हां असा फरक नाहीं पडला तरच नवल. त्यांतून लायकी नसतांना अप्राप्य वस्तु हातीं आली अचानक, मग काय! चढतोच असा ताठा माणसाला. "

" हंऽऽऽ! "...माझा पुन्हां एक हुंकार. हलकासा निःश्वासहि.

" पण काय हो, कसा मिळाला हा चान्स त्यांना ? तुम्हांला तर किती ज्युनियर होते ते. "

" ज्यानं त्यानं नशिबानं घ्यावं आपल्या " माझा अलीकडे बनलेला दैववादी दृष्टिकोन.

रांगणेकरला पाहिल्यावर मी मुद्दामच मागं रेंगाळलों. तो सपाट्यानं पुढं गेला. तरीहि त्याच्यापासून एका ठराविक अंतरावर मी चालत होतों.

तो थिएटरच्या गेटशीं आला. इतक्यांत दोन तीन व्हालंटीअर्स एकदम पुढें आले धांवपळ करीत ... " अरे साहेब आले. साहेब आले ... " त्यांची आपापसांत कुजबुज.

रांगणेकरच्या पुढें पुढें करण्यांत त्यांची जणू अहमहमिका लागली होती... " या, या साहेब. इकडे या नं "...त्यांच्या स्वरांत मनस्वी आदब होती.

हालमधल्या अगदीं पुढच्या रांगेत अध्यक्षांच्या शेजारीं त्यांनीं त्याला बसवलं.

आम्ही दोघेहि इथें आमंत्रितच होतों, आमच्यामधें असलेल्या लेखनगुणा-मुळें. पण रांगणेकर इथें आला होता, या सेक्शनचा मुख्य अधिकारी म्हणून. या डिपार्टमेंटचा तो जणू दुसरा संस्थानिकच. त्याची बायको एका बड्या ऑफिसरची बायको म्हणून. त्यांचं इथलं स्थान, इथली भूमिका निराळीच होती. मग त्यांचा तैनातींत कसूर कशी होणार ? त्याला नि मला इथें सारखी वागणूक कशी मिळणार ? अर्थात्च व्हॉलंटीअरनं आम्हाला रांगणेकर व मी याच्यामधें एक रांग सोडून तिसऱ्या रांगेत बसवलं रांगणेकराच्या नेमक्या मागेंच आमच्या खुर्च्या होत्या. माझी खात्री आहे, रांगणेकरनं आम्हाला आंत शिरतांना नक्की पाहिलं असलं पाहिजे. निदान मधें त्या दोघांनीं दोनचार वेळा सहज मागं वळून पाहिलं, तेव्हा तर नक्कीच पाहिलं होतं. त्याच्या दृष्टींतून निसटण्याइतके

फिरकोळ आम्हीं खासच नाहीं. याचा स्पष्ट अर्थ असाच–त्यांनीं आमच्याकडे पाहूनहि न पाहिल्यासारखं केलं. दोघेहि मोठ्या झोकांत कोचावर रेलून बसलीं. आजूबाजूच्या खुर्च्यांतील इतर लोकांच्याकडे पाहून रांगणेकर माफक हंसला. त्याची बायकोहि दांत दिसू न देण्याइतपत हसली. कुणी तरी एका व्हॉलंटीअरनं त्यांची ओळख करून दिली. किंचित् उजव्या बाजूला कलून त्यानं त्यांच्याशीं हस्तांदोलन केलंन्. त्याच्या बायकोनं अध्यक्षांना व त्यांच्या मिसेस्ना स्टायलिश नमस्कार केला. मग त्या चौघांच्यात थोडं विनोदी भाषणहि झालें असावं. त्यांच्या हसण्यावरून, चेहऱ्यावरच्या भावावरून मी तें ताडलं. बसल्या जागेवरूनच मला हें सारं दिसलं. काळजांत कळ उमटली. मन चिंबलं. त्या चिंबलेल्या, पिचक्या मनानंच मी पुढचा कार्यक्रम पहात होतों.

आज व्हरायटी एन्टरटेनमेंटचा कार्यक्रम होता. फिल्मी संगीत संपलं. गुजराती एकांकिका सुरू झाली. गाणं मी ऐकलं होतं. नाटक मी पहात होतों. पण खरं म्हटलं, तर गाण्यांचे स्वर, संवादांतले शब्द माझ्या कानांवर पडत होते, माणसं माझ्या डोळ्यांपुढून हलत होतीं इतकंच. पात्रांच्या हालचालींवर माझी दृष्टि स्थिर होत नव्हती. डोळे चांगले असूनहि मोतीबिंदू झालेल्या माणसासारखं मला सगळं अस्पष्ट, सारवल्यासारखं दिसत होतं. कान चांगले असूनहि बहिऱ्या माणसागत अवस्था झाली होती. माझे डोळे टिपत होते रांगणेकरची प्रत्येक हालचाल. कान लागले होते तो अध्यक्षांशीं बोलत असलेल्या शब्दांकडे. पण माझं सगळं लक्ष रांगणेकरकडेच कां खेचलं जावं ? त्याच्याच विचाराभोंवतीं माझ्या मनानं गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या कां कराव्या ? कां ? कां ? कां ?

तसं म्हटलं, तर रांगणेकर असा कोण मोठा दुढ्ढाचार्य लागून राहिला होता ? गेल्या दोन वर्षांपूर्वी तर तो माझ्यासारखा आमच्या ऑफिसमध्यें हेडक्लार्क होता. माझ्या पलीकडच्याच टेबलावर सकाळीं साडे दहापासून संध्याकाळीं साडे-सात आठपर्यंत मान मोडेस्तोंवर काम करीत होता. त्याच्याआधीं तर माझ्याच हाताखालीं क्लार्क होता. ऑफीस सुटल्यावर दोनदोन तास लेट बसून आम्ही दोघं उरलेल्या फाइल्स पूर्ण करीत होतों. आतांपर्यंत तो पुष्कळ वेळा माझ्या घरीं आला होता. मी त्याला चहाबरोबर चमचमीत खाणंहि दिलं होतं. दोनचार वेळां माझ्या पंक्तीला बसून तो जेवलाहि होता. रोज संध्याकाळीं आम्हीं दोघंहि

सात पन्नासच्या फास्ट लोकलनं बरोबरच घरीं येत होतों. अन् तोच रांगणेकर आज मला नुसती ओळखहि दाखवीत नव्हता.

पण तेंहि खरंच. त्यानं अशी ओळख कां दाखवावी? एका ऑर्डिनरी क्लार्कशीं (मग हेडक्लार्क झाला म्हणून काय झालं? शेवटीं तो क्लार्कच ना?) त्यानं कसं हसावं? बोलावं? तो आता मोठा ऑफिसर झालाय. तो कसा ऑफिसर झालाय, हें त्याला ठाऊक आहे, मलाहि. अन् आमच्या सेक्शन-मधल्या मूठभर लोकांनाहि, पण म्हणून काय झालं? शेवटीं तो ऑफिसर आहे, हें तर नक्कीच.

कार्यक्रम पहाण्यांत सुशीला मनस्वीं रंगून गेली होती. मधून मधून ती मला कांहीं प्रश्न विचारीत होती. मी उडवाउडवीचीं उत्तरं देत होतों. शेवटीं तिच्या चाणाक्षपणानं मला पकडलंच.

"मला वाटतं, तुमचं लक्ष नाहीं या कार्यक्रमांत. बरं वाटत नाहीं कीं काय?" सहानुभूतीच्या स्वरांत तिनं विचारनं.

"छे ग! बरं वाटतंय कीं." मी पुन्हा उडावीउडवी केली.

ऑफिसमधल्या गोष्टीबद्दल मी तिला नेहमींच अज्ञानांत ठेवतों.

रांगणेकर माझ्याकडे यायचा बंद झाला, तेव्हां एकदोनदां ती मला म्हणाली होती, "काय हो, हल्लीं रांगणेकर अगदीं फिरकत नाहींत ते इकडे?"

"त्याची बदली झालीय दुसऱ्या डिपार्टमेंटमध्यें. मग कशाला येईल? एकाच डिपार्टमेंटमधें होतों मागें, त्यामुळें साहजिकच होत होतं येणं जाणं, ऑफिसच्या कामाच्या निमित्तानं."

ती मग जास्त खोलांत शिरली नाहीं त्याबाबतींत.

पुन्हां एकदां तिनं मला कांहीं विचारलं. पण मी आपला गप्पच. तोंडाला गमची पट्टी लावल्यागत.

"आज तुमचं कां लक्ष नाहीं कार्यक्रमाकडे, तें कळलं मला. तुमचं सगळं लक्ष लागलंय रांगणेकरांच्याकडे."

"छट्! भलतंच कांहीं तरी. रांगणेकरकडे लक्ष जायचं काय कारण? त्याच्यांत काय पहायचंय आतां नवीन।"

ती कांहींच बोलली नाहीं. पण कां कोण जाणे, तिचीहि दृष्टि तिकडेच जायला लागली, तिच्या नकळत.

" रांगणेकरांची बायको अध्यक्षांच्या बायकोशीं मारे जोरांत गप्पाटप्पा करतेय जशी कित्येक दिवसांची दाट ओळख आहे यांची... " ती माझ्या कानाशीं कुजबुजली.

" तशी घसट नसली तरी आतां पातळी जवळजवळ एकच आहे दोघींची. "

" आहे ठाऊक ! एकाद्या विषयावर बोलायलासुद्धां येत नाहीं धड आणि शिक्षण काय ! जेमतेम चार यत्ता... " तिच्या स्वरांत थोडा फणकारा, थोडा उपहास.

" मग रांगणेकर काय मोठा शिकलाय ? ग्रॅज्युएट झाला तो सुद्धां पंढरीच्या वाऱ्या करीत करीत नि तरीहि वशिल्यानंच. पण असतो कसा रुबाबांत ! "

" तेंच नवल वाटतं मला. येत नाहीं कांहीं नि आव मात्र आणतात आय. सी. एस. चा. दोन वर्षांपूर्वी बायको तर नुसती ध्यान दिसत होती ध्यान. आतांच पाहातेंय मी हा थाट. "

" तेंच महत्त्वाचं आहे, सुशीला. तेंच महत्त्वाचं आहे. एवढंसं अंगीं असलं, तर हें मोठं करून दाखवण्याची कला अंगीं असणंच फार आवश्यक आहे आजच्या काळांत. "

नाटिका संपली, टाळ्यांचा कडकडाट झाला. अध्यक्षांचं भाषण होणार असल्याची आंतून अनाउन्समेंट झाली. अध्यक्ष व अध्यक्षीणबाईंना स्टेजवर बोलावून नेण्यांत आलें. पुन्हां आंतून अनाउन्समेंट झाली..." मिस्टर रांगणेकर वॉंटेड ऑन द स्टेज "...पाठोपाठ दोन तीन व्हालंटीअर्स धांवतच रांगणेकर-जवळ आले. रांगणेकर त्यांचा बॉस होता. त्यानं आपल्याशीं चार शब्द बोलावेत, म्हणून तर त्यांची ही धडपड. त्यानं त्यांचा मोठेपणा सिद्ध होणार होता. आपल्या आदबशीर वागणुकीनं त्यांनीं रांगणेकरला व त्याच्या बायकोला खूष करून टाकलं. ( पुढं मागं रांगणेकरचा शेरा त्यांना उपयोगी पडण्याची दाट शक्यता होती. ) आपल्या अधिकाराची जाणीव त्यांना आहे, हें पाहून रांगणेकर सुखावला. आपल्या नवऱ्याच्या मानमरातबाच्या जाणिवेनं स्त्रीसुलभ स्वभावानुसार त्याची बायको तर हवेंत पन्नास फूट उंच तरंगतच राहिली.

रांगणेकरला व त्याच्या बायकोलाहि स्टेजवर अध्यक्षांच्या अगदीं शेजारीं बसवण्यांत आलं. मी तें पाहिलं. काळजांत पुन्हा कळ उठली. वास्तविक आज त्या खुर्चीवर मी बसायचा आणि माझ्या शेजारीं सुशीला. माझा रास्त हक्क

होता तो. पण रांगणेकरनं तो हिसकावून घेतला होता.

अध्यक्षांची ओळख करून देण्याचं काम रांगणेकरकडे होतं. पण त्याला भाषणाची संवय होतीच कुठें? त् त् प प करीत जेमतेम चार शब्दांत 'अध्यक्ष व आपण यामधें मी जास्त वेळ राहूं इच्छित नाहीं,' असं म्हणून त्यानं चटावर श्राद्ध उरकलं. मी अनेक वेळा सभेंत छान भाषणं केलीं होतीं. आज हें काम माझ्याकडे असतं तर...माझ्या मनाला तेवढ्यांतहि हा विचार चाटून गेल्याशिवाय राहिला नाहीं. भाषण संपलं: अध्यक्षांच्याबरोबर रांगणेकरला व त्याच्या बायकोलाहि पुष्पगुच्छ देऊन डिपार्टमेंटनं त्यांचा सन्मान केला. नंतर खान्याच्या वेळींहि त्यांना अध्यक्षांच्या खुर्चीला खुर्ची लावून बसवण्यांत आलं. आम्हालाहि तिथं आग्रहानं बोलावून नेलं होतं. पण रांगणेकरपेक्षां माझं स्थान केव्हांहि निराळं नि कमी महत्त्वाचं होतं. खान्याच्या वेळींहि आमचं दोघांचंहि लक्ष नकळत का होईना, रांगणेकरकडेच लागलं होतं. अगदीं कोपऱ्यातल्या खुर्च्यांवर बसून जेमतेम कॉफी घेऊन आम्ही उठलों.

शेवटीं ही डोकेदुखी वाढूं नये, म्हणून इन्टरव्हल संपल्याबरोबर आम्ही तिथून काढता पाय घेतला.

रस्त्यानं येताना मी गप्पच होतों. तोंडांत मिठाची गुळणी धरल्यासारखा. कार्यक्रमावर भाष्य करण्याच्या मूडमध्यें मी नव्हतों. सुशीलेशीं काय बोलावं, सुचत नव्हतं. रांगणेकराचा विषय मी टाळत होतो अन् दुसऱ्या विषयावर मला बोलता येत नव्हतं. माझ्या डोळ्यापुढें होता आज फक्त रांगणेकरच. त्याचं तिथलं हसणं, बोलणं, चालणं, वागणं, बसणं,...जणू सगळं रांगणेकरमय झालं होतं.

रांगणेकरला ही पोस्ट मिळाली तेव्हांचा प्रसंग...

ऑफिसमध्यें त्या दिवशीं सगळ्यांच्या तोंडीं आपला हाच एक विषय. शेजारच्या टेबलावरचा हेडक्लार्क मला म्हणाला, "काय भागवत तुम्हाला कळलं का ती पोस्ट रांगणेकरांना मिळाली?"

"अय्या ऽऽ! होऽऽऽ?..." शेजारची टायपिस्ट 'अय्या हो' या शब्दांना हेलकावे देत म्हणाली, "खरंच ती पोस्ट रांगणेकरांना मिळाली? का आपली तुम्ही चेष्टा करताय भागवतांची?"

"अशी भलती चेष्टा कशी करीन? ऑर्डर ह तांत सुद्धां आली त्यांच्या."

" इश्श ! खरं म्हणजे त्या पोस्टवर भागवतांचा क्लेम होता नाहीं का हो ? सीनिऑरिटीप्रमाणें सुद्धां भागवतांनाच मिळायला हवी होती ती पोस्ट–शिवाय ते क्वॉलिफाइडसुद्धां आहेत. "

" काय केलं हो रांगणेकरांनीं ? कशी मिळाली ही पोस्ट त्यांना ? "

" काय करायचं कप्पाळ ! आज कित्येक दिवस त्याची या जागेसाठीं धडपड चालली होती. कितीजणांचा वशिला लावलान्, तें मला विचारा. दोघांतिघांना डावलून उगीच नाहीं एवढी पोस्ट मिळाली वरिष्ठांचे हात ओले केल्याशिवाय " मी हें सारं बोल्लों, पण स्वगत.

" च्र् च् च् च् ! केवढा मोठा चान्स हुकला भागवतांचा. आतां मला वाटतं, यापुढें चान्स नाहीं त्यांना वर येण्याचा या सर्व्हिसमधें. " चारपांच टेबलं सोडून बसलेला एक क्लार्क हळहळला.

मी गप्प होतों. माना खालीं घालून कामांत मग्न असल्याचा बहाणा करीत होतो. नंतर उठून पलीकडच्या रूमकडे निघालो, चीफक्लार्ककडे कांहीं कामासाठीं दाराशीं गेलों. तिथेंच थबकलों. इथेंहि तीच चर्चा रंगली होती. पेनं विश्रांती घेत होती. भटाकडून मागावलेला चहा आला होता. कुणी पानतंबाखूचे तोबरे भरले होते.

आडून बोलणं ऐकणं फार वाईट, हें ठाऊक असूनहि मी दाराशींच उभा राहून भिंतीला कान लावले. विषय माझ्या जिव्हाळ्याचा होता. माझ्याविषयीचं खरंखुरं मत अजमवण्याची हीच एक नामी संधी होती.

" मला वाटलंच होतं, रांगणेकराला ही पोस्ट मिळणार. माझं भविष्य खोटं ठरणं अशक्य नाही. गुरू फार भाग्यशाली आहे सध्यां त्याचा. नि तो आतां नेमका ...... "

" इश्य ! भविष्य आधीं वर्तवायचं असतं, ढेकणे. पोस्ट मिळाल्याची ऑर्डर हातांत आल्यावर नव्हे " मिस रेळे आपली एकुलती एक कुरळी बट कुरवाळीत म्हणाली.

" अय्या ! तर काय ! "—आणखी एक किनरा आवाज, अठरा वीस वर्षांच्या पोरीचा.

" बाकी कांहीं म्हणा,रांगणेकर इज ए लकी गाय "...अमेरिकन कादंबऱ्या वाचणारा एक क्लार्क म्हणाला.

" तसं का म्हणतां ? रांगणेकर खरंच गुणी आहेत. त्याचं वागणं, बोलणं, चालणं सगळंच कसं रुबाबदार. "

" मग काय ! उगीच नाहीं इम्प्रेशन मारलंन साहेबावर. "

" याला म्हणतात हुशारी. हां हां म्हणतां म्हणतां सुपरसीड केलंन चार जणांना. "

" पण बिचाऱ्या भागवतांची सीनिऑरिटी होती, त्याचं काय ? फुकट गेलं त्याचं सगळं रेकॉर्ड. "

" फुक्कट काय फुक्कट ! तोंडावरची माशीसुद्धां हलणार नाहीं असा हा भागवत. नुसतं मान मोडेपर्यंत काम करून का भागतं ? सीनिऑरिटी नि ऑनेस्टी हे शब्द शाळेंतल्या बोर्डावरच वाचायचे असतात. व्यवहारांत त्याना किंमत शून्य. हा भागवत आपल्या हाताखालच्या क्लार्कलोकांचीं कामसुद्धां स्वतःच करीत बसतो लेट बसून. "

" पण भागवत सिलेक्ट नाहीं झाला नं इंटरव्ह्यूत ? "

" अहो कसले आलेत इंटरव्ह्यू ! फार्स होता तो एक लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकायला- इंटरव्ह्यूमधें प्रश्न काय तर म्हणे आजच्या पेपरमधली ताजी बातमी काय ... चारजण होते इंटरव्ह्यूला. भागवत. बी. ए. बी. कॉम, एलएल. बी. दुसरे दोघे डबल ग्रॅज्युएट नि रांगणेकर ग्रॅज्युएट. एवढ्या क्वॉलिफाइड लोकांना असले प्रश्न विचारायचे ? धडधडीत अपमानच कीं हा त्यांचा. पण जाब विचारायचा कुणाला ? रांगणेकराचा सगळीकडेच दांडगा वशिला. त्याला ही जागा द्यायची हें ठरलेलंच होतं आधींपासून. इतरांना बिचाऱ्यांना काय ठाऊक आंत काय शिजतंय तें, म्हणून गेले इंटरव्ह्यूला. "

" पण तें कांहींहि असो. गट्स पाहिजेत अंगांत, हें नक्कीच. रांगणेकराच्या अंगांत गट्स आहेत, हें कुणीहि कबूल करील. "

" खरंच गट्स पाहिजेत " – मी स्वतःशींच पुटपुटलो. असा वशिला लावणं जन्मांत जमायचं नाहीं आपल्याला. यालाच गट्स म्हणायचं असेल तर ते नाहींत खरे आपल्या अंगांत.

" कसले गट्स घेऊन बसलांत प्रधान ? आपलं ऑफिस म्हणजे वरच्या लोकांना चरायला मिळालेलं कुरण आहे कुरण. बॉसला चारलंत, कीं झालंच तुमचं काम. मग सिनीऑरिटी, ऑनेस्टी, शिक्षण सगळं फुकट आहे इथें – "

मेहेंदळे तळमळीनं म्हणाला. त्यालाहि कुठें तरी असाच फटका बसला असावा. या सेक्शनमधें तो नवीनच बदलून आला.

कामाकरतां मी या रूममधें जायला निघालों होतों, तें तसंच राहून गेलं. हातांतल्या फाइल्स् मी नुसत्याच चाळवत राहिलों. काम न करतांच परत येऊन आपल्या जागेवर बसलों.

इतक्यांत रांगणेकरची स्वारी हसत हसत आमच्या ऑफिसमधें शिरली. सगळ्यांचीं तोंडं एकदम बंद झालीं. त्याच्या पुढ्यांतल्या दोन चार जणांनीं पटकन् पुढे होऊन त्याला 'कांग्रॅटस' म्हटलं. मग सगळ्यांनीं पार्टीसाठीं एकच गदारोळ मांडला. – " अरे पार्टी पार्टी काय करतां ! जरूर देऊं. म्हणाल तेव्हां नि म्हणाल तिथें. मग झालं. " रांगणेकरच्या स्वरांत घमेंड होती. पैशाबद्दल वेफिकीरी होती. पार्टी देणं हा जणूं त्याच्या हातचा मळ होता.

रांगणेकर इथें येऊनहि आपणाहून माझ्याशीं बोलला नाहीं. माझ्याकडे त्यानं पाहिलं कीं नाहीं देव जाणें. कदाचित् पाहिलं असेल, कदाचित् नसेलहि. माझी खात्री होती. तो माझ्याशीं कां बोलला नाहीं ? कदाचित् त्याला लाज वाटली असावी. कदाचित् घमेंडहि. पण मला मात्र त्याच्या करणीची चीड आली होती. त्याच्याशीं आपणहून एक शब्द तरी बोलावा, अशी मला इच्छाच झाली नाहीं. शिवाय अंगांत योग्य ते गुण असूनहि मी पराजित झालों होतो, याचीहि मला खंत वाटत होती.

त्याच्या पूर्वीच्या सहकाऱ्यांशी तो कांहीं तरी कुजबुजला. सगळेच हसले. ते बहुतेक माझ्याचसंबंधी असावं. कदाचित् माझी ती शंका खोटी असेल. पण मला ते जाणूनबुजून खिजवताहेत, असं मला वाटलं, एवढ मात्र खरं. रांगणेकर आज इथें आला, तोहि मुद्दाम दिमाख दाखवण्यासाठीं, मला खिजवण्यासाठीं, असंच माझ्या मनानं घेतलं. कारण मागची आमच्यावरची पोस्ट मिळाल्यापासून तो इकडे फिरकलाहि नव्हता.

वावटळीसारखा रांगणेकर आला नि निघूनहि गेला. पण माझं मन मात्र मागच्या स्मृतींनीं चांगलंच चाळवलं.

रांगणेकर अन् मी एकाच वर्षी एकाच कॉलेजांत दाखल झालो. एक निव्वळ योगायोग. आमची पहिली सलामी झाली ती तिथें. रांगणेकर बुद्धीचा तसा

वेताचाच. पहिल्या वर्षी जेमतेम पास झाला. दुसऱ्या वर्षाला गोता खाल्लान्. मी कॉलेजमधें पहिला आलों. माझा खूप उदो उदो झाला. नापासाचा शिक्का बसल्यामुळें रांगणेकर चांगलाच नर्व्हस झाला. मलाहि फार वाईट वाटलं. कारण गेलीं दोन वर्षं आम्ही एकाच वर्गात होतो. दादरहून एकाच गाडीनं कॉलेजला जात होतों. आमची घट्ट मैत्री नसली तरी सहवासानं आपुलकी, थोडं प्रेम निर्माण झालं होतं.

कॉलेज सुरू झालं. रांगणेकरच्या टर्म्स भरलेल्या असल्यामुळें तो रेग्युलर येत नव्हता. पण एक दिवस कांहीं कामानिमित्त आला. आम्ही दोघं नेमके एकाच गाडीनं आलों. कॉरिडॉरमधें पोरांचं मोठं टोळकंच्या टोळकं उभं होतं. आम्हाला पहातांच त्यातली कांहीं खट्याळ कार्टी आपापसांत कुजबुजलीं—रांगणेकर भागवताची बरोबरी करूं पहातोय. गाडीचं स्पीड जमतं बरोबर. पण अभ्यासाचं नाहीं जमत. कुठें भागवत नि कुठें रांगणेकर ! भागवतची गाडी हिरवा बावटा दाखवून पंजाब मेलच्या थाटांत गेली सुद्धां निघून. याची गाडी बसलीय अजून शंटिंग करीतच."

रांगणेकरच्या तें कानावर पडलं ... आधींच दुखावलेलं त्याचं मन मत्सरानं पेटलं असावं. वास्तविक असल्या बोचऱ्या चेष्टेनं त्यांनीं रांगणेकरच्या मनावर ओरखडला ओढायला नको होता. त्यामुळेंच पुढें एवढं मोठं महाभारत झालं. पण बोलून चालून कॉलेजचीं पोरं तीं. मला स्वतःलासुद्धां तसली कुचेष्टा आवडली नाहीं. पण मी त्याच्या तोंडाला हात कसा धरणार ? मी स्वतः रांगणेकरला कधीं कमी लेखलं नाही. तसं नुसतं दर्शवलंहि नाहीं. त्यानं माझा मत्सर करावा, असं माझ्या हातून कधींच कांहींहि घडलं नाहीं. पण कोण कुणाचा कसा नि केव्हां द्वेष करूं लागेल, याचा नेम नसतो. रांगणेकर त्या पोरांच्या वाक्यानंच पेटला, अशी माझी तरी निदान खात्री आहे. कारण तेव्हांपासून त्याच्या वागण्यांत फरक पडला. कुत्र्याला जसं 'छू' करून एखाद्याच्या अंगावर सोडावं, तसा रांगणेकर त्या वाक्यानं माझ्यावर सुटला आणि मला चावा घेण्याचा प्रयत्न करूं लागला. कॉलेजमध्यें त्यानं माझ्याविरुद्ध अफवा उठवायला सुरुवात केली. तो मुद्दाम रेग्युलर कॉलेजमध्यें येऊं लागला. म. वा. मंडळाचा सेक्रेटरी झाला. इतरहि ॲक्टिव्हिटीजमध्यें भाग घेऊं लागला, या निमित्तानं त्याच्या बऱ्याच प्रोफेसरांशीं ओळखी झाल्या होत्या. त्या सर्वांचं माझ्याबद्दल वाईट मत करून

देण्याची संधि मिळेल तेंव्हां तेंव्हां घेण्याचा सपाटा चालवला. माझ्या कानांवर हें येत होतं. पण जाणूनबुजून मी तिकडे दुर्लक्ष करीत होतो. कावळ्याच्या शापानं गाय मरत नाहीं, असं म्हणून स्वस्थ होतो. पण जसजसा मी स्थितप्रज्ञ राहण्याचं ठरवत होतों, तसतसा रांगणेकरला जास्त जास्तच चेव चढत चालला होता. कॉलेजमध्यें माझ्यापेक्षां आपलं महत्त्व येनकेन प्रकारेण प्रस्थापित करण्याचा त्यानं चंग बांधला होता. इन्टरला दुसऱ्या वर्षी त्याचे पेपर्स चांगले गेले नाहींत तेंव्हां त्यानं सरळ सरळ वशिला लावला. अन् बी. ए. ला तर त्यानं आधींच चक्क वशिला लावून ठेवला होता. असं सगळीं म्हणत आणि तें खरं असलं पाहिजे. कारण वशिलेबाजी त्याच्या कणान् कणांत भिनलीय, याचं प्रत्यंतर पुढं मला आलंच. वरिष्ठांशी सिक्रास बोलायचं, त्यांच्या पुढें पुढें करायचं; मोठमोठ्या लोकांशी मुद्दाम ओळखी करायच्या; त्या वाढवायच्या; दुसऱ्याची नालस्ती करायची, हुशारीची जाहिरात करायची, ही कला त्याला चांगली आवगत होती. रांगणेकरमध्यें कांहीं गुण निश्चित होते. पटकन दुसऱ्यावर छाप पाडण्यासारखं त्याचं व्यक्तिमत्व, पर्सनेलिटी, आपल्या संभाषण चातुर्यानं दुसऱ्याला आपल्या-कडे खेचण्याची ( आकर्षून घेण्याची ) शक्ति, याच्याउलट बुद्धीनं चांगला तीव्र असूनहि मी लोकांत बोलाचालायला मुखदुबळा नि भिडस्तहि फार. आणि नेमका याच गोष्टीचा रांगणेकर फायदा उठवीत होता.

मी बी. ए. झालों. तरी रांगणेकर अजून इन्टरच्याच वर्गात बुचकळत राहिला होता. बी. ए. मला क्लास मात्र मिळूं शकला नाहीं. वडील सिरियस होते नि पुढें लगेच ते वारलेहि. घरची जबाबदारी पार पाडण्यासाठीं चटकन मिळालेली नोकरी मी पत्करली. माझ्यानंतर तीन चार वर्षांनीं रांगणेकर क्लार्क म्हणून आमच्याच ऑफिसांत लागला. हाहि एक योगायोगच. रांगणेकरची नि माझी पुन्हां एक गाडी झाली. मी हेडक्लार्कची परीक्षा पास पास झालों. ऑर्डिनरी कोर्सप्रमाणें हेडक्लार्क झालोंहि. एकीकडे बी. कॉम्, एलएल. बी.हि केलं. माझ्यामागें डिग्र्यांचीं शेपटं वाढत होतीं. पण आमच्या ऑफिसांत कुणालाच त्याचं कौतुक नव्हतं. किंमत नव्हती. मी आपला होतो तिथंच होतों, बे एके बे करीत. नाकासमोर पाहून चालत होतों. चांगली सुशिक्षित डिग्र्यावाली लोकं ऑर्डिनरी क्लार्क म्हणून राहायची नि चार पांच यत्ता झालेलीं लोकं वशिलेबाजी करून वर चढायची, बॉस म्हणून मिरवायची, क्लार्क लोकांना हिणवीत लायकी

नसतांना गाड्यांतून हिंडायची. हा आमच्या ऑफिसचा जणुं शिरस्ताच. पण तरीहि संसाराचा पसारा पोसण्यासाठीं मला इथें चिकटून राहणें प्राप्त होतं. पण रांगणेकर मात्र लोकांची समजूत करून देत होता, कीं याच्या अंगांत गटस् नाहींत, म्हणून हा इथें चिकटून राहिलाय. माझ्याविषयी लोकांचें मत वाईट करण्याचं, माझ्याशी स्पर्धा करण्याचं त्यानं सोडलं नाहीं. तो माझ्या हाताखालीं क्लार्क म्हणून काम करीत होता. माझी माझी सिनिऑरिटी, हेडक्लार्कशिप त्याच्या डोळ्यांत सलत होती.

पण रांगणेकरचं नशीबच मोठं बलवत्तर. फार दिवस राहावं लागलं नाहीं त्याला माझ्या हाताखालीं. 'पंत मेले राव चढले' तसं झालं. दुसरा एक हेड-क्लार्क अचानक वारला. त्याची जागा रांगणेकरला मिळाली. रांगणेकरनं सुटकेचा निःश्वास सोडला. कारण आतां तो माझ्या लेव्हलला आला होता. पण तेवढ्यानं त्याचं समाधान झालं नाहीं. त्याला मला सरपास करायचं होतं. वशिला लावून लावून का होईना, त्यानं अल्पावधींतच एक ऑफिसरची जागा पटकावली. आणि आतां तर एक बड्डा ऑफिसर म्हणून म्हणून तो मोठ्या दिमाखानं मिरवत होता. पंधराशेंच्या ग्रेडमध्यें जाऊन बसला होता.

'वशिल्यानेंच मनुष्या आलें श्रेष्ठत्व या जगामाजी । न दिसे एकहि वस्तु वशिल्यानेंहि असाध्य आहे जी' असं माझा एक मित्र गंमतीनं म्हणायचा. रांगणेकरच्याबाबतींत तें तंतोतंत बरोबर होतं. पण तें कांहींहि असलं, तरी रांगणेकर लौकिकदृष्ट्या श्रेष्ठ ठरला होता. त्यानं सुरू केलेल्या स्पर्धेत तो जिंकला होता. मी हरलों होतों. ही पोस्ट मिळवून त्यानं माझा पुरा सूड घेतला होता. आयुष्यांत मला पुढचं दार कायमचं बंद करून टाकलं होतं. वास्तविक त्यानं माझा असा सूड का घ्यावा? मी काय त्याचं घोडं मारलं होतं? त्यानं माझ्याशीं स्पर्धा कां करावी? का पूर्वजन्मीचे आमचे लागेबांधेच असे होते, ते या जन्मीं अशा रीतीनं फळाला येताहेत? तें कांहींहि असलं तरी रांगणेकर माझा मत्सर करत होता. फक्त माझाच हेवा, द्वेष करीत होता. माझी जागा त्यानं हिसकावून घेतली होती.

पण ही जागा त्याला पचली नाहीं. जिवाचा आटापिटा केला होतान त्यानं ही जागा मिळविण्यासाठीं. पण या अधिकाराचा तो मनमुराद उपभोग घेऊं शकला नाहीं. नियतीनं त्यांत खो घातला. एक दिवस एकानं मला अचानक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे ग्रंथालय.
अनुक्रम....०३५६०.... दि. ...८३-५-१...
क्रमांक....२१२६....नोंद दि....१०-३-१९...


खातमी दिली, 'रांगणेकर गेला'

"कशानं ?..." मी एकदम धसकलोच.

"हार्टफेल" तो म्हणाला.

मला खरोखरच मनस्वी दुःख झालं. ऑफिसर झाल्यापासून रांगणेकरनं माझ्याशीं आपणहून बोलायचं सोडून दिलं, खरं. पण मीसुद्धां आपणहून त्याच्याशीं कधींच बोललों नाहीं. त्याच्याकडे गेलों नाहीं. त्याच्या वागणुकीची, मत्सरीवृत्तीची मला, वशिलेबाजीची माझ्या मनांत विलक्षण चीड बसल्यामुळें, तो भेटला तरी मी त्याच्याशीं बोलायचं टाळलं. पण तो गेल्याचं कळल्यावर मी त्याच्या अंत्ययात्रेला गेलों. स्मशानांत आमच्या मोठ्या साहेबानं त्याची खूप स्तुति केली. त्याच्या गौरवपर भाषण करून त्याला श्रद्धांजली वाहिली. इतरहि चारपांचजणांनीं आदरांजली अर्पण केली. आणि माझ्या मनांत इकडे अनाहूत विचार घुसला. रांगणेकरनं सुरू केलेल्या स्पर्धेचा आज शेवट झाला. (वास्तविक अशावेळीं असं कांहीं मनांत यायला नको होतं. पण तरीहि आलं, त्याला काय करणार ?) स्पर्धेचा शेवट झाला खरा, पण मला असा शेवट व्हायला नको होता. मनापासून नको होता.

यानंतर चारआठ दिवसांत साहेबानं माझ्या अपॉइन्टमेन्टच्या ऑर्डरचा कागद माझ्याकडे पाठवून मला आपल्या चेंबरमध्यें बोलावलं.

त्यांच्या खोलींत पाऊल टाकल्याबरोबर ते मला म्हणाले, "कॉंग्रॅटस मिस्टर भागवत ! तुमच्या अपॉइन्टमेन्टचा कागद वाचलाच असेल तुम्ही ?"

"यस सर." माझ्या तोंडून कसेबसे शब्द बाहेर पडले. कदाचित् तो नेहमींच्या संवयीचाहि परिणाम असेल.

"रांगणेकरांची फार इच्छा होती तुमची या पोस्टवर अपॉइन्टमेन्ट व्हावी अशी." साहेब म्हणाले.

"रांगणेकरांची ?..." माझं तोंड आश्चर्यानं आ वासलं गेलं.

"हो त्यांना पहिला हार्ट ॲटॅक आला तेव्हां डॉक्टरांनीं बेड रेस्ट घ्यायला सांगितलं. तसा माइल्ड होता ॲटॅक. डॉक्टरांना आशा होती ते बरे होण्याची. पण रांगणेकर फार भ्यायले होते. त्यांनीं मला फोन करून बोलवायला सांगितलं. मी त्यांना भेटायला गेलों. आपण आतां नक्की जाणार, असं त्यांच्या मनानं घेतलं होतं. मी त्यांना खूप समजावलं. पण त्यांची धास्ती कांहीं केल्या कमी

होईना. आपली अखेरची इच्छा त्यांनीं त्याच वेळीं माझ्याजवळ व्यक्त केली..
"माझ्यानंतर माझी पोस्ट भागवतांना आपण शक्यतों द्यावी. माझी शेवटची आहे ही.." रांगणेकर म्हणाले..

"माझ्याकडून शक्य ती खटपट मी करीन. तुम्ही निश्चिंत असा, असं मी त्यांना आश्वासन दिलं." साहेबांच्या डोळ्यांत पाणी तरारलं. सिगरेटच्या टिन-मधली एक सिगरेट काढून घेऊन त्यांनीं टिन माझ्यापुढें केला. मी 'नो, थँक्स' म्हटलं. साहेबांनीं सिगरेटचा धूर हवेंत सोडला. त्यांची दृष्टि कुठें तरी शून्यांत लागली होती. ते मनस्वी भारावले होते. मला वाटतं, त्यांच्या डोळ्यापुढें फक्त रांगणेकरच दिसत होता आणि तेव्हांचा तो प्रसंगहि. घोगऱ्या, गहिवरल्या स्वरांत ते पुढें म्हणाले..."फार चांगला माणूस रांगणेकर. हुशार, खटपट्या, कामसू, कल्याणकारी, निर्मत्सरी. जातां जातांहि त्यानं तुमचं भलं करण्याची इच्छा धरली, इतकेंच नव्हे, तशी खटपटहि केली."

काय बोलावं, मला सुचेना. विचारांच्या धांवऱ्या मुंग्या मनांत अजूनहि भुरुभुरु धांवत होत्या. रांगणेकरनं मरतां मरतां ही जागा मला कां देऊं केली? त्यांत त्याचा अंतस्थ हेतु काय होता? आजपर्यंतच्या त्याच्या वागणुकीबद्दल त्याच्या मनाला शेवटीं खंत तर वाटली नाहीं? मी त्याला मत्सरी समजत होतों तसाच तो मला मत्सरी समजत असल्यामुळें असा वागत होता? त्यानें केलेल्या मत्सराबद्दल, स्पर्धेबद्दल त्याचं मन त्याला खात तर नव्हतं? त्याबद्दल त्याची त्यालाच शेवटीं लाज वाटली असावी? आणि आपल्या मरणानंतर माझ्या मनांत कोणत्याहि प्रकारची अढी राहूं नये, म्हणून त्यानं साहेबाला अशी गळ घातली? मरेपर्यंत स्वतःचं वशिल्याचं तट्टू पुढें दामटलं, हें मनांत डांचत, डचमळत राहिल्यामुळें मरतां मरतां त्यानं साहेबांजवळ माझा वशिला लावला? सर्व करून करून शेवटच्या घटकेला त्याला ही उपरति झाली? का साहेब म्हणतो, तसा रांगणेकर मनाचा फार सज्जन, दिलदार माणूस होता नि मला जें सर्व वाटत होतं तो केवळ माझ्याच मनाचा खेळ होता?..."

क्र. ९४७५६ नों.
दि.

■ ८ ■

# शिक्षा

बेबीच्या ममीनं लिपस्टिक हलकेच ओठांवरून फिरवून त्यांवरून पुन्हा एकदां जीभ फिरवली. हनुवटीवर अगदीं बारीक काळा ठिपका रेखला अन आरशांत आपलं प्रतिबिंब न्याहाळलं. सगळा साज मनाजोगता झाल्यावर बाहेर पडण्या पूर्वीच्या इन्स्ट्रकशन्स देण्यासाठीं तिनं बेबीला हाक मारली, " बेबी "–

पण हूं नाहीं कीं चू नाहीं !

" बेबी, ए बेबी "–ममीनं पुन्हा मोठ्यानं हाक मारली.

" यस् ममी "...बेबीच्या स्टडीमधून नाजूक, मंजुळ पण थोडा रुसवा आवाज आला. बेबी जागची हलली नाहीं बिलकुल. तिचं सगळं लक्ष लागलं होतं समोरच्या चाळीकडे. टेबलावर पुस्तक उघडून ठेवलं होतं, तें फक्त नांवाला, अभ्यासाकडे तिचं मुळींच लक्ष लागत नव्हतं.

" बेबी, ए बेबी "–ममीनं पुन्हा मोठ्यानं हाक मारली.

" यस् ममी "–

" इकडे ये बवू जरा ! "

" यस् ममी, कमिंग " असं म्हणून बेबी पुन्हा समोरच्या चाळीकडे पाहूं लागली.

समोरच्या मोठ्या चाळीच्या आवारांत सात-आठ मुलींनीं ऐसपसचा खेळ

सुरू केला होता. बेबीला आपल्या खोलींतून त्यांची चाललेली पळापळी, त्या खेळांतली गंमतजंमत दिसत होती. तिच्या जिवाला तिकडे जाण्याची कोण ओढ लागली होती ! पण ममी तिला परवानगी देणं शक्यच नव्हतं. परवांसुद्धां तिचा जीव त्या पोरींच्याबरोबर खेळण्यासाठीं असाच चुटपुटला होता. पण ममीनं तिला मुळींच जाऊं दिलं नाहीं. बेबीनं विचारलं होतं, " ममी, समोरच्या चाळीच्या गॅलरींत मुली भातुकलीचा खेळ खेळताहेत. मी जाऊं त्यांच्यात खेळायला ? "

" कुठें ? "...ममीच्या कपाळावर शेपन्नास आठयांचं जाळं पसरलं. स्वर त्रासिक आला.

" इथेंच ग, समोरच्या चाळींत. "

" वेड लागलं का कांय तुला, बेबी ? होमवर्क करायचं सोडून खेळायला कुठं चाललीस आतां ? "

" होमवर्क झालंसुद्धा अन् गार्डनमधें जाण्याच्याऐवजीं मी तिकडे खेळतें. मग तर झालं ? "

" अं–हं ! "

" अं...अं...अं..." कुरकुरत बेबी म्हणाली, " असं ग काय ममी ? जाते ना ग आजच्या दिवस ! " बेबीचा लाडका स्वर.

" नाहीं जायचं ! " ममी प्रत्येक शब्दावर जोर देत ठासून म्हणाली.

" पण कां ? "

" मी सांगतें म्हणून ! लहान मुलांनीं जास्त चांभारचौकशा करूं नयेत. " बेबीच्या डोळ्यांत पाणी तरळलं. ममीला ऐकूं जाणार नाहीं अशा बेतानं स्वतः-शीच कांहीं पुटपुटत ती तिथून गेली.

–अन् तरीहि आज पुन्हा एकदा धीर करून बेबीनं ममीला विचारलं, " ममी, मी जाऊ समोरच्या चाळींत ऐसपैस खेळायला ? "

" डोन्ट बी सिली, बेबी ! एकदां तुला सांगितलं नं, त्या पोरींच्यांत खेळा-यचं नाहीं म्हणून ? "

" अं...मी जाणार ! "

" मार खाशील गेलीस तर. चाळींत राहणाऱ्या कारकुंड्यांच्या दरिद्री पोरी त्या त्यांच्याबरोबर तूं खेळणार ? असल्या पोरींच्यामधें मिसळून तसल्याच भिकार नि गलिच्छ सवयी लागतात. तुला पाहिजे तर रखमाकडून तुझी चूलबोळकीं काढून

घे. गूळ खोबरं, दाणे, पोहे, बिस्किटं, चॉकोलेट--काय हव्वं तें आतुकलीला मागून घे अन एकटी खेळ इथें."

"अं...पण एकटी-एकटीनंच काय ग नेहमीं नेहमीं खेळायचं? अन चट्टामट्टा काय एकटीनंच करायचा?"

"मग पलीकडच्या बंगल्यातल्या डॉक्टरांच्या नीनाबरोबर खेळ."

"शीः! मला नाहीं आवडत ती नीना. भांडकुदळ न कुचकी नुसती!"

"मग थोडा वेळ अभ्यास कर अन् नाहींतरी तुझी आता गार्डनमधें जाण्याची वेळ होतच आलीय. कपडे बदल नि रखमाबरोबर गार्डनमधें जा बघू कशी!"

आता ममीच्यापुढें बोलल तर मुस्कटांत मिळेल म्हणून बेबी नुसतीच धुसफुसली नि गप्प बसली. पाय जोरांत आपटीत ती आपल्या खोलींत निघून गेली पण तिला हें मात्र कळलं नाही कीं, चाळींतल्या मुलीच्याबरोबर तिनं कां खेळायचं नाहीं? त्यांच्यात खेळून तिला कसल्या वाईट सवयी लागणार? कारकुनांच्या मुलींच्यात खेळणं त्यांच्या प्रतिष्ठेला कां शोभत नाहीं?

बेबी मग नुसतीच फुरंगटून बसली. तोंडाचा चंबू करून समोरच्या चाळींतला खेळ पाहात. तिला ठाऊक होतं, ममी आता बाहेर निघालीय. ही तिची नित्याचीच बाहेर जायची वेळ. रोजचा ठरलेला कार्यक्रम. पोर्चमधून पपांना गाडी बाहेर काढताना तिनं मघाशी पाहिलं होतं. ममीनं पटकन् खालीं उतरावं म्हणून पपा हॉर्न देत होते. अन् रोजच्याप्रमाणे बाहेर जातांना इन्स्ट्रक्शन्स देण्यासाठीं ममी तिला हाक मारत होती. पण बेबीनं आज पक्कं ठरवून टाकलं होतं. रोजच्यासारखं ममीपुढें पटकन् मुळींच जाऊन उभं राहायचं नाहीं! "नाहींतरी ममी वाईटच आहे मुळीं. अगदीं अगदीं वाईट! आपण तिचं कां ऐकायचं? ती कुठें आपलं ऐकते? एकसारखं अमक्याकडे जाऊं नको, तमक्याला घरी आणूं नको हें आपल्या प्रेस्टिजला शोभत नाही. नेहमीं नेहमीं ही काय कटकट! कधींसुद्धां आमच्या मनासारखं करायचं नाहीं. सदानकदा आपल्यालाच हवं तसं करायचं. खेळायलासुद्धां धड कुठें पाठवीत नाहीं नि रोजरोज घरांत आम्हाला एकटीलाच ठेवून जायचं म्हणजे काय! ईऽऽऽ! आम्हाला नाहीं वाटतं कंटाळा येत रखमाबरोबर जायचा!"

"बेबी," ममीची जास्तच चढ्या सुरांत पुन्हा हाक आली.

"आय् टोल्ड यू आय ॲम कमिंग." बेबीनं जागची न हाल्तां उत्तर दिलं.

तावातावानं ममी शेवटीं बेबीच्या स्टडीशीं आली. तिचीं पावलं दाराशी वाजल्याबरोबर बेबीनं पटकन् हातांत पुस्तक धरलं.

" बेबी, व्हॉट आर यू डूइंग देअर ? "

" स्टडीइंग, ममी. "

" बेबी, तुला किती हाका मारायच्या ? कान्ट यू हिअर मी ? "...ममीचा मघाहूनहि आणखी चढा सूर.

" येस् ममी. " बेबीनं अगदीं सहजगत्या शांतपणें उत्तर दिलं.

" उलट बोलायला लाज नाहीं वाटत तुला ? "

" यात काय उलट बोलले मी ? तूं म्हणालीस..." कान्ट यू हिअर मी ?" आय सेड..." येस ममी. "

" शट अप ! जास्त बोलूं नको पुढें. तुला हाक मारून किती वेळ झाला ! "

बेबीचा चेहरा निर्विकार. ती खांबासारखी स्तब्ध उभी.

" काय विचारतेय मी ? " ममीचा आवाज हाय पिचला पोचला. " उत्तर न द्यायला काय झालं तुला ? "

" तूंच म्हणालीस नं, जास्त बोलूं नको पुढें म्हणून ? "

बेबीच्या त्या धिटाइनं ममी एकदम अवाक् झाली. थिजली. पण ही वेळ गप्प बसण्याची नाहीं या विचारानं म्हणाली, " बेबी, हल्लीं तुझी जीभ फारच वळवळायला लागलीय. जो जो गप्प बसून चुरचुरीत बोलण्याचं कौतुक करावं तो तो जास्त जास्तच करायला लागली आहेस तूं अलीकडे. सांगितलेलं बिल्कुल ऐकत नाहीस तूं. बरं नव्हे हें तुझं लक्षण अन सांगून ठेवते अशीच वागत राहिलीस तर बोर्डिंगमधें ठेवून टाकीन मी तुला समजलीस ? "

रागाच्या भरांत ममी खूप बडबडली अन बेबीच्या खोलींतून बाहेर पडली पण तेवढ्यांत तिला आठवण झाली. बाहेर जातानाच्या इन्स्ट्रक्शन्स द्यायच्या राहिल्या आहेत. ती पुन्हा बेबीच्या स्टडीशी आली. बेबी तिथें तशीच मख्खासारखी उभी होती. ममीला तिचा भयंकर संताप आला. काय करूं अन् काय नको असं तिला झालं. पण तिनं आपला राग गिळला आणि ती बेबीला म्हणाली, " जा आंत. दूध पी अन् पुढच्या उद्योगाला लाग. नुसती खांबासारखी उभी राहूं नको इथें ! "

मग तिनं डान्स कुठला करायचा, होमवर्क केव्हा करायचं, गार्डनमधें रखमा-

बरोबर केव्हां व किती वेळ जायचं इत्यादी सगळ्या इन्स्ट्रक्शन्स भराभर दिल्या. दरवाज्याशी आल्यावर तिनं पुन्हां माग वळून वेबीची हालचाल नजरेनं टिपली वेबी अजून तिथें तशीच उभी होती न बोलता. न हालतां, खड्या पारशासारखी..

" वेबी, तुला ऐकू आलंय नं, मी काय सांगितलं तें ? "

वेबी तरीहि गप्पच होती.

" काय करावं तरी बाई या पोरीपुढें कांहीं कळत नाहीं. "...ममी स्वतःशी पुटपुटली. " काय ग, ऐकलंस का नीट काय तें ? अं ? "

वेबीला ममीचा अस्सा राग आला होता,कीं ममीच्या प्रश्नांना उत्तरं देण्याची सुद्धां तिची इच्छा नव्हती. पण चारचारदां विचारूनहि उत्तर न दिलं, तर पाठीत धपाटा बसण्याची धास्ती म्हणून तिनं सगळा राग गिळला औषधाची गोळी गिळावी तसा. अगदी नाइलाजानं तिच्या तोंडून एकच शब्द बाहेर पडला, " हो. "

" वेबी, तूं सांगितलेलं ऐकत नाहींस मुद्दामच, हें बरं नव्हे हं. मी पुन्हा सांगतें तुला. तूं हल्ली भारी हट्टी होत चालली आहेस. " जातांजातां वेबीला पुन्हा एकदां ताकीद देऊन ममी बाहेर पडली.

' तूं तरी कुठें ऐकतोस आमचं ? हें तुझं वागणं तरी बरोबर आहे का ? आम्हाला हट्टी म्हणते, पण आपणच खरी हट्टी आहे. आम्ही इतक्यांदा विचारलं येऊं का तुझ्याबरोबर ? पण नेतेस का कधीं ? अन् म्हणे आम्ही हट्टी' ...वेबी स्वतःशींच पुटपुटली. ममीला तें ऐकूं गेलं नाही म्हणून बरं !

आतापर्यंत वेबीनं कधीच फारसा कशासाठीं हट्ट केला नव्हता. तसा हट्ट करायला तिला वावहि नव्हता. विशेष तिनं मागणी करण्यापूर्वीच तिला कित्येक गोष्टी मिळत. इतर मुलींना कधी बघायलासुद्धा मिळणार नाहीत अशी छानछान खेळणीं, कपडे ममीनं तिला आणले होते. खाण्यापिण्याची तिची चंगळ होती.. ममी या सर्व गोष्टींत तिचं भरपूर कौतुक नि लाड पुरवाची वेबीचा. दिवसभराचा कार्यक्रमहि ममीनं आखून दिला होता. अन् त्याचप्रमाणं तो सुरळीत चाललाहि होता. त्यात ती रंगूनही जायची पण गेले कांहीं दिवस हे सर्व असूनहि वेबी दुःखी झाली होती. तिला काहीतरी कमी वाटत होतं. कुठंतरी दुखत होतं, खुपत होतं. गार्डनमधें कितीतरी मुलामुलींचे पपा नि ममी त्यांच्याबरोबर येतात. मग आपलेच ममी–पपा आल्याबरोबर येत नाहींत, असं का ? नेहमीं नेहमीं

ती दोघंच जातात सिनेमाला, नाटकाला, फिरायला अन् लग्नालासुद्धां अन् बेबीची हीच खरी व्यथा होती. एकदा तिनं मोठा धीर करून ममी बाहेर जात असताना विचारलं,

" ममी, मी येऊं तुमच्याबरोबर ? "

ममीला तो प्रश्न अनपेक्षित होता. प्रथम थोडा वेळ ती तिच्याकडे पाहातच राहिली मग म्हणाली, " कां ? रखमाबरोबर जा नं तूं. "

" शीः ! रखमाबरोबर जायचा कंटाळा येतो मला. मी येते ना ग तुमच्याबरोबर."

" अग मोठ्या माणसाबरोबर नसतं जायचं लहान मुलांनी, बेबी ! "

" मग रखमा काय लहान आहे माझ्याएवढी ? "

" तुला उत्तरं द्यायची कुणी बाई ! " ममीला बेबीच्या प्रश्नाचं मोठं कौतुक वाटलं. पण तिला त्यावर उत्तर सुचेना. मग ती म्हणाली,

" हे बघ, पपांना नाहीं आवडत असं कुठेंतरी मुलांना बरोबर नेणं. एक चॉकोलेट देऊ तुला त्याबद्दल ? "

" अं ... मग म्हणून काय झालं ? " असं म्हणून कांहींशी कुरकुरतच बेबी गप्प बसली खरी, पण ममीच्या बोलण्यानं तिचं समाधान मात्र झालं नाही. म्हणून पुन्हां एकदा ममी नि पपा पिक्चरला निघालीं तेव्हां तिनं विचारलं, " ममी, मला नेतेस पिक्चरला ? "

" या पिक्चरमधें तुला काय कळणार, बेबी ? अग, लहान मुलासाठीं निराळीं पिक्चर्स नि नाटकं असतात. मधें इथें 'युकिवारिसु' 'एस्केपेड इन जपान' लागली तेव्हां पाठवलं नव्हतं मी तुला रखमाबरोबर ? "

" शीः ! पण रखमाबरोबर काय जायचं ? तिला कांहीसुद्धां कळत नाहीं त्यांत. "

" बरं बरं. पुन्हा मी येईन हं तुझ्याबरोबर, " असं आश्वासन ममीनं तिला दिलं पण तें केव्हांच पाळलं नाही.

बेबीला कळायला लागल्यापासून बेबी कधी कुणाच्या लग्नालाहि गेली नव्हती. तिच्या शाळेंतली तिची मैत्रीण आपल्या आई-वडिलांच्याबरोबर लग्नाला जायची. तिथल्या खूप गमतीजमती ची तिला सांगायची. आपल्याला लग्नाला जायला मिळत नाहीं, म्हणून बेबीचा जीव चुटपुटायचा. एकदा तिनं ममीबरोबर लग्नाला जाण्याचा हट्टच धरला तेव्हां ममी म्हणाली, " तुला कल्पना नाहीं, बेबी. तूं

खूप कंटाळून जाशील तिथें. अन मग माझ्या डोक्याशी कटकट करीत बसशील. हल्लीं हें काय खूळ घेतलं आहेस तूं डोक्यांत ? जिथें तिथें माझ्याबरोबर येण्यां-साठीं काय पाठीस लागतेस ? मग रखमाला कशाला ठेवलीय ?"

बेबी ममीवर मनांतून अगदी नाराज झाली. ममी तिचं ऐकत नाहीं म्हणून तीहि ममीच ऐकणार नव्हती.

तशातच एक दिवस बेबीची मावशी, तिचे मिस्टर अन् तिचीं मुलं त्यांच्या-कडे पाहुणी आली. मावशीला पाहिल्याचं बेबीच्या आठवणीतहि नव्हतं. गेल्या तीन-चार वर्षांत ती इकडे आलीच नव्हती. मावशी आल्यावर बेबीची कळी एकदम खुलली. मावशीनं रोज एक निराळा कार्यक्रम आखला होता. राणीचा बाग, अपोलो, बंदर, सिनेमा – या सगळ्या ठिकाणी त्यांनी आपल्याबरोबर मुलांनाही हिंडवलं अन् बेबीलासुद्धां. पण बेबीला सगळ्यात आश्चर्य वाटलं तें मावशीच्या नात्यांतल्या एका लग्नालासुद्धां तिनं बेबीसकट सर्वांना नेलं : लग्नातला थाट बेबीला अगदीं अनोखा होता. आइस्क्रीम, पेढे खातांना, गुलाबपाणी शिंपडताना, अत्तर लावताना, नवे नवे कपडे घालून मांडवातून मिरवतांना, बरोबरीच्या मुलामुलींच्यांत हसता-खिदळतांना, धुडगूस घालताना बेबी विलक्षण रंगून गेली. ती आपलं घर, ममी, रखमा – सगळंसगळं विसरली. एका निराळ्याच तंद्रीत दिवसभर वावरली. बेबी घरी आली तेव्हा दिवसभराच्या श्रमानं तिचे डोळे अगदी पेंगुळले होते. पण ममी म्हणाली.

"बेबी, दिवसभर झाला न धांगडधिंगा ? आता आधी होमवर्क पुरं कर पाहूं बसून !"

"पण ममी, आय ॲम सो स्लीपी नाउ ॲंड ॲज युजवल इट् इज टाइम फॉर मी टु गो टु बेड."

"पण होमवर्क पूर्ण झालं नाहीं तर उद्या इम्पोझिशन मिळेल शाळेत. त्यापेक्षां आज थोडा वेळ जागण्याची पनिशमेंट कांहीं वाईट नाहीं."

"जाऊं दे ग. कांहीं मिळत नाहीं इम्पोझिशन एक दिवस होमवर्क राहिलं तर."

– मावशीनंच अशी मध्यस्थी केल्यामुळें बेबीच्या होमवर्कला फाटा मिळाला त्या दिवशीं.

मावशी असेपर्यंत बेबीचे चार-सहा दिवस कसे अगदी मजेत गेले. एका

निराळ्याच आनंदाच्या, सुखाच्या धुंदींत ती घरांत वावरत होती. अर्थात्च मावशी जाणार म्हणतांना वेबीला अगदीं रडू कोसळलं. ती मावशीला म्हणाली, " तूं इथंच राहा ना ग. तूं असताना नं, कित्तीकित्ती मज्जा आली ! रेखा-रश्मीबरोबर बाहुला-बाहुलीचं लग्न, भातुकली, ऐसपैस – कित्ती खेळ खेळायला मिळाले, बाहेर जायला मिळालं. तूं असलीस नं की, ट्यूशनला, होमवर्कला दांडी देता येते एखाद्या दिवशीं तरी. तू नव्हतीस नं, तेव्हां ममीचा सारखा माझ्यामगं लकडा अन् एवढ्या-तेवढ्यासाठीं रागवायची. अग, परवा मी केसाला हिरवी रिबन बांधली फ्रॉक होता निळा, तर ममी लगेच ओरडली मला " वेबी व्हाय हॅव यू ड्रेसड् युवर हेअर वुइथ ए ग्रीन रिबन ? हॅवन्ट यू गॉट ए ब्लू बन ? यू हॅवन्ट गॉट द सेन्स ऑफ मॅचिंग ॲट ऑल ! " अशी आहे आमची ममी. अगदीं अगदीं वाईट अन् बरं का ग मावशी आमची ममी नि पपा कुठं म्हणजे अगदी कुठं नेत नाहींत मला कधीं बरोबर. तूं कशी ग नेतेस आम्हांला बरोबर ? "

" अग, तुझे पपा नि ममी अमेरिकेंत होते दोनचार वर्षं. तिथल्या राहणीची सवय झालीय त्यांना. अमेरिकेंत नाहीं अशी पद्धत मुलांना बरोबर नेण्याची ! "

" मग इंग्लंडमधें नेतात मुलांना बरोबर ? "

मावशी इंग्लंडमधें राहून आलेली आहे, हें वेबीला ठाऊक होतं.

वेबीच्या प्रश्नावर मावशी नुसतीच हसली. ती तशी कां हसली, तें वेबीला कळलं नाहीं. पण तेव्हांपासून वेबीच्या डोक्यांत एक कल्पना ठाम बसली. ममी अमेरिकेला जाण्यापेक्षां मावशीसारखी इंग्लंडला गेली असती तर बरं झालं असतं.

मावशी गेली अन् वेबीला कसं चुकल्या-चुकल्यासारखं वाटू लागलं. ममीच्या-बद्दलची तिच्या मनांतली अढी तशीच कायम होती. तिचं रुटीन वर्क चालू होतं पण तें केवळ नाइलाजानं.

होतां होतां शाळेला सुट्टी सुरू झाली. वेबीला ग्रँडम्मानं पाहून तीन-चार वर्षं झाली होती, म्हणून तिनं वेबीला अन् ममीला सांगलीला बोलावलं, वेबीची रवानगी झाली. पुढे सांगलीला अर्थातच रखमाबरोबर. ममी मागाहून चार-सहा दिवसांनी जाणार होती.

ममीच्या ममीकडे वेबी अगदीं खुषीत होती. तिचे ग्रँडपपा नि ग्रँडम्मा तिचं

सर्वतोंपरी कौतुक करीत. बेबी होतीहि तशी कौतुक करण्यासारखी हुषार नि चुणचुणीत. आजूबाजूच्या पोरींत खेळतांना ती कशी उठून दिसे रूपानं नि गुणानंही. इथें आपल्या बरोबरीच्या मुलींच्यात मनसोक्त खेळण्याची तिला पूर्ण परवानगी होती, डान्स; होमवर्क, ट्यूशन—कसलीच पाठीशी कटकट नव्हती. अमक्या वाजतां अमूक झालंच पाहिजे म्हणून मानेवर खडा ठेवून वागायला नको होतं, शिवाय तिला रखमाबरोबर बाहेर जाण्याची सक्ती नव्हती. ग्रँडमा तिला संध्याकाळीं आपल्याबरोबर देवळात नेत असे. ग्रँडपपा तिच्याशीं रमी खेळत. एकूण बेबीची स्वारी मजेंत होती.

पण ममी आली नि बेबीचा आनंद पूर्णपणें ओसरला! तिचा ग्रँडपपांच्या-बरोबरचा रमीचा खेळ बंद झाला. आता ग्रँडपपा, ग्रँडमा, ममी अशी सगळीं मोठीं माणसं ब्रिज नाहीं तर रमी खेळायला बसत. मोठ्या माणसांत या चिमुरडीची कशाला लुडबूड, म्हणून ममी तिला खेळायला घेत नसे.

दुसऱ्या दिवसपासून ग्रँडमाबरोबर तिचं देवाला जाणही ममीनं बद केलं. ममीच्या मतें म्हाताऱ्या आजीबाईसारखं देवळांत काय जायचं रोज उठून!

शेवटीं बेबीच्या नशिबाला पुन्हा रखमाच आली! इथेंहि पुन्हा तिची नि रखमाचीच सांगड ममीनं घातली अन् बेबी पुरी वैतागली

बेबीची ममी नि ग्रँडमा रोज कुठें न कुठें बाहेर जात पण बेबीला बरोबर नेण्याचं ममी कटाक्षानं टाळीत असे. बेबीला वाटलं होतं, आपली ममी जशी आपल्याशीं वागते तशीच ममीची ममीपण तिच्याशीं वागत असेल. तसंच तिनं तिला वागवावं. पण ग्रँडमा ममीशीं तशी कधींच वागली नाहीं. उलट ती तिला रोज आपल्याबरोबर नेत असे, प्रत्येक गोष्ट तिला विचारून करीत असे. बेबीला हें मुळींच आवडलं नाहीं. शेवटीं एक दिवस ती ग्रँडमाला म्हणाली, "ग्रँडमा, तूं कशाला ग ममीला बरोबर नेतेस? ममी मला कुठं—कुठं नेत नाहीं आपल्या-बरोबर. नेहमीं नेहमीं रखमाबरोबर पाठवते. सिनेमाला, नाटकाला, गार्डनमधें. तूं पण तिला तुमच्या विठाबाईबरोबर पाठवीत जा अन् अगदीं रोजच्या रोज टाइम-टेबलप्रमाणें होमवर्क करायला, ट्यूशनला बसायला अन् डान्स करायला लाव!"

ग्रँडम्मा खूप मोठ्यानं हसली पण तिनं बेबीचं ऐकलं मात्र नाहीं. बेबीला ग्रँडम्माचा भारी राग आला अन् वाईटहि वाटलं. बेबीनं एवढं सांगूनसुद्धां ग्रँडम्मानं ममीला बरोबर न्यायचं, ममीचंच सगळं ऐकायचं, अन् बेबीचं कांहीं-

सुद्धां ऐकायचं नाहीं म्हणजे काय ! बेबीला कळेना ममीला कुणीच कसं रागावत नाहीं ! बोलत नाहीं ! ग्रँडम्मा, ग्रँडपपासुद्धां. कुणीच कशी तिला शिक्षा करीत नाहीं ! शीः आम्हांला मात्र सदानकदा शिक्षा पण छे ! ममीलासुद्धां चांगली शिक्षा झाली पाहिजे.

बेबी एकटीच गॅलरींत विचार करीत बसली होती. अन् एकदम तिच्या डोक्यांत एक विलक्षण कल्पना घुसली. तिनं हळूच आत येऊन कानोसा घेतला ममी, ग्रँडम्मा, ग्रँडपपा सगळी वामकुक्षी करीत होतीं, रखमानं चांगली ताणून दिली होती. दुपारचं ऊन बाहेर नुसतं रणरणत होतं. पुढच्या दाराची कडी बेबीनं अगदी आवाज न करतां काढली. मग मांजराच्या पावलानं पुन्हा आंत येऊन नजरेनं चाहूल टिपली. सगळीकडे सामसूम होतं. बेबी बाहेर पडली नि धूम पळत सुटली ! अंगांतून घामाच्या धारा फुटत होत्या, उन्हानं चेहरा लालबुंद झाला होता, पण कुठेंहि सावलीला घाम पुसण्यासाठींसुद्धां न थांबतां बेबी धावत धावत सांगली स्टेशनवर आली. मिरज गाडी फलाटाला लागलेली होती. समोरच दिसलेल्या एका डब्यांत बेबी चढून बसली !

फक्त मिरजेपर्यंत जाणारी गाडी नि दुपारची वेळ, त्यामुळें गाडीला फारशी गर्दी नव्हती. बेबीला खिडकीजवळची छानशी जागा मिळाली होती. गाडी सुरू झाल्यावर ती खिडकींतून बाहेरची गंमत पाहू लागली. चालत्या गाडींतून मंद वाऱ्याची झुळूक अंगाला चाटून जात होती. ती बेबीला मोठी सुखावह वाटत होती. विश्रामबाग वानलेसवाडी स्टेशनं पटकन् मागं पळाली अन बेबीचे डोळे पेंगुळले. उन्हांत पळूनपळून ती दमली होती. वाऱ्यांच्या मंद झुळुकेनं तिला केव्हां झोप लागली तें कळलंच नाहीं. बेबी गोडशा स्वप्नांत रंगून गेली होती खास. तिच्या मिटल्या डोळ्यांतहि हसू चमकत होतं. खुषीनं चेहरा उजळला होत. आज आता ती मावशीकडे जाणार होती. तिथें खूप गंमतजंमत करणार होती. मावशीच्या मुलांच्याबरोबर मनसोक्त खेळणार होती. आज ती ममीच्या तडाख्यातून सुटल्यामुळें तिला कसलंच कम्पल्शन नव्हतं. पाठीशीं कसला लकडा नव्हता. रखमाबरोबर बाहेर जाण्याची, डान्स करण्याची, होमवर्क करण्याची कसलीहि शिक्षा नव्हती उलट तीच मावशीला सांगणार होती, तूं आमच्या ममीला चांगली शिक्षा कर—ती मला करते अगदी तश्शी !

स्वप्नाच्या गोड तंद्रीत बेबी मनस्वीं सुखावलीं होतीं. स्वतःशींच खुसुखुसु

हसत होती. तिच्या डोळ्यांपुढं छानसं चित्र उभं राहिलं होतं. नक्कीच बेबीच्या सांगण्याप्रमाणें मावशीनं ममीला शिक्षा केली आहे. ममी आता होमवर्क पूर्ण करतेय, ट्यूशनला बसतेय, रखमाबरोबर गार्डनमधें जातेय नि अय्या ! डान्ससुद्धां करतेय इऽऽऽ ! नि ममी अगदीं वेडावाकडा डान्स करतेय. ममीला शिक्षा झालेली पाहून बेबीला केवढं हसूं फुटलं. विशेषतः ममीला वेडीवाकडी नाचतांना पाहून बेबी पोट धरधरून हसतच सुटली आपली इतक्यात...

कसल्याशा आवाजानं त्या तिच्या गोड तंद्रीची नशा खाडकन् उतरली ती विलक्षण दचकली. तिनं आजूबाजूला नजर टाकली. आपण आहोत तरी कुठं ? तिनं डोळे चोळले अन् पुन्हा इकडे तिकडे पाहिलं. तिला कळून चुकलं कीं ती एका पोलीस व्हॅनमधें बसलेली आहे. तिच्या दोन्ही बाजूंना मावशी नि मावशीचीं मुलं नसून दोन पोलीस आहेत ! ती मनस्वी घाबरली. पोलिसांची नाहींतरी तिला पहिल्यापासून भारीच भीती वाटायची. तिला वाटलं, हे आपल्याला पकडून तर कुठें नेत नाहींत, चोरांना पकडून नेतात तसं ? तिला ममीची एकदम तीव्रतेनं आठवण झाली अन् आपलं रडूच कोसळलं. पोलिसांनी तिला अंजारलं, गोंजारलं तिचा चेहरामोहरा, पेहरावावरून ही कुठल्यातरी बड्या घरांतली मुलगी असावी या कल्पनेनं तिला प्रेमानं वागवलं, तेव्हां कुठें तिची भीति किंचित् कमी झाली, पण तिचा कावराबावरा चेहरा अजून तसाच होता. पोटांतला भीतीचा गोळा पूर्णपणे वितळला नव्हता. तिला आता तिच्या ममीकडे जायचं होतं–ममीकडेच फक्त.

पोलीस तिला नाना प्रश्न विचारीत होते, पण तिला कशाचीच धड उत्तरं देतां येत नव्हतीं. त्या मनःस्थितीतच नव्हती. नांव, गांव, पत्ता विचारल्यावर मात्र तिनं ग्रॅंडपपांच्या घराचा पत्ता अचूक सांगितला अन् माझी ममी तिथेंच आहे, तिच्याकडे मला घेऊन जा, हें एकच ध्रुवपद ती आळवीत राहिली. त्यांनीं तिला खाऊ घेऊन दिला अन् तिच्या ममीकडेच नेणार असल्याचं आश्वासन दिलं तेव्हां कुठें तिच्या जिवांत जीव आला अन् पोलिसांच्या मागचं तिचं टुमणं कमी झालं.

इकडे दुपारीं ममी झोपून उठल्यानंतर तिला बेबी कुठेंच दिसली नाहीं. असेल कुठेंतरी इथेंतिथं खेळत, या हिशेबानं पांचदहा मिनिटं ती स्वस्थ होती. पण नंतरहि बेबीचा पत्ता नाहीं, असं पाहिल्यावर सगळीकडे शोधाशोध सुरू झाली. संडास, बाथरूमपासून सगळं घर शोधून झालं. शेजारी पाजारी चौकशी केली पण छे ! बेबीचा ठावठिकाणा कळेना. रखमाला ममीनं चांगलीच फैलावर घेतली. तिनं

बेबीवर नजर नको ठेवायला ? दोषाचं खापर तिच्या माथ्यावर फुटलं पण केवळ रखमाला धारेवर धरून उपयोग नव्हता. हालचाल करणं आवश्यक होतं.

शेवटीं ग्रँडम्मा ग्रँडपपापासून चौघं चार दिशांना बेबीच्या शोधार्थ धावलीं पण बेबी कुणाच्याच नजरेस पडली नाहीं. कुणालाच कळेना बेबी अशी गेली तरी कुठं ! ममी तर अगदीं घायकुतीला आली. तिच्या तोंडचं पाणी पळालं. काय करावं ? बेबीला कुठें शोधावी ? बेबीला कुणी भिकाऱ्याबिकाऱ्यांनीं पळवून तर नाहीं नेली ? नाना कुकल्पना, नाना कुशंका. ममीच्या डोळ्यांपुढें मनस्वी भेसूर चित्र उभं राहिलं. बेबीला भिकाऱ्यांनी पंगू केल्याचं-कुरूप, विद्रूप केल्याचं तिच्या डोळ्यांतून आपलं एकाएकीं बळाघळा पाणीच वहायला लागलं. नास्तिक ममी एकदम अस्तिक बनली. मनाच्या एका कोपऱ्यांत कुठंतरी दडून बसलेल्या देवाला तिनं तळमळीनं आळवलं. बेबी सुखरूप परत यावी, म्हणून देवाला पन्नास नवस बोलली पण पोलिसांत वर्दी देण्याखेरीज गत्यंतर नव्हतं म्हणून ती निघाली.

तेवढ्यांत एक पोलीस व्हॅन दाराशी थांबली. ममीच्या पोटांत भीतीचा हा मोठा गोळा उठला. बेबीला कुठं ॲक्सिडेंट तर झाला नाहीं ? पोटात बागबूग झालं. थिजलेल्या डोळ्यांनी ती प्राण कंठाशीं आणून पाहूं लागली. दोन पोलीस. जवान खालीं उतरले. त्यांनीं बेबीचं बोट धरलं तिनं टुणकन् खालीं उडीच मारली आपलं घर पाहताच तिला केवढं अवसान आलं होतं ! ममीला पाहतांच तिनं पटकन् तिला मिठीच मारली. नशीब, बेबी सापडली. देव नवसाला पावला. बेबीला पाहून ममीचा जीव भांड्यांत पडला. चेहरा आनंदानं उजळला. तिनं चटकन् बेबीला उचलून कडेवर घेतलं, छातीशी कवटाळलं अन् पटापट मुके घेतले. पोलिसांचे आभार मानायचं किंवा बेबीसंबंधी ( ती कुठें सापडली वगैरे ) चौकशी करण्याचं कसलंच भान तिला त्या क्षणीतरी मुळींच नव्हतं. तें काम तिनं सावकाश आठवण झाल्यावर केलं. अस्वस्थ जीव शांत, स्वस्थ झाला. बेबीला कुठं ठेवूं नि कुठें नको ठेवूं, असं तिला झालं. पण हा भावनावेग थोड्या वेळानं ओसरला. पोलिसांकडून तिला कळलं, कीं बेबी मिरजेच्या गाडींत बसून एकटीच कुठंतरी चालली होती. तेव्हा बेबीनं न सांगतांसवरता घरांतून असं पळून कां जावं, याचा तिला आश्चर्य वाटलं. मनस्वी रागहि आला. ती बेबीला एकदम ओरडली,

" बेबी, व्हाय डिड यू रन अवे विदाऊट लेटिंग मी नो ? यू मस्ट बी पनिशड् फॉर सच बॅड बिहेवियर ! "

* *

■ १ ■

# स्पर्श

संकष्टीची संध्याकाळ...गांवाबाहेच्या गणपतीच्या देवळाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून माणसं मण्यासारखी घरंगळत होतीं. तसं म्हटलं, तर एरवीं या रस्त्याला वर्दळ कमीच; कांहीं मोजकीं माणसं सोडून. आयुष्यांत सर्वस्वीं तृप्त झालेलं एक म्हातारं जोडपं आतां अध्यात्माकडे वळलं होतं. देव देव करीत होतं. नेमानं दर्शन घ्यायचं, काठी टेकीत टेकीत येत. एक तरुण जोडपं पोरबाळ नाहीं, म्हणून देवळाचा उंबरठा झिजवीत होतं. एक प्रौढा पूजासाहित्य घेऊन नेमानं यायची, भर पावसातसुद्धां. अन् संकष्टीला एकवीस मोदकांचा नैवेद्य घेऊन. ती अशी कां यायची, कां आळवायची देवाला, कोण जाणे! अशींच आणखी चारदोन माणसं. तोहि इथं नियमित येऊन बसायचा. देवळांत जाण्यासाठीं साताठ पायऱ्या आहेत, त्यांतल्या सगळ्यांत वरच्या पायरीपर. अन् संकष्टीच्या दिवशीं देवळांला लागून बांधलेल्या ओवरीवर. बाकी इथें जवळजवळ शुकशुकाट.

सकाळीं तर बाजूच्या शहरांत भाजी, लोणी विकायला, दूध घालायला जाणाऱ्या लोकांखेरीज फारसे चेहरे दृष्टीस पडत नसत. कारण देऊळ तसं दूर, गांवापासून मैल दीड मैलाच्या अंतरावर. पण गणपती उजव्या सोंडेचा, नवसाला पावणारा ( सिद्धिविनायक ) अशी ख्याति, त्यामुळें लोक इकडे धावायचे, नवस करायला, साकडं घालायला. अन् विशेषतः संकष्टीला मोठ्या भक्तिभावानंच रीघ

लावायचे. खेचाखेचींत दर्शन घ्यायचे.

अलीकडे रहादरी तशी थोडी वाढली होती. कारण ठिकाण नितांतरम्य होतं. थोडं उंचावर देऊळ, बाजूला खालीं वहाणारं नदीचं अरुंद पात्र, त्यामुळें हवेंत वेताचा गारवा. पाणी गुडघाभरच पण संथ, स्वच्छ. बाजूला ज्वारीची शेतं. आणि विशेष म्हणजे देवळाचा आसमंत चिंचेच्या बनानं व्यापलेला. जमिनीवर पसरलेल्या चिंचेच्या तांबूस, पिंवळट फुलांचा आंबट गोड गंध. सकाळ संध्याकाळ बाजूच्या झाडींतून मोरांचं ओरडणं ऐकू यायचं. नि मन टवटवीत, प्रसन्न व्हायचं. त्यामुळें हल्लीं सकाळ-संध्याकाळ लोक फिरायला यायचे.

त्याचं खोपट या देवळाजवळच होतं. दिवसभर तो त्या खोपटाच्या खिडकींत बसून रहायचा, तींच तींच पुस्तकं वाचत; उदासवाणा, रेंगाळणारा दिवस कसाबसा ढकलीत. आणि सकाळ-संध्याकाळ तो या देवळाच्या बाहेरच्या पायरी-वर बसायचा. स्वच्छ, नीटनेटके कपडे घालून, केसांचा व्यवस्थित भांग पाडून देवाच्या मूर्तीकडे तासन् तास पहात. इथूनसुद्धां मूर्ति स्पष्ट, छान दिसायची. गाभाऱ्यांत निरांजन, समई तेवत असायची. गंधाचा, उदबत्तीचा मंद वास दरवळायचा. अंगाणांत सांडणाऱ्या चिंचेच्या फुलांचा आंबट गोड वास त्यांत मिसळायचा. त्या शांत, पवित्र वातावरणानं तो भारून जायचा.

इथें बसून तो देवाचं नांव घ्यायचा, मनोभावानं त्याचं भजन करायचा. स्तोत्रं म्हणायचा. मानसपूजा करायचा. टाळ्या वाजवून आरतींत सामील व्हायचा. पुजारी दुरूनच, चार हाताच्या अंतरावरून झारींतनं तीर्थ त्याच्या हातावर घालायचा. लांबूनच त्याच्या हातांत प्रसादाचं खोबरं टाकायचा. एकदा तीर्थ-प्रसाद घेण्यासाठीं तो देवळांत गेला. तेव्हां पुजारी त्याला म्हणाला, 'आंत नका येत जाऊं तुम्ही. बाहेरच आणून देईन मी तुम्हांला तीर्थप्रसाद...

बोलतां बोलतां पुजाऱ्याची नजर त्याच्या हातापायाकडे वळली. तो काय तें मनांत उमगला. पुजाऱ्याचं बोलणं त्याला फार लागलं. तेव्हांपासून तो बाहेरच बसायचा. तिथूनच तीर्थप्रसाद घेऊन जिवाच्या आकांतानं, तळमळीनं तो आपलं गाऱ्हाणं देवाला सांगायचा.

अलीकडे तो सारखा देव देव करायला लागला होता. त्याची वृत्ती अशी अध्यात्माकडे वळणं साहजिकच होतं. नाहींतर त्याच्या नशिबांत आतां दुसरं उरलंच होतं काय ? नव्हतं स्त्रीचं सुख, मुलाबाळांचं सुख, संसाराचं सुख. नव्हतं

साधं स्पर्शाचंहि सुख.

नुकतीच घडलेली गोष्ट...

रोजच्याप्रमाणें तो देवळाच्या पायरीवर बसला असतांना एक बाई देवळांत शिरली. तिच्याबरोबरचा तो छोटासा गोरापान मुलगा...त्याचे भुरे भुरे केस, निळे निळे डोळे, गुलाबी गुलाबी गुबगुबीत गाल. त्याला वाटलं हळूंच एक गालगुच्चा घ्यावा त्या पोराचा. त्याच्या मनांत ही कल्पना आली मात्र...

"अरे अरे, इकडून ये नं. तिकडे कुठें गेलास कडमडायला ?..." असं म्हणून त्याच्याकडे तिरस्कारानं, घृणेनं नजर फेकीत त्या बाईनं मुलाला खसकन आपल्या बाजूला ओढलं.

"पन काय ग झ्यालं इकडून गेलो तल...?" त्या अजाण पोराचा प्रश्न.

"शीः ! अरे तो घाणेरडा भिकारी बसलाय न तिकडे. त्याला शिवायचं नाहीं आपण. समजलं ?..." तिनें त्या पोराला हळूंच सांगितलं, तरी त्याला तें ऐकूं गेलंच.

मग आपल्या पाकिटांतनं पांच पैशाचं नाणं काढून तिनं तें त्याच्या पुढ्यांत भिरकावलं.

"बाई, भिकारी नाहीं मी कुणाकडनं भीक घ्यायला. परत घ्या तुमचे पैसे. दुसऱ्या एखाद्या भिकाऱ्याला द्या ते..."

तो असं म्हणाला, तरी त्याच्याकडे फेकलेल्या पैशाला स्पर्श करायला ती तयार नव्हती. तिनं अंगाची नुसतीच चुळबूळ केली. अन ती तशीच पुढें निघून गेली. तो काय तें मनांत उमगला. त्यानं ते पैसे एका आंधळ्या भिकाऱ्याला देऊन टाकले.

असं कांहीं घडलं कीं, तो फार दुखावला जायचा. बेचैन व्हायचा, कधीं कधीं वैतागायचाहि, आपल्याच वाट्याला हा भोग आला म्हणून. पण पुष्कळ वेळां आपल्या आसवांनीं ती पायरी ओलीचिंब करायचा. देवाशीं बोलायचा—एकटाच त्याला उत्तर द्यायला, त्याची व्यथा जाणून त्याच्याशीं सुखदुःखाच्या गोष्टी बोलायला तिथें होतंच कोण ?

सुरुवाती सुरुवातीला (त्याला या खोपटांत ठेवल्यावर) त्याचे आईबाप, भाऊबहीण कुणीतरी घरून त्याचं जेवण घेऊन यायचं. दुरून का होईना, दोन शब्द त्याच्याशीं बोलायचं. पण हळू हळू त्यांचं येणं मंदावलं, रोडावलं अन

शेवटीं बंदच झालं. आतां घरगडी जेवण घेऊन यायचा. खोपटाच्या बाहेरच, चार हात अंतरावर उभा राहून, घरच्या भांड्यांतून आणलेलं अन्न त्यानं आपल्या खोपटांतल्या पुढें केलेल्या भांड्यांत वाढायचा. वेळ असलाच, तर चार दोन शब्द बोलायचा. वरवरच्या आपुलकीचे, पोकळ सहानुभूतीचे—नाहीं तर तर तसाच निघून जायचा गडबडीनं. प्रेमाची, नात्यागोत्याचीं माणसंसुद्धां त्याच्याशीं बोलायचं टाळीत होतीं. तर दगडाचा देव काय बोलणार ? तरीहि तो तसाच बोलायचा. स्वगत बोलल्यासारखा. कारण तें भयानक एकलेपण त्याला खायला उठत होतं अजगरासारखं.

पण इथें देवाच्या दारीं बसून त्या आसमंतानं थोडासा उल्हसित व्हायचा. थंड हवेचे घुटके घ्यायचा. आपली व्यथा थोडी का होईना, विसरायचा. तास दोन तास असे घालवून फरफटत फरफटत तो पुन्हां आपल्या खोपटांत यायचा.

पुन्हां दुसऱ्या दिवशी सगळं तसंच.

गेली सातआठ वर्षं त्याचा हा असाच कार्यक्रम चालला होता. जडशील, पण तरीहि अखंड, अव्याहत. वास्तविक त्याचं सगळं जीवनच घुसळून निघालं. पण तरीहि त्याला गति कशी ती नव्हतीच. नव्हतं चैतन्यहि. तें नीरस, कंटाळवाणं होतं. जीव आहे म्हणून जगवायचा, इतकंच.

नेहमींप्रमाणें संकष्टीला त्या देवळाशी बांधलेल्या ओवरीवर तो बसला होता. रंगीबेरंगी दुनिया पहात, जिवाला थोडा विरंगुळा, थोडी करमणूक म्हणून. आणि अचानक त्या जोंधळ्याच्या शेतामागनं पांच सहा पोरींचा घोळका बाहेर पडतांना त्याच्या दृष्टीस पडला. ज्वारीच्या कणसातनं रंगीबेरंगी फुलपांखरं उडत उडत यावीं, तशा त्या पोरी आल्या अन चिंचेच्या वनांत शिरल्या. त्याला मोठी गंमत वाटली. हंसत खिदळत चिंचेची पिवळट तांबूस रंगाची, आंबट गोड चवीचीं फुलं उड्या मारमारून झाडांच्याफांद्यांना लोंबकळून त्या तोडीत होत्या. त्या सगळ्या अजून पाठमोऱ्या होत्या. झाडांच्या ग्रर्द झाडींत लपलेल्या होत्या. पण कोवळ्या कोवळ्या चिंचा नि फुलं काढून झाल्यावर त्या वळल्या. घोळक्याच्या मध्यभागीं असलेली ती गोरीपान, रेखीव अवयवांची बांधेसूद मुलगी त्यानं पाहिली मात्र...तो मनस्वी लाजला, कां कोण जाणे !

मान मागें टाकून खळखळून हंसणारी; अल्लड, अवखळ हावभावांची ही पोरगी...कोणाची कोण बरं ? गांवांत नवीनच झालेल्या बंगल्यांतली असेल का ?

कां कुणाकडे पाहुणी म्हणून आलीय? गेल्या आठदहा वर्षांत गांव किती झपाट्यानं बदललं होतं. नवीन वसाहती झाल्या होत्या. एक्स्टेन्शन्स झालीं होतीं. टुमदार बंगले उठले होते. हे नवीन लोक त्याला ओळखणं शक्य नव्हतं. गेलीं आठ दहा वर्षं गांवांपासून संपर्कच सुटला होता. पण तिला पूर्वी कधीं पाहिल्याचें त्याला आठवेना. बाकी पाहिली असली, तरी कशी ओळखणार? तेव्हां ही शेंबडी पोर येवढीशी असेल...फ्रॉक घालणारी. आतां वयांत आल्यावर फरक पडणारच कीं, ओळखू न येण्याइतपत.

ती गोरीपान मुलगी ओंजळभर चिंचेचीं फुलं घेऊन, ती खात खात त्याच्याच बाजूनं देवळांत शिरली. पानांच्या सळसळीबरोबर तिच्या रेशमी कपड्यांची सळसळ त्याला जाणवली. सुरेखसा गंध आला. तिचं तें गोडसं हसणं....तो बावरला. काळजांत लक्क झालं. अंगावर गोड शिरशिरी उमटली. त्यानं आपले तळवे उगीच एकमेकांवर घासले. पाय आखडले. लांब केले. अन् मग शरीराची अशीच कांहीं अस्वस्थ हालचाल करीत ती बाहेर पडण्याची तो वाट पहात राहिला.

अर्धा तास झाला, तरी त्या पोरी बाहेर पडल्याच नाहींत. देवळाच्या एवढ्याशा आवारांत त्या रमल्या तरी कुठं? बाहेर पडायला दुसरा मार्गहि नाहीं.

हळूहळू गर्दी पांगली. एकवीस मोदकांचा नैवेद्य दाखवून ती नेमानं येणारी बाई परत फिरली. ते म्हातारं जोडपं मधेंच तोंडानं देवाचं नांव घेत घेत, मध्येंच नातवंडांच्या कौतुकाच्या गोष्टी करीत निघून गेलं. मुलासाठीं नवस बोललेलं ते तरुण जोडपंही जोडप्यानं पूजा आटोपून घरीं परतलं आणि देऊळ जवळजवळ रिकामं झालं, देवळाचा पुजारी नि गुरव याखेरीज. त्याच्या मनाला चुटपुट लागली. तो पोरींचा घोळका त्याला दिसलाच नाहीं. विशेषतः स्कर्ट ब्लाऊझ घातलेली ती गोरीपान मुलगी...त्याला तिला पुन्हां पहायची होती. ती त्याच्या मनांत मनस्वी ठसली होती. त्याची नजर देवळाच्या प्रवेश-द्वारावर घुटमळत राहिली. आपण तंद्रींत असतांना ती निघून तर नाहीं गेली? त्याला आतां रहावेना. हळूहळू काळोख पसरूं लागला. आतां त्या गेल्या नक्कीच, आपल्या नकळत. तो उठला. हळूच त्यानं कानोसा घेतला. देवळांतल्या बोअरिंगच्या विहिरीचं थंडगार पाणी त्या पीत होत्या. मधेंच तेंच पाणी

हातानं एकमेकींच्या अंगावर उडवून खिदळत होत्या. मग सावकाश त्या बाहेर पडल्या.

गर्द झाडीमुळें काळोख लवकर भरला. तिचं रूप डोळ्यांत साठवून ठेवण्यासाठीं तो अधीर झाला होता. डोळे ताणून ताणून पहात होता. पण ती त्याला पुन्हां तितकी स्पष्ट, रेखीवपणें दिसलीच नाहीं. तिची पुसटशी आकृति तेवढी त्याला दिसली. त्याचा जीव चुटपुटला. हळहळला. ती लौकर आली असती तर ? फार उशीरानं आली ती. लगेच काळोख दाटला. त्यांनून संकोचानं प्रथम डोळे वर करून पहाणंहि जमलं नाहीं. एकदम आपलं गोंधळायलाच झालं. आधींच माणसांची ही गर्दी, त्यांत आणखी ती मैत्रिणींच्या घोळक्यात. चेहरा पुसटसा, ओझरताच दिसला. आपण आज त्या पायरीवर बसलों असतो तर ? अगदीं जवळून निरखून तिला पहाता आलं असतं. त्या पोरींचा चिवचिवाट तेवढा कानावर पडला.

" अय्या ! किती काळोख झाला. घरीं वाट पाहणार. आतां काळजी करणार. " " अगोबाई ! इथें आहे वाटतं असं कुणी काळजी करणारं ? "

" चल ग ! चहाटळ कुठली ! " ती खुदकन हंसली. मैत्रिणीच्या पाठीवर तिनं लटक्या रागानं चापट मारली. " आजी आहे घरीं, म्हटलं, वाट पहाणारी, काळजी करणारी. समजलं ? "

" ए, पण नवस काय केलास देवाला ? "

" नवस ? नवस नाहीं बाई केला कांहीं. नुसतं सांगितलं, चांगला क्लास मिळूं दे परीक्षेंत. "

" कसल्या परीक्षेंत बाई ? " एकीचा खोंचक प्रश्न.

" बी. ए. च्या, दुसऱ्या कसल्या ? इश्श ! भारीच बाई वाह्यात पोरी तुम्ही. "

" अन् तुम्ही अगदीं आजीबाईच ? "

" मग काय तर ! स्कर्ट ब्लाऊझ पहा किती भिजवलात माझा. "

" मग वसंतसेना शोभशील आतां. "

" अगबाई ! चारुदत्त आहे वाटतं इथं कुणी ? "

" ए, तुम्हांला वात्रटपणाशिवाय दुसरं कांहीं सुचतच नाहीं का ग ? "

यावर हास्याची चांगलीच खसखस पिकली.

" चला आतां. पाऊल उचला. काळोख झालाय खूप. मला तर बाई साप-किरडाची भारी भीति वाटते. आजीला वाटेल कुणीकडनं बोलावलं इथं सुटींचं नातीला. "

मग हळूहळू सगळ्या दिसेनाशा झाल्या.

त्या दिसेनाशा झाल्या, तरी किती वेळ तो तिथे तसाच बसून होता. त्या गेल्या त्या वाटेकडे पहात राहिला होता. एका तंद्रींत होता. धूपारतीची वेळ झाली. भटजींनीं भसाड्या स्वरांत म्हटलेल्या आरतीच्या आवाजांत घंटेचा आवाज मिसळला. पाठोपाठ नगारा सुरू झाला. तो तंद्रींतून बाहेर आला. ठराविक ठिकाणीं देवळाच्या पायरीवर जाऊन बसला. आरतीसाठीं टाळ्या वाजवूं लागला. पण आज त्याचं खरं लक्ष त्या आरतीकडे नव्हतं. गणपतीच्या मूर्तीच्या जागीं त्याला ती मघाचीच मुलगी दिसायला लागली. आपली अशी काय अवस्था झाली, त्याला नक्की अंदाज बांधतां येईना. नकळत त्याच्या ओठांतून शीळ उमटली. त्या शीळेवर तो गुणगुणत होता, मागं वाचलेल्या कुठल्याशा काव्यांतल्या ओळी...

सहज कुणाला दुरून पाहिले.

..........................

स्पर्शावाचून उमटला कांटा अंगावरी
हरवलें माझें कांहींतरी.

आरती संपली, तरी तरी तो तिथें तसाच बसून होता. मग केव्हां तरी तो तिथून उठला. तिच्या नुसत्या निसटत्या, ओझरत्या दर्शनानंहि त्याच्या मनांत केवढी उलथापालथ केली होती. एरवीं उदासवाण्या असलेल्या त्याच्या जीवनांत एकदम चैतन्य भरलं. मागें केव्हां तरी पाहिलेल्या सिनेमातलं गीत कधीं नव्हें तें आज गुणगुणत तो खोपटांत शिरला. गेल्या कित्येक वर्षांत नव्हता; इतका तो आज खुषींत होता. त्या खुषीची सुस्ति त्याच्या शरीरावर पसरली होती. त्या सुस्तींत तो किती वेळ अंथरुणावर नुसताच पडून होता. स्वतःशींच खुसुखुसु हंसत होता. रात्रीं झोंपेतसुद्धां ती गोरीपान, बांधेसूद मुलगी त्याला सारखी दिसत होती. त्याच्या ओठांतून गोडसं हंसू फुटत होतं. शब्दांवाचून संभाषण होत होतं.

गेल्या आठ दहा वर्षांत असं कधींच झालं नव्हतं. रोज दर्शनाला माणसं येतं

संकष्टीला तर झुंबड उठे लोकांची. पुरुष, बायका, मुलं नि तरण्याताठ्या पोरीहि. अगदीं सुंदर, सुंदरशा. अंगापिंडानं टंच भरलेल्या. पण त्याच्या मनांत खळबळ माजली नव्हती. एक आगळीच, गोडशी शिरशिरी उमटली नव्हती. एकाद्या व्यक्तीकडे पहात न् पहातच रहावं तास न् तास असं त्याला कधींच वाटलं नव्हतं. पण आज जें घडलं तें विपरीत, अनपेक्षित.

मग दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं रोजच्याप्रमाणें तो त्या पायरीवर जाऊन बसला. नकळत तिची वाट पहायला लागला. बराच उशीरापर्यंत ती आली नाहीं. त्याला काळजी वाटूं लागली. काल~तिच्या कपड्यांवर, अंगावर, त्या वात्रट पोरींनीं पाणी उडवून तिला भिजवून टाकलं. तिनं चिंचाहि खाल्ल्या खूप. त्यावर गार गार पाणी प्यायली. तिला सोसलं नसेल तें कदाचित्. ताप, खोकला तर आला नाहीं तिला त्यामुळें ? आज आतां ती येणार नाहीं. पण तेवढ्यांत ती आली. त्याच्या मनानं आनंदानं टाळ्या पिटल्या. आपले हातपाय पटकन कपड्यांत गुरफटून तो तिच्याकडे पहात राहिला.

आज ती दगडी रंगाच्या पार्श्वभूमीवर गुलाबी रंगाचीं फुलं असलेली रेशमी साडी नेसली होती. साडीला मॅचिंग असा गुलाबी ब्लाऊझ तिनं घातला होता. ती पुनः पुन्हा पदर सावरीत होती. साडी नीट आहे ना तें मागें पुढें नजर टाकून पहात होती. साडी नेसण्याची संवय नसावी बहुतेक तिला. आपल्या पोशाखांत कांहीं बदल झाला कीं, कॉन्शसनेस येतो तसा कॉन्शसनेस तिच्या हालचालींत वाटत होता. पाठीवर लांबसडक शेपटा चालण्याच्या प्रत्येक आघाताबरोबर नागासारखा डौलदार हलत होता गालांच्या खळीवर पहाणाऱ्यां नजरा चिकटत होत्या. कानांतल्या रिंग्ज मजेदार हलत होत्या. तिची एकंदर हालचालच मजेशीर नि लोभस होती. सर्कशींत हिंस्र श्वापदांना खेळवणाऱ्या बाईसारखी. तो तिच्याकडे पहात राहिला. हरखून गेला. स्वतःला हरवून बसला. अन् मग ती दृष्टीआड होईपर्यंत पहातच राहिला. त्यानं तिला सबंधच्या सबंध आपल्या डोळ्यांत अलगद ठेवून दिलं.

कालच्याप्रमाणेंच आजहि त्या पोरींनीं कोवळ्या चिंचा उड्या मारमारून ओरबाडून काढल्या. तांबूस, पिवळ्या फुलांनीं तिच्या गोऱ्यापान, तांबूस तळव्यांना आणखीच नाजुकपणा, उठावदारपणा आला होता. तिची साडीसुद्धां कशी या तळव्यांना मॅचिंग होती.

चिंचा नि फुलं खात, खात दर्शन घेऊन चेष्टामस्करी करीत करीत त्या निघून गेल्या.

तो धुंद झाला. त्या धुंदीतच त्यानं आरतीच्यावेळीं एरवीपेक्षां जोरजोरांत टाळ्या पिटल्या. एका निराळ्याच बेहोषींत तो आपल्या खोपटांत शिरला अन् ती धुंदी शरीरावर, मनावर घेऊन वावरत राहिला. दुसऱ्या दिवशींची संध्याकाळ केव्हां होते नि ती पुन्हां केव्हां दृष्टीस पडते, याची वाट पहात राहिला. वेळ भराभर कां धांवत नाहीं, याचं त्याला नवल वाटलं.

मग तिसऱ्या दिवशीं संध्याकाळीं लवकरच तो पायरीवर जाऊन बसला. तिच्या वाटेकडे त्याचे डोळे लागले. हळूंहळूं काळोख पसरला. आज ती आलीच नाहीं. त्याला चुकल्या चुकल्यासारखं झालं. बहुतेक ती पलीकडच्या वाटेनं फिरायला गेली असावी. रोज ती इकडंच कशी येईल ? आपण तिकडे जाऊन बसायला हवं होतं. ती दिसली असती. नजरेचं पारणं फिटलं असतं. त्याचा जीव हळहळला.

दुसऱ्या दिवशीं त्या दुसऱ्या वाटेवर तो फरफटत जाऊन बसला. तिची मार्गप्रतीक्षा करायला लागला. पण आजहि ती त्याला दिसली नाहीं. छे ! आपली नि तिची विनाकारण चुकामुक होतेय. ती बहुतेक चिंचेच्या बनांतच गेली असेल, आपण उगीचच इकडे येऊन बसलों. त्याला वाईट वाटलं. मनाला चुटपुट लागली. मग पुन्हां दुसऱ्या दिवशीं तो आपल्या नेहमींच्या जागीं देवळाच्या पायरीवर बसला. पण ती दिसलीच नाहीं. आणि पुढें दोन चार दिवसहि असेच सुने सुने, कंटाळवाणे गेले. ठराविक वेळीं त्याला उगीचच तिच्या पावलांची चाहूल लागायची. कपड्यांची सळसळ ऐकूं यायची. एक गोड गंध नाकांत भरायचा. मग तो वळून पहायचा. पण कुणीच नसायचं. नुसता भास. तो दिवस त्याचा ओकाओका, सुनासुना जायचा. त्याच्या अंगांतलं चैतन्य ओसरायचं. मनानं तो मलूल, दीनवाणा, खंगल्यासारखा व्हायचा, एखाद्या मोठ्या जिवावरच्या दुखण्यांतून उठल्यासारखा. आणि मग ती पुन्हां दिसली कीं, त्याच्या अंगांत उत्साह भरभरून यायचा. मनावर हलक्या हातानं मोरपिस फिरवल्यागत त्याला गुदगुल्या व्हायच्या.

आतां त्याच्या मनाला तोच एक नाद लागला होता. तिची जणुं वाट होऊन तो तिची वाट पहायचा. ती दिसली कीं तिला आपल्या दिठीच्या मिठींत लपेटून

टाकायचा. तिची सबंध आकृति आपल्या डोळयांत घालून घ्यायचा. मग ती निघून गेली, तरी त्याच्या नजरेंत ती जशीच्या तशीच रहायची. तिला तशी आपल्या नजरेंत घट्ट दाबून ठेवण्यात, तिच्या प्रतिमेच्या, हंसण्या बोलण्याच्या आठवणींत स्वतःला गुरफटून ठेवण्यांत तो तासन् तास रंगून जायचा.

पण गेले आठ दहा दिवस त्यानं तिची अधीरपणें वाट पहा पहा पाह्यली, पण ती आलीच नाहीं. तो वाट पहात होता आणि ती येत नव्हती. त्याला वाटलं, सुटीची ती इथं आली होती, आतां गेली असेल बहुतेक आपल्या घरीं. आतां ती पुन्हा दिसणं शक्य नाहीं. तो निराश झाला. त्यानं तिची वाट पहायचं सोडलं. तो पुन्हा आपल्या व्यथेंत बुडून गेला. देवाला गाऱ्हाणं सांगूं लागला. अश्रूंनीं ती पायरी ओलीचिंब करायला लागला.

वास्तविक त्याच्या बरोबरीचे लोक संसारांत गुरफटले होते. एक दोन मुलांचे बाप झाले होते बायका-मुलांसह मजा मारीत होते. मग त्यानंच असं काय पाप केलं होतं, फक्त त्याच्याच वाट्याला हें सुख येऊं नये? कधींच येऊं नये? मागं कॉलेजांत असतांना त्याच्या मनांत एक पोरगी ठसली होतीं. ती अगदीं हुबेहुब अशी होती. त्या वेळीं त्यानं आपल्या डोळ्यापुढं एक स्वप्न पाहिलं होतं, सुंदरसं. आपल्या संसाराचं. पण तें स्वप्न कधींच साकार झालं नाहीं. नियतीनं त्यांत खो घातला. त्याचं सुख हिरावून घेतलं. त्याला या खोपटांत बंदिस्त करून टाकलं.

त्याचं मन तडफडलं.

आणि अचानक एक दिवस त्याला पुन्हां तिची चाहूल लागली. त्यानं वळून पाहिलं. खरंच तीच होती. त्याचं मन एकदम कोकरागत बागडलं. काळजांत लक्क झालं. कानशिलं तापलीं. छाती धडधडायला लागली. सर्वांगांतून विजेची सणक निघाली. श्वास जोरजोरांत व्हायला लागला. काय करावं, त्याला सुचेना, कळेना. मग हातापायाची उगीचच अस्वस्थ हालचाल करीत तो बसून राहिला.

आज ती नऊवारी गुलाबी साडी नेसली होती. नऊवारीत तिचे पुष्ट अवयव जास्तच रेखीव नि उठावदार दिसत होते. आज तिनं छानशी हेअरस्टाईल केली होती. कानांत मोत्यांचीं भोकरं होतीं. सगळा साज तिला किती शोभून दिसत होता.

आजे तिच्याबरोबर काळंभोर कुत्रं होतं. त्याच्याबरोबर खेळत, खेळत ती

येत होती. चेंडू दूर फेकून तो ती त्याला आणायला लावीत होती, त्यानं चेंडू तोंडांत धरून आणला कीं, ती तो पुन्हां फेकीत होती. त्या कुत्र्याला ती आंजा-रीत, गोंजारीत होती. त्याच्या पाठीवरून प्रेमानं हात फिरवीत होती. त्याच्या मानेवर आपला गाल घाशीत होती. त्याला वाटलं, त्या कुत्र्याच्या पाठीवरून आपणहि हात फिरवावा. तिच्या गालाचा त्याला स्पर्श झालाय, तिथंच आपला गाल घासावा. तिच्या अप्रत्यक्ष स्पर्शाचं तेवढंच सुख. त्याला त्या कुत्र्याचा मत्सर वाटला. वाईटहि वाटलं. त्या कुत्र्याइतकंहि स्पर्शसुख आपल्या नशीबांत नसावं ! कुत्र्याला स्पर्श करण्याच्या संधीची तो वाट पाहूं लागला. ती देवळांत दर्शनाला गेली. कुत्र्यानं चिंचेच्या झाडाच्या बुंध्याशीं एक तंगडी वर करून आपला विधी उरकला.मग ते पळत, तिचा मार्ग शोधीत निघालं. कुत्रं आतां एकटंच आहे, ही संधी साधून त्यानं त्याला हात लावण्याचा प्रयत्न केला. पण तें भोऽऽ करून एकदम त्याच्या अंगावर आलं. दोन तीनदां भुंकलं आणि धांवत तिच्या मागें निघून गेलं. तिच्या अप्रत्यक्ष स्पर्शाचं सुखहि निसटलंच.

त्या वनात, दोन झाडांच्या फांद्यांच्या महिरपींत ती बसली होती, कुणाची तरी वाट पहात मखरांत देवी बसावी, तशी ती त्याला वाटली.

थोड्याच वेळांत तिच्या दोन मैत्रिणी आल्या आणि त्यांच्या किलबीलीनं ते वन बोलकं झालं.

" अय्याऽऽऽ ! नऊवारीऽऽऽ ?..." एकजण. " अन् आज अगदीं हेअर-स्टाईलसुद्धां ऽऽऽ ?..." दुसरी.

" टॉप झालीय हं पण..."

" अगबाई ! बघू बघू तरी नऊवारीत कशी दिसतेस ! '...पुन्हां पहिली.

मग दोघींनीं मिळून तिला उभी करून आपादमस्तक न्याहाळलं. तिला वाटोळी फिरवून मागून पुढून निरखली.

" ए, काय चालवलं आहेत काय हें ! फिरवताय काय मला अशी गाऱ्या-गाऱ्या भिंगोऱ्या केल्यासारखं ? "

" ए अशी मस्त दिसतेस तूं ! "

" खरंच मस्त. एकदम टॉप !..." तो म्हणाला अर्थात्च मनांतल्या मनांतच.

" मी जर पुरुष असतें न, तर..."

" काग ग, काय केलं असतंस ? " एकीचा मिस्किल प्रश्न.

" बरं बरं. पुरें झालं हं आतां फार वाहवलात दोघी..." ती डोळे मोठे वटारून म्हणाली.

त्या दोघीहि हंसल्या, हीः हीः हीः हीः करून. तोहि स्वतःशीच हंसला. पण थोडं मोठ्यानंच.

नित्याप्रमाणेंच गप्पाटप्पा करीत त्यांनीं दर्शन घेतलं. तिनं आपल्या छोट्या रुमालांत चिंचा बांधून घेतल्या होत्या त्या खात, खात ती त्यांच्याबरोबर बाहेर पडली. खाता, खाता तिच्या हातानं गाभुळलेली चिंच निसटली नि ती नेमकी पडली त्याच्या पुढ्यांतच त्यानं ती पटकन् लपवली.

" इश्श ! चिंचा सगळ्या गळतातच आहेत बाई खालीं. "

" एका वितीच्या रुमालांत कशा रहाणार त्या ? मोठा नाहीं आणायचा ? "

" जाऊं दे ग गळाल्या तर. उद्यां काढूं आणखी. "

" वा ग वा गाभुळलेल्या आहेत या. दुसऱ्या आंबट, तुरट आहेत अजून. "

" ए, मग आम्हाला दे की गाभुळलेली एकेक. "

" दोनच आहेत आता. चिमणीच्या दातानं देते हवी तर थोडी थोडी. "

चिमणीच्या दातानं तिनं दिलेली चिंच खात, खात त्या गेल्या.

त्या दृष्टीआड झाल्याबरोबर त्याच्या पुढ्यांत पडलेली ती गाभुळलेली चिंच त्यानं चाखली. आज त्याचं आतां आरतीकडे, कशाकडेच लक्ष नव्हतं. त्या गाभुळलेल्या चिंचेचं बुटुक चघळत चघळत तो आपल्या खोपटांत शिरला. रात्री झोपेपर्यंत उरलेल्या त्या चिंचेची थोडी थोडी चव तो घेत होता. सकाळीं तो उठला, तरी त्याच्या तोंडांत त्या चिंचेची चव तशीच रेंगाळत राहिली होती.

त्यानंतर पुन्हा लगेच दुसऱ्या दिवशीं ती त्याला दिसली पण आज तिला पाहिल्यावर त्याला आंदुळल्यासारखी गंमत, सुख वाटलं नाहीं. आज तिला पाहिल्यावर तो मनस्वी बावरला. कांहीं एका निराळ्याच संवेदनेनं त्याच्या वृत्ति थरारल्या. अंतर्याम अस्वस्थतेनं पोळलं. हुळहुळलं.

आजच आपल्याला तिच्याबद्दल निराळें असं का वाटतंय ? काय वाटतंय ? नक्की काय हवंय ? त्याचं त्यालाहि कळेना.

पुन्हां तिला पाहिल्यावर त्याच्या मनाचा तोच, तसाच गोंधळ.

तिच्याविषयीं आपल्या मनांत कांहीं चमत्कारिक आकर्षण तर निर्माण झालं नाहीं ? नाहीं तर मग हे जे कांहीं वाटणं आहे, तें नक्की काय आहे ?

तो आपलं मन चाचपून पाहूं लागला.

त्याच्या मनांत तिच्याविषयीं निराळें आकर्षण निर्माण झालं होतं खास. आणि त्या आकर्षणाचं सुदर्शनचक्र त्याच्या मागें रात्रंदिवस फिरत राहिलं.

आतांपर्यंत तिच्याबद्दलच्या आकर्षणाचं स्वरूप नक्की कसं होतं, हें त्यालाहि कळलं नव्हतं. आतां त्याच्या नजरेंत हावरेपणा आला. अभिलाषा आली. मागच्याहून हें स्वरूप कांहीं निराळें आहे, हें त्याला उमगलं. मागच्या आपल्या वाटण्यांत ही विचित्र छळवादी अस्वस्थता खासच नव्हती.

आतां तिला केवळ दिठीत साठवून त्याचें समाधान होईना. पूर्वी ती त्याच्यासमोरून निघून गेली, तरी तिच्या स्मृतीबरोबर तो मनानं फरफटत फरफटत जायचा. त्यांतहि त्याला गंमत, समाधान वाटायचं. धारोष्ण दुधाची चव बराच वेळ तोंडांत रेंगाळावी, तसं तिच्या अदृश्य अस्तित्वाचं सुख त्याच्या मनांत रेंगाळायचं. पण आतां तिला सबंधच्या सबंध डोळयांत घेऊनही त्याची तृप्ति होईना. तिच्या सतेज, टवटवीत, मळींतल्या काकडीसारख्या कोवळ्या लुसलुशीत सर्वांगावरून हळुवार हातानं स्पर्श करावा अन् किंचित् तांबूस, गुलाबाच्या पाकळींसारख्या गालाचं...

पुन्हां एकदां तिला पंजाबी पोषाखांत त्यानं पाहिली, तेव्हां तर त्याची ही इच्छा चांगलीच तीव्र झाली. त्याला रहावेना. मग बसल्या जागेवरूनच त्यानं आपले कुरूप ओठ हळूंच पुढं केले अन् दुरूनच तिचं एक चोरटं ओझरतं चुंबन घेतलं. ओठांची खाज थोडी का होईना, निवली. मनावर तृप्तीचा तात्पुरता शिडकावा झाला. अन् कांहीं दिवस तृप्तीचा हा ओलावा टिकलाहि.

पण एक दिवस अचानक ही त्याची तृप्ति ओसरली. थंडीनं फुटलेलं अंग तडतडावं, तसं मन तडतडायला लागलं. पुन्हां आणखी पुढची ओढ. छळवादी. तिला आपल्या बाहूंनीं शरीराशी घट्ट कुरवाळून धरावं. तिच्या बाहुपाशांनीं आपलं अंग लपेटलं जावं.

आतां याच एका विचारांत तो अंगाअंगानीं बुडून गेला. एकच निदीध्यास. मग एक भयानक विचार त्याच्या मनांत रुतला. कांट्यासारखा. ती सर्वस्वानं आपलीशीं होण्यासाठीं तिला असाच रोग व्हावा. मग ती अशीच या खोपटांत बंदिस्त केली जाईल. अलगद आपल्या मिठींत येऊन पडेल. पण हें व्हावं कसं? आपण तिला एक धक्का मारला, तर तिचं सौंदर्य डागळेल?

आता याच एका विचाराभोंवती त्याचं मन गरगर, गरगर, गोल, गोल गोल फिरत राहिलं.

त्याच्या मनांत रेड्यासारख्या माजलेल्या या खळबळीची तिला विचारीला मात्र कल्पनाहि नव्हती. नेहमींप्रमाणें आपल्या मैत्रिणींच्या बरोबर गप्पाटप्पा करीत करीत ती फिरायला, दर्शनाला आली होती. तिची ती वसईच्या कांद्या-सारखी तेजस्वी, पांढरी धवधवीत कांति, संध्याकाळच्या मावळत्या उन्हांत चमकत होती. त्या कांतीतला रस गटागटा पिऊन टाकावा, तृप्तीची ढेकर द्यावी. तिला पाहून उफाळून आलेल्या या उर्मीसरशी तो एकदम उठला. पाय फरफटत, फरफटत ओढल्यासारखे टाकीत तिच्या दिशेनं निघाला. आतां ती साधारण त्याच्या दृष्टीच्या टप्प्यांत असली, तरी तशी थोडी दूर होती. तिच्या त्या मोहक हालचाली, तें निरागस सौंदर्य...त्याची हावरी नजर त्यावरून फिरली. थोड्याच वेळांत तो त्या सौंदर्याला कवटाळणार होता, सर्वस्वीं आपलंसं करणार होता. त्यानं पावलं उचललीं. पण कशी कोण जाणे, कडेनं चालता चालता ती आपल्या मैत्रिणींच्या मधनं चालू लागली. मग उशीर झाला, म्हणून त्यांनीं भराभर पावलं उचलली. आणि पहातां पहातां त्या दिसेनाशाहि झाल्या.

त्याचं मन अंधारलं गेलं. सगळें कसं मनाजोगतं होण्याचा घाट जमला असतांना अचानक ती हरवली होती. पहातां पहातां निसटली होती हातांतनं. लिंबाच्या बीसारखी. पण हरकत नाहीं. अजून तिची सुट्टी संपली नाहीं. ती पुन्हां येईल इथें. आतां आली कीं, टपून रहायचं. संधि साधून घ्यायची.

मग दुसऱ्या दिवशीच्या संध्याकाळची तो अधीरपणें वाट पहात तिथें बसून राहिला.

रेंगाळणाऱ्या पावलानं संध्याकाळ एकदाची आली. त्याच्या अपेक्षेप्रमाणें तीहि आली. आज ती एकटीच होती. अजून कदाचित् तिच्या मैत्रिणी पण त्या येण्यापूर्वीच, आजूबाजूला कुणी नाहीं ही संधी साधून...

तिला पाहिल्याबरोबर वखवखलेलं त्याचं शरीर पेटून निघालं. शरीराच्या त्या विलक्षण ओढीनं तो तिच्याकडे फरफटत, फरफटत निघाला. अजून ती पाठमोरी होती. केवळ साताठ हातांचंच अंतर. तेवढं कापलं कीं, मग तिला एकदम आपल्या हातांनीं छातीशीं करकचून आवळून धरायचं. अन...त्यानं आणखीच पाऊल उचललं. आतां फक्त वाव दोन वाव अंतर. आणि मग...त्यानं पटकन

पुढें होऊन तिच्या स्टीव्हलेस ब्लाऊझमधून डोकावणाऱ्या गोऱ्यापान, गोंडस दंडाला स्पर्श केला. आता तिला तिला तो कवेंत घेणार...पण त्यापूर्वींच त्या केवळ निसटत्या स्पर्शानंहि ती केवढी दचकली. तिनं वळून पाहिलं. त्याच्याकडे तिची दृष्टी गेली. त्याचं तें किळसवाणं ओंगळ शरीर...त्याच तो स्पर्श... तिच्या सर्वांगावर किळसेचा शहारा उडला. ईऽऽ करून ती जवळ जवळ किंचाळलीच. तिरस्कारानं त्याच्याकडे पहात ती झटकन बाजूला सरली. तिची ती दृष्टी...ईऽऽ करून किंचाळणं...खऱ्या अर्थानं स्पर्श होण्यापूर्वींच त्याचीं गात्रं एकदम लुळीं पडलीं, अर्धांग झाल्यागत. पेटलेलं शरीर बर्फागत थंडगार पडलं. आपले सडके, ओंगळ हात तिच्यापुढें पसरून तो म्हणाला—"बाई, द्या कांहीं भिकाऱ्याला..."

■ १० ■

# दोन उणे दोन

एकाद्या मोठ्या भविष्यकारानं भविष्य वर्तवलं असतं तरी तें खोटं वाटलं असतं, असा अचानक एक दिवस बापूच्या आयुष्यांत उजाडला. त्याच्या हालचालीवर बारीक नजर असलेल्या त्याच्या शेजाऱ्यांच्या लक्षांत अगदीं सहजच आलं कीं, बापूमध्यें एकदम आश्चर्यकारक स्थित्यंतर झालेलं आहे. अन् खरोखरच कुणाच्याहि चटकन् लक्षांत येईल असा, कुणालाहि आश्चर्य वाटेल असा पालट बापूमध्यें झाला होता खरा. त्याची खोली स्वच्छ, नीटनेटकी दिसूं लागली. त्याच्या कपड्यांत व्यवस्थितपणा, स्वच्छता आली. नेहमीं दाढीचे खुंट वाढवणारा बापू आतां रोजच्या रोज नि घोटून घोटून दाढी करूं लागला. एक दिवस तर तो चक्क भडीचे कपडे घालून हिंदी सिनेमाला जाऊन आला. अन् दुसऱ्या दिवशीं जरा उशीराच उठून त्या नवीनच पहिल्या वहिल्यानं पाहिलेल्या हिंदी सिनेमांतलं गाणं नळावर आंघोळीच्या वेळीं गुणगुणतांना लोकांनीं त्याला धडधडीत आपल्या डोळ्यांनीं पाहिलं. कानांनीं ऐकलं. सबंध पुरे आठ दिवस चाळीला हा एक कुतुहलाचाच विषय झाला होता आणि आतां त्यांना कळत होतं, कीं बापू बर्वेचं लग्न ठरलं होतं. शेजाऱ्यांचं एक कुतुहल संपलं. पण दुसरं नवीन कुतुहल निर्माण झालं. बापूचं लग्न ठरलं तरी कसं, कुणाबरोबर, केव्हां नि कुणाच्या मार्फत ?

लोकांच्या मनांत अशी जिज्ञासा उत्पन्न होणं साहजिकच होतं. कारण बापूनं आतांपर्यंत उभ्या आयुष्यांत आपल्या लग्नाचा कधीं विचारच केला नव्हता. फार काय पण वयाची चाळीशी होत आली तरी आपल्या जीवनाचाहि त्यानं कधीं फारसा विचार केला नव्हता. फायनल पास होऊन इंग्रजी जेमतेम दोन चार यत्ता झाल्यावर बापू बर्वेच्या शिक्षणाला पूर्णविराम मिळाला आणि त्याच्या मामाच्या वशिल्यानं तो एका गिरणींत कारकून म्हणून नोकरीला लागला. तेव्हां-पासून आजतागायत तो ती नोकरी इमानेंइतबारें करीत आला होता. ऑफिस आणि घर, घर आणि ऑफिस या व्यतिरिक्त इतर जगाशीं त्याचा फारसा संबंधच नव्हता. त्याच्या नात्याचीं फारशीं कुणी माणसं नव्हतींच. अन् होतीं तींहि त्याच्याकडे कधीं येत जात नसत. तोहि कधीं कुणाकडे जात येत नसे. बापू बर्वे म्हणजे एक बावळट मनुष्य, असंच समीकरण सगळ्यांनीं मांडलेलं होतं. तसं म्हटलं तर बापू मुळींच बावळट नव्हता. दिसण्यांत, वागण्यांत, बोलण्यांत, कशा तच; पण मनुष्य फार भिडस्त असला, अवास्तव गरीब असला, कीं व्यवहारी जग त्याची बावळटांतच गणना करतं. बापू बर्वेहि असाच बावळट ठरलेला मनुष्य होता अन् त्याच्या सर्व नातेवाईकांची तर तशी ठामच समजूत होती. अप्रत्यक्षरीत्या तीं तसं त्याच्या तोंडावर बोलूनहि दाखवत. त्यामुळें बापूचीहि तशीच समजूत झाली होती. सर्वांच्या तोंडून तेंच तें, तेंच तें बऱ्याच वेळां ऐकल्यावर बापूचा बावळटपणा त्याच्या मनावर पक्का ठसल्यासारखा झाला. तो कुठेंहि गेला कीं कुणींहि त्याला वाटेल तें काम करायला सांगे. आपल्या भिडस्त स्वभावामुळें बापूला नाहीं म्हणणं कधींच जुळत नसे. पडेल तें काम, यांत कोणत्याहि प्रकारचा कमीपणा न मानतां, करणं हा बापूचा शिरस्ता; त्यामुळें कोणतंहि, कसलंहि काम तो चटकन् उरके. पण एकदां काम करून घेतलं, कीं मग मात्र त्याला कुणीच विचारीत नसे. कामापुरतीं सगळीं त्याच्याशीं गोड गोड बोलत, चांगलं वागत; पण काम संपलं रे संपलं कीं जणुं कांहीं हा आपला कुणीच नाहीं, हा विनाकारणच इथं येऊन बसतो अशा तऱ्हेनं त्याची संभावना करीत. त्याला टाळण्याचा प्रयत्न करीत. सगळें नुसते कामापुरते मामा ! बापूला आतां हें पुरतं कळून चुकलं होतें. आपल्यासारख्या बावळट माणसाबद्दल कुणालाहि प्रेम वाटणार नाहीं; फार काय, पण कुणाला साधी सहानुभूतिहि वाटणं शक्य नाहीं, याची बापूला खात्री होती अन् म्हणूनच अलिकडे तो कुणाकडेच जात येत नसे.

गिरगांवांतल्या एका कोंदट, जुनाट चाळींत, अगदीं नळाजवळच्या खोलींत, बापू बर्वे गेलीं कित्येक वर्षं राहात होता. नळावर जाणाऱ्या येणाऱ्या लोकांच्या वर्दळीचा बापूला भारी उपद्रव होई. शिवाय संडास–बाथरूमची घाण बापूला खोलींत बसणंहि अशक्य करी म्हणून खोलीचं मागील दार बापू बंद ठेवी. दहा बाय दहाच्या या खोलींत बापूचा ब्रह्मचारी संसार थाटलेला होता. त्याच्या खोलींत मोजकंच सामान होतं. त्यांत एक वेताची, कांहींशी जुनाट, गंजलेली ट्रंक होती. या ट्रंकेंत बापूचे चार दोन खाकी शर्ट नि एक धोतर एवढेच कपडे होते. ट्रंकेवरच एक फळकूट टाकून बापूनं त्याचं टेबल बनवलं होतं. या ट्रंक–कम्–टेबलावर कैक वर्षांत साफसूफ न केलेला एक स्टोव्ह, दोन पातेल्या, एक कपबशी, चहाचं गाळणं नि चहा-साखरेचे दोन डबे इतकं सामान दाटीवाटीनं ठेवलेलं होतं. एका कोपऱ्यांत एक वळकटी होती. त्यावरचा पलंगपोस अन् तिला बाहेरून गुडाळलेली सतरंजी कळकट, मळकट दिसत होती. दुसऱ्या एका कोपऱ्यांत विडयांचीं थोटकं पडलेलीं असायचीं. पहांटे उठल्यापासून रात्रीं निजेपर्यंत ओढलेल्या विडयांचीं सगळीं थोटकं तो सबंध दिवस याच कोपऱ्यांत जमा करीत असे. तिसऱ्यांत कोपऱ्यांत एक टमरेल, एक तपेली व पाण्याचं एक छोटसं साठवण होतं. एका छोट्याशा पातेल्यांत पिण्यासाठीं भरलेलं पाणी अन् जवळच एक पितळी फुलपात्र होतं. एवढा आटोपशीर बापूचा संसार होता. नाहीं म्हणायला त्याच्या सगळ्या सामानांत एकच चांगलीशीं, चकचकीत वस्तु होती. ती म्हणजे एक कांचेची, सुबक आकाराची, स्वच्छशी बरणी. त्याच्या उशागतीच, बसल्या, बसल्याहि हाताला येईल इतक्या उंचीवर, एक फळी मारलेली होती. अन् त्यावर, त्या एकमेव चकचकीत बरणींत चॉकोलेट, पेपरमिंट, खडीसाखर असा कांहीं तरी स्वस्तांतला पण लहान मुलांच्या आवडीचा खाऊ असे. बापूला लहान मुलामुलींची फार आवड होती. चाळींत एकंदर किती बिऱ्हाडं आहेत, त्यांत कुठं कोण कोण राहातं, कुणाकडं किती माणसं आहेत, याची बापूला कधींच माहिती नव्हती. अशी खानेसुमारी करण्याचा बापूचा स्वभावच नव्हता. असल्या चांभार चवकशा करण्याचा त्याला उलट तिटकारा होता. पण मजल्यावर राहाणारीं झाडून सारीं मुलं बापूच्या परिचयाचीं होतीं. सबंध दिवसांत एकदां तरी तीं नेमानं बापूकडं येत अन् बापूहि नेमानं त्यांना त्या बरणींतील खाऊ वाटी. तो खाऊ त्यानं त्या चिमण्या जिवांसाठींच आणून ठेवलेला असे.

बापूचा सबंध दिवसाचा कार्यक्रमहि ठरलेलाच असायचा. अगदीं चाकोरी-सारखा. पहांटे चार वाजतां जेव्हां सगळी चाळ झोपलेली असे तेव्हां बापू एकटाच सगळ्यांच्या अगोदर उठे. आंतल्या छोट्याशा मोरींत चूळ भरून टाकून तो गरमागरम चहा करून घेई अन् मग विडीचा झुरका मारून तो पांच मिनिटं पुन्हां अंथरुणावर लोळत पडे. नंतर उठून तो आपल्या खोलीचं मागचं दार उघडी; नळावर जिकडे तिकडे सामसूम, शुकशुकाट अंधार असे. चाळ जरा आंतल्या बाजूलाच असल्यामुळें मुंबईतलीं पहांटेची ट्रॅम-बसची वर्दळ इथं मुळींच जाणवत नसे. अशा त्या वातावरणांत बापू एकटाच तिथं वावर करी. एखाद्या भूतासारखा. प्रथम दिव्याचं बटण दाबून तो नळावर उजेड करी. प्रातर्विधि उरकले कीं मग नळाखालीं बसून गार पाण्यानंच आंघोळ करी. बारा महिने बत्तीस काळ त्याची गार पाण्याची आंघोळ कधीच चुकली नाहीं. तोंडानं एकीकडे मारुतीस्तोत्र पुटपुटतच तो खोलींत येऊन धोतर नेसे. मारुतीच्या तसबिरीपुढं उदबत्ती लावायला तो कधीच विसरला नाहीं. मग त्याला पुन्हां चहा पिण्याची तल्लफ येई. गरमागरम चहाची लज्जत चाखून तो एक विडी ओढी. गादी कशीबशी गुंडाळून ती कोपऱ्यांत ढकलून देई. अन् मग आपल्या खोलीं-तल्या त्या जरीपुराण्या, एकमेव आरामखुर्चीत पडून तो दासबोध, तुकारामाची गाथा असलं कांहींतरी संतवाङ्मय वाचीत पडे. मग साडेआठ पावणेनऊच्या सुमारास तो कपडे करण्याच्या मार्गाला लागे. नेसूच्या धोतराचाच काचा मारून त्यावर एक खाकी शर्ट चढवला कीं, त्याची बाहेर जाण्याची तयारी होई. एवढं झालं कीं, तो खानावळीचा मार्ग धरी. तिथून तसाच पुढं तो कामावर जात असे. कामांत त्यानं कधीच चुकारपणा केला नाहीं. बढतीची, पगारवाढीची, बोनसची कशाचीहि अपेक्षा न करतां तो इतमानें-इतबारें आपलं काम करी होता. आज वर्षानुवर्षं व संध्याकाळीं कामावरून परत येतांना खानावळींत जेवूनच मग तो आपल्या खोलींत येऊन पडे. रात्रीं नवाच्या पुढं बापूच्या खोलींत कधींच कुणाला दिवा दिसला नसेल. सुट्टीच्या दिवशीं समुद्रावर जाऊन तासन् तास तो तिथं एक-टाच बसे. फारच कंटाळा आला म्हणजे आपल्या मजल्यावरच्या शेवटच्या बिऱ्हाडांतल्या पेन्शनर अण्णांशीं तो पांच दहा मिनिटं जाऊन बोलत बसे पण तेंहि अगदीं क्वचितच. बाकी चाळींतल्या इतर बिऱ्हाडांत तो कधींच कुणाकडे गेला नव्हता. त्याला कधीं कुणी आवर्जून बोलावलंहि नव्हतं. नाहीं म्हणायला

सत्यनारायणाच्या तीर्थप्रसादाचं निमंत्रण आलं तर मात्र तो अवश्य जाई. पण तिर्थंसुद्धां हातावर तीर्थप्रसाद पडला कीं तोहि खोलीबाहेर पडे कुणी एखादा प्रश्न विचारला तर किंचितसं हंसून जेवढ्यास तेवढं उत्तर देई. तो कधीं कुणाच्या लग्नकार्याला, कशालाच जात नसे. त्याला आतां कुणाबद्दल अन् कशाबद्दलच कुतुहल उरलं नव्हतं. पण सबंध चाळीला मात्र त्याच्याबद्दल एकप्रकारचं कुतुहल होत. तो असा एकांडा का वागतो, म्हणूनच त्याच्या वागण्यावर, हालचालीवर चाळीची बारीक नजर असे.

वर्षानुवर्षे बापू बर्वेचं असं एकाकी जीवन चाललं होतं. अगदीं ठराविक चाकोरीसारखं दिवस येत होता, जात होता. पुन्हां दुसरा दिवस उजाडत होत नि तोहि मावळत होता. पण बापूला आपल्या या एकाकी जीवनाबद्दल कधींच खंत वाटली नाहीं. त्यांत त्याला सुख नव्हतं. दुःखहि नव्हतं आपण एकटेच आहोंत, ही जाणीवसुद्धां त्याला आतां राहिली नव्हती, इतकं हें जीवन त्याच्या आतां सरावाचं झालं होतं.

पण गेले आठ दिवस बापूच्या या त्याच त्या नित्यक्रमांत एकदम स्थित्यंतर घडून आलं. सबंध चाळींत सकाळ दुपार आपापसांत एकच चर्चा सुरू होती. बापू–पुराणाचा सप्ताह मोठ्या रंगांत चाळींत साजरा होत होता. पण हें कसं घडलं, ही सूत्रं कशी हालवलीं, कुणी हालवलीं, ही प्रेरक शक्ति कोण, याचा मात्र कुणालाच उलगडा होत नव्हता; पण सप्ताह संपला अन् अचानक या गोड गुपिताचा स्फोट स्वतः बापूनंच एक दिवस केला. शेवटच्या खोलींतल्या अण्णांकडे तो अचानक त्या दिवशीं जाऊन हजर झाला. मजल्यावरच्या सबंध बिऱ्हाडांच्या दारावरून जातांना बापू बर्वे आज तोंडानं चक्क शीळ घालीत होता. त्या शीळेंतून तो “ कधीं करिसी लग्न माझें ” हें पद मोठ्या तालांत, रंगांत येऊन म्हणत होता, एकीकडे गालांतल्या गालांत हंसत होता. अगदीं बिऱ्हाडांची पुढचीं दारं सताड उघडीं असूनहि. एका बिऱ्हाडावरून तो पुढं गेला कीं त्या बिऱ्हाडांतलीं लोकं दारांतून डोकावून त्याच्याकडे आ वासून पहात होतीं. साठी उलटलेल्या सांवळ्या लक्ष्मीकाकू सुद्धां भराभरा स्वयंपाकघरांतून बाहेरच्या खोलींत येऊन डोकावून पहात उभ्या राहिल्या. सत्तरी उलटलेले गोविंदभट रामरक्षा म्हणतां म्हणतां तशीच अर्धवट टाकून पंचा नेसत नेसत दाराशीं उभे राहिले. बापू बर्वेच्या अंगांत हें वेडं वारं अचानक काय संचारलं, याचंच सगळ्यांना

नवल वाटत होतं. एखाद्या सिनेमा नटासारखा अभिनय आजच बापू कसा करायला लागला याचं आश्चर्य वाटत होतं.

अण्णांच्याकडे गेल्यावरहि जरा वेळ बापू तसाच हंसत शीळ घालीत बसून राहिला. अण्णांना ही बातमी कशी सांगावी, हा त्याला मोठा प्रश्न पडला. बापू आज फार खुषीत आहे हें अण्णांनीं केव्हांच ताडलं. त्याच्या वागण्यावरून, हाव-भावावरून, चेहऱ्यावरून. मिस्किलपणें हंसत हंसत ते त्याला म्हणाले, "काय बापूराव कांहीं विशेष ?" त्यांच्या त्या प्रश्नाबरोबर त्यांना कसं सांगावं हा बापूचा प्रश्न तात्काळ सुटला त्यानं ती विस्मयकारक बातमी हळूंच अण्णांच्या कानांत सांगितल्यासारखी सांगितली. ती सांगतांना बापू कोण लाजला. अगदीं एखाद्या नवीन लग्न ठरलेल्या तरुणीगत ! किती अडखळला. मराठी शाळेंतल्या बालवर्गी-तल्या मुलाला डिपोटींनीं प्रश्न विचारल्यासारखा. खुर्चीवर बसला असतांना पाय हालवीत हालवीत, खालीं पायाकडे लाजऱ्या नजरेनं पहात त्यानं कसंबसं तें एकदा अण्णांना सांगितलं. अण्णांना तें ऐकून खूप आश्चर्य वाटलं. आनंदहि झाला. सबंध आयुष्यात इतक्या खुषींत बापू आज प्रथमच होता. त्यामुळें अण्णांना जास्तच आनंद झाला ते म्हणाले, "फार छान ! अतिशय आनंदाची बातमी सांगितलीत बुवा." मग स्वयंपाकघराकडे तोंड करून ते पत्नीला म्हणाले, "ऐकलंत का हो ? मोठी गोड बातमी आहे. बापूरावांचं लग्न ठरलं. आतां झकाससा चहा देऊन त्याचं तोंड गोड करा पाहूं."

"कशाला, कशाला चहा आतां ? जेवणाचीच वेळ झालीय" बापू म्हणाला तरीहि अण्णांनीं त्याला चहा पाजलाच. मग पोक्तपणानं सल्ला द्यायचा म्हणून ते म्हणाले, "पण तुम्ही सारी व्यवस्थित, खोल चवकशी केली आहे ना ?"

"अं...तशी चवकशी करायची कांहीं फारशी जरूरी नाहीं. तशी ती माझ्या पूर्वीची परिचयाची आहे थोडीशी" बापू गोंधळून अडखळत अडखळत बोलत होता.

"मग काय उत्तमच झालं ! उडवून टाका लवकर बार."

अण्णा खूप मोठ्यानं हंसले. त्यांनीं बापूच्या पाठीवर मोठ्यानं थाप मारली.

बापूसारख्या माणसाचं लग्न कधींमधीं होईल, ही कल्पनासुद्धां अण्णांना नव्हती. त्यामुळें त्यांना खूप आनंद झाला होता. बापूला स्वतःला तरी कुठं कल्पना होती, कीं आपल्या आयुष्यांत इतक्या आनंदाचा दिवस कधीं मधीं का होईना उजाड-णार आहे. त्यामुळें तो तर अगदीं आनंदानं नुसता मोहरून गेला होता.

बापूच्या ह्या आनंदाचं बेंड चाळींत फुटायला फारसा वेळ लागला नाहीं. सगळी चाळ आश्चर्यचकितच झाली अन् त्यांतल्या त्यांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे बापूला एका स्त्रीनं लग्नाबद्दल आपणहून विचारलं होतं. बापूच्याच गांवची, त्याच्या लहानपणीची थोडीशी ओळखीची, एका मराठी शाळेंत मास्तरीण म्हणून काम करणारी अन् आतांपर्यंत वयाच्या जवळ जवळ तीस बत्तीस वर्षांपर्यंत अविवाहित राहिलेली, सावळी पण नाकींडोळीं नीटस्, तरतरीत असलेली, ही मिळवती स्त्री बापूसारख्या माणसाशीं आपणहून लग्नाला तयार होते, तसं त्याला आपणहून विचारते, ही बापूच्या जीवनांतली आनंदाची तितकीच आश्चर्याचीच गोष्ट नव्हती का ? आपल्या उभ्या आयुष्यांत स्वप्नांतसुद्धां न घडलेली, न घडणारी ती अकल्पित घटना घडणार म्हणून बापू साहजिकच हरवून गेला होता. हुरळून जाऊन कोणत्याहि गोष्टीचा फारसा विचार न करतां बापूनं तिच्याशी लग्नाचा संमति दिली अन् त्यानंतर पंधराच दिवसांनीं रजिस्टर पद्धतीनं बापू चतुर्भुज झाला. वास्तविक बापूच्या मनांत साध्या, जुन्या पद्धतीनं लग्न करावयाचं होतं. पण तिच्या इच्छेखातर बापू रजिस्टर लग्नाला तयार झाला अन् तिच्याच मताप्रमाणें कोणत्याहि प्रकारें गाजावाजा न होतां बापूचं नि तिचं लग्न झालं.

हळूंहळूं बापू आणखी बदलूं लागला. त्याच्या घरांत दोन नवीन खुर्च्या, एक टेबल, एक पलंग इत्यादि फर्निचर; चार दोन स्टीलचीं भांडीं वगैरे सामान आलं. खोलीला चांगला फिक्का गुलाबी रंग लागला. बापूच्या कपड्यांत, राहणींत आणखीनच नीटनेटकेपणा आला. बापूनं एक पांढरा शर्ट आणि चांगलीशी पॅंट शिवून घेतली आतां त्याला रोजच्या रोज घोटून दाढी करण्याचा कंटाळा येईनासा झाला. केस पोमेड लावून तो चापून चोपून बसवूं लागला. पहाटे सगळीकडे शुकशुकाट असतांना उठणारा बापू सगळी सात साडेसातपर्यंत अंथरुणांत डाराड्डर आरामांत घोरत पडलेला दिसूं लागला. रात्री अकरा वाजेपर्यंत बापूच्या खोलींत दिवा दिसूं लागला. पूर्वी सारा वेळ मान खालीं घालून वावरणारा हा प्राणी आतां मान किंचित वर करून दुसऱ्याच्या दारावरून जाऊं लागला. चाळींतल्या इतर लोकांशीहि तो अधून मधून हंसण्याची, चार दोन शब्दांची देवाण घेवाण करूं लागला. एकंदरीत काय कीं बापू बर्वे आतां पूर्वीचा बुजरा बापू राहिला नव्हता. सगळी चाळ एकमुखानं म्हणत होती. बापू आतां माणसाळला. इतर चार माणसारखाच स्वाभाविक झाला.

वास्तविक बापूच्या लग्नाला आतां कुठं महिना, सव्वा महिनाच झाला होता. पण गेल्या सबंध महिन्यांत बापूंत केवढा तरी बदल घडून आला होता. तसें म्हटलं, तर या सबंध महिन्यांत बापूची बायको फार तर पंधरा वीस दिवसच काय ती बापूच्या खोलीवर असेल. बाकीचे दिवस या ना त्या कारणानें ती आपल्या वहिणीकडे, म्हणजेच माहेरीं होती. बापूला वाटे, आतां तिनं कधींहि माहेरी जाऊं नये, पण तिचं मन दुखूं नये, म्हणून तो तसं कधीं उघड उघड म्हणाला नाहीं. 'तू आतां बिलकुल माहेरी जातां कामा नये. एकसारखं आहे काय माहेरीं? मग लग्न तरी कशाला केलंस?" अशा प्रकारची कांहीं वाक्यं बापूला वास्तविक तिला हक्कानं म्हणतां आली असती, कारण तो आतां तिचा कायदेशीर नवरा होता. पण बापूच्या मूळ स्वभावांतच हें नव्हतं. कुणालाहि तोडून, एक घाव दोन तुकडे बोलणं त्याला कधींच जुळलं नसतं. आवडहि नसतं. मग प्रत्यक्ष त्याच्या लाडक्या पत्नीला असं तो बोलणार! फक्त एकदां ती माहेरी निघाली तेव्हां त्यानं आडवळणानं तिला सुचवलं, "तू माहेरी गेलीस म्हणजे अगदीं करमत नाहीं बुवा आपल्याला."

"इश्श! कांहीं तरीच." ती नुसतीच थोडीशी हंसून म्हणाली.

"खरंच फार ओकं ओकं वाटतं घर. अगदीच एकाकी एकटं एकटं..."

"अय्या! मग इतकी वर्षं कुठें दुकटे होतात?" असं म्हणून ती पुन्हां एकदां माफक हंसली.

"तुला करमतं तिकडं एकटीला? माझ्यावांचून?" बापूच्या या प्रश्नावर तिनं उत्तर द्यायचं टाळलं तेव्हां बापू पुन्हां म्हणाला, "सांग ना, करमतं?"

"हो ऽऽ." तोंडाचा चंबू करून लाडिक स्वरांत ती म्हणाली, "वयाचीं इतकीं वर्षं त्याच घरांत गेलींत म्हटलं माझी."

या उप्परहि माहेरीं जाण्याचा आपला हेका तिनं मुळींच सोडला नाहीं. ती त्या दिवशी बापू घरांत असतांनाहि तशीच निघून गेली.

पण तिच्या या हेकट वागणुकीबद्दल बापूनं जराहि तक्रार केली नाहीं. अगदीं आपल्या मनाशीसुद्धां तिचं कसंहि वागणं त्याला चांगलंच वाटत होतं. ती माहेरीं गेल्यावर चैन पडेनासं झालं म्हणजे हें नाहीं तें निमित्त काढून तोच तिकडे जाऊन तिला भेटून येत असे. तिनं घरांत इतर चार गृहिणीसारखं हौसेमौजेनं राहावं, संसार सजवावा, स्वयंपाकपाणी करावं, अशी बापूची फार इच्छा होती

अन् एक दिवस त्यानं हळूंच अप्रत्यक्षरीत्या ती तिच्याजवळ बोलून दाखवलीहि. वर्षांनुवर्षं खाणावळींत जेवणाचा माणसाला कंटाळा येतो नाहीं ?" तो म्हणाला. "तुलासुद्धां या डब्यातल्या जेवणांत गोडी वाटत नसेल ?"

"हो ना. पण करणार काय ?" ती म्हणाली.

"मला वाटतं. आपण आता घरींच करूं लागलो तर !"

"इश्श ! पण भांडीकुंडीं, सगळाच मांड नवीन मांडायला हवा."

"मग त्याला काय हरकत आहे ? केव्हांतरी तो हवाच नाहीं मांडायला ?"

"पण एवढ्याशा जागेंत; एका खोलींत करणार तरी कसं ?"

"सध्यां सुरुवात तर करूं. मग बघू या हळूं हळूं मोठी जागा."

"मुंबईत जागा मिळणाराय तरी कुठं अशी लवकर ? त्यापेक्षां आहे ती ठीक आहे. शिवाय माझीपण नोकरी आहेच. त्यांतून बघू मग नंतर थोड्या महिन्यांनीं कसं कसं नि काय काय करायचं तें. आतांच नको गडे ! आतां आपले नव्या नवलाईचे दिवस. त्यांत सैंपाकाची रखरख नको बाई पाठीशीं." ती म्हणाली अन हें म्हणतांना तिनं असा कांहीं गोड अभिनय केला कीं, बापूचं सर्वांग एका गोड शिरशिरीनं भरून गेलं. बापूला आपल्या अज्ञानाबद्दल, बावळटपणा-बद्दल कससंच वाटलं, स्वतःचीच कींव आली. तो झटकन म्हणाला, "हो खरंच, तें लक्षांतच आलं नाहीं अगदीं माझ्या !"

कधीं नव्हे ती एकादी वस्तु मिळाली म्हणजे लहान मुलाला जशी ती अप्रूप वाटते, जसा आनंद होतो, ती वस्तु कुठं ठेवूं अन कुठं नको असं होऊन जातं अन त्या वस्तूला सोडायला तो जरासुद्धां तयार होत नाहीं, अगदीं तशीच बापूची अवस्था झाली होती. कधीं नव्हे ती आपल्याला बायको मिळालीय. तिला कुठं ठेवूं अन् कुठं नको ठेवूं, असं बापूला झालं होतं. ती त्याचं सर्वस्व होती. तिची प्रत्येक इच्छा पुरवायला, तिची आज्ञा अंमलांत आणायला बापू एका पायावर तयार होता. तिला एवढंसंसुद्धां दुखवायचं त्याच्या जिवावर येत होतं. इतकीं वर्षं आपण एकटे कसे राहिलो, याचं त्याला आतां नवल वाटत होतं. सारा वेळ तो तिच्या मागं मागं असे. यापूर्वींच हिनं आपल्याला का विचारलं नाहीं ? आपल्या आयुष्याची इतकीं वर्षं एकलेपणांत उगीच फुकट गेली, अशी रुखरुख कधीं कधीं त्याला वाटत असे. आनंदाच्या वेहोषींत बापूचे दिवसाचे सारे कार्यक्रम चालू असत.

आणि थोड्याच दिवसांत बापूची ही आनंदाची धुंदी आणखीनच वाढली. त्याला पुन्हां एक दुसरा गोडसा धक्का बसला. त्याच्या बायकोनं एक गोड गुपित त्याच्या कानांत सांगितलं. हळूच, लाजत लाजत एकांतांत तिनं त्याला आपल्याला दिवस गेले असल्याची बातमी दिली. बापूच्या मनावर आनंदाचा आणखीनच कैफ चढला. त्याच्या शरीराचा कणन्‌कण आनंदानं नुसता फुलून निघाला. आनंदातिशयानं त्या दिवशीं बापू अक्षरशः नाचला. अगदीं एकाद्या वेड्यागत आधींच बापूला मुलांची आत्यंतिक आवड, त्यांत आतां तो स्वतः तो बाप होणार होता. मग काय विचारतां ! बापूनं बायकोला जोरांत ओढून कवेंत घट्ट आवळलं अन ती गुदमरून जाईल इतकीं तिचीं चुंबनं घेतलीं.

आणि लग्नानंतर अवघ्या सातच महिन्यांनीं बापू बाप झाला. चाळींत पुन्हां एकदां कुतुहलाची लाट जोरांत उसळली. आपापसांतल्या चर्चेला, कुजबुजीला नुसता ऊत आला होता. आपला अंदाज खरा ठरला, आपण कसं अगदीं अचूक ताडलं, म्हणून चाळींतल्या बायका एकमेकीला अभिमानानं म्हणत होत्या, " तरी म्हटलं नाहीं मी तुम्हांला ? "

बापूच्या बायकोला सगळी चाळ नाकं मुरडीत होती. बापूची कींव करीत होती पण बापूच्या हें गांवींहि नव्हतं. आपल्याला मुलगा झाला, या एकाच आनंदांत तो मग्न होता. त्याचा तो आनंद त्या चिमुकल्या, मुठीएवढ्या हृदयांत बिलकुल सामावेना. केव्हां एकदां ही बातमी अण्णांना सांगतो असं त्याला झालं. माणसाला एकाद्या गोष्टीचा फार आनंद झाला कीं, ती गोष्ट केव्हां एकदां आपल्या आवडत्या माणसाला सांगतों, असं त्याला होऊन जातं. त्यानं ऐकणाराला तर आनंद होतोच पण सांगणाराचा आनंद तर द्विगुणित होतो. बापू गर्दी गर्दीनं खोलीबाहेर आला. त्यानं अण्णांना ती बातमी जाऊन सांगितली. बापूला कल्पनाहि नव्हती कीं, बापूनं सांगण्यापूर्वीच ही बातमी एकट्या अण्णांच काय पण साऱ्या चाळीलाहि कशी कोण जाणे पण समजलीय. बापूच्या सांगण्यावर अण्णा हंसले. अगदीं कसंसंच वरकरणी म्हणाले, " अभिनंदन हं ! " पण बापूचं तिकडे लक्षच कुठं होतं ? ते पुढें आणखी कांहीं बोलणार होते पण तितक्यांत बापू खोलीबाहेरहि पडला. धाडधाड जिना उतरून तो खालीं गेला. चांगले एक रत्तल पेढे आणून त्यानं आपल्या घरांतल्या मारुतीच्या तसबिरीपुढं ठेवले. आनंदातिशयानं त्याचे डोळे भरून आले. " देवा, हा दिवस आयुष्यांत

कधीं मधीं दिसेल ही कल्पनासुद्धां नव्हती रे. हा तुझाच कृपाप्रसाद." असं म्हणून त्यानं देवाला साष्टांग नमस्कार केला. अगदीं भक्तिभावानं. त्याचं अंतःकरण इतकं सद्गदित झालं होतं कीं, तो देवाशींसुद्धां जास्त कांहीं बोलूं शकला नाहीं.

आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे यानंतर पुढं पांच सात दिवसांनींच बापू ब्वें पुन्हा एक दिवस पहांटे चारच्या ठोक्याला उठला. पूर्वीप्रमाणेंच त्यानं आपलें दिवसाचे सारे कार्यक्रम उरकले. कुणाकडेहि पाहून न हंसता, अगदी खालच्या मानेनं तो कामावर गेला. त्या दिवसापासून बापूचा दैनंदिन कार्यक्रम पूर्ववत् सुरू झाला. बापूची कथा मूळपदावर आली. जणूं बापूचं लग्न झालंच नव्हतं. बापूला मुलगा झालाच नव्हता.

■

▪ ११ ▪

# वास्तु

काड्याच्या पेटींतल्या काडीनं भिकूनं आपला कान टोकरला. मग त्याच काडीचा दुसऱ्या बाजूचा तुकडा मोडून, तो दांताखालीं धरून त्यानं चावायला सुरुवात केली. विड्या पेटवण्यासाठीं ओढलेल्या काड्या भिकू एका जुन्या काड्याच्या पेटीत जमा करून ठेवीत असे. त्या काड्यांनीं कान टोकरण्याचा अन् त्या काड्यांचा दुसऱ्या बाजूचा तुकडा मोडून दांताखालीं धरून चावण्याचा त्याचा फावल्या वेळांत एक आवडता चाळा होता. आतांसुद्धां दहा-पंधरा मिनिटं तो असाच विचार करीत बसला होता. कान टोकरीत नि दांताखालीं काडी धरून चावीत मग एकदम तो स्वतःशींच खुसुखुसूं हंसला. मनापासून आनंदानें कांहींशा सुखद विचारानें. कां कोण जाणे, त्याला एकाएकीं तल्लफ आली सिंगल चहा पिण्याची. वर विडीचा छानदार झुरका मारण्याची नाहींतर पानाचा बार भरण्याची. त्याच्या पैरणीच्या खिशांत चंची होती. भिकूसा छाप विडीहि होती. पण चहासाठीं त्याला बायकोजवळ मस्कापॉलिसी करणं प्राप्तच होतं. वास्तविक आज पहांटे पांच वाजतां त्यानं चहा घेतला त्याला आतां चांगले तब्बल दोन-तीन तास होऊन गेले होते आणि आतां पुन्हां चहा पिण्याची त्याला तल्लफ येणं साहजिकच होतं. कारण तो चांगलाच चहाबाज होता. पण कालच रात्रीं त्यानं एक नेम केला होता. रात्रीं निजण्यापूर्वी त्यानं नि त्याच्या बायकोनं आजपर्यंत साठवलेले सगळे पैसे मोजून पाहिले होते. अजूनहि पुरेसे पैसे

सांठले नव्हते. आणखी कांहीं शिल्लक टाकणं प्राप्तच होतं. त्याशिवाय आज कित्येक दिवस तो जें सुखस्वप्न डोळ्यापुढं पहात राहिला होता तें साकार होणं शक्यच नव्हतं. खर्चात कुठंतरी, कांहींतरी काटकसर करणं भाग होतं अन् म्हणून काल त्याची बायको त्याला म्हणाली होती, " लई पैसं वाया जात्यात तुमच्या या च्या, पान-तमाखू आन इडीपायीं. जास इडी-तमाखू छातीलाबी बरी न्हाई म्हनत्यात डागदर तवा दिसांतून दोनदांच वडीत जा इडी आन पान-तमाखूबी दोन येळांच खावा मंजी खर्च बी वांचल आन् छातीलाबी काय इजा व्हनार न्हाय. "

भिकूला तिचं हें म्हणणं ताबडतोब पटलं होतं अन् म्हणून आजपासून दिवसांतून दोनदा चहा, दोनदां पानतंबाखू अन् दोनदां विडी ओढण्याचा त्यानं निश्चय केला होता. पहांटेचा पहिला चहा झाला होता. आतां दुपारी चहा. घेतला नाहीं तर कामाला हुशारी वाटणं शक्यच नव्हतं. म्हणजे आतां ओघानेंच दुपारपर्यंत चहा घेतां येणार नव्हता. घटकेघटकेगणिक घोट घोट चहा पिण्याची, पानतंबाखू खाण्याची नि विडी ओढण्याची भिकूला चांगलीच संवय जडली होती आणि आतां फक्त दोनदांच चहा, विडी पान घेण्याचं बंधन पाळणं म्हणजे भिकूच्या दृष्टीनं तें मोठंच दिव्य होतं. पण तें दिव्यहि करायला तो तयार होता. कष्टानं नव्हे. दुःखानं नव्हे तर अगदीं राजीखुशीनं, आनंदानं, कारण त्यामुळें त्याच्या खर्चात बचत होणार होती. त्या बचतींतून तो आपल्या इवल्याशा घर-कुलावर माडी बांधणार होता. आज कित्येक दिवसांचं त्याचं ते एक स्वप्न होतं.

त्याचं तें छोट्या छोट्या दोन खोल्यांचं घर कच्च्या मातीच्या विटांनीं बांधलेलं होतं. त्याच्या भिंती तांबड्यालाल मातीनं सारवलेल्या होत्या. त्या दोन खोल्यांत भिकूचा सारा संसार थाटलेला होता टापटिपीनं, स्वच्छतेनं, नीट नेटकेपणानं घरांतलीं भांडींकुंडीं अगदीं लख्ख घासून ओळीनं मांडून ठेवलेलीं होतीं. तीं पॉलिश केल्यासारखीं नुसतीं लकाकत होतीं. ' अशा या टुमदार, छोट्याशा घरावर आपण सुंदरशी माडी बांधायची, तिला छानदार रंग द्यायचा, पोराबाळांस्नी अभ्यासाला, बसाउठायला, खेळायला मोप जागा हुईल. सध्यां त्यांस्नी निजाबसायाची जागा न्हाय. आपल्याला कारभारणीसगट संध्याकाळच्या टायमाला सुखदुःखाच्या गोष्टी कराया मिळतील. उद्यां पोरंपाळं मोठीं झालीं, सुना आल्या, जांवई आलं, नातवंड झालीं मंजी मुलामाणसांनीं माडी कशी भरून जाईल !

सगळीं तिकडं आनंदानं नाचता बागडताहेत असं तें दृश्य, ती माडी जणूं कांहीं तो डोळे भरून पहात आहे. जागेपणीं, डोळे सताड उघडे ठेवूनहि भिकू हें सुखदस्वप्न पहात बसला होता. मध्येंच तो स्वतःशींच हंसत होता. खुसुखुसू. उगीचच. एखाद्या वेड्यागत. त्या स्वप्नाची मखमली लुसलुशीत धुंदी त्याच्या डोळ्यावर, शरीरावर पसरली. त्या नादांत मग त्याची चहाची, विडीची, पान-तंबाखूची सगळी तल्लफ एकदम नाहींशी झाली. तो असाच विचार करीत स्वतःशींच खुसुखुसू हंसत कितीवेळ बसला असता कोण जाणे! इतक्यांत त्याच्या बायकोचे शब्द त्याच्या कानांवर आले–" म्हटलं, म्या तुमच्यासंगट बोलतीया लक्स तरी हाय कुटं ? "

" आं ? माझ्यासंगट बोलतीयास व्हय ? मग बोल कीं, लक्स हाय ना माजं."

" वाह्यूळ इचार कशापायीं करत बसलायसा ? दुकान उघडायचं न्हाई व्हय आज ? दुकान बंद दिसलं तर गिऱ्हाईक परत जाईल न्हवं ? "

" इचार ? इचार न्हाय बा कसला करत. उघडतोंच न्हवं का आतां दुकान. "

" पर इवढा इचार तरी कसला चालला व्हता ? "

" माडी बांधायची हाय न्हव आतां. तेंच डोळ्याम्होरं दिसतंया बग आतां-शीक. दुसरं तिसरं काय न्हाय."

मग भिकू उठला. घराच्या पुढच्या छोट्याशा पडवींत त्यानं आपलं दुकान थाटलं होतं. त्याची पुढची फळी त्यानं उघडून ठेवली. वास्तविक दुकान म्हण-ण्यासारखं तिथ विशेष असं कांहींच नव्हतं. पडवीच्या उजव्या बाजूच्या पुढच्या कोपऱ्यांत भिंतीला लागून भिकूनं आपली धोपटी ठेवली होती. त्या धोपटीत केस कापण्याचं मशील, वस्तारा, कात्री वगैरे त्याच्या धंद्याला लागणारी केस काप-ण्याची हत्यारं होती. वस्ताऱ्याला धार लावण्यासाठी ठेवलेला एक चार-सहा बोटं रुंदीचा नि दीड–दोन फूट लांबीचा चामड्याचा पट्टा, एक छोटासाच आरसा, पाण्यासाठीं लागणारी वाटी, पॉवडर, खोबरेल तेलाची बाटली अन् एक कंगवा, बस्स, एवढंच सामान त्या धोकटीत होतं. केस कापतांना गिऱ्हाईकाच्या मांडीवर टाकण्यासाठीं लागणारं एक साधंसुधं, जुन्या जाडजूड धोतराचं फाडलेलं, पण स्वच्छसं फडकं वरच एका खिळ्याला अडकवून ठेवलेलं होतं. भिकू केस कापतांना ज्या भिंतीला टेकून बसत असे तिथ त्याच्या डोक्याच्या बरोबर वरच्या खिळ्यांना केस कापतांना मांडीवर टाकण्याच्या फडक्याच्या शेजारीच शंकर,

गणपति, मारुति इत्यादि देवादिकांच्या तीनचार तसबिरी लावलेल्या होत्या. पंक्तीला एक दोन सिनेमांतल्या नट्याहि खिळ्यांना लोंबकळत राहिलेल्या होत्या. थोडक्या मोजक्याच सामानानं सजवलेलं असं त्याचं तें छोटसं दुकान होतं. परंतु जवळपास दुसरं चांगलंसं सलूनच नव्हतं. पूर्वी भिकूच्या घरापलीकडे पांचसात झोपड्या सोडल्यावर एक पिंपळाचा पार होता. अन् त्या पारावर एक न्हावी येऊन बसत असे आजूबाजूच्या कांहीं झोपड्यांतले लोक त्याच्याकडून केस कापून दाढी करून घेत पण पुढं पुढं लोकांना त्या पारावर उघड्यावर बसून केस कापून घेण्याची लाज वाटू लागली. अर्थातच भिकूचं घरांत थाटलेलं, थोडं आडोशाला असलेलं हें दुकान त्यांनीं विशेष पसंत केलं अन् भिकूकडचं गिऱ्हाईक वाढूं लागलं. भिकू बडबड्या होता, न्हाव्याच्या जातीचं इमान त्यानं सोडलं नव्हतं. त्या जातीला साजेसे अनेक गुण त्यांच्या अंगांत होते. राजकीय आणि सामाजिक घडामोडीची त्याला अद्यावत बातमी असे. भिकूचं दुकान म्हणजे वर्तमानपत्रांचा स्टॉल होता, सगळ्या गांवची टपालपेटी होती. शिवाय तो आपल्या धंद्यांतहि कुशल होता. त्यामुळें गिऱ्हाईक त्याच्यावर खूष असे. केस कापतांना, दाढी करतांना तो गिऱ्हाईकाशी अशा गोष्टी बोले कीं, गिऱ्हाईक त्याचं कौतुक करीत. कधीं कधीं तर कांहीं इरसाल गिऱ्हाईकांच्या फाजील चौकस बुद्धीला भिकूच्या गप्पागोष्टी म्हणजे चांगलंच खाद्य होतं. त्याची गप्पाष्टक, चकाट्या त्यांचं भरभूर मनोरंजन करीत.

दुकानाची एक फळी उघडल्यावर भिकूनं तिथला केर काढला. मग त्या देवादिकांच्या तसबिरींना त्यानं नमस्कार केला अन् स्वतःला बसण्यासाठीं एक व गिऱ्हाईकाला बसण्यासाठी एक अशी दोन पोतं त्यानं नेहमींच्या जागी पसरलीं आणि गिऱ्हाईकाची वाट पहात, विचार करीत तो आपलं सुखस्वप्न पहात बसला. इतक्यांत पुन्हां बाहेर येऊन त्याची बायको म्हणाली, "मघाशी तात्याब आलात. तुम्ही गेल्ता संडाडाला तवा म्होरच्या वान्याकडं जाऊनशेनी बसल्यात. मंग येतो हजामत कराया म्हून सांगूनशेनी गेल्यात. आन काय वं दाढी केल्यावर घा–चारा आनं तरी ठिवाया नग त्येंनी हातावर? चार–आठ आनं देत्यात आन हजामत नि दाढीबी करूनशेनी घेत्यात. पन तुमी त्येंना रोकठोक सांगून शेनी टाका. किती दीस धरायची व अंशी भीड? वळखीचं झालं म्हून काय झालं?"

" निस्ती वळख न्हाय न्हायल्याली. वर्सानवर्स आपुन शेजारी शेजारीं न्हातुया तवा नात्यागतच झालंया आतां ह्यें. आन येकटा तात्याबाच न्हाय करत असं. आतां सम्दीं लोकंच असं कराया लागल्यात इथली. म्हागाई रोजच्या रोज वाढतीया. आतां पैसं हायतीच कुठं कुनाजवळ ? भाईरचं गिऱ्हाईक यील तरच निभाव लागनार हाय आपलावी." बोलतां बोलतां भिकूनं वस्तान्याला धार लावण्याचा पट्टा धोपटीतून बाहेर काढला अन् तो वस्तान्याला धार करूं लागला.

" पाटलांच्या घरीं जायचं हाय न्हवं आज केस कापाया ?"

धार लावतां लावतां भिकू किंचित थांबला. बायकोकडं मान फिरवून त्यानं विचारलं, " कंचं ग पाटील ?"

" त्ये, तलवारीवाणी मिशा हैती त्ये. त्येंच्या प्वाराचं जावळ करायचं हाय न्हवं आज ?"

" हां हां. त्ये हाय लक्सामंदी माज्या. आतां तात्याबाचं झालं मंजी तकडंच जानार हाय."

भिकूची बायको मग आंत आपल्या उद्योगाला निघून गेली अन् भिकू पुन्हां वस्तान्याला धार लावूं लागला इतक्यांत तात्याबा हजर झालाच.

" काय भिकूबा, काय म्हननोस ?" दुकानाच्या पायरीवर बसतां बसतां तात्याबानं विचारलं.

" काय न्हाय बा केस कापायचं हैती न्हवं ?"

" हां सांगूनशेनी गेल्तो वैनीला." तात्याबानं उजव्या हाताच्या अंगठ्याजवळच्या दोन बोटांतून पानतंबाखूची पिचकारी टाकली.

" तात्याबा, आतां जरा मोठं ठिवतो केस. क्रोज क्राप नगा करून घिऊ." भिकूनं हलकेंच आपलं म्हणणं पुढं मांडलं.

" नग बाबा लई वाढल्याल दिसल्यात मग केस, नाटकांतल्या नटावाणी आन लवकर करावी लागल हजामत. म्यां त म्हनतो, ह्या टायमाला अक्षी गुळगुळीत गोटाच करूनशेनी घ्यावा. दाढीवन अक्षी गुळगुळीत करून टाक मंजी चार चार चार दिशी नग यायला." तात्याबानं आपलं घोडं पुढं दामटलं. मग भिकूला जास्त कांहींच बोलता येईना. खिळ्यावरचं तें स्वच्छ धुतलेलं फडकं काढून त्यानं तात्याबाच्या अंगावर टाकलं. धोपटीतून आपलीं हत्यारं बाहेर काढलीं अन्

एकीकडे गप्पाटप्पा करतां करतां तो तात्याबाचे केस कापूं लागला. वस्तारा फिरवतां फिरवतां भिकू म्हणाला, "पाटलाची बायकू येकायेकीं न्हाईशी झाली म्हनं वरांतनं तात्याबा."

"काय म्हनतोस काय भिकू?" मान किंचित् उजव्या बाजूला करून तात्याबा म्हणाला.

"म्हादबा सांगत व्हता काल दाढी कराया आला तवां. त्यें काय कळल्यालं न्हाय पन समद्ं अघटीतच हाय बगा."

"त्यो तलवारीवानी मिशी असल्याला पाटीलच न्हवं? अरं, त्याचं प्यार इक्तंसं न्हान हाय ना रं?"

"वसाचं झालं आतांशीक. आज त्येचं जावळ हाय न्हवं! तुमचं केस कापलं कीं तकडंच जानार हाय."

"लई वंगाळ झालं न्हाय, भिकोबा?"

"वंगाळ झालं प्याराचं. पाटलाचं अशी व्येस व्हईल. दुसरी बाईल कवांच हेरून ठेवलिया त्येनं."

"दिसतोच कसा म्हना तो. निस्ता उग्र चेहेरा."

"लई तराट व्हता म्हनं त्येचा बायकोला."

मानेजवळचे नि कानाजवळचे केस कापतां कापतां भिकू म्हणाला.

वस्तऱ्याचं काम झाल्यावर त्यानं तो खालीं ठेवला आणि त्याबरोबरच 'मवाचा विषय हे ताबडच बाजूला केला. तात्याबाच्या मानेवर पॉवडरचा पफ् मारतां मारतां त्यानं नवीन विषयाला हात घातला.

"म्हादबाच्या पोराला प्यारच होनं न्हाय बगा तात्याबा. धा-बारा वर्सं झालीं लगीन होऊन. नवससायास, देवदेवरुकी, समदं करूनशेनी झालं बगा. हाकडं आमच्या घरांत दर दोन दोन वर्साला पाळणा हालतुया. ईस्वराचं देनं दुसरं काय? नव्हाळांनीं घर भरनं मंजी त्येचीच किरपा." भिकूला एकदम मुला-बाळांनीं भरलेली आपली माडी डोळ्यासमोर दिसली अन् तो खुसुखुसू हंसला.

"अरे, म्हादबाचा पोर कसला त्यो? नामर्द निस्ता पुरुष हाय का न्हाय कोण जानं बायकू मातर हाय रचनीच, अंगानं भरल्याली, चांगली देखनी."

"हां त्ये मातर खरं. जोडा अगदी इजोड दिसतुया." भिकूनं तात्याबाच्या डोक्याला तेल लावलं. कंगव्यानं केस विंचरले. मग पुढं आलेले बारीक बारीक

केस कातीनं कापून टाकले अन् केसांवरून ब्रश फिरवून केस साफ केले. नंतर भांग पाडला. तात्याबापुढं आरसा ठेवून तो म्हणाला " बगा आतां तात्याबा झालं न्हवं मनासारकं ? "

" हां लई ब्येस आतां दाढीबी करूनशेनी टाक "

तात्याबाच्या खांद्यावरचं फडकं काढून भिकूनं त्यावरचे केस झटकून तें साफ केलं अन् दुसरं फडकं आणून तात्याबाच्या छातीवर टाकलं. तात्याबाच्या दाढीला साबण लावला नि वस्तऱ्यानं दाढी करतां करतां तो राजकारणावर गप्पा मारू लागला. पंतप्रधान नेहरूंपासून निरनिराळ्या खात्याच्या अनेक मंत्र्यांचं धोरण कसं नि कुठं चुकतंय, तसंच इतर विरुद्ध पक्षांचं धोरण काय आहे वगैरे बरंचसं राजकारण दाढी होईपर्यंत त्यानं तात्याबाला ऐकवलं. दाढी करून झाल्यावर भिकूनं तात्याबाला पुन्हां एकदां आरसा दावला. तात्याबानं तोंड आरशांत पाहिलं आणि तो एकदम खूष झाला. दाढी अगदीं गुळगुळीत झाली होती. केसहि मनाप्रमाणें कापलेले होते. पैरणीच्या खिशांतून आठ आणे काढून तात्याबानं ते भिकूच्या हातावर ठेवले.

हातांतल्या पैशांकडं एकदां न्याहाळून पाहिलं. पुन्हां एकदां ते मोजले. तात्याबाला जास्त पैसे द्यायला सांगावें असं त्याला वाटलं. पण तोंडांतून शब्द मात्र लवकर बाहेर पडेनात. मग एकदम बायकोच्या मघाच्या शब्दांची त्याला आठवण झाली. मोठा धीर करून पण तरीहि चांचरतच तो तात्याबाला म्हणाला, " तात्याबा, केसाचं नि दाढीचं मिळून बारा आनं तरी द्याया हुवे आतां. म्हागाई झालीया. दर वाढल्याती आतां."

" तुला म्हागाई वाटतीया आन मला न्हाय व्हय ? बरं, पगार तरी कुठं मिळतुया इक्ता त्या परमानांत ? सिवाया टकूरीला हैतीच कुटं केस कापाया ? फुडचं काय कापशील ते मागं सम्दं टक्कलच हाय. त्या टक्कलाचं पैसं दिऊ म्हनतोस ? फुडच्या केसाचं दिलंच हैती. टक्कलाचा काय चार्ज न्हाय बग. " असं म्हणून तात्याबा आपल्याच विनोदावर मोठ्यानं पोट गदगदां हलेपर्यंत हंसला मग भिकू मग जास्त कांहींच बोलू शकला नाहीं. सगळं सामान आवरून स्वच्छ पुसून भिकूनं तें पुन्हां धोपटींत ठेवायला सुरुवात केली. भिकू आपलं काम करीत होता अन् तात्याबा पान चघळत चघळत गप्पाष्टकं करीत होता. तात्याबा वाट पहात होता चहा घेण्याची. तात्याबाचा दुसरा चहा च तेक रोजच

भिकूकडं होई. तात्याबा एकटा सडाफटींग मनुष्य होता. त्याला घरची अशी कांहींच ओढ नव्हती. त्यामुळं भिकूकडं चहा, पान, विडी, गप्पाटप्पा वगैरे सर्व उरकून सावकाश घराकडं वळायचं हा तात्याबाचा सकाळचा नित्याचाच कार्यक्रम ठरलेला होता; पण आज बराच वेळ झाला तरी चहा मिळण्याचं चिन्ह दिसेना. भिकू चहाची बातच काढीत नाहीं असं पाहून शेवटीं तात्याबानं हलकेंच आड-मार्गानं मूळ मुद्याला हात घातला—" काय भिकोबा, आज च्याची तल्लफ न्हाय वाटतं आली ?"

आज स्वतःहि चहा प्यायचा नाहीं असा भिकूचा बेत होता. म्हणून पहिल्यांदा त्यानं तो प्रश्न ऐकला न ऐकल्यासारखच केलं तेव्हां तात्याबा समजून चुकला कीं आज पाणी काय न्यारंच आहे. डाळ लवकर शिजणारसं दिसत नाहीं मग तो सरळ सरळ म्हणाला, " आपल्याला तर बुवा लई हुक्की आलीया च्या पिण्याची."

मग भिकूचा नाइलाजच झाला. " तात्याबास्नी च्या आनतीयास न्हवं ?" बसल्या बसल्याच भिकूनं आंत चहाची वर्दी दिली. नाखुषीनंच बायकोनं एक कप चहा आणून तात्याबापुढं ठेवला. बशींत चहा ओततां ओततां तात्याबा म्हणाला, " आन् तुला रं ?"

" म्या न्हाय घेणार आतां. माजा झाला सकाळीं येकदां."

" येकदां झाला म्हून ? रोज न्हाय घेत ? वैनी, आन दुसरा कोप भिकूलाबी." तात्याबा आंतल्या बाजूला तोंड करून मोठ्यानं म्हणाला.

" नग नग. मला नग आतां. तुमीच ध्या."

" अरं वारं मर्दा ! च्या न्हाय पीत मंजी काय ? आन ग वैनी." तात्याबानं आर्डर सोडली. बशींतला चहा त्यानं पुन्हां कपांत ओतला. आतां तात्याबाला काय सांगावं तें भिकूला समजेना पण तेवढ्यांत त्याला एक सबब सुचली—" तब्बीत बराबर न्हाय तात्याबा. डागदर म्हनत्यात चा–इडी कमी कर. आतां फकस्त दोन टायमाला चा आन दोनच टायमाला इडी."

" अरं डागदर काय सांगत्यात ? योक कप च्यानं काय व्हतंय व्हयरं आपल्यासारक्याच्या शरीराला ? घे तूं आपला."

" पसंबी लई जात्यात त्येच्यांत, तात्याबा." तात्याबाला सबब पटलेली नाहींसं पाहून भिकूनं शेवटीं खरं कारण सांगितलं.

" मग आतां पै-पैसा ठेवूनशेनी घर बांधणार हायेस व्हय ? " दोन बोटांच्या फटींतून पिचकारी टाकीत तात्याबा म्हणाला.

" समदं घर काय व्हनार न्हाय म्हणा पन अवंदा माडी मातर बांधनार म्हनतों घरावर. "

" लई मोटा बेत हाय पन इडी-काडीचं पैसं वांचवून माडी व्हनार व्हय तुजी ? उगी तरास नग करू पैसं वांचवण्यापायीं. घे च्या वाईचसा. "

" मंग कोपांतच ठिवा वाईचसा."

तात्याबानं तोंडातलं पान थुंकून दिलं. बशींत चहा ओतून घेतला अन् कप भिकूपुढं केला.

तसं म्हटलं तर भिकूलाहि तल्लफ आलीच होती चहाची. त्यानं एका दमांत तो चहा घटांघटां पिऊन टाकला. तात्याबानं आपल्या जाकिटाच्या खिशांतून विड्यांचं बंडल काढलं. एक आपण घेतली. एक भिकूपुढं धरून म्हटलं, " घे. इडी वढ. मंजी कामाला कसा जोर यील बग."

भिकूनं विडीचा मनापासून एक झुरका मारला. मनांतल्या मनांत मात्र त्यानं पुन्हां एकदां निश्चय केला कीं, आपल्या खर्चानं मात्र दिवसांतून दोनदांच्यावर चहा, विडी अगर पान कांहींच घ्यायचं नाहीं. पण दुसऱ्या कुणी आपणाहून दिलं तर घ्यायला कांहींच हरकत नाहीं. विडी ओढून भिकू पुन्हां उगीचच वस्तान्याला धार लावीत बसला. तात्याबाचीहि घरीं जाण्याची वेळ झाली म्हणून तो निघून गेला. वस्तऱ्याला धार लावतां लावतां भिकू पुन्हां आपलं तें आवडतं स्वप्न पाहूं लागला. त्याच्या छोट्याशा घरावर छानशी माडी बांधलीय. त्याचा रंग किती मोहक दिसतोय. आतां त्याचं घर कसं डौलदार दिसतंय. फक्त त्याच्या घरावर माडी आहे. आजुबाजूची सारीं घरं बैठीं आहेत. त्यामुळं त्याच्या घरापुढं तीं कशीं खुजी खुजीं, ठेंगणीं ठेंगणीं वाटताहेत. उफाड्यानं वाढलेल्या मुलांपुढं खुजट मुलं दिसावी तशीं. डोळ्यांत न भरणारीं. लोकांना त्याचं घर फार आवडलंय. त्यामुळें त्या वसाहतींत त्याचा मानहि बराच वाढलाय. त्याच्याबद्दल लोकांच्या मनांत थोडा मत्सरहि निर्माण झालाय कारण त्यांना वाटतंय आपणहि अशीच माडी बांधावी पण त्यांच्याजवळ पैसा कुठाय आणि तो आणायचा तरी कुठून ? भिकू मग अभिमानानं मान उंच करून आपल्या घराकडं बघतोय. ती डौलदार माडी मुलाबाळांनीं सुना-नातवंडांनीं नुसती गजबजून गेलीय. सगळ्यांच्या

हंबरण्याचे बागडण्याचे आवाज कानावर येताहेत अन् आनंदानं भिकूचं मन कसं धुंद झालंय. डोळ्यापुढं हें स्वप्न पहातां पहातां भिकूनं वस्ताऱ्याला धार लावणं बंद केलं अन् काड्याच्या पेटीतली ओढलेली एक काडी दातांखालीं धरून ती चावण्याचा त्यानं आपला आवडता चाळा अगदीं नकळत सुरू केला.

दिवसाढवळ्या, जागेपणी आपल्या माडीचं स्वप्न पाहण्याचा भिकूच्या मनाला आता एकच चाळा लागून राहिला होता. त्यानं त्याच्या शरीरावर, मनावर आनंदाचा एकप्रकारचा कैफच चढे. माडीच्या नुसत्या कल्पनेनंहि त्याचं मन मोहरून जाई अन् मग त्या धुंदीत, तंद्रींत तो तासन्तास बसून राही. स्वतःशीच खुसुखुसू हंसत, काडीनं कान टोकरत, दातांखालीं काडी धरून ती चावीत.

आतांहि तो असाच आपल्या तंद्रींत बसला होता पण त्याच्या बायकोनं पुन्हां बाहेर येऊन त्याला पाटलाकडं जावळ करायला जाण्याची आठवण दिली तेव्हां तो गडबडीनं उठला नि धोपटी घेऊन चालूं लागला.

वास्तविक भिकुचं घराणं कऱ्हाड-साताऱ्याकडचं. पण भिकूचा आजा धंद्यासाठीं म्हणून मुंबईत आला. मुंबईत धंदा केला तर जास्त पैसा कमवतां येईल या कल्पनेनं अन् त्याप्रमाणें खूप मेहनत करून आपल्या धंद्यांतलं कौशल्य दाखवून धंद्याचा त्यानं चांगलाच जम बसवला. चार पैसे गांठीलाहि ठेवले आपण एक वास्तु खरेदी करावी अशी त्याची इच्छा होती. फार दिवसांची मनांत दडवून ठेवलेली, सुप्तशी म्हणून चार पैसे शिल्लक राहिल्याबरोबर आपल्या इच्छेला घातलेला अडसर त्यानं काढून टाकला आणि माहिम ते वांद्रा यांच्या दरम्यान जा बराच मोठा खाजणाचा भाग होता त्यावर त्यानं छोटीशी जागा खरेदी केली. त्याच्या मनांतून त्या जागेवर एक टुमदार चिमुकलंसं घर बांधायचं होतं. पण कांहीं ना कांहीं अडचण नेमकी आयत्यावेळीं उपस्थित होऊन त्याच्या हयातींत तें जमलंच नाहीं. भिकूच्या बापानं मात्र आपल्या बापाची ती इच्छा पूर्ण केली. त्या जागेवर त्या छोटंसं घरकुल उभारलं. भिकू नेहमीं मनांत म्हणे, आपल्या आज्यानं जागा घेतली. बापानं घर बांधलं. आपुनहि त्यांच्यापरमानं कांहीं केलं पायजे न्हायतर आपुन अगदींच नामर्द ठरू.' आपुन आपल्या घरावर माडी बांधायची, मनांत असा विचार आला कीं, भिकूला आपल्या डोळ्यापुढं ती माडी दिसूं लागे. सध्या अस्तित्वांत नसलेली पण कल्पनेनं चितारलेली ती माडी खरोखरच त्या जागी असल्यागत त्याला भास होई त्या माडीच्या पायऱ्या भरा_

वर चढून गेल्याचा अनुभव तो घेई. केवळ नुसत्या कल्पनेनं खालून आपल्याला कुणीतरी हांक मारतंय, वरूनच आपण त्याला ओ देतोंय. आपण खालीं न येतां त्यालाच वर बोलावतों, तो वर येतो मग आपण त्याच्याशीं त्या माडींत आरामांत भिंतीला टेकून गप्पागोष्टी करीत चहा पितों, पान खातों, विडी ओढतों. भिकू मग आनंदानं नुसता हरखून जाई. माडीच्या नुसत्या कल्पनेनंहि अभिमानानं फुगे.

अन् अशी ती त्याला एकसारखी जागेपणीं, स्वप्नांत डोळ्यापुढं दिसणारी माडी आपण केव्हां एकदां बांधतों असं भिकूला झालं होतं. त्यानं पुन्हां एकदां इकडंतिकडं ठेवलेले पै-पैसे सर्व जमवून मोजले. माडी बांधायची म्हणजे किमान दीड-दोन हजार तरी हातांत हवेत म्हणजे आणखी कांहीं दिवस तरी थांबणं प्राप्तच होतं. तरीहि पैन् पै वांचवून शिल्लक टाकून आपण ही माडी बांधू अशी आशा तो उराशीं बाळगून होता.

पण वर्ष दोन वर्षं उलटून गेलीं तरी भिकूच्या शिलकींत फारशी कांहींच भर पडली नाहीं. महागाई मी म्हणून वाढत चालली होती. त्यामानानं आवक मात्र वाढत नव्हती. पशा दोन पैशाचं तेल मागितलं म्हणजे वाणी कुरकुरत असे. निदान गिन्नीचं तरी तेल एकावेळीं इतक्या माणसांना घ्यावं लागत होतं. मीठ मिरचीला पैसा पुरवतां पुरवतां नाकीं नऊ येत होते. वाढत्या पोरवड्यामुळं भिकू वैतागून गेला होता. कांदा-भाकर, मीठ-भाकर याशिवाय त्या इवल्याशा जिवांना तो कांहींच खायला घालू शकत नव्हता. दहा बारा मुलं, बायको नि तो स्वतः इतक्या माणसाचं कुटुंब एकट्याच्या जिवावर चालवणं आजकाल मोठं कठिण होऊन बसलं होतं. तशांतच अलीकडं भिकूचा धंदाहि पूर्वीसारखा चालेनासा झाला होता. त्याच्या दुकानापासून जवळच फर्लांग दीड फर्लांगाच्या अंतरावर मुख्य रस्त्यावर एक नवीन सलून निघालं होतं. अगदीं अपटु डेट पाश्चात्य देशांतल्या थाटाचं. सलूनचा मालक इंग्लंडहून केशकर्तनाचं स्पेशल शिक्षण घेऊन आलेला होता. सलून एअर कंडिशण्ड नि भपकेबाज होतं. दुकानाला सुंदरसा ऑईलपेंट दिलेला होता. त्याची पुढचीं काचेचीं दारं आपोआप बंद होणारीं होतीं. दुकानांत पांच-पांचशें रुपयांची एकेक खुर्ची गिऱ्हाईकाला केस कापतांना बसण्यासाठी ठेवलेली होती. खुर्चीला खालीं मऊ मऊ गादी होती. मान टेकायलाहि जागा होती. त्यामुळं त्यावर बसायला मोठं सुख वाटे. मानहि अवघडत नसे. खांद्यावर टाकायला मद्रीचे टॉवेल होते. हत्यारं सगळीं अद्यावत होतीं.

दुकानांत गिऱ्हाईकांसाठीं भरपूर वर्तमानपत्रं असत. दुकान एअर कंडिशण्ड असल्यामुळं गिऱ्हाईकाला तिथं थांबून बसण्याचा कंटाळा येत नसे. उलट एखादं वर्तमानपत्र तिथं आरामांत बसून वाचायला मोठी मौजच वाटे. दुकानाचा मालक दिसण्यांत रुबाबदार, सफाईदार इंग्लिश बोलणारा नि अद्यावत पोशाख केलेला होता. त्याच्या बोलण्यावागण्यांत आदब होती. पाश्चत्य राष्ट्रांतल्या धंदेवाईक लोकांप्रमाणें त्याच्या मॅनर्स पॉलिशड् होत्या. दुकानांत स्वच्छता व टापटीप होती. त्यामुळं गिऱ्हाईक साहजिकच त्याच्याकडं आकर्षिलं जाऊं लागलं. त्याच्या दुकानापुढं भिकूचं दुकान अगदींच ओबडधोबड नि गांवठी वाटे. दिवस न् दिवस भिकू गिऱ्हाईकाच्या वाटेकडं डोळे लावून बसे. आलेल्या गिऱ्हाईकाशीं गोड गोड बोलून त्याला खूष करून आपल्या कौशल्याची खात्री पटवून देण्याचा प्रयत्न करी पण लोकांची दृष्टि आतां बदलली होती त्यांना हवा होता डामडौल, दिखाऊपणा. भपकेबाजपणा. मुंबईतल्या अशाश्वत जीवनामुळें तिथल्या लोकांची दृष्टि नेहमींच चैनीकडं असते. मनुष्य काय आज आहे उद्यां नाहीं. आहे तोंवर उपभोगून घ्यावं, थाटामाटांत डामडौलांत रहावं मग त्यासाठीं चार पैसे जादा खर्च करावे लागले तरी फिकीर करण्याचं कारण नाहीं असं त्याचं तत्त्वज्ञान असतं. तशी त्याची वृत्ति नकळतच बनते. त्यामुळेंच भिकूच्या शेजारच्या दुकानांतला पोकळ भपका, देखावा, डामडौल लोक विकत घेत होते. पैशाची बिलकुल मातब्बरी न करता. पण प्रथम प्रथम भिकूनं आशा सोडली नव्हती. आज ना उद्यां लोकांना सत्य पटेल, भपक्यांत पैसा वाया घालवला म्हणून पश्चात्ताप होईल. गिऱ्हाईक पुन्हां आपल्याकडं वळेल अन् धंदा नवीन जोमानं सुरू होईल. ' जुनं तें सोनं ' हें लोकांना सावकाश का होईना पटतंच अशी त्याची खात्री होती अन् म्हणून माडीचं सुखस्वप्न पाहण्याचा त्याचा चाळा कित्येक दिवस तसाच चालूं होता.

पण वाट पाहून भिकू शेवटीं थकला. धंदा कसा चालेल म्हणून नुसताच कुठंतरी शून्यांत पहात, विचार करीत बसूं लागला. असाच तो एकदां विचार करीत बसला असतांना तात्याबा आला.

" काय भिकोबा कसला इचार करतुयास ? " हातानं तंबाखू मळतां मळतां तात्याबानं विचारलं.

" काय नाय जी, "

" पन चेहेरा तर तसा दिसतुया." तात्याबानं मळलेल्या तंबाखूची फक्की मारली.

" धंदा चालत न्हाय तात्याबा आजकाल. म्हागाई तर रोजच्या रोज वाढतीया. काय कराव समजना. त्यें नवं दुकान झाल्यापून आमी पाक गेलों खालीं."

" आतां तूबी तसं इयाक दुकान करून टाक भिकोबा. लई ब्येस दिसनं बग त्यें. अरं काय त्या खुर्च्या, तो थाट! अश्शी मिट्रोवाणी थंडगार. लई आराम वाटतुया म्हनं तथं. अरं म्या गेलतो परवा मेट्रोला शिनिमा बघाया. इंग्रजी शिनिमा काय कळला न्हाय म्हना; पन तीन तास थंड थेटरांत बसाया लई मजा आली बग. मोप आराम वाटला."

" पन तात्याबा, इक्ता थाट कराया पैसं कुटनं आनू? गरीब लोक आमी. निस्ती माडी बांधनं व्हईना हात्नं. आज किती दिस पैसं साटवतो हाय."

त्यें सम्दं खरं हाय रं. पन माडी बांधण्यापेक्षां दुकानच थंडगार करूनशेनी टाक. नं आपल्याला तर लई आवडलं त्यें. योक दिस म्यावी जाईन म्हनतों तथं हजामतीला. आतां नेहमीं न्हाय परवडायचं म्हना आपल्याला. पन योक टायमाला तर मजा करूं."

" रिण काढून दुकानाचा थाट करून काय करूं तात्याबा? आन त्यें रिण फिटनार तरी कबा नि कसं? रिण देणार तरी कोण?" डोळे मिटून निराशेनं मान हलवीत भिकू म्हणाला.

" बग काइ वेवस्था होते का."

भिकू मनांतून आधींच अस्वस्थ होता अन् आतां तात्याबाच्या शब्दांनीं तर त्याची बेचैनी अधिकच वाढली. त्याला वाटलं, तात्याबासारखं चिकट नि गरीब गिऱ्हाईकहि जुनं असूनसुद्धां तिकडं वळलं तर मग बघायलाच नको.

मनाच्या अशा चमत्कारिक उदास अवस्थेंत भिकू असतांना एक दिवस चार-पांच सरकारी नोकराचं टोळकं त्याच्या त्या वसाहतींत हजर झालं. अगदी अचानच. कुणालाहि कल्पना नसतांना खाजणाच्या कांठावर ज्यांचीं घरं होतीं तीं सारीं लोकं बाहेर रस्त्यावर येऊन त्या सरकारी नोकरप्रमुखाकडं व त्याच्या लव्याजम्याकडं पहात राहिलीं. आश्चर्यानं, कुतुहलानं, साशंक नजरेनं. हा काय प्रकार आहे हें कुणाच्याहि लक्षांत आलं नाहीं. त्या लोकांच्या हातांत टेप, फूटपट्टी दोरी अन् शंकू होता अन् त्याच्या साहाय्यानं ते रस्त्याच्या लांबरुंदीची मोजणी करीत होते. हा रस्ता ते कां मोजतात ह्या गूढ गोष्टीचा कुणालाच उलगडा होत

न्हता. शेवटीं भिकूच पुढं झाला त्यानं थेट त्या अधिकाऱ्यालाच प्रश्न केला, " ह्यें काय चालल्यालं हाय व बाबानु तुमचं ? "

" रोडवायडनिंगचं काम आहे बाबा. हा रस्ता आतां मोठा करायचा सरकारचा विचार आहे. "

" मंग किती लांबरुंद करणार म्हणतायसा ? "

" दोनशें अडशें फूट रुंद नि थेट अहमदाबादपर्यंत लांबीचा. लोकांचा फार फायदा होणार आहे त्यामुळं. मुंबई ते थेट अहमदाबापर्यंत वाहतूक करायला लोकांना फार सोयीचं पडेल ह्या एक्सप्रेस हाय–वेमुळं. "

हजारों लोकांची सोय म्हणजेच भिकूची गरसोय. लाखों लोकांचा फायदा अन् भिकूचा मात्र पूर्णपणें तोटा. अनेक लोकांच्या आशेंत भिकूची निराशा, पण हजारों लोकांच्या सोयीपुढं त्याची गरसोय कोण पाहणार ? लाखों लोकांच्या आशेपुढं, फायद्यापुढं त्याच्या एकट्याच्या तोट्याकडं कोण लक्ष देणार नि त्याच्या मातब्बरी तरी लोकांना कां व कशी वाटावी ? क्षणार्धात भिकु काय तें समजून चुकला. त्याच्या डोळ्यापुढं काजवे चमकले. एकदम कसंतरी सगळं आजूबाजूला फिरल्यागत वाटूं लागलं. हातापायाला कांपरं भरलं लटपटत्या पायांनीं तो कसाबसा घरी परतला.

अन् त्यानंतर थोड्यांच दिवसांत त्याला कळलं कीं, त्याचं घर त्या रोडवायडिंगच्या योजनेंत सरकारच्या ताब्यांत जाणार. भिकूला ते सरकारी लोक तिथं आले त्या दिवशींच हें कळून चुकलं होतं पण तो वेडी आशा जोपासत होता. आतां मात्र त्याबद्दल शंका उरली नाही, सरकार त्याबद्दल त्याला भरपाई म्हणून पैसे देणार होतं. काय करावं तें भिकूला कळेना. त्याचं शरीर बधीर झालं होतं. ऑपरेशनच्या वेळीं इंजेक्शन देऊन करतात तसं. तो सुन्नपणें, भ्रमिष्टासारखा नुसताच तासन्तास बसून राहूं लागला. त्याला असा पाहून तात्याबाच्या पोटांत कालवाकालव होई. शेवटीं तो एक दिवस भिकूला म्हणाला, " अरं असं निस्त येड्यावानी बसूनशेनी व्हतं व्हय ? "

" मंग आतां काय करू तात्याबा ? ही माझी वास्तु जाण्यापरीस आंदी माजा जीव गेला असतां तर लई ब्येस झालं असतं बगा. " भिकूचे डोळे पाण्यानं तुडुंब भरून आले.

" अरं त्या सरकारी लोकांचं खिसं गरम कर आन मंग बग कशी किमया व्हईल ती. समदी सूत्रं निराळींच हालत्याल बग."

" छाः ! छाः ! असलं काई कराया नगा सांगू तात्याबा."

" हाच योक उपाय हाय बग."

" पन त्यें घेत्याल म्हनतां ?" भिकूनं शंका काढली,

" अरं सम्दी दुनिया तशीच चाललीया नव्हं का ? त्ये काय दुनियायेगळे हायेत व्हय ? तुला न्हाय कळायचं त्ये भिकोबा. अरं मोठ्या शान्या पंडितावानी लांब लांब बाता मारतुयास आन् इत्तं कसं कळत न्हाय रं तुला ?"

पण भिकूचं डोकं हल्लीं खरोखरच चालेनासं झालं होतं.

" मंग असं काम व्हईल म्हणतां ?"

" अरं जालंच पायजे.

अन् मग भिकूनं त्या सरकारी अधिकाऱ्यांचा पत्ता शोधून काढला. पंढरीच्या वाऱ्याप्रमाणं त्याच्या त्या अधिकाऱ्यांच्या घराकडं वाऱ्या सुरू झाल्या. त्यांच्या दाराचे तो रोजच्या रोज उंबरठे झिजवूं लागला. त्याच्या हातीपायीं पडून सांगूं लागला, " काय म्हनाल त्यें करतों पन गरिबावर इत्ती किरपा करा. माजं गरिबाचं झोपडं नगा घिऊं आपल्या ताब्यांत. माडी बांधायची हाय मला त्येच्यावर. येकदां गेलं तर मंग कध्धी व्हनार न्हाय त्यें हातानं." तो अगदीं काकुळतीला येऊन परमेश्वराइतक्याच भक्तीनं त्यांची करुणा भाकी.

" अरे बाबा, पण आम्ही काय करणार ? सरकारी काम आहे तें. सरकारची आज्ञा होईल तसं आम्ही करणार. आम्ही फक्त सांगितल्या कामाचे मालक. तूं त्या अमक्यातमक्याला भेटून पहा कांहीं होतंय का "

एकानं दुसऱ्याचं, दुसऱ्यानं तिसऱ्याचं अशीं नांवं सुचवतां सुचवतां खालपासून वरपर्यंत सगळ्यांना भेटून भिकूनं त्यांची मनधरणी केली. तो रडला, भेकला. पण कोणीहि त्याची दाद घेतली नाहीं. भिकू रोज एकाला भेटायला जाई आणि हात हलवीत परत येई. खिन्न मनानं. निराश अंतःकरणानं. कधीं कधीं तो फार चिडला, निराश झाला म्हणजे मनांतल्या मनांत त्या साऱ्या लोकांना शिव्याहि हासडायला कमी करीत नसे. शेवटीं वाऱ्या करून करून, उंबरठे झिजवून झिजवून भिकू थकला. मनानं नि शरीरानंहि. मनांत समजून चुकला कीं हें काम थोड्याथोडक्यांत होणारं नव्हे वरपासून खालपर्यंत बक्खळ पैसे भरून झालं यदाकदाचित् तर नकळे. पण इतका पैसा भरायला त्याच्याजवळ पैसा होताच कुठं अन् शिवाय इतके पैसे भरूनहि शेवटीं घर राहिलं तर ठीक, नाहीं

तर कर्ज काढून पैसे भरायचे म्हणजे कर्जापरी कर्ज व्हायचं नि घरापरी घरहि जायचं नि शेवटीं हेंहि गेलं नि तेंहि गेलं नि धुपाटणं हातीं आलं; तशी अवस्था व्हायची आणि घर नि पैसे दोन्हीहि जायचीं. शेवटीं त्यानं तो नाद सोडून दिला.

आणि एक दिवस भिकूला तें घर सोडण्याचा सरकारी हुकूम आला. छोट्या छोट्या मुलांना दुसरीकडं राहायला जायचं म्हणून आनंद झाला होता. तीं नाचत बागडत होतीं. पण जाणता मुलगा होता त्याला मात्र त्याचं फार दुःख होत होतं. तो भिकूला म्हणाला, " बाबा, आपुन सोडलंच पायजे ह्यं घर ? आपलं हक्काचं हाय न्हवं ? मग सरकार कसं घेतंया ? आपुन न्हाय जायचं हतनं. पाहूं सरकार काय करतंय त्यें. "

त्याची समजूत कशी घालावी तें भिकूला समजेना. त्याला एकदम भडभडून आलं. तो कसंबसं इतकंच म्हणाला, " कायदा तसाच हाय बाबा. आपुन तरी काय करनार ? विलाजच न्हाय तवां देवाची मर्जी म्हनायची. "

घरांत बायको सामानाची आवरासावर करीत होती. खिन्न मनानं. जड पावलानं. भिकू कितीतरी वेळ नुसताच सुन्न होऊन बसून राहिला होता. मग तोहि कसाबसा उठला. उठवत नव्हतं तरी उठला. उठायला हवं होतं म्हणूनच केवळ उठला. बेड्या पायांत घातल्यासारखे पाय जड झाले होते. मणामणाचं ओझं पायांत अडकवल्याप्रमाणं तो एकेक पाऊल उचलीत होता. दुःखाच्या असाहाय्यतेच्या जाणीवेनं त्याचीं सारीं गात्रं विकल झालीं होतीं. हृदयांत एक विलक्षण पोकळी निर्माण झाली होती. ज्या ठिकाणीं आज कैक वर्षं ते हक्कानं रहात होते तिथूनच त्यांची आतां हकालपट्टी झाली होती. किडुकमिडुक जमवीत आज दोनतीन पिढ्या त्या वास्तूंत गुरफटलेले जीव एकाएकीं निराधार होऊन आयुष्यांतून उठले गेले होते. जी वास्तु त्यांची हक्काची होती तिथून ते आतां हलले नाहींत तर त्यांना धक्के मारून हुसकून लावण्यांत येणार होतं. ज्या वास्तूचं दर्शन त्यांना रोज घडत होतं, त्यावर माडी बांधायची सुखस्वप्नं ते रचीत होते, त्या वास्तूचं दर्शन त्यांना पुन्हां या जन्मांत होणार नव्हतं. कुठल्याहि जन्मांत होणार नव्हतं. त्या वास्तूचं कलेवरच काय पण त्याची चि .टभर राखसुद्धां कांहीं दिवसांनीं तिथं दृष्टीस पडणार नव्हती. त्यांचीं मनं आक्रंदन करीत होतीं. जिवाचा आकांत चालला होता. समजूत घालायची तरी कुणी कुणाची ?

शेवटीं दोघांनीं आपापल्या मनाची कशीबशी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. आल्या संकटाला तोंड देणं प्राप्तच होतं. दुःखाचे आवंढे गिळीत, मनाचा कोंडमारा सहन करीत तीं सामानाचीं गांठोडीं बांधीत होतीं. धक्के मारून हाकलून लावण्यापेक्षां आपला मान ठेवून तिथून हललेलं बरं म्हणूग ते ती वास्तु सोडणार होते.

घरांतलं वातावरण शांत, निःशब्द झालं होतं. हंसत्या, खेळत्या, नांदत्या घराला स्मशानाची अवकळा आली होती. कुणीच कुणाशीं बोलत नव्हतं. कुणी बोलायचं नि काय बोलायचं हाच मुळीं प्रश्न होता. चुकून नजरेला नजर भिडली तर तीं लगेच खालीं पहात होतीं. सारीं दुःखांत चूर होतीं. जणुं घरांत कुणी मेलं आहे अशीं. सगळं काम चाललं होतं तें मुकेपणानं, जड मनानं, निर्जीव बाहुल्यागत. मग तात्याबा त्याला भेटायला, त्याचा निरोप घ्यायला आला. भिकूशीं काय बोलावं हें तात्याबालाहि समजेना. एकाद्या माणसाचा अगदीं जवळचा आप्त वारल्यानंतर त्याचं सांत्वन करायला जावं तशीच तात्याबाची अवस्था झाली होती. मनांतून पुष्कळ बोलायचं असूनहि शब्द बाहेर फुटत नव्हते. ओठावरूनच ते मागं परतत होते. बोलायला येत असूनहि, तोंड उघडूनहि बोलतां येत नव्हतं. तो तिथं तसाच उभा राहिला, मुकाट्यानं खालीं मान घालून. पण त्याला पाहिल्यावर भिकू मात्र हंसला. अगदीं भयानक, एखाद्या वेड्यागत हंसला. तात्याबा एकदम दचकला. त्याच्या कानांत भिकूच्या हास्याचे असे कांहीं विलक्षण, भयंकर प्रतिध्वनि उमटले कीं, त्या हंसण्यापेक्षां भिकू मोठ्यानं गळा काढून रडला असता तरी बरं झालं असतं असं तात्याबाला वाटलं. तें भेसूर दृश्य तात्याबाला पहावेना. दुःखाचा उमाळा त्यालाहि आवरेना. आज वर्षांनुवर्षांचे लागेबांधे नियतीनं एका फटकाऱ्यासरशीं तोडून टाकले होते. तात्याबानं भिकूच्या पाठीवरून जरा थोपटल्यासारखं केलं अन् मुकाट्यानं तो झपाट्यानं तिथून निघून गेला.

भिकूनं अन् त्याच्या बायकोनं कसंबसं आपलं चंबूगबाळं आवरलं अन् ते तिथून बाहेर पडल्यावर त्यांनीं पुन्हां आपल्या त्या वास्तूचं दर्शन घेतलं. मेलेल्या माणसाचं डोळे भरून दर्शन घ्यावं तसं. ती वास्तूच काय पण तिचं एवढसंसुद्धां अस्तित्व आतां त्यांना तिथं दिसणार नव्हतं भिकूची नि बायकोची नजरानजर झाली. दोघांनीं खालीं माना घातल्या अन् तीं पुढं चालूं लागलीं.

:शब्दपणं, अगतिकतेनं, असाहाय्यतेनं, जड पावलानं, दुःखित अंतःकरणानं, र दोन पावलांगणिक तीं पुनःपुन्हां मागं वळून वळून त्या वास्तूकडे पहात होतीं. आतां त्यांना हक्काचं घर नव्हतं, दार नव्हतं. ते पूर्णपणें निर्वासित झाले होते. ान्यावर वरात निघाल्याप्रमाणं कुठंतरी रहाणार होते. कुठंतरी जेवणार होते. कुठंतरी निजणारबसणार होते. विंचवाच्या बिऱ्हाडाप्रमाणें पाठीवर बिऱ्हाड घेऊन हिंडत आयुष्याचा शेवट कसाबसा गांठणार होते.

आणि मग सरकारी योजनेप्रमाणं एक दिवस सरकारी अधिकारी आपल्या लव्याजम्यासह तिथं हजर झाले. रोडवायडनिंगचं काम सुरू झालं. भिकूच्या हातांत त्यांच्या घराचा मोबदला म्हणून पैसे पडणार होते. पण भिकू बेघर झाला होता. आतां भिकूच्या हातांत सरकार पैसे देणार होतं. छानशी, त्याच्या कल्पनेनं रेखली होती तशी माडी बांधून होईल इतके पण आतां माडी बांधायला त्या ठिकाणीं त्याची ती वास्तु, त्याच्या आज्यापासून चालत आलेली ती वास्तु शिल्लकच होती कुठं? ती झाली सरकारजमा. एकेकाळीं त्या ठिकाणीं भिकूचं घर होतं, त्याची वास्तु होती, याची पुसटमुद्धां खूण तिथं शिल्लक राहिलं होतं तें त्या वास्तूचं भयानक स्वरूप, भीषण चित्र, तोडून मोडून, पाडून फोडून, तुकडे तुकडे करून टाकलेली, भुईसपाट झालेली भिकूची वास्तु! नुसता मातीचा ढिगारा अन् त्याखालीं गेलेली भिकूची आपल्या वास्तूबद्दलची भावना!

भिकू आणि त्याची बायको आपलं चंबूगबाळं आवरून दुसरीकडं राहायला निघून गेलीं होतीं; पण रोज नियमानं तीं दोघं त्या जागीं, ज्या ठिकाणीं एकेकाळीं त्यांची वास्तु होती तिथं येऊन जात. भिकू रोज सकाळींच तिथं येऊन बसे. त्याची बायको मात्र संध्याकाळीं फुरसत होईल तेव्हां तिथं येई. त्या ठिकाणची नेमकी खूण त्यांना कशी पटे कोण जाणे! कारण आतां तिथं त्यांची वास्तु असल्याची पुसटशीहि नांवनिशाणी शिल्लक नव्हती. कसला अवशेष बाकी नव्हता. जनतेच्या कोटकल्याणासाठीं सरकारनं त्या ठिकाणीं केवढा मोठा एक्स्प्रेस हाय-वे तयार केला होता. पण तरीहि त्यांना ती आपली जागा कळे एवढं खरं. रोज तीं नेमकीं त्या ठराविक जागींच येत. तिथली चिमूटभर माती उचलून कपाळाला लावीत. भिकूची बायको लगेच परत फिरत असे. पण भिकू मात्र तिथं तासन् तास बसून राही. कधीं कान टोकरीत अन् त्याच काडीच्या दुसऱ्या बाजूचा तुकडा मोडून तो दाताखालीं चावीत, विचार करीत, भकास

दृष्टीनं, उदास मनानं जागेपणींच आपल्या माडीचं स्वप्न पहात. अगदीं एखाद्या खुळ्यागत.

आणि असाच भिकू एकदां सकाळच्याऐवजीं संध्याकाळीं तिथं येऊन बसला होता. आपलं तें आवडतं स्वप्न पाहात काडीनं कान टोकरीत, दांताखालीं काडी धरून ती चावीत. नेमकी त्याच वेळीं आज त्याची बायकोहि तिथं आली. भिकूला कल्पनाहि नव्हती कीं, ती रोज संध्याकाळीं अशीच तिथं येते अन् त्याच्या बायकोलाहि कल्पना नव्हती कीं, तो असाच रोज सकाळीं तिथं येऊन आपलं आवडतं, सुखस्वप्न पहात बसतो. दोघांनीं तिथली चिमुटभर माती उचलून कपाळाला लावली अन् त्याच वेळीं नेमकी दोघांची नजरानजर झाली. दोघं एकमेकाकडं क्षणभर पहातच राहिलीं. अगदीं वेड्यागत आणि मग दोघांच्याहि माना एकदम खालीं गेल्या.

■ ■

■ १२ ■

# अखेर

ती रोज दुपारी चार साडेचारच्या सुमारास इथें अशीच यायची. मंद, मधुर स्मिताचा शिडकावा करीत. मोगरीचा सुगंध बरोबर घेऊन. मोगरी-सारखीच टवटवीत चेहऱ्यानं. एक झुळझुळीत, धुतलेली साडी लेवून, काळ्याभोर, मऊसूत रेशमासारख्या लांबसडक शेपट्यावर मोगरीची टपोरी फुलं किंवा गजरा माळून. हॉस्पिटलच्या कंपॉउंडमधून खालीं मान घालून ती आंत शिरायची. वॉर्ड नं. पांच, कॉट नं. चारच्या बिछान्याशी कॉटखालीं सारलेलं स्टूल ओढून घेऊन बसायची. हा तिचा नित्याचाच सराव. सगळं कसं अगदी सहज व्हायचं. तास दीड तास बसून ती तिथून उठायची अन् रेतींतून पावलं टाकीत जावं, तशी जड पावलानं बाहेर पडायची. येतांना ती किती उत्साहात यायची. द्रुतलयींत पावलं टाकीत. ती आली कीं, त्याच्याहि अंगांत उत्साह संचारायचा, नवा जोम यायचा. ती खूप बडबडायची, हंसायची, खिदळायची. पण तरीहि तिच्या वागण्यांत, बोलण्या चालण्यांत एक प्रकारची ग्रेस होती, स्टाईल होती, मार्दव होतं. हिरव्या पानासारखी तिची तजेलदार कांति, टवटवीत चेहरा, त्यावरचं प्रसन्न हास्य, हालचालींतली चलाखी नि नम्रता. तिला पाहिल्यावर तो हरखून जायचा. स्वतःला हरवून जायचा. सुकलेल्या फिकट पानासारख्या झालेल्या त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेची रेषा चमकायची. ती आल्याबरोबर तिच्या विरोधाला न जुमानतां तो

उठून बसायचा—' हें पाहा, तुम्हांला डॉक्टरांनीं संपूर्ण विश्रांति घ्यायला सांगितलंय. लक्षांत आहे ना ? तुम्ही आपले पडल्या पडल्याच बोला कसे. किंवा तुम्ही बोलण्याचेसुद्धां श्रम घेऊं नका. मी तुम्हांला खूप गंमतीजंमती सांगीन. तुमची करमणूक करीन '—असं म्हणून ती त्याला निजायला लावायची. त्याच्या अंगावर हलकेच पायालगतची चादर टाकायची. मऊ मृदुल, प्रेमळ स्पर्शानं आपुलकीच्या, स्नेहपूर्ण शब्दानं त्याचं मन नि शरीर सुखावायचं. मग गप्पांच्य नादांत तो पुन्हां केव्हांतरी एकदम उठून बसायचा. दोघांच्याहि नकळत. तिच्या तें लक्षांत आलं कीं, ती त्याला म्हणायची — " हें काय, तुम्ही पुन्हां आपले उठून बसलांत. लक्षांतच नाहीं आलं माझ्या केव्हां उठून बसलांत तें. पडा पाहूं अगोदर. "

" अग पण मी पडलो, तर मला लागेल न, "...मधेंच अशाच कांहीं पोरकट कोट्या करून तो हंसायचा.

" हें पाहा, पोरकटपणा पुरे बरं कां, निजा आधी. नाहींतर अशानं मी उठून जाईन हं ! "...डोळे वटारून ती खोटा खोटा धाक दाखवायची.

" नको नको, तेवढं मात्र करू नकोस. या तुझ्या धाकाला मी फार भितों बघ. तूं इथेंच, अशी अगदी जवळ बस माझ्या. बोल. मी पडून ऐकतों मुकाट्यानं. पण खरं सांगूं ? आतां मला खूप बरं वाटतंय. खरंच, खूप बरं वाटतंय. "

" बरं वाटायला लागलंय, म्हणूनच काळजी घ्यायला हवी. नाहीं तर दुखणं उलटण्याची भीति. काळजी घेतली, पथ्यपाणी, औषध बरोबर झालं, तर लवकर खडखडीत बरे व्हाल, असं डॉक्टर म्हणतात. "

" खरंच डॉक्टर असं म्हणतात ? "

त्याला मग आपल्याला बरं वाटूं लागल्याची स्वप्नं पडायला लागायची. आज्ञाधारक लहान मुलाप्रमाणें तो पुन्हां अंथरुणावर पडायचा. ती पुन्हां पांघरूण घालायची. उगीच वरून जरा हात फिरवून तें सारखं करायची. तिच्या दृष्टींतलं तें प्रेम, कौतुक पाहून त्याला मनस्वी बरं वाटायचं. आपण आजारी पडलों, तेंहि उत्तमच झालं. म्हणून तर ही सारी अपूर्वाई. प्रेमाची, सेवेची, कौतुकाची. नाहीं तर आपण हें सर्व हरवून बसलों असतों. हें सुख हातांतून निसटलं असतं.

कधीहि त्याची जाणीव न होतांच...अशीहि एक कल्पना त्याच्या मनाला निसटता स्पर्श करून जायची. आपल्या या दुखण्याचाहि त्याला एक आनंद व्हायचा. हा आनंद आपल्या हृदयाच्या कुपीत तो बंद करून ठेवायचा. तो त्याला दुसऱ्या दिवशीच्या दुपारपर्यंत पुरत असे.

तासभर ती तिथें असतांना वेळ कसा उंदरासारखा पटकन् पळून जायचा आणि मग ती निघण्याच्या तयारीला लागायची. बरोबर आणलेलीं दोन चार मोगरीची किंवा दुसरी सुवासिक फुलं ती त्याच्या उशाशी त्याला वासाकरतां म्हणून ठेवायची. त्याच्याकरितां घरून कांहीं तरी खायला करून आणलेला डबा उशालगतच्या बंद कपाटांत काढून ठेवायची. आदल्या दिवशीचा रिकामा डबा पिशवीत टाकायची. एकदां चार्टवर नजर टाकायची. जातां जातां डॉक्टरांना भेटून त्याच्या औषधाची, प्रकृतींतल्या सुधारणेची चौकशी करायची अन् मग घरी परत यायची. मोठ्या आशेनं कीं, उद्यां आपण भेटायला जाऊं, तेव्हां डॉक्टर आनंदानं हंसत म्हणतील, –‘ ओऽऽ ! ही इज इम्प्रूव्हिंग नाऊ ’...पण दुसऱ्या दिवशी ती जायची, तेव्हां त्याच्या प्रकृतींत सुधारणा होत असल्याचं डॉक्टरांनीं तिला केव्हांच सांगितलं नाहीं. अन् हळू हळू तिला कळून चुकलं कीं, आपण गेल्यावर तो हंसतो, बडबडतो, पण तें सारं उसनं आहे. वरवरचं आहे. आपल्याला बरं वाटावं, म्हणून त्याच्या जिवाचा हा सारा आटापिटा आहे, या कल्पनेनं तिला आणखीच दुःख होई. त्याच्याविषयीं अधिकच कणव वाटे. तिच्या मनांत येई कीं, त्याला सांगून टाकावं, ‘ कशाला करतां तुम्ही हें नाटक ? तुमचं नाटक पाहून माझ्या मनाला क्लेश होतात. अशी फसायला मी काय आता लहान पोर का आहे ? पण प्रत्यक्ष तिथें गेल्यावर मात्र तिला हें बोलणं जमत नसे. ओठावर आलेले शब्द बाहेर पडतां पडत नसत. दोघं एकमेकाला फसवीत. नाटक करीत. ती मग तिथलं वातावरण हसण्यानं, बडबडण्यानं भारून प्रसन्न ठेवी. तोहि तिला साथ करी. ‘ डॉक्टर काय म्हणतात ग ? ’...खोकल्याची उबळ दाबण्याचा प्रयत्न करीत तो विचारी.

“ डॉक्टर म्हणतात, रोज थोडा थोडा फरक पडतोय. नक्की सुधारून ल्वकरच डिस्चार्ज मिळेल. इथून. ” खोटं सांगायचं जिवावर येऊनहि ती त्याला खोटं सांगे. खोटं सांगण्यानं त्याला खरं समाधान मिळालं तर देवच पावला. त्याला समाधान, सुख देण्याचा अल्पसा प्रयत्न दुसरं काय !

आजारी माणसाला — "वा ! तब्येत सुधारते कीं तुमची" असं तोंड-देखलं का होईना म्हणावं; तेवढंच त्याला समाधान वाटतं. दिलासा मिळतो. उलट "काय हो तब्येत बरी नाहीं दिसत—" असं तोंडाकडे किंवा शरीराकडे पाहून म्हटलं कीं, आजारी मनुष्य दुखण्यानं होत नसेल, इतका त्या बोलण्यानं नर्व्हस होतो, हा तिचा अनुभव होता.

वास्तविक क्षयाची त्याची दुसरी अवस्था होती. प्रथम तिला कल्पनाहि आली नाहीं, हें भयंकर दुखणं त्याला जडलंय. गेले काहीं दिवस त्याला अधूनमधून बारीक ताप यायचा. थोडथोडा खोकला होता. औषध चालू होतं. काढे वगैरे देऊनहि बरं वाटेना. तेव्हां डॉक्टरांना दाखवलं. डॉक्टरांनीं तिला एका बाजूला बोलावून सांगितलं—" दुखणं विकोपाला गेलंय पण बरं होण्याची आशा आहे. यापूर्वींच त्यांनीं मेडिकल एड घ्यायला हवी होती. मुलं लहान आहेत तुमची. त्यांना इन्फेक्शन लौकर होण्याचा फार संभव. तुम्ही त्यांना हॉस्पिटलमध्यें अॅडमिट करावं, हें बरं."

डॉक्टरांचं तें निदान नि सल्ला ऐकून ती विलक्षण हबकलीच होती. तरी पण वर वर मात्र काहींच न दर्शविता शांतपणें व्यवहार करीत होती. त्याच्यापासून तिनं तें अगदी गुप्त ठेवलं होतं. तिनं त्याला सांगितलं, ..." तुम्हाला लौकर बरं वाटावं, म्हणून डॉक्टरांनीं दवाखान्यांत राहण्याचा सल्ला दिलाय. घरी नाहीं म्हटलं तरी जमत नाहीं सगळं करणं दवाखान्यासारखं."

दवाखान्यांत त्याला ठेवलं आणि ती नियमित त्याला चारांच्या टोल्याला भेटायला येऊं लागली. तीनाच्या नंतर त्याचीहि नजर सारखी घड्याळाकडे राहायची, चाराची वाट पहात. चारला ती दाराकडे लागायची अन् ती दिसली कीं, तो एकदम खुलायचा. तिनं आणलेलं चैतन्य आकंठ पिऊन घ्यायचा. आणि मग त्या चैतन्याच्या धुंदीत तिच्या मधुर स्मिताचं, कौतुक, काळजीमिश्रीत नजरेचं, मनोरंजक गोष्टीचं पांघरुण लपेटून डोळे मिटून पडून रहायचा.

त्याच्याप्रमाणेंच तिच्या आगमनानें सगळ्या वार्डातच एकप्रकारचं चैतन्य संचारायचं. सबंध दिवस इकडे तिकडे हिंडलेल्या सगळ्या रुग्णाईतांच्या नजरा चारच्या सुमारास दाराशी घोटाळत. तिचं सौंदर्य तर सगळ्यांना मोहवीच. पण काहींच्या नजरेंत त्या तशा अवस्थेंतहि तिचा आकर्षक बांधा नि टंच भरलेलं

शरीर पाहून अभिलाषा चमके. त्यांची हावरी नजर त्यांच्या दुबळ्या शरीराकडे दुर्लक्ष करून तिच्यावर ठरण्याचा अट्टाहास करी.

तिला किंवा त्याला याची कांहींच कल्पना नव्हती. तिचं सारं लक्ष त्याच्यावरच केंद्रित झालेलं होतं. तो लवकर बरा व्हावा, त्याचं मन रिझवावं, तो आनंदी रहावा, म्हणून तिचा सगळा आटापिटा होता. अन् तो ? तिच्या मनाचा थोरपणा, हंसतमुख चेहरा, आनंदी वृत्ति पाहून समाधानानं तुडुंब भरला होता. आपण लौकर बरे होऊं, तिच्या सहवासाचं सुख उपभोगूं, आपलया चिमुकल्या संसारांत गुंगून जाऊं, अशी स्वप्नं पहात होता. आपल्या आजारामुळें संसाराची सगळी जबाबदारी तिच्या एकटीवर पडतेय. बिलाचा आकडा फुगतोंय, खर्चाची ओढाताण होतेय, सोन्यासारख्या दोन मुलांची आबाळ होतेय आणि तरीहि ती आनंदांत रहाते, आपल्याला आनंद देते, याबद्दल त्याला तिच्याविषयीं कृतज्ञता वाटे. आदर, कणव वाटे. तिच्याबद्दलचं त्याचं प्रेम या चार महिन्यांत आणखीनच वाढलं होतंच. नि दयाहि वाटत होती. इतका आजारी असूनहि तो कण्हत नाहीं, कुथत नाहीं, इथें तो झिजत पडलाय, दिवसानुदिवस बरा होण्याची आशा दुबळी होत चाललीय, दर दिवशीं मृत्यु समीप समीप येत चाललाय, अन् अजाणतां, अचानक एकाद्या दिवशीं तो त्याला आपल्या बाहुपाशांत कवटाळून धरील, जें दुखणं तो सोसतोय, त्याचा परिणाम काय त्याला ठाऊक नसेल ? मृत्युच्या नुसत्या कल्पनेनेंहि आपल्या जिवाचा थरकांप उडतो. पण तो थंड आहे. शांत आहे. जणूं मृत्यूची चाहूल त्याला लागलेलीच नाहीं, इतका तो आनंदी आहे. हा थंडपणा त्याचा स्थायीभाव नव्हे. तरी त्यानं मूक, सोशिक वृत्ति धारण केलीय, का ? तर आपल्या समाधानासाठीं, आपल्याला सुख, मनशांति मिळावी म्हणून. या विचारानं त्याच्या सहनशक्तीचं तिला विलक्षण कौतुक वाटे. त्याच्याविषयीं असीम प्रेम, अपार सहानुभूति वाटे. गेले चार महिने तो दवाखान्यांत आजारी असूनहि दोघं मजेंत होतीं. सुखाची देवाणघेवाण करीत होतीं.

पण एक दिवस त्याच्या हातांतून हें सुख अचानक, अजाणतां निसटलं. लिंबाच्या बीसारखं आणि मग तें तिच्याहि हातून निसटलं.

रोजच्याप्रमाणें आजहि ती प्रसन्न चेहऱ्यानं तिथं आली. तासभर त्याच्याशीं बोलत बसली नि निघून गेली. ती आली तेव्हां कॉट नं. दोनला दोन कॉलेजमध्यें जाणारी तरणी बांड पोरं भेटायला आली होतीं. त्यांतला एक तिला पाहून

एकदम अस्वस्थ झाला. तिच्यावर आसक्त झाला. त्याची हावरी, अभिलाषायुक्त नजर तिच्या टंच भरलेल्या अंगोपांगावरून फिरली अन् मग ती सारखी तिथंच घुटमळत राहिली. आपल्या मित्राच्या किंवा भेटायला आलेल्या पेशन्टच्या बोलण्याकडे त्याचं लक्षच नव्हतं. तें लक्ष केंद्रित झालं होतं सर्वस्वी तिच्यावरच. शेवटी त्याच्या मित्रानं त्याला विचारलं,...' अरे तुझं लक्ष आहे तरी कुठें ? ' डोळ्याच्या कोपऱ्यांतून तिच्याकडे पाहात त्यानं आपल्या उजव्या हाताचा अंगठा तिच्याकडे दर्शवून नाचवला त्याचा मित्र हंसला. त्यानं त्याला टाळी दिली. एकमेकांकडे पाहून त्यांनीं डोळे मिचकावले. कसं कोण जाणे, पण नेमकं त्याच वेळीं त्याचं लक्ष त्या दोन तरुणांच्याकडे गेलं. त्यानं त्यांच्या आपापसांत चाललेल्या खाणाखुणा पाहिल्या त्याच्या तीक्ष्ण नजरेनं त्यांचा अभिप्राय जाणला. त्यांची नजर, त्यांच्या खुणा त्याच्या काळजांत खुपसल्या गेल्या. अंगावर कांटा आला आणि जें व्हायला नको होतं तेंच नेमकं झालं.

त्याच्या मनांत ठिणगी पडली.

तिनंहि त्यांच्याकडे अशाच विचित्र नजरेनं पाहिलं असेल का ? त्याच्या मनांत आलं, तसंच हिच्याहि कांहीं ?... गेले पांच सहा महिने आपण असे आजारी आहोत. दोन महिने घरी, चार महिने इथें. आपला काय उपयोग होतोय तिला ? तिची उपासमार तर होत नसेल ? झाली असेल ? का तिनं या तरुण पोरांच्यासारखा...? पण छे छे ! तसं कसं शक्य आहे ! ती आपली किती प्रेमानं सेवा करते. आस्थेनं विचारपूस करते. घरचं काम करून मुलांना संभाळून जिवाचा आटापिटा करून ती इथें येते. तरीसुद्धां कधीं चिडाचीड नाहीं, रागावणं नाहीं, कीं कपाळावर बारकशी आठीसुद्धां नाहीं. उलट सदा प्रसन्न हंसतमुख चेहरा. त्याला वाटलं, आपण प्रत्यक्ष कांहीं पाहिल्यावांचून तिला उगीच दोष देण्यांत अर्थ नाहीं.

लग्नानंतरचे एक दोन प्रसंग त्याला आठवले.

ऑफिसामधून एकदां यायला त्याला खूपच उशीर झाला. ऑफिसमध्यें इन्स्पेक्शन असल्यामुळें त्याला लेट बसावंच लागलं. तिनं किती वेळ वाट पाहिली त्याची डोळ्यांत प्राण आणून. केवढी घाबरली ती. वाट पाहून पाहून दमली नि शेवटी त्याला शोधायला निघाली. फोन काय, ऑफिसमधल्या चार लोकांच्या घरीं जाऊन चौकशी काय धांवाधांव केलीन नुसती. केवढी घासाघूस

होऊन आली होती ती घरी. आपल्याला पहातांच केवढा आनंद झाला तिला. तिच्या डोळ्यांनीं कृतींनीं लगेच तो व्यक्तहि केला. तिच्या उतावीळपणाची, प्रेमाची केवढी चेष्टामस्करी केली त्या दिवशी शेजाऱ्यांनीं.

नामसादृश्यामुळें अशीच एकदां केवढी धमाल उडाली. आपल्याच नांवाचा एक इसम ॲक्सिडेंट होऊन गाडीखालीं तिथल्या तिथे गेला, असं तिला कळलं. मनांत शंका आल्याबरोबर तिच्या तोंडचं पाणी पळालं. पंधरा मिनिटांत देवाला छपन्न नवस बोलली ती ऑफिसमधें तिचा आलेला फोन आपण स्वतः घेऊन सुखरूप असल्याचं सांगितलं. प्रत्यक्ष आपल्या आवाज कानी पडल्यावर तिच्या जिवांत जीव आला. केवढा मोठा सत्यनारायण केलान तिनं त्यासाठीं. तीच ही आतां अशी वागेल? साध्वी पतिव्रतेची छिनाल स्त्री होईल? सतीची व्यभिचारी स्त्री होईल? नाहीं. तें शक्य नाहीं! पण तसं नाहीं. आतां कदाचित तें शक्य होईलहि. त्यावेळीं आपण चांगले ठणठणीत होतो. मग ती आपल्यावर आसक्त असली, तर नवल तें काय? पण आतां आपण असे अंथरुणाला खिळून राहिल्यावर ती वाहवण्याची शक्यता नक्कीच आहे. पण मग ती इथें आल्यावर इतकी प्रेमानं कशी वागते? का तें सगळं नाटकच आहे? आपल्याला वस्तुस्थितीचा थांगपत्ता लागूं नये म्हणून हा अभिनय तर नव्हे?

सुल्ट उलट, उलट सुलट विचारांचा गुंता वाढतच होता. त्या रात्रीं त्याला धड झोंपहि आली नाहीं.

दुसऱ्या दिवशी ती आल्यावर आदल्या रात्रीं मनाशी योजल्याप्रमाणें त्यानें तिला कांहीं खोचक प्रश्न विचारले. तिनें भाबड्या मोकळेपणानं सगळ्या प्रश्नांची उत्तरं दिलीं. तिच्या उत्तरांतून त्याला धड कांहींच निष्कर्ष काढतां येईना पण त्या दिवशी त्याच्या मनांत जी शंका शिरली ती साफ पुसली जाईना. अधून मधून त्याच्या मनांत तो विचार आल्यावांचून राहिना. आपण असें मरतमढें मग ती कोरडी ठणठणीत कशी राहिली असेल? रात्रीं अंथरुणावर पडल्या तो विचार त्याला सतावी. त्याचा पिच्छा पुरवी. त्याला ग्लानी आल्यासारखें वाटे. मग ती भेटल्यावर तिला तो प्रश्नावर प्रश्न विचारून तिच्या मनांतलं काढून घेण्याचा प्रयत्न करी त्याच्या मनात चाललेल्या या आंदोलनाची तिला कल्पनाहि नव्हती. त्याच्या उत्साहाला, आस्थेवाईपणाला ती दाद द्यायची.

एक दिवस तिच्या बोलण्यावरून त्यानं तर्क बांधला कीं, शेजारचा मेघश्याम त्याच्याकडे नेहमीं येतो. तो मुलांना फिरायला नेतो, त्यांना खाऊ आणून देतो. मुलंहि त्याला मामा करून बिलगतात. मेघश्याम त्या दिवशीच्या त्या तरुणा-एवढाच आहे. त्यालाहि तिच्याविषयीं आकर्षण वाटत असेल का? हें मानाचं जोडलेलं नातं खरं कशावरून असेल? आपण तिथें असतांना कुठें मेघश्याम इतका येत जात होता? मग आतां त्या दोघांचं कांहीं...

त्या नंतर एक दिवस अचानक तिच्याबरोबर त्याला भेटायला म्हणून मेघ-श्यामहि आला. त्यांना दोघांना एकत्र आलेले पाहून तो विलक्षण अस्वस्थ झाला. आधीच शंकाकुशंकानी त्याच्या मनाला भोक पाडलं होतं. त्यांत ही भर पडली. त्या दोघांना त्यानं वेडेवांकडे प्रश्न केले. मात्र वरकरणी तो साळसूदपणाचा आव आणीत होता. मोठ्या प्रयासानं आपलं मन आवरीत होता. त्यांच्या बोलण्या-वरून कशाचा मागमूस न लागूनहि त्याचं मन बिथरलं. आपल्या भोंवतीं शंका-कुशंकाचं जाळं त्यानं तयार केलं नि त्यांत तो अडकत अडकतच चालला.

ती आली, म्हणजे तिच्याशीं तो पहिल्यासारखा हंसेना, बोलेना. मधेंच तो मूडी बनायचा. लहर लागली, तर बोलायचा. नाहींतर नुसताच तिच्याकडे संशयी दृष्टीनं पहात रहायचा. त्याचं असं पाहाणं तिला कांहींतरी वाटायचं. ती म्हणायची, "असें काय पहातां माझ्याकडे विलक्षण नजरेनं?"

मग तो भानावर यायचा. म्हणायचा,—"छे, छे! विलक्षण? कुठें काय?"

त्याचं मन होडीत बसल्यासारखं असं हेलकावत असतांना मधें दोन दिवस ती दवाखान्यांत आलीच नाहीं. मग तिसऱ्या दिवशीं ती नेहमींप्रमाणें हंसतमुखानें आली. ती आल्याची चाहूल लागल्याबरोबर त्यानं पटकन् तोंडावरून पांघरूण घेऊन झोंपेचं सोंग घेतलं. अलगद पावलनं ती त्याच्या बिछान्याशीं येऊन उभी राहिली. तिला तो स्वस्थ झोपलेला दिसला. कपाटांत वस्तु ठेवून तिनं आपली पिशवी रिकामी केली. अन् तो उठण्याची ती वाट पहात बसली. दहा पंधरा मिनिटं झाली, तरी तो उठण्याचं चिन्ह दिसेना, त्याला उठवावं का नाहीं? तिला प्रश्न पडला. 'जाऊं द्या. चांगली झोंप लागलीय. विश्रांति मिळेल,'—असं स्वतःशींच म्हणत ती गॅलरीत येऊन पांच दहा मिनिटं उभी राहिली. पुन्हा आंत गेली. तरी तो झोपलेलाच होता. तसाच, मधेंच पांघरूण बाजला करून त्यानं हळूंच पाहिलं. ती बाहेर गेलेली होती. तो पुन्हां डोळे मिटून पडून राहिला.

तिनं दोन तीनदां आंत बाहेर केलं. काय करावं, तिला सुचेना. मग तिनं आजूबाजूच्या एक दोन स्त्री पेशन्टसची विचारपूस केली.

" आज त्यांना चांगली झोंप लागलेली दिसतेय '—सात नंबरची स्त्री पेशन्ट म्हणाली.

" हो ना. असं कधीं झालें नव्हतं "–ती म्हणाली,–" रोज ते माझ्या येण्याची किती वाट पहात रहातात. "

" खरंच दवाखान्यांत असं पडून राहाणं केवढं मनस्तापकारक आहे, याची निरोगी लोकांना कल्पना नाहीं येणार. हें दुःख एक तो पेशन्ट नि परमेश्वरच जाणे ! वाटतं, रोज कुणी तरी प्रेमाचं माणूस भेटायला यावं. तेवढाच दिलासा. जिवाला विरंगुळाहि. "

" मला कल्पना आहे आजारी माणसाच्या मनाची. म्हणूनच रोज न चुकतां येते मी इथं. "

" तुमच्यासारखी माणसं फार थोडी. रोग्याचं दुःख नि मनहि जाणणारी. नाहीं तर रोज रोज यायचं म्हटलं कीं, कंटाळतात लोक. नित्य मरे त्याला कोण रडे. "

" असं म्हणून कसं चालेल ? आपल्याला देतां येईल तेवढा रोग्याला दिलासा द्यायचा. दुखणं कांहीं कुणाचं कुणाला देतां घेतां येत नाहीं. देवाण-घेवाण करायची ती गोड शब्दांची, भावनांची, एकमेकाच्या सुखदुःखाची. आजारी माणसाच्या भावनांना फार जपावं लागतं. "

" हुं ! " त्या बाईनं एक जड निश्वास सोडला. ती थोडी हंसली पण त्यांत विषाद होता. तिला तें चांगलंच जाणवलं.

तिला ठाऊक होतं कीं, ती बाईहि आज कित्येक दिवस त्याच्या सारखीच इथें बिछान्यांत पडून होती. सुरुवातीला नवरा नि मुलं नियमानं येत. पण आतां सगळीं कंटाळलीं आहेत. कुणालाच तिच्याबद्दल ओढ राहिलेली नाहीं. कर्तव्यच म्हणून केवळ तिचा नवरा क्वचित् येतो. नि तें कर्तव्य पार पडलं कीं, सुटकेचा निश्वास टाकून निघून जातो. ती बाई विचारी आयुष्याचा एकेक दिवस मोजीत इथें मृत्यूची वाट पाहतां पाहतांहि मधूनच बरी होण्याची आशा करतेय.

ती त्या बाईशीं बोलण्यांत गुंतलीय, हें त्यानं हलकेच पाहून घेतलं नि कूस बदलली. तेवढ्यांत तिचं लक्ष नेमकं तिकडे गेलं. ' अग बाई, जागे झाले वाटतं.' तिच्या स्वरांत खूप आनंद होता. ती जवळ आल्याचं पाहून तो पुन्हां पांघरूण ओढूं लागला. पांघरुणांत गुंतलेला त्याचा हात तिनं हलकेच बाजूला केला. मंद, मधुर स्मितानं तिचा चेहरा उजळला, ' झोंप झाली नाहीं का अजून ? केव्हांची आलेय मी. बसून बसून कंटाळा आला अगदी. "

तो कांहींच बोलला नाहीं. त्यानं फक्त जांभई दिली.

" पुरे झाली न आतां झोप. ' तिच्या स्वरांत लाडिकपणा होता.

त्याला वाटलं, तिला विचारावं, ' हे साखर पेरलेले शब्द तुझ्या तोंडांतून बाहेर पडतात तरी कसे ? नुसता मुखवटा. वेगडी, तकलादू प्रेम ! जायचंस न तूं इथून निघून, तुला कंटाळा आला होता तर बसून बसून. मला ठाऊक आहे, तुला इथं येण्यांत आतां कांहीं स्वारस्य राहिलेलं नाहीं. केवळ कर्तव्य म्हणून तूं येतेस. लोकलज्जेस्तव देखावा करतेस. ' पण ओठांवर आलेले शब्द त्यानं मागं परतवले. आळोखे पिळोखे देत आळस दिला.

आपल्या न येण्यानं तो फुरंगटलाय, हें तिला समजलं.

" दोन दिवस माझी खूप वाट पाहिली असाल ना ? किती कंटाळा आला असेल नुसतं पडून पडून. पण काय करूं ? मला जरा बरं नव्हतं. "

त्याला वाटलं, काय धाड झालीय हिला ! चांगली टुमटुमीत तर दिसतेय. कुठं मागमूस नाहीं चेहऱ्यावर आजारपणाचा. उगीच साळसूदपणाचं पांघरूण ! त्याच्या मनांत एक विलक्षण विचार डोकावला. खरंच ही कधींच आजारी कशी पडत नाहीं ? इतक्या वर्षांत आपण हिला कधींहि साधं पडसंसुद्धां झालेलं पाहिलं नाहीं. टोमॅटोसारखं लालबुंद शरीर आहे नुसतं. नि आपण मात्र इकडे रोज मरतोय. खरंच हीसुद्धां एकदां चांगली सणसणीत आजारी पडावी, आपण एकदम ठणठणीत व्हावं प्रकृतीनं. हिच्यासारखं टंच भरलेलं शरीर, दगडासारखं टणक. मग तिचीहि आपण प्रथम प्रथम अशीच प्रेमानं चौकशी करावी. आणि मग नुसते साखर पेरलेले शब्द. फक्त शब्द. आणि कृति मात्र कांहीं नाहीं. नुसता मुखवटा.

तिच्या ठणठणीत प्रकृतीचा हल्लीं त्याला हेवा वाटूं लागला होता.

ती एकटीच पांच पहा मिनिटं बडबडली. तिच्या प्रश्नांची त्यानं मामुली उत्तरं दिलीं. मग मुलं शाळेंतून घरीं येण्याची वेळ झाली, म्हणून ती उठली.

त्यानंतर मग रोज असंच होत राहिलं. ती यायची, तेव्हां तो मुद्दाम झोंपेचं सोंग करायचा. ती बसून बसून कंटाळायची आणि निघून जायची. एक दोनदां तिनं त्याला उठवण्याचा प्रयत्न केला, तेव्हां डोळ्यांवर झोंपेची सुस्ती असल्यागत त्यानं ते उघडले अन् तो पुन्हां झोंपून गेला. नव्हे, त्यानं झोंपेचं ढोंग केलं. तो असं मुद्दाम ढोंग करतोंय, याची तिला कल्पनाहि नव्हती. तिला वाटायचं, त्याची प्रकृति दिवसानुदिवस खालावते. हंसाबोलायचीसुद्धां त्याच्या अंगांत ताकद राहिली नाहीं. उमेद, इच्छा राहिली नाहीं. अशक्तपणानं डोळ्यावर झापड येतेच. भविष्यकाळाच्या जाणिवेनं तिच्या जिवाचा नुसता थरकाप उडे.

काय करावं, तिला कळेना.

ती आपली नुसतीच तिथं तरीहि जात राहिली.

त्यानंतर तीन दिवस ती पुन्हां येऊं शकली नाहीं. मग चौथ्या दिवशी ती आली. मोठ्या उत्साहानं. ती आलेली दिसतांच त्यानं डोळे मिटून घेतले. तिनं त्याला उठवलं. त्याच्या कपाळावर सूक्ष्मशी आठी उमटली. तिच्या तें लक्षात आलं. तिला अपराध्यागत वाटलं—' झोंप फार येत असली तर झोपा थोडा वेळ. मी बसते. ' ती संकोचून म्हणाली.

" कशाला बसतेस ताटकळत ? मला झांप येतेय. "

" तीन दिवस जमलं नाहीं मला यायला, म्हणून राग तर नाहीं आला ? "

" तुझ्यावर रागावण्याचा मला काय अधिकार ? "

" म्हणजे ? "—ती एकदम चापापली. त्याच्या शब्दांतला उपरोधिक कडवटपणा तिला जाणवला.

" तसं नव्हे ग. आधीच तुला त्रास होतोय रोज रोज येण्याचा. माझं दुखणं हें असं चिकट. किती दिवस चालेल न किती दिवस नाहीं. कदाचित्.. पुढं मागं कांहीं बरं वाईट...' त्यानं स्वतःला सावरलं. त्याच्या स्वरांत ढोंगीपणा, खोटं मार्दव होतं. पण ती फार भोळी होती. त्याच्या शब्दांतल्या ढोंगीपणाला फसण्याइतकी भोळी होती. त्याच्या शब्दांतलं खोटं मार्दव, ढोंगीपणा तिला जाणवलाच नाहीं.

" इश्श ! असलं अभद्र कशाला बोलता ? '–त्याच्या तोंडावर हात ठेवीत ती म्हणाली–' तो विचारसुद्धां नको. डॉक्टर तर म्हणताहेत, आतां व्हाल लौकरच बरे. "

" काय होत होतं तुला ? "

" अंग मोडून आलं होतं. दोन दिवस पित्तहि झालं होतं खूप. "

" पित्त ? "–त्याच्या शब्दांना पुन्हां कडवटपणा आला. धार आली. त्याच्या स्वरांतल्या कडवटपणाचा तिला वासहि आला नाहीं. तिचं तिकडे लक्षहि गेलं नाहीं.

" हो, का कोण जाणे बाई. फार पित्त झालं होतं." भाबडेपणानं ती म्हणाली–" अरू मीनाच्या वेळेला झालं होतं असं. नाहीं ? एरवी कधी आठवत नाहीं मला पित्त झाल्याचं. "

" तेंच नवल वाटलं मलाहि. "

त्याला वाटलं, ' काय बेराकी आहे ही बाई. चक्क सागतेय, डोहाळपणाशिवाय असं कधी झालं नाहीं. प्रत्यक्ष आपल्या नवऱ्याला हें सांगायला लाज नाहीं वाटत ? आपल्या वागण्यातलं काळवेरं उघड उघड...शीः शीः ! बरं तें सुद्धां साळसूदपणानं. ही म्हणे आजारी होती. आजारपणाचा लवलेश, चिन्ह तरी आहे का चेहऱ्यावर ? कसलं आजारपण तें कळलं आम्हाला, म्हटलं, बाईसाहेब हा बच्चंजी कांहीं कच्च्या गुरूचा चेला नाहीं. हुं ! मला फसवण्याचा प्रयत्न करतेस काय ? तुझ्या बारशाच्या बुगऱ्या खाल्ल्या आहेत मी. "

त्याच्या मनांत शंकेनं ठाण मांडलं.

ती आली म्हणजे तो झोपेचें ढोंग करूं लागला. क्वचित् बोललाच. तर हुं हां पलिकडे बोलत नसे. नाहीं तर असं कांहीं तरी बोले कीं, ज्यामुळें तिच्या मनावर ओरखडा निघावा, तिला वेदना व्हावी.

तो असा का वागतो, याचं कोडं तिला उलगडत नव्हतं. दुखण्यानं माणसं चिडकी बनतात. असं ती मनाचं समाधान करून घेत होती. पण एक दिवस तिचें हेंहि समाधान हरवलं. तो तिला म्हणाला–" रोज रोज येत जाऊं नकोस तूं आतां. "

" का ? "

" बोलावसंच वाटत नाहीं मला. "

"पण तुम्ही नका बोलूं. मी बोलीन एकटीच. नाहींतर नुसतीच बसेन."

"तुझं असं वागणंहि आग्रही वाटतं मला."

"तें कसं?"

"तुला नुसतं बसवून ठेवणं जिवावर येतं माझ्या. मग बोलणंच भाग पडतं. शिवाय तुलाहि घरीं माझ्या गैरहजेरीमुळें सुनं सुनं वाटण्याचं, न करमण्याचं कारण नाहीं. माझ्या ऐवजी मेघश्याम आहे तुला आतां तिथें."

अभावितपणें तो हें बोलून चुकला. बोलायचं नाहीं असं ठरवूनहि तोंडावर ताबा न राहिल्यामुळें तो हें स्पष्ट बोलून गेला. मग त्यानं खूप सारवासारवी केली –"शिवाय मुलंहि आहेतच करमणूक करायला." असं म्हणून आपल्या शब्दांवर पांवरूण ओढलं.

पण त्या दिवशीं तिला त्याचं खरं स्वरूप कळून चुकलं. आपल्याशीं अलीकडे तो असा का वागतो, या प्रश्नाचं उत्तर तिला मिळालं. पण उत्तर सांपडून उपयोग झाला नाहीं. आपल्याशीं तो असा वागतो, तो मनांत संशय निर्माण झाल्यामुळें, ही जाणीव झाल्यावर ती खूप अस्वस्थ झाली. त्या रात्रीं ती खूप रडली. हुंदक्यांनीं तिचं शरीर नुसतं गदगदून गेलं. "छे! आपली त्यानं हीच का पारख केली? आतांपर्यंत आपण जी तपश्चर्या केली, त्याचं हेंच का फळ? एकापरीनं त्याचें दुखणं आपण भोगलं. दुखणं त्याला झालं पण त्याच्या विलक्षण असह्य कळा आपल्याला काढाव्या लागल्या. शारीरिक नि मानसिक केवढा ताण माझ्या मनावर आहे, तो मी आनंदानं सहन करते. याची त्याला कांहींच जाण नसावी! कशी त्याची खात्री करून देऊं कीं, मी पवित्र आहे? सीतेनं अग्निदिव्य केलं. माझ्यांत ती मनाची शक्ति, धारिष्ट्य नाहीं. मी काय करूं? माझ्या प्राणाचं गंगाजळ त्याला अर्पण केलं, तर त्याची खात्री पटेल?" विचार! विचार! विचार! अतिविचारानं तिचं डोकं भणभणलं. तिला एकप्रकारची ग्लानी आली. शारीरिक नि मानसिकहि.

आतां त्याच्याकडे जावं तरी पंचाईत, न जावं तरी पंचाईत. दुसऱ्या दिवशीं तिला मोठा प्रश्नच पडला. त्या दिवशीं मग ती गेलीच नाहीं. तिचं डोकंहि खूप ठणकत होतं. पण पुढेंहि दोन तीन दिवस ती गेली नाहीं.

ती अशी लागोपाठ तीन चार दिवस आली नाहीं, तेव्हां तो खूप अस्वस्थ झाला. त्याला तिचा विलक्षण संतापहि आला. त्याच्या डोळ्यापुढें मेघश्यामच्या

नि तिच्या किळसवाण्या कृत्याचं चित्र सारखं तरळत राहिलं. त्यानं कल्पनेनं चितारलं होतं तसं. त्यांचे प्रेमालाप, त्यांच्या गुजगोष्टी त्याच्या कानांत घुमूं लागल्या. आणि त्याचा तो राहिला नाही.

अलीकडे असंच व्हायचं. ती आली तरी तें त्याला असह्य होई. मनांत नको नको ते विचार धुमाकूळ घालीत. तो आंतल्या आंत चिडायचा, जळफळायचा, खऱ्या तापापेक्षां या संतापानं तो निष्प्राण बनायचा. त्याच्या डोळ्याची विलक्षण आग व्हायची, अंग तापानं सणसणायचं. खोकल्याची उबळ वाढायची, आणि मग ती येऊं नये, असं वाटूनहि तो तिची वाट पहात राहायचा.

आजहि तो अशीच तिची वाट पहात राहिला. साडेचार वाजून गेले. ' ती आजहि येत नाहीं, बहुतेक. गेले तीन दिवस ती आली नाहीं. आज अजून आली नाहीं. पण कदाचित् उशीरानें येईल. मधें एकदां आली होती तशी. मग मानभावीपणानं प्रेमाचं प्रदर्शन करील. आज तें प्रदर्शन तिला करूं द्यायचं नाही.' तो स्वतःशींच पुटपुटत होता—" आतां आपल्या मनावर ताबा राहिला नाहीं. सहनशक्तीनं मर्यादा गांठलीय. दुःख दाबण्यानं दुखणं वाढतंय. आज ती आली कीं, तिच्या कृत्याचा जाब विचारायचा. तिला नाहीं नाहीं तें बोलून तिचं पाप चव्हाट्यावर ठेवायचं. त्याशिवाय मनाचं समाधान होणार नाहीं. मन हल्कं, मोकळं होणार नाहीं. "

तिला काय बोलायचं, तें मनाशीं ठरवून त्यानं वाक्यांची जुळवाजुळव केली. आणि तिच्या येण्याची वाट पहात तो स्वस्थ पडून राहिला, व्हरांड्यांतून येणाऱ्या तिच्या पावलांची चाहूल लागते का तें पाहात.

रुग्णाईतांना भेटायला येणाऱ्या माणसांची ये जा सुरू झाली. त्यांच्या आपापसांत चालणाऱ्या गप्पांनीं इतका वेळ निपचित पडलेला व्हरांडा शब्दांकित झाला. इकडून तिकडे जाणाऱ्या डॉक्टरांच्या बुटांचे टॉक टॉक आवाज येत होते. त्यांच्या मागून पळणाऱ्या नर्सेसची धांवपळ जाणवत होती. पलीककडच्या वॉर्ड-मधें कांहींतरी गडबड चालली होती खास. त्याच्या मनांत तें जाण्याची जिज्ञासा निर्माण झाली. दोन माणसं आपापसात काहीं बोलत त्याच्याच वॉर्डाशी आली. त्याचे कान नकळत तिकडे लागले.

" काय रे ही धांवाधांव कसली चाल्लीय ? "

ते दोघेजण पाच नं. वॉर्डाच्या दरवाजाशीच बोलत उभे होते. त्याची कॉट दरवाजाला लागूनच होती. साहजिक त्यांचं बोलणं त्याला स्पष्ट ऐकूं येत होतं.

" तुला कळलं नाहीं ? डॉक्टर नर्सेससकट सगळी पळताहेत नुसतीं."

" पलीकडच्या वॉर्डमधला तो चार नंबरचा पेशन्ट "...त्यानं एक दीर्घ सुस्कारा सोडला.

" काय झालं त्याचं ? "...विचारणाराचा उत्सुक अधिरा स्वर.

" खलास झाला मघाशी. डॉक्टरांनीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली पण त्यांच्या हाताला यश आलं नाहीं. विधिलिखित कुणाला चुकलंय ? "

" अरेरे ! "...ऐकणारा हळहळला.

एक मिनिट स्तब्धता पसरली.

त्यानंहि तें ऐकलं नि तो अस्वस्थ झाला. नकळतच त्यानं आपल्या अंगाला हात लावून पाहिला. अंगांत ताप होताच. खोकल्याची एकदम उबळ येणारसं वाटलं. " आपलंहि दुखण वाढलंय कदाचित् त्या पेशन्टसारखंच एक दिवस... छे ! विनाकारण मनांत शंका. हा बोलून चालून दवाखाना. इथें मरण हें नित्याचंच. हॉस्पिटलच्या तें सारं सवयीचंच. जीवनमरणाचा लपाछपीचा खेळ पण इथें मरण पुष्कळदां जीवनाचा पाठलाग करतं. त्याला शोधून काढून आऊट करतं. एकानं लपायचं, दुसऱ्यानं त्याला शोधून काढून आऊट करायचं, मग पुन्हां लपायचं, शोधायच...सगळं तेंच. तो पेशन्ट गेला एकापरी बरं झालं. आपला मृत्यु त्यामुळें सुद्धां कदाचित् टळेल. त्याचं आयुष्य आपल्याला मिळेल. " नवीनच मनांत डोकावलेल्या या विचारानं त्यांच्या मनांत आशा पल्लवित झाली.

" खरंच ! नवल वाटतं. काय तब्बेत होती तिची. गाजरासारखा लालबुंद चेहरा, उंच भरलेलं शरीर "—त्या दोघांचं भाषण पुन्हां सुरू झालं.

" तुझ्या माहितीची होती ती बाई ? "

इतका वेळ मधे विचार करीत पडलेला तो त्या दोघांचं बोलणं पुन्हां कान देऊन ऐकूं लागला.

" तशी माहितीची नव्हती. पण थोडीबहुत माहिती कळली या तीन दिवसांत. माझ्या बहिणीला अन् तिला एकाच दिवशी ॲडमिट केलं. पलीकडच्या वार्डात माझ्या बहिणीला बघायला रोज येत होतो मी इथें. "

" काय झालं तरी काय तिला एकाएकीं ? "

" परवां माइल्ड हार्ट अटॅक आला. शेजाऱ्यांनीं तावडतोब ॲडमिट केलं तिला इथें. "

" म्हणजे तिचं कुणीच नाहीं नात्याचं ? "

" आहे न. लहान लहान दोन मुलं आहेत घरीं अन् नवरा आजारी आहे म्हणे याच हॉस्पिटलमध्यें आज चार महिने. "

" तो कसा आहे आतां ? "

" कोण जाणे ! "

" त्याला नाहीं कळलं ती गेल्याचं ? "

" अं हं ! त्याला कळवूं नका म्हणून तिनं डॉक्टरांना परोपरीनं विनवून सांगितलं. पहिला अॅटक माइल्ड होता. शारीरिक नि मानसिक फार ताण, श्रम पडल्यामुळें असा अचानक अॅटॅक आला, असं डॉक्टरांचं निदान होतं. डॉक्टरांना आशा होती तिच्या सुधारण्याची पण तिनं आपल्या तब्बेतीचं अचूक निदान केलं अन डॉक्टरांना सांगितलं. " आपण आजारी असल्याचं त्याला न कळवण्याचं डॉक्टरांच्याकडून तिनं वचन घेतलं. रोज बिचारी ह्याच वेळेला येत असे म्हणे इथे नवऱ्याला बघायला न चुकतां. आज त्याच वेळेला ती गेली. "

" ती म्हणाली होती त्याच वेळेला ? "

" हो. अगदीं त्याच दिवशीं, त्याच वेळेला. माझी बहीण सांगत होती मला सगळे. डॉक्टरांनासुद्धां कळलं नाही. पण तिला कळलं होतं म्हणे तिचें मरण. "

" आश्चर्य आहे खरोखर. खरी पतिव्रता होती बिचारी. "

" हो ना. खंगत पडलेल्या नवऱ्याच्या आधीं या दगडासारख्या टणक शरीराच्या बाईला मरण आलं. तिची इच्छाशक्ति दांडगी असावी. "

त्यानं त्या दोघांचें तें बोलणं ऐकलं नि त्याच्या मनांत विलक्षण शंका आली. ही बाई म्हणजे तीच तर नव्हे ? एकदम त्याच्या अंगांत कुठलं बळ आलं कोण जाणे ! वात झालेल्या माणसासारखा टुणकन् उडी मारून तो वार्डाबाहेर पळाला. डे डयुटीची नर्स वॉर्डमधल्या पेशंटबद्दल आर. एम्. ओ ना सांगायला गेलीं

होती. हां हां म्हणतां म्हणतां तो पलीकडच्या वार्डमध्यें घुसला. कॉट नं. ४ रिकामी होती, ती रिकामी कॉट पाहून तो धाडकन् खालीं कोसळला.

आणि नेमकी त्याच वेळीं ती रोजच्याप्रमाणें पांच नं. च्या वार्डामध्यें प्रवेश करीत होती. मोगरीचा सुगंध बरोबर घेऊन, टपोऱ्या मोगरीसारखीच टवटवीत; प्रसन्न चेहऱ्यानें.

■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अनुक्रम ९३८६८ वि. कथा
क्रमांक २२२८ नोंद दि. ३०.३.६९

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १०१५८ नों. दि ............
वि. कथा क्र. ................

IRBK-0114156